म. ग्रं सं ठाणें

विषय ... जिल्हे ...

सं. क्र. 021.

REFBK-6065969

नेलँकर प्रकाशन : १ :

हरि विनायक

अंतरंग

- भालाकार कॉलिंग
- सरस्वतीच्या सिंहासनापुढें
- साहित्त्यिकांचें स्वयंवर
- विचार तरंग
- घसा साफ करून

REFBK-0005969

लेखक

हरि विनायक वाडेकर.

किंमत १॥ रुपया.

कार्तिक शुा १
शके १८६२.

: प्रकाशक

बा. म. नेलेकर,
मालक नेलेकर बुकडेपो,
बुधवार चौक, पुणें २.

[सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन]

: मुद्रक :

प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
३३५ शनिवार पेठ, पुणें २.

शाबास हरिभाऊ

पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची ही भानगड माझ्या आयुष्यांत दुसऱ्यांदा माझ्या गळ्यांत पडत आहे. माझी पहिली प्रस्तावना मला चांगली आठवते. चांदणी-चौक या नांवाचं पुस्तक होतं तें. अन् त्याला "दिल्ली दरवाजा" किंवा "आसराची वेस" असली कांहींतरी इमारती (constructive !) प्रस्तावना लिहिली होती मी. माझे मित्र तिजवरून माझी चेष्टा करीत असत. त्यांना माझी ही दुसरी प्रस्तावना वाचून आणखी थट्टा करायला फावलं नाहीं म्हणजे मिळविली.

प्रस्तावना हा ज्यांचा फुरसतीचा धंदा म्हणतां येईल असे आणि दुसऱ्याच्या पुस्तकाला केव्हांही प्रस्तावना न लिहिणारे असे दोन्ही प्रकारचे नामवंत साहित्यिक माझ्या पहाण्यांत आहेत. पहिल्या प्रकारच्या लेखकांची लोकांनीं केव्हां केव्हां थट्टाही केलेली आहे. पण मला वाटतं कीं तेच लेखक बरे. कारण प्रस्तावनेच्या निमित्तानं तरी ते नव्या नव्या लेखकांचं लिखाण वाचीत असतात. आजकाल ही गोष्ट फार दुर्मिळ झाली आहे.

समकालीन इतर लेखकांचं वाङ्मय नियमानं वाचणारे नामवंत साहित्यिक तर राहूं द्याच; पण सहज हातांत आलेल्या नव्या पुस्तकाकडे तरी त्यावेळीं कितीकांचे लक्ष जात असेल कुणास ठाऊक ! वाडेकर, तुमचं लिखाण जरी मी मधून मधून वाचीत असलों तरी तुमचे सर्व लेख या पुस्तकांत एकत्र पाहिल्यावर तुमचं कितीतरी वाङ्मय वाचायचं राहिलं आहे. असं मला वाटायला लागलं. आणि नव्यांपैकीं एका चांगल्या कसलेल्या लेखकाचं सुंदर वाङ्मय हरिभाऊ, तुमच्या या पुस्तकामुळं मला वाचायला मिळालं म्हणून मला माझंच अभिनंदन करायला पाहिजे.

सुंदर वाङ्मय म्हैट्लंय मी. आणि आपल्या सारख्या तरुण नवोदित लेखकांना सुंदर वाटण्यांसारखं खरोखरीच आहे तें. तसं पांहिलं तर तुमची भाषा उपमा अलंकारांनीं नटलेली नाहीं. साधी सुटसुटीत नि ओघवती आहे. पण ती जिवंत आहे. जिवंतपणांतच तिचें सौंदर्य आहे. बंडगार्डनच्या उद्यानांत सुंदर नक्षीकाम करून बांधलेलं ते पाण्याचं कारंजें पुष्कळांनीं पाहिलं असेल. भोंवतालीं नीटनेटकीं आंखलेलीं फुलझाडें आणि त्यांच्या मध्यभागीं तें कारंजें. पण आम्हांला नाहीं तें तितकं सुंदर वाटत. त्यापेक्षां शेजारीच त्या भव्य बांधावरून धडाधडा कोसळून फेसांळणारं पाणी आम्हांला अधिक रम्य वाटतं. जिवंतपणा आहे ना त्याच्यांत ?

या पुस्तकांतले तुमचे " विचारतरंग " वाचून शाबास हरिभाऊ हे उद्गार माझ्या तोंडून आपोआप बाहेर पडले. मला कुणी विचारलं, यातलं अगोदर काय वाचूं, तर मी सांगेन, आधीं विचारतरंग वाच. नाटकी जगाच्या तावडींत सापडलेलं आणि कठीण परिस्थितीनं गांजलेलं आजचं तरुण मन कसं सारखं हेलकावे खात राहतं, याचं हरीभाऊ, फार उत्कट नि हृत्कंपक चित्र तुम्हीं या विचारतरंगांत काढलेलं आहे. किती जोरदार नि मनाचा ठाव घेणारी तुमची भाषा ? नी वाचल्यावर तुम्हीं किती कलम कुशल आहां हें निराळं सांगायला कां पाहिजे कुणाला ?

फडक्यांचं सुंदर लिखाण भरपूर वाचलेलं, अन् त्यांत तुमच्या मनाच्या मोकळेपणाची भर. मग तुमचे विचार कागदावर उतरविताना लेखणी अडखळेल कशाला ? तुम्हां लेखकांच्या लेखणीला इतकं सहज सुंदर वळण लावण्याचं श्रेय आणखी कांहीं थोड्या लेखकांना असेल. त्यांत कदाचित् कांहीं पाश्चात्य लेखकही येतील. पण फडक्यांचं स्थान त्यांच्यांत प्रमुख ठरेल असं मला वाटतं. कांहीं ठिकाणीं तर तुमची कथनशैली थेट फडक्यांच्या गुजगोष्टींच्या वळणावर गेलेली दिसते.

तुमच्या विचारतरंगांत आणि इतरत्रही पेरून दिलेल्या अगणित रेघा Dashes—पाहिल्या कीं तुम्हीं फार Dashing लेखक आहांत असें कोण म्हणणार नाहीं ? वाक्या वाक्यांत एकवाक्यता न ठेवतां इतका तुटकपणा कशाला ठेवलांत हरिभाऊ ? खरं सांगायचं म्हणजे सुंदरश्या मटारांच्या उसळींत कोंथिंबिरीच्या काड्या लागाव्यात तशा वाटतात त्या. छापखान्यांत पूर्णविरामाचीं टिंबें कमी पडतील अशी भीति वाटून तर ही त्यांची सोय पाहिली नाहीं ना ? पुढच्या लिखाणांत हें काडेचिराईत कमी कराल कां ?

गार्डिनरच्या निबंधांचा बांधेसूद सहज सुंदरपणा तर तुमच्या विचारतरंगांत आहेच. पण शिवाय ल्यूकसच्या पद्धतीप्रमाणं तुमच्या प्रत्येक तरंगाला छोट्याश्या कथानकाची पार्श्वभूमि आहे. त्यामुळं वाचतांना कंटाळा येण्याचं किंवा तरंगांची तुफान लेक्चरबाजी होण्याचं संकट कुठंच उद्भवत नाहीं. पुन्हां थोडक्यांत बरेच विचार मांडल्यामुळें ते स्फटिकवत् (Crystallise) झालेले आढळतात. " धुतलेले तांदूळ " आणि " ह्याला कारण ? " या दोन तरंगामध्यें साहित्यगुणांचा इतका प्रकर्ष आहे कीं, जणूं काय तुमचे विचार सजीवरूप धारण करून मनाच्या पडद्यावरून एखाद्या चित्रपटासारखे धावत जात आहेत. " आयुष्याची किंमत आठ आणे " नि " जनरल स्टोअर्स " यांत वस्तुस्थितीचा कडवटपणा ध्येयवादी तरुण मनाला किती जाणवतो याचं उत्कृष्ट प्रत्यंतर पहायला मिळतं.

" असें कां ? " असं विचारून तुम्हीं आकांक्षा नि त्यांची पूर्तता यांतील पदोपदी पडणारी विसंगति वाचकांच्या पुढं मांडली आहे आणि वाचकांनीं तुमच्या " why ? " ला उत्तर द्यावं अशी तुमची आकांक्षा दिसते. आयुष्यांतली ही चुकामुक (माझं त्याला चुकामूक हें नांव आहे) आपणां सर्वांनाच थोड्याफार प्रमाणांत जाणवते. Life is a game of hide and seek हें स्टीव्हन्सनचं वाक्य पदोपदीं पटतं. पण हरिभाऊ, ही चुकामूक नसती

तर मानवीप्राणी सतत धडपडले नसते. जीवनांत जिवंतपणा राहिला नसता, जगांत जें Life दिसतं तें या चुकामुकीमुळंच आहे असं नाहीं कां वाटत तुम्हांला ? ज्या दोन व्यक्तींची गांठ ज्यावेळीं पडावी त्यावेळीं त्यांची गांठ पडत नाहीं. म्हणूनच तर या जगाची रंग-भूमी झाली. कथाकादंबऱ्यांना या चुकामुकीमुळेंच तर रंग येतो. चुकामुक अजिबात नसती तर आपल्या जगाचं विगवेन सारखं एक घड्याळ वनून जातं.

प्रेम आणि समाज यांच्या कैचींत तरुण मनाची विलक्षण ओढा-ताण होत असते. एका इंग्रजी पुस्तकांत वाचलेली एक गोष्ट आट-वली. ती या मनस्थितीची बरोबर कल्पना करून देईल.

नुकतंच लग्न झालेलं एक प्रेमळ जोडपं नाटक पहायला आलेलं होतं, नाटकांत नायक आणि नायिकेची बरीच चुकामूक होऊन शेवटीं त्यांचं मीलन झालेलं दिसतं. दोघांच्या भावना उचंबळून येऊन नायक—नायिका एकमेकांच्या बाहुपाशांत बद्ध होतात. तें दृश्य पाहिल्याबरोबर या जोडप्यालाही प्रेमाचा उमाळा आला आणि त्यानें तिचें पटकन चुंबन घेतलें.

परंतु समाज बिथरला. भर समाजांत आपल्या प्रेयसीचं असं चुंबन घेणं कायद्यांत गुन्हा होता. त्यामुळं लोकांनीं त्याला पोली-सच्या ताब्यांत दिलें.

मॅजिस्ट्रेटच्या समोर जबाब देतांना वकिलाच्या शिकवणुकीमुळं त्यानं बचाव दिला. " साहेब, चुकून माझ्या बायकोचं चुंबन घेतलं मीं. अशी चूक पुन्हां माझ्या हातून होणार नाहीं !"

मॅजिस्ट्रेटनें त्याला एकवेळ माफी केली. पण कोर्टांतला त्याचा जबाब ऐकल्यावर बायकोनं आकाशपाताळ एक केलं आणि त्याला घरांतून हांकून दिलं !

ही ओढाताण तुमच्या लेखांतून फार प्रभावी रितीनं रंगविली गेली आहे यांत शंका नाहीं. " घसा साफ करून " तुम्हीं लिहिलेल्या

विचारचित्रांचा नंवरही या करतांच मी वराच वर लावतों. समाजांत वरवर शिष्टसंमत दिसणाऱ्या अनेक गोष्टींतील रहस्य तुम्हीं आपल्या „मार्मिक आणि भेदक विचार सरणीनं लोकांपुढें उघड करून दाखवलं आहे. निव्वळ " हम तुम और वो " असले त्रिकोण निर्माण करून समाजापुढें प्रश्नचिन्हं उभीं करणाऱ्या लेखकांपेक्षां हें सत्यशोधन मला अधिक आवडतं.

ज्याच्या " शरीराचा शनवारवाडा नि मनाचा फुटका बुरूज " झालेला आहे अशा माणसानं जरी तुमची ही विचारचित्रं त्याच्या जाड कांचांच्या चष्म्यांतून वाचलीं तरी त्याला आपल्या कांचा पुन्हां पुन्हां पुसून तीं वाचण्याचा मोह होईल. त्याचं विचारयंत्र गंजून पडलेलं असलं तरी तुमचे लेख वाचून फार जलदगतीनें धावूं लागेल.

यावरून एक आठवलं, हरिभाऊ. तुमच्या लिखाणांत पुण्याचीं अनेक प्रेक्षणीय स्थळं विचारखुलावटीसाठीं तुम्हीं फार मार्मिकपणानं वापरलीं आहेत. ही तऱ्हा मोठी गंमतीची वाटते. आयुष्याचं ओंकारेश्वर, मनाचं मुंबई ऑफिस, छबीच्या झग्याचा हवेली तालुका, पहिल्या मानाकरितां सोन्यामारुति, शीलाची भोकरवाडी, अशीं कितीतरी उदाहरणं सांपडतील. एखाद्या प्रश्नावरून खूप वाद माजला कीं, केवढं सोनपत पानपत झालं, असं म्हणण्याचा आपल्याकडे प्रघात आहे. भूगोल नि भाषा यांचा असा समन्वय तुम्हीं पुण्यापुरतां पुष्कळच ठिकाणीं घालून दिलेला आहे. पण " वऱ्याच्या सदऱ्याचं टिळक पंचांग " करून आपण सोयीप्रमाणं सण तर उरकून घेतला नाहीं ना ?

आमच्या (आणि तुमच्याही) पुण्यांतलीं बरींच प्रेक्षणीय स्थळें वाचकांच्या नजरेला आणून तुम्हीं या लेखांची उपयुक्तता वाढविली आहे. आतां त्यामुळं तुमच्या या खटाटोपालां थोडसं स्थानिक स्वराज्याचं स्वरूप आलेलं दिसतं खरं. एखादेवेळीं पुणें म्युनिसि-

पालिटीनं यापुढं यांपैकीं कांहीं स्थळांचीं नांवं वदललीं तर तुम्हांला पुस्तकास correction slips ही जोडाव्या लागतील. पण त्याला इलाज नाहीं. सक्तीचं ब्रह्मचर्य लादलें गेलेल्या, तुमच्या लंगोटबंद तरुणाला भिकारदास मारुती भोंवतीं फिरावं लागल्यास त्याचा दोष आपल्याकडे थोडाच येतो !

" सरस्वतीच्या सिंहासनापुढें " बारासाहित्यिकांना खेंचून तुम्हीं त्यांचे तीन तेरा केलेत. असा आरोप कदाचित तुमच्यावर येईल, अदालतीच्या पिंजऱ्यांत उभे करून त्यांची उलटतपासणी केल्यामुळं कांहीं विनोबांचा वानर झालेला दिसतो. या उलटतपासणींत त्यांच्या नाक डोळ्यांऐवजीं किंवा सोट्या—कासोट्या ऐवजीं साहित्याची तपासणी झाली असती तर हा आरोप तुमच्यावर येताना.

वैयक्तिक टीका करायला बसलं म्हणजे पुष्कळ वेळां असं होतं हरिभाऊ, कीं नुसते मथळे वाचून मजकुरावर टीका करणाऱ्या संपादकाप्रमाणं किंवा वधूपरीक्षेंत नानाथेर करणाऱ्या सनातनी मुलाच्या बापाप्रमाणं आपण करायाला लागतो. नवरी मुलगी करायची म्हटली, कीं तिचा तिरवा डोळाही " अचपळ " ठरतो आणि तीच करायची नसली, कीं तिच्या कमलनयनांकडेही डोळे-झांक होते.

वैयक्तिक टीका करूं नये अशा मताचा मी नाहीं. लोकांच्या सामाजिक व राजकीय विचारांना योग्य वळण देण्याच्या सद्हेतूनं केलेली वैयक्तिक टीका अवश्य पाहिजे. तात्यासाहेब केळकरांच्या घरसोडीच्या स्वभावामुळं महाराष्ट्र राजकारणांत मागें पडला अशी प्रामाणिक समजूत असेल, तर त्यांच्या त्या स्वभाववैशिष्ट्यावर वैयक्तिक टीका—अर्थात् सद्भिरुचीची मर्यादा संभाळून—करणें केव्हांही अक्षम्य ठरूं नये. दत्तोपंत पोतदार तात्यासाहेबांच्या अर्घ्य-वचनांत गेल्यामुळं खरोखरीच जर महाराष्ट्र युनिव्हर्सिटी धूळ खात असल, तर दत्तोपंतांना त्याबद्दल खुशाल चिमटे घ्या, कोपरखळ्या द्या.

परंतु तात्यासाहेबांचं झोन तिकीट दत्तोपंत लग्न समारंभाची निमंत्रण पत्रिका म्हणून पुढं करतात, हें काडतुस उडवून हरिभाऊ तुम्हीं कोणती शिकार साधलीत ? सुधारणा होऊन त्याच व्यक्तीचं शक्ति-सर्वस्व सत्कारणी लागावं याकरतां केलेलं दोषादिग्दर्शन किंवा सगळ्या समाजाचं कल्याण करण्याकरतां एखाद्या व्यक्तीचं ढोंग चव्हाट्यावर मांडणं या गोष्टी निराळ्या, पण केवळ एका मोठ्या माणसाला घायाळ करण्यांत आपण किती बिनतोड भाषाप्रयोग आणि कल्पना चमत्कार लढविले, आपण केवढे टिंगल बहादूर आहोंत, या बढाई करतां लेखणी चालविण्यांत कार्य तर होत नाहींच, पण आपल्यालाही सुख लागत नाहीं. एकादा सेंचरी बॅटस्मन लौकर औट होत नाहीं म्हणून विकेट कीपरनं हातचलाखी करून हळूंच त्याच्या बेल्स उड-वाव्यात तसा हा प्रकार होऊन मन खात राहतं. आपण खेळाडू वृत्तीनं वागलें नाहीं ही जाणीव मनाच्या कुठल्या तरी कोपऱ्यांत राहतेच.

भालाकार कॉलिंग या उपरोधिक लेखमालेंत याचं एक उदाहरण सापडतं—

त्या गांधीसारखी या बोटावरची थुंकी त्या बोटावर करून मीं काय लोकांना झुलविलं आहे ? हें एक वाक्य पाहा. आणि त्याच्याच पुढं—

" वीरावाल्यानं पाठींत लाथ मारल्यावर ठाकुरांची थैली उपटून पळून जाणं याला काय नांव देतां ! " आणि—

" मी धडधडीत नीरा म्हणून ताडी ढोसतो आहे. "

हीं दोन वाक्यें पहा. तुमच्या प्रामाणिक समजुतीप्रमाणें तुमचे विचार बोलून दाखविणारं पहिलं वाक्य क्षम्य ठरेल. पण पुढचीं दोन वाक्यं ? बरं, त्यांतील आरोपाबद्दल म. गांधी थोडेच तुमच्या-विरुद्ध कोर्टांत जाणार आहेत ? पण तुमचं मनच पुढं मागं तुम्हांला खाईल. आपण कांहींतरी unsportsman like केलं असं

वाटेल तुम्हांला. Art displays good and conceals bad सिंक्लेअरचं म्हणणं खरं असेल तर या वैय्यक्तिक टीकालेखांत तें तुम्हीं उर्दू पद्धतीनं पाळलं आहे, असं नाहीं कां ?

'साहित्यगुदाम' या माझ्या पुस्तकांतील तीनचार लेखांत मीं हीच चूक केली. त्यावेळीं हौस वाटली मला तें लिहितांना. आज वाटतं आपण 'रडी डाव' खेळलों. Satire is like a waterspray. It fits and cleanses the face; but does not injure it. हीं एका पाश्चात्य लेखकाचीं वाक्यं आठवतात आणि तुम्हांलाहि सांगावसं वाटतं, "वाडेकर, In the long run it does not pay."

उदयोन्मुख साहित्यिक आणि प्रथितयश साहित्यिक यांच्यांत नेहमींच Pride and Prejudice मधल्या एलिझाबेथ न् डार्सी यांच्याप्रमाणं नातं असतं. पुढच्या काळांत तें तसंच राहणार आहे. त्यानं उद्वेग वाटून ओढ साहित्यिक नि दे त्याला फांशी असं आपण कां करावं ?

भालाकार कॉलिंग, सरस्वतीच्या सिंहासनापुढें, आणि साहित्यिकांचें स्वयंवर या तुमच्या त्रिफळ्यांत भाषेचा उपरोधिकपणा फार मार्मिक नि प्रखर आहे. कांहीं व्यक्तींच्या बाबतींत तुम्ही मारलेले बाण थोडे कमीच वाटतात. पण उपरोधिक भाषेला जें अनुपान असावं लागतं तें तुमच्या लेखांत कमी आहे, त्यामुळं ती तितकी परिणामकारक झाली नाहीं. उपरोधिक टीकेंत गुदे आणि गुदगुल्या हीं दोन्हीं समप्रमाणांत असावी लागतात. पैकीं गुदे—कोपरखळ्या या भागांत विपुल आहेत. पण त्याचं अनुपान ज्या गुदगुल्या, त्या फार थोड्या. तुमच्या प्रतिभेंत विनोदाची कसर आहे, पण त्यापेक्षां अधिक प्रभावी जंतु नाहीं असं मला वाटतं. उलट मनाच्या सूक्ष्म संवेदना उत्कटतेनं प्रकट करून भावनांचं तुफान उडवून देणें हेंच तुमच्या प्रतिभेला अधिक आवडतं असं दिसतं.

पंधराव्या पानावर " कामरसाचीं गुऱ्हाळें " या सदरखालीं— " यांनीं म्हणायचं भटकभवाने " वगैरे जें लिहिलंत तें गाळलं असतं तर तुमची टीका कमी तिखट झाली असती कां ? छे उगीचच तुमच्या लेखणींतून हा गाळ कागदावर उतरला.

प्रसिद्ध व्यक्तींवर खुसखुशीत टीकाशब्दांनीं व चित्रांनीं कर-ण्याचं एक विशिष्ट तंत्र आहे. अशा बऱ्याच टीका वाचून किंवा Caricatures पाहून आपल्याला तें समजतं. एकच उदाहरण देतों—

हिटलरच्या राजवटींत कांहीं औद्योगिक योजनेकरतां मोठं थोरलं कर्ज उभारण्याकरतां एक जर्मन मुत्सद्दी अमेरिकेंत गेला. एका श्रीमंत अमेरिकन पेढीवाल्याकडे जाऊन तो म्हणाला,

" आम्हांला तीन कोटी डॉलर्स कर्ज हवं आहे "

" ठीक, पण तुमचं तारण ? " पेढीवाल्यानं विचारलं.

" तारण ? तारणाला काय तोटा ? " तो जर्मन मोठ्या आढ्य-तेनं म्हणाला, " आमच्या जर्मनींत जमिनीच्या खालीं अफाट खनिज संपत्ती आहे आणि जमिनीवर आमचे फ्यूहरर. (हिटलर).

" थोडं चुकलं " अमेरिकन शांतपणें म्हणाला, " या दोन तारणांची उलटापालट केलीत तर तुमच्या मागणीचा विचार करूं "

अशा तऱ्हेची साहित्यिकांचीं व्यंगचित्रं तुमच्या सरस्वतीच्या सिंहा-सनापुढें पहावयाला मिळत नाहींत असं नाहीं. य. गो. जोश्यांना —संसारी माणसं स्वयंपाकघरांत तुला नेऊन तुझा गौरव करतील, हा सरस्वतीनं दिलेला आशीर्वाद, कांहीं साहित्यिक वसल्याजागीं दांतओठ खात, मनांतल्या मनांत जेधेमॅन्शन करतात, अऱ्यांच्या व्याख्यानांत ऐकण्यासारखं कांहीं नसलं तरी पहाण्यासारखं बरंच असतं. नटसम्राट + लुगडें = भावी वधू आणि नटसम्राट—लुगडें = जांवईबुवा इत्यादि तुमची मार्मिक, अर्थपूर्ण वाक्यं मी कधींही विसरणार नाहीं. पण त्याबरोबरच——अत्रे केस विंचरून छबीला

शोभा आणावी म्हणून केशकर्तनालयांत गेले आणि अगदीं गं. भा. होऊन बाहेर आले, अशासारखे कांहीं ढेकूण या लेखांच्या त्रयोदशगुणी विड्यांबरोबर मध्येंच लागतात ना ! असो.

अशा तऱ्हेचा 'सरसनिरसपणा--असला तरी एकंदर पुस्तक वाचल्यावर वाचकांना तुम्हालां उद्देशून " शाबास हरिभाऊ "— असंच म्हणावं लागेल. नव्या लेखकांत, हरिभाऊं तुमच्यासारखे कसबी लेखक—(कसाबी नव्हे) आणखीही असतील. ते साहित्य-मजलशींत मागच्या बांकावर बसतात, किंवा त्यांना बसावं लागतं, म्हणून त्यांचा गाजावाजा होत नाहीं. पुढच्या बांकावर आणून त्याचं मानाचं स्थान त्यांना देण्याचं कार्य, हरिभाऊ, तुम्ही व आम्ही मिळून करूं या. Perfection of practice is always aimed; never attained या कार्लाइलच्या उक्ती-तला आशय आपल्याला समजतो. आपण आपलं लिखाण हें वाक्य मनांत ठेऊनच करीत असतो. अलीकडचीं हीं पोरं--हीं काय लिहिणार ? यांचे उथळ विचार पहा. भाषेची देखील धड ओळख नाहीं. नुसता इथून तिथून थिल्लरपणा. यांनीं काय निर्माण करावं वाङ्मय !--अशी ओरड करणाऱ्या आहिताग्नींच्या अग्यारीपासून विश्राममंडळांतील बुद्धुकांपर्यंत सर्व सनातनी साहित्यिकांनीं एकदां आमच्या हरिभाऊंचा हा ' हरि विनायक ' वाचून पहावा.

वाचकहो, तरुणांच्या जीवनांतील सारा झगडा, प्रतिकूल परि-स्थितींतून डोकें वर काढण्याची त्यांची तडफ आणि कुठल्याही अन्यायाविरुद्ध त्यांनीं कुंकूंतल्या नीरेच वाण घेऊन पुकारलेलें बंड, हें सारं तुम्हांला हरिभाऊंच्या या लिखाणांत पदोपदीं सांपडेल. असे हरिभाऊ आपल्या तरुण पिढींत लेखणी घेऊन पुढें सरसावले म्हणजे कशाला हवेत ते तुमचे गॉर्की नि डोस्टोव्हस्की !

--वि. मा. दी. पटवर्धन.

आंभार—

माझ्या लेखांचें स्वतंत्रपणें पुस्तक काढण्याचें धाडस करून मला ऋणी केल्याबद्दल नेर्लेकर बुकसेलर ह्यांचे आभार मानले पाहिजेत. माझे परमे स्नेही नि विविधवृत्ताचे सहसंपादक रा. रा. चं. वि. वावडेकर, ह्यांनीं 'हरि विनायक' ही व्यक्ति रसिकांना परिचित करून दिली. वावडेकरांनीं माझ्या लेखनाचें कौतुक केलें. मला आपलेपणाचे भावनेनें पुढेंहि आणले--तेव्हां--त्याचेहि आभार मानण्यांत मला विशेष आनंद नि अभिमान वाटणार आहे. त्याच-प्रमाणें माझे अपरिचित संपादकत्रय—रा. रा. रा. का. तटणीस, अनंत काणेकर, मो. ग. रांगणेकर--ह्यांनींहि मला उत्तेजन दिलेलें आहे. विशेषतः काणेकर--रांगणेकर ह्या संपादकद्वयांनीं—'सरस्वतीच्या सिंहासनापुढें' ही लेखमाला प्रसिद्ध करून मला रसिकां-च्या पुढें' आणलें ही जाणीव सदैव माझ्या अंतःकरणांत जागृत राहील..

श्री. वि. मा. दी. पटवर्धन (प्राध्यापक कर्नाटक कॉलेज, धारवाड) ह्यांनीं प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

माझे साहित्य स्नेही—रा. गोविंद भिकाजी रानडे, र. गं.. विद्वांस, गं. स. दाते, वि. ग. भिडे, वि. प्र. महाजन, न. वि. घारपुरे—ह्यांनींहि मला बरीच मदत केलेली आहे. त्याचप्रमाणें मला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहाय्य करणारे मित्र—रा. वा. ग. म्हाळगी, रा. म. नेर्लेकर, दि. मो. हातवळणे, अ. म. नेर्लेकर—ह्यांचाहि उल्लेख करणें जरूरीचें आहे.

क्षमस्व—प्रस्तुत लेखसंग्रहांत ज्या ज्या व्यक्तींचा-उल्लेख केलेला आहे, त्या त्या व्यक्तींबद्दल मला अत्यंत आदर आहे. कोणत्याही व्यक्तीचा—हेतु पुरस्सर बदनामी करण्याचा माझा मानस नाहीं.

५६२ रविवार पेठ,
पुणें नं. २.

रसिकांचा
ह. वि. वाडेकर
३१-१०-४०

प्रकाशकाचें निवेदन—

ललित-वाङ्मयाचे प्रांतांत आम्हीं पहिलेंच पाऊल टाकीत आहोंत. परंतु हें पाऊल टाकण्यापूर्वी आम्हांला जर कोणत्या गोष्टीची अंतःकरणांत जाणीव निर्माण होत असेल तर ती म्हणजे मुंबईचे प्रख्यात—पुस्तक विक्रेते नि प्रकाशक **बाळकृष्ण लक्ष्मण पाठक**—ह्यांच्या सुरुवातीपासूनच्या कृपेची. मुळांत त्यांचें असलेलें दुकान आमचेकडे त्यांचेच कृपेनें आल्यानंतरही आमच्या पाठीशीं त्यांची पुण्याई नसती तर आजच्या धकाधकीच्या मामल्यांत कसावसा टिकाव धरून रहाणेंही कठीण झालें असतें. मातेच्या प्रेमळपणानें पाठकांनीं आम्हांला लहानाचें मोठें केलें—आणि "लेकरा लेववी माता अलंकार। नाहीं अंतपार आवडीसी" या दृष्टीनेंच ते आमच्याकडे सदैव पहातात.

प्रकाशनाचें कार्य हातीं घेतांना आम्हांला आमचे स्नेही श्री. **हरि विनायक वाडेकर** ह्यांच्या विविध लेखनसंग्रहाचा उपयोग करून घेतां आला—ही गोष्ट आनंदाची आहे.

यापुढेंही उत्तम पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें आमचें ध्येय आहे.

आमचे तरुण चित्रकार श्री. बालकृष्ण अनंत कल्याणकर ह्यांनीं पुस्तकासाठीं—जे चित्रकार ह्या नात्यानें सहाय्य केलें त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

प्रतिभा मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांच्याहि सहकार्याचा उल्लेख करणें जरूरीचें आहे.


नेर्लेकर बुकसेलर, पुणें.
प्रकाशक.

पितृचरणों—

लेखक—



हरि विनायक वाडेकर.



● भालाकार कॉलिंग—

[भास्करभाऊ मोपटकर यांचें भाला पत्र आज बंद असल्यामुळें हिंदी राजकारणाची मोठीच हानि झाली आहे यांत शंका नाहीं. लग्नाची घाई चालू आहे पण चौघडेवाला पळून गेला आहे. गौरी-हराकडून नवरी उठून मंडपांत आली, पण मंगलाष्टकें म्हणणाऱ्या भिक्षुकांचा पत्ता नाहीं, अशी स्थिति भालाकारांच्या गैरहजेरीमुळें आजच्या राजकारणांत उत्पन्न झाली आहे. भालाकारांच्या गैरहजेरी-मुळें राजकीय विचारसरणी व मतप्रचार यांना जो एकांगीपणा आलेला आहे, तो चटण्या-कोशिंबिरीशिवाय भोजनाचें प्रयोजन, त्याप्रमाणें रूक्ष वाटतो. भाला नाहीं म्हणून राजकारणांत उत्साह नाहीं, भाला नाहीं म्हणून राजकारणांत चैतन्य नाहीं, असें उदास-वाणें स्वरूप राजकारणाला आलें आहे. भालाकार हे द्रष्टे आहेत. ही गोष्ट आतां महाराष्ट्राला पूर्णपणें पटली आहे. भालाकारही या जाणिवेनें मनांत संतुष्ट राहिले असतील; पण त्या आत्मप्रत्ययानें अथवा कृतकार्यतेमुळें त्यांचें अवतारकार्य संपत नाहीं. चालूं राज-

कारणांतील प्रत्येक महत्त्वाच्या व बिनमहत्त्वाच्या मुद्द्यावर आपलें विशिष्ट मत काय आहे हें आतां जनतेला त्यांनीं अधिक जोरानें व ठासून सांगणें जरूर आहे. पण भालाकारांच्या औदासिन्यामुळें त्यांचीं मतें त्यांच्या पत्रांतून जाहीर होणें जवळजवळ अशक्यप्रायच झालें आहे. वाचकांना लागलेली ही दुधाची तहान ताकावर भागविण्यासाठीं माझ्या रेडिओवर भालाकारांना मधून मधून बोलावून त्यांची मतप्रणाली जिवंत ठेवण्याचा प्रयत्न मी करणार आहें. भाला पत्रांतील भालाकारांची वाणी ही शरीरी वाणी होती, माझ्या रेडिओवरील त्यांची वाणी ही अशरीरी वाणी आहे. पण तेवढ्या फरकामुळें भालाकारांच्या मतांत फरक पडणार नाहीं अशी हमी मी देतों. कांहीं चूकभूल झालीच, तर ती कृपावंत होऊन भाऊरावांनीं दुरुस्त करून घ्यावी अशी त्यांना माझी सविनय विनंती आहे.]

— १ —

मी लोकमान्यांचा मट्ट पण घट्ट शिष्य बोलत आहे. नीट सावधान चित्तानें ऐका. माझी आणि माझ्या मतांची आतांपर्यंत तुम्ही खूप चेष्टा केलीत; पण आतां मीच बरोबर होतों हें तुम्हांला समजून आलें. आतां महाराष्ट्रांतलीं तुम्ही सर्व पत्रें त्या मोहात्म्याच्या नांवानें कोकलत आहां; पण कां रे बाबांनो, आतां कां कोकलतां? गांधींच्या महात्म्याची त्यावेळीं तुमच्या डोळ्यांवर धुंदी चढली होती, आणि हा भालाकार तुम्हांला कस्पटासमान तुच्छ वाटत होता! त्याचा तुम्ही नाहीं नाहीं त्या रीतीनें पाणउतारा केलात. त्याला वांगड्यांचा अहेर केलात—त्या वांगड्या मी अजून जपून ठेवल्या आहेत. त्याला भोजन—भैरव म्हणालांत, त्याला विक्षिप्त ठरविलेंत. त्याला सनातनी म्हणून शिवी दिलीत. त्याच्या बाबागाड्यांची कुचेष्टा केलीत, आणि मेजवानींत लवंड्या द्रोणाबद्दल वाट्या टेवा म्हणून मी म्हटलें तर मला द्रोणाचार्य ही पदवी देऊनही तुम्ही

मोकळे झालांत. कां रे बाबांनो, मी विक्षिप्तपणा केला ? माझीं स्पष्ट मतें मीं मांडलीं हा काय विक्षिप्तपणा होतो ? विक्षिप्त म्हणणाऱ्या लोकांना आजही आव्हान देऊन मी विचारलें कीं, मी विक्षिप्त कसा हें सिद्ध करून द्या. मला या विशेषणाची मोठी चीड आहे. त्या गांधीसारखी ह्या बोटावरची थुंकी त्या बोटावर करून मी काय लोकांना झुलविलें आहे, कीं धडधडीत नीरा म्हणून ताडी ढोसतों आहे ? राजकोटच्या ठाकूराच्या दरवाजावर जीव देतों म्हणून धरणें धरून बसून नंतर वीरावाल्यानें पाठींत लाथ मारल्यावर ठाकुरांची थैली उपटून पळून जाणें ह्याला तुम्ही काय नांव देतां ? हजारों लोकांना बेकारीच्या वणव्यांत टाकून देऊन मुंबई इलाख्याचें दिवाळें वाजविणाऱ्या दारुबंदीच्या अचरट प्रयोगाला तुम्ही काय म्हणतां ? हा मात्र विक्षिप्तपणा नव्हे, आणि हा भालाकार भोपटकर जें म्हणतो आणि करतो तो मात्र विक्षिप्तपणा ! हा कुठचा न्याय ?

दोन खंबीर गडी

लोकप्रिय माणूस झाला म्हणजे त्यानें वाटेल तो विक्षिप्तपणा केला—अगदीं शेण खाल्लें तरी तो शहाणपणा होतो आणि माझ्यासारख्या धट्ट माणसानें छातीठोकपणा दाखविला कीं, त्याला विक्षिप्त म्हणून फिदीफिदी लोक हंसतात; पण अखेर आम्हींच शहाणे ठरतों. हा भालाकार भोपटकरच आतां शहाणा ठरला आहे. गांधीला राजकोटमध्यें कालपरवांच वीरवाला भेटला; पण महाराष्ट्रांत त्याचें तोंड तुरट करणारा महाराष्ट्राचा आवळा जर कोण प्रथम भेटला असेल, तर तो मीच; हा **भालाकार भोपटकर.** तो काठेवाडचा वीरवाला तर मी महाराष्ट्राचा मावळा. हे दोन गडी गांधीला खंबीर भेटले. गांधी हा महात्मा नसून मोहात्मा आहे, आणि देशाचा व धर्माचा सत्यानाश करायला तो उठला आहे, हें आम्हीं दोघांनींच ओळखलें आणि त्याच्या मोठेपणानें

दिपून गेलों नाहीं. आमचे तात्यासाहेब आणि त्यांच्याबरोबर आमचे अण्णासाहेबही डोक्यावर सुतकी टोपी ठेऊन गांधींच्या तमाशांत नाचले होते. तेही गांधीला भुलून गेले होते; पण मी मात्र तसा कधींही नाचलों नाहीं आणि मला नाचतांही येत नाहीं. नाचावें कोणीं ? ज्यांनीं बृहन्नडा होऊन पायांत घुंगुर अडकविले आहेत त्यांनीं. ज्यांचा कासोटा घट्ट नसेल, त्यांनीं; ज्यांनीं हातांत बांगड्या भरून लाटणें घेतलें आहे, त्यांनीं; माझ्या हातांत लाटणें नाहीं, भाला आहे; भाला आणि फाळ मोडला तरी दांडा अजून घट्ट आहे. राजकारणांत चमकतां यावें म्हणून ह्या नाचऱ्या पुरुषी वायका ठुमकत मुरडत राहतात. शंकरराव देव सुद्धां लुंगी लावून नाचतात; पण नाचरेपणाचा धोका काय असतो हें माहीत आहे काय ? शंकरराव देवांनाच विचारा, म्हणजे ते सांगतील. नाचतांना वस्त्रांत पाय घसरून पडण्याची भीति असते आणि नाचतांना एकदा माणूस पडला, कीं त्याचें वस्त्रसुद्धां जाग्यावर राहात नाहीं. मग लोक त्याच्यावर अंडींफेक करतात. शंकरराव देवावर अंडीं कां फेकण्यांत आलीं ? ते नाचतांना पडले म्हणून व लोकांना त्यांचा अवतार बघवेना म्हणून. ते लुंगी नेसले, तरी शेवटीं त्या लुंगींतच अडकून पडले.

दांडीमार्च–नवा शब्द.

लोकमान्याप्रमाणें ज्याला राजकारण करावयाचें आहे, त्यानें पाय घट्ट ठेऊन राहिलें पाहिजे. विशाद नाहीं लोकप्रियता नाहीं मिळाली म्हणून ! नाचरेपणानें मिळविलेली लोकप्रियता जास्त दिवस टिकत नाहीं. तिचें शेवटीं हंसें होतें. त्यापेक्षां खुशाल घरीं बसून शिरा चापावा, लोकप्रियतेच्या मागें लागून अंडीं खात पडण्याऐवजीं साजुक तुपानें लिबलिबलेला केशरी शिरा चापणें जास्त हितकर असतें. गांधीवाद्यांना या शिऱ्याचें महत्त्व समजावयाचें नाहीं. ते

शिरा खाणार नाहींत. गांधींचें अनुकरण करून खाल्लें तर खजूर आणि मध खातील, आणि मग करतील काय ? तर दांडी-मार्च; ब्रह्मचर्यस्खलन या अर्थी दांडीमार्च हा नवा शब्द मी बनवीत आहे. म्हातारपणीं सुद्धां दांडीमार्च करावासा वाटतो यांचें कारण खजूर आणि मध या ऊष्ण पदार्थांचें सेवन. शिऱ्यामध्यें हा दोष नाहीं. तो पुष्टिदायक आहे, पण तो असें कांहीं भलतेंसलतें होऊं देणार नाहीं. गांधींनीं प्रसाददीक्षा लिहिली. शीः शी शी; म्हातारचळ लागण्याचें आणखी तें काय बाकी राहिलें ? प्रसाददीक्षेंतून तो तसा प्रसाद पाघळण्यास गांधीच कशाला पाहिजे होता ? हा सर्व त्या खजुराचाच परिणाम. जात्यावर बसलें कीं ओवी सुचते आणि खजूर खात खाटेवर बसलें कीं प्रसाददीक्षा सुचते. राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाच्या गप्पा मारतां, पण अहो मदनदास गांधी, आतां तुमचें राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व कुठें राहिलें ? ही तर नुसती जागृतीच दिसली. या भ्रष्टीय जागृतीनें तुम्ही राष्ट्राचा उद्धार करणार आहांत काय ? बोला, अहो मदनदास, बोला ! तुम्हीं आतां कसचें बोलणार ?

पोरीला सोटा

हुरळली मेंढी आणि लागली लांडग्याच्या मागें; त्याचप्रमाणें कुठची एक उनाड कुमारिका हुरळली आणि लागली तुमच्याकडे कंबर दुखते म्हणून कुरकूर करायला. तुम्हांला तरी कांहीं सभ्यपणा पाहिजे होता; पण तो तर तुम्हीं कधींच गुंडाळून ठेवला आहे. तुम्ही आपल्याच गमती तिला सांगायला लागलां. अशा अचरट चवचाल पोरींना वठणीवर कसें आणायचें हें तुम्हांला कळायचं नाहीं. माझ्याकडे ही पोरगी तक्रार घेऊन आली असती, तर तिला हातांतल्या सोट्यानें प्रथम मीं सरळ केली असती आणि सांगितलें असतें, कीं आतां बुधवारांत जा आणि रस्त्यांत भेटेल त्या तुझ्या जातींतल्या पहिल्या धटिंगणावरोबर लग्न लावून मोकळी हो. पोरींना

काय होतें, कां होतें आणि काय व्हें असतें हें आम्हांला चांगलें कळतें. त्यांच्याशीं लेखणीनें बोलून उपयोगी नाहीं. सोऱ्यानें बोललें पाहिजे. उगीच नाहींत या गांधींचीं पोरें बिघडलीं तीं. थोरला तसा निपजला, आणि धाकट्यानें तर सरळ कीं हो ब्राह्मणाच्या पोरीबरोबर—त्या राजाजीच्या लक्ष्मीबरोबर लग्न केलें ! थोरला मुसलमान होऊन धर्मभ्रष्ट झाला, धाकट्यानें वर्णसंकर करून धर्माला काळोखी लावली. ज्याला आपल्या मुलांवर दाब ठेवतां येत नाहीं, तरुण पोरीबाळींना ज्याचा वचक वाटत नाहीं, त्यानें गोऱ्या लोकांना हांकून लावण्याचें कशाला उगीच ढोंग करावें ? अशा बायल्यांच्या हातून काय देशाचें राजकारण होणार आहे ? नांव नको. राजकारण करावें लोकमान्यांनींच. त्यांच्या समोर येण्याची कोणाची बिशाद नव्हती. आम्ही देखील वर मान करून त्यांच्याशीं बोलत नव्हतों. माझी कंबर दुखते म्हणून त्यांच्याकडे विव्हळत जाण्याची कुणा पोरीची प्राज्ञा होती काय ?

गांधीवादाचें खूळ

गांधीवाद हें एक नवें प्रस्थ अलीकडे निघालें आहे. गांधीवाद म्हणजे काय हें मला तर कांहीं कळत नाहीं. लोकमान्यांच्या निधनानंतर ज्या राष्ट्रीय रंडक्याकडे देशाच्या संसाराचा कारभार आला, त्याचें हें रड्डूबाईचें तत्त्वज्ञान आहे आणि लौकरच तें ओंकारेश्वरावर जाणार हें मी आजच सांगून ठेवतों. ज्यावेळीं ' घुसा आणि घासा ' हा कौन्सिलप्रवेशमंत्र मी म्हणत होतों, त्या वेळीं कायदेभंग करून तुरुंगांत गेलांत आणि आतां घुसलांत तर घांसतां येईना म्हणून कोकलूं लागलांत. हें कोकलणें म्हणजेच गांधीवाद. आतां अंगावर आलें म्हणून कां रे बाबांनो, या गांधीवादाला डरतां ? धड तुरुंग म्हणावा तर तुरुंग नाहीं, कौन्सिलप्रवेश म्हणावा तर धड कौन्सिलप्रवेश नाहीं, चळवळ म्हणावी तर चळवळही नाहीं. आपलाच दाम खोटा आहे.

तो दगडावर झणझणीत वाजणार कसा ? पण तरी देखील घटना मोडण्याच्या गप्पा कमी झाल्या नाहींत. अरे, कसल्या मोडतां घटना ! तुमची लुंगीच झाली आहे पिवळी. ती धुवून आधीं वाळत घाला. त्या वेळीं कौन्सिलप्रवेश केला असता, तर कांहीं-तरी वळलें असतें; पण मग माझी चेष्टा कोणीं केली असती ? मला बांगड्या कोणीं दिल्या असत्या ? मुलगी शोधायची आम्हीं, लग्न ठरवायचें आम्हीं, घोड्यावर बसावयाचें आम्हीं ! वरात काढायची आम्हीं आणि खोलीच्या दरवाज्यावर जाऊन उभें राहिलों कीं मात्र "भाऊसाहेब गो बॅक" खूप न्याय ! असेंब्लीसाठीं उभा राहिलों तर माझें डिपॉझिटच जप्त झालें. असेंब्लींत मी गेलों असतों तर गांधीवादाला नसते खडे चारले ? पण काय ? मी गेलों नाहीं, आणि अण्णाही नाहीं. लोणी मटकावलें तिसऱ्यानेंच. मला तर सध्यां या राजकारणाची धडगत दिसत नाहीं. देशांतल्या पुरुषांनीं मिशा भादरून, पुरुषत्व टाकून, सत्य-अहिंसेच्या बांगड्या जोंपर्यंत हातांत भरल्या आहेत, तोंपर्यंत हें असेंच चालावयाचें. गांधीच्या भोंव-तालचे सर्वच लोक पाहा ! डोक्यावरून पदर घेतला तर बायको कीं पुरुष तें सुद्धां ओळखूं येणार नाहींत. गांधींनीं मिशा अर्धवट ठेवल्या आहेत. वल्लभभाईंनीं मिशा होत्या त्याहि काढून टाकल्या. राजाजी जवाहिर, जमनालाल, भुलाभाई ह्या सर्वांनींच आपल्या मिशा गांधींच्या पायावर टाकून त्यांचा टिळा लावला. आमच्या शंकरराव देवांनीं मात्र त्या गोळा करून आपल्या हनुवटीवर चिकटवून दिल्या आहेत खऱ्या. पण गांधींची शेळी त्या कुरतडून खाते. देशाचें राजकारण जर वळणावर आणायचें असेल, तर आधीं मिशा वाढवा आणि पुरुष बना असें ह्या भाऊसाहेबांचें सांगणें आहे.

— २ —

कन्हैय्यानें उघडलेल्या रेडिओ स्टेशनवरील माझ्या पहिल्या भाषणाला तुम्हीं तरुण लोक मनमुराद हंसला असें मला समजलें. रेडिओवरच्या कार्यक्रमांत कांहीं तरी नाविन्य निर्माण व्हावें म्हणूनच मला भाषण करायला बोलावलें. गाजावाजा आणि गर्दी जमवायला मी हवा—आणि अध्यक्षपदाचा मान त्यावेळीं मात्र माझी आठवण नाहीं. जगाची रीतच अशी आहे. जग कृतघ्न आहे. पण त्याचा खेद वाळगून उपयोगी नाहीं. कामापुरतां हा भाऊ, आणि लोणी मात्र तात्या–अण्णा, खाऊ !

कुठें चाललास–नटीच्या मागें ?

माझ्या व्याख्यानाचा विषय, तरुणा, तूं कुठें चाललास असा आहे. माझ्या प्रश्नाच्या रोखानें उत्तर रोखठोक कोणीही देईल—कीं तरुणा तूं—रेस्टोरांकडे चालला आहेस ? तरुणा, अरे बाबा, रेस्टोरांकडे कां जातोस–? अरे, एखाद्या 'रानभरोसे दुग्धमंदिराकडे जा–' नाहीं पटायचें; कारण मी सांगतों ना ? उद्यां हेच सावरकर सांगू लागले कीं 'तरुणा, मशिदींत तूं नमाज पड !"—अगदीं सावलीप्रमाणें पाठोपाठ जातील—तात्याराव—म्हणे स्वातंत्र्यवीर, म्हणतो कोण त्याला स्वातंत्र्यवीर ? कुठें झेंडे धडकविले आहेत त्यानें ? काय स्वातंत्र्याचे दिवे लावलेले आहेत ?—असेल छाती तर—केसरीच्या कुरणांतून हो स्वतंत्र—नि कर पाहूं तुझी चळवळ—पाहूं कशी तुझी ती तुफानी गर्दीचीं नि अंगावर कांटा उभीं करणारीं भाषणें होतात तीं ? एकदां कुठें समुद्रांत बिळांतूनच उडी मारून पाणबुडी देशभक्ति दर्शविली तर—झाला शिवाजी...! शिवाजी गोब्राह्मण–प्रतिपालक होता, हा गोब्राह्मणभक्ष्यक भस्मासूर आहे ! आहे कुठें अक्कल तरुणांना ! ठाऊक कुठें आहे इतिहास–?

दिसला गोरा गोमटा–ठेंगणा टुसका देशभक्त—लागले पाठीमागें तरुण. हिंदुमहासभेचे अध्यक्ष–झुणकाभाकर सहभोजनी बोके हे—— आणि तरुणांनो तुम्हीं त्याच्या पाठीमागें कां ? माझ्या पाठीमागें या–अरे, तुमचा संसार–थाटून देतों–तुमच्या संसारांत बालबंदी (संततिनियमनाकरितां नवीन शब्द) केव्हां करावी–कशी करावी, हें तुम्हांला मी सांगतों–! तुम्ही वेड्यासारखे सावरकरांच्या पाठीमागें जात आहांत, म्हणून तात्यारावांची समजूत झाली आहे कीं मी तरुणांचा पुढारी; पण हा भाऊराव——हा रसाळ भाऊराव—— तोंडाळ तात्यारावाला स्पष्टपणें सांगणार आहे, 'तरुण, धड ना तुझ्या धड ना माझ्या पाठीमागें; तें पाठीमागें असतील कोणाच्या, तर आजकालच्या सिनेमातारकांच्याच !'

सायकल आणि पोरगी

तरुणा, तूं कुठें चालला आहेस ! काय उत्तर देऊं मी ? प्रभात टॉकीजच्या आवारांत, मध्यंतरीच्या समयीं सिगार ओढीत फॅमिली सर्कलच्या भोंवतीं गिरक्या मारीत आहे, असें उत्तर देऊं का ? एखाद्या सुतकी काँग्रेसमनसारखा चेहरा करून रस्त्याच्या कोपऱ्यावर शाळा सुटण्याच्या वेळीं ' हें पाखरूं मजसि येईल काय कामा ? ' ह्या, काव्यचरणाचा जप करीत उभा असशील असें का उत्तर देऊं ? सूर्य उगवतांच खोलीचें हेअर कटिंग सलून करून ' गाल-सफाई ' करीत तूं बसला आहेस असें का उत्तर देऊं ? सांपडेल ती सायकल नि दिसेल ती पोरगी ह्यांवर नजरफेक करण्याकरितां सभा मिरवणुकींतून तूं हिंडतो आहेस, असें का उत्तर देऊं ? घरचें साजूक नि रुचकर अन्न सोडून इराण्याच्या धर्मभ्रष्टी इमल्यांत कांट्याचमच्याशीं चकमक करीत तारवटलेल्या डोळ्यानें झिंगत तूं बाहेर पडत आहेस हें उत्तर तुला हवें आहे का ?

तरुणा,—उद्यांच्या राजकारणांतील तुझें स्थान काय आहे ?

त्याच्यासाठीं तूं काय करीत आहेस ? ' आजच्या राजकारणांत मिरव्या—समाजकारणांत तूं बव्या—आणि धकाधकीच्या मामल्यांत तूं वशा—' झाला आहेस. संसाराच्या रस्सीखेंचींतही ' पांचहि वेळां यत्न करुनियां आलें यश न तयाला ' अशा प्रकारचा तूं तरुण आहेस. तरुणा, अरे,—स्वातंत्र्यलक्ष्मी तुला जर हाक मारूं लागली कीं सोडव मला,—तर तूं काय करणार—? तुझा ४१ इंची लेंगा आवरणार—कीं २१॥ इंची—छाती पुढें करून रणांगणावर उभा राहाणार ? सावरकर म्हणतात, कीं अभिमन्यूच्या अवसानानें लढा—खर्ड्याची लढाई लढा—पुन्हा पानपत लढवा. पुन्हा दिल्लीचें तक्त फोडा, हिंदु म्हणून लढा,—हिंदु म्हणून मरा,—हिंदु म्हणून जगा, काय करणार तुम्ही ? प्रथम सांगा कीं तुम्ही अगोदर हिंदु आहांत का ? तुम्ही म्हणे अभिमन्यु ? अरे, त्याचा बाप अर्जुन होता, तसे अर्जुन आणि सुभद्रा वाटेवर कां पडले आहेत आजकाल ?

कुठें जाऊं ?—आखाड्यांत

तरुणांनो कुठेंही जाऊं नका; थांबा एकदम थांबा.एक—पाऊलही पुढें टाकूं नका. मी सांगतों कुठें जा तें. मी सांगतों तुम्हांला काय करा तें ! प्रथम आखाड्यांत उतरा, लेंगा सोडून लंगोट आवळा, नि संसार करा ! संसारांत—केशव-नारायण-वामन-श्रीधर हे चार खांदेकरी नि पांचवा शिंकाळीचा शिरस्तेदार हृषिकेश झाला, कीं मग ' बालबंदी ' चळवळ सुरू करा, व्यापार करा, लक्ष्मीचंद बना. आणि मग व्याजामध्यें प्रपंच भागूं लागला, कीं मग पडा राजकारणांत. मग शनवारवाड्यापुढें शंखध्वनि करा, अध्यक्षस्थान स्वीकारा, उद्घाटनसमारंभ करा, महिलांचे कैवारी बना, विधवांचे वासुदेव व्हा,—मग कुठेंही जा, कांहीं करा, मग हा भाऊसाहेब नाहीं विचारणार, कीं तरुणा तूं कुठें चालला आहेस म्हणून. तात्या—अण्णांच्या नादीं न लागतां, तरुणा, माझें ऐक.

— ३ —

भालाकार नव्हे मालाकार—

भालाकार भोपटकर म्हणून सारा महाराष्ट्र मला ओळखत आहे—भाला बंद पडला—माझा 'रुपेरी' क्लास बंद पडला—राजकारणांत भालाकार पुरणाची पोळी ठरला—समाजकारणांत भाऊसाहेब 'शेवया' ठरला—आणि धर्मकारणांत शंकराचार्य आघाडीला हिंदुध्वज हातीं घेऊन उभे राहिले—आणि धर्माकरतां मरणारे भालाकार—दसराचें 'लाल फडकें'—घेऊन कोर्टांत—'वकीली गुत्त्यांत' रमूं लागले ! तारुण्य संपलें—पक्ष संपला—राजकारण संपलें—धर्मकारण आटोपलें—आतां फक्त माझें दीडवितीचें करवतीकांठीं उपरणें—ती गोल तिरपी टोपी—आणि माझी पदवी—आणि त्या करतां तयार केलेली 'भास्कर बळवंत भोपटकर' B. A. LL. B. ही पाटी शिल्लक राहिली ! भालाकार रिटायर्ड मामलेदार झाला—भालाकार राजकारणांतील कार्तिक स्वामीचे मंदीर ठरला—माझ्या मताच्या मसाल्यावर—आपले 'गरम नि चटकदार पदार्थ' राजकारणी पंड्ये विकूं लागले—माझ्या विचाराच्या गुलकंदाचे 'सीलबंद डबे'—आपल्या नांवानिशी खपवूं लागले—अरे कांहीं लाज—कांहीं लज्जा—माझाच माल—माझाच दाम—आणि पुन्हां तुमचा आमचा संबंध नाहीं—! मुलीशीं लग्न लावावयाचें—संसार थाटायचा—आणि सासरा म्हणून—कबूल करायचें नाहीं—खूप न्याय—! आमच्या वयाला साठ वर्षें झालीं—आम्हीं काय शेणामेणाचे—आम्हीं काय नुसते वकील म्हणून जगलों—ब्राह्मण्यासाठीं—राष्ट्रासाठीं—कांहीं केलें नाहीं—? आणि अरे मग—एकसष्ठी साजरी करता कोणाची ? अलीकडे एकसष्ठया वाटेल त्याच्या साजऱ्या होतात—दहा पांच गुंड जमविले—दोन-चार संपादक हाताशीं घेतले—आला फोटो—दिलें मानपत्र—झाली एकसष्ठी ! अरे असा कारे दुष्टावा!—भालाकाराला सव्वा

रुपयाचा हार कां नाहीं ? त्यानें तुला कांहीं शिकविलें नाहीं—शिवाजीनें शेंडी राखली—भाऊसाहेबांनीं जानवें राखलें—संभाजीनें धर्म राखला—भाऊसाहेबांनीं सनातन धर्माकरतां ५३६ लोकांचा संग्रह केला—! भालाकार—आतां झाले—मालाकार. भालाकारांनीं दुसऱ्याच्या गळ्यांत हार घालायचे—भालाकारांनीं बाळंतपणें करायचीं—बाळंताविडेहि करायचें—आणि वर 'सांगितले होते कुणी करायला'—होती खाज पडला राजकारणांत—होता पैसा केला खर्च—आणि तुम्ही जन्मला नसता तर कांहीं 'क्रूस' देखील समाजाचें वांकडें झालें नसतें—असेंहि म्हणायला मागेंपुढें पाहणार नाहींत ! अरे कोण हा कृतघ्नपणा—मुलाला उपदेश करूं लागलो—तर मुलगा सांगतो—तुमच्या वेळेला 'संतती-नियमन' ठाऊक नव्हतें—म्हणून—नाहींतर तुम्हीं—आमचे कसले जन्माचे धनी होता—ही तर वडिलाविषयीं आदरबुद्धि—ही तरुण पिढी—! आणि मला अनुल्लेखानें मारायला—तरुण पिढीनें काय केलें आहे—सांगा पाहूं ?

म्हातारा आणि मीठ

तरुण, टारगट आहे--वात्रट आहे--' टिंगल--सिंगल --आणि चंगळ ' हें पाहिजे त्याला--त्याला पाहिजे शांता आपटे --त्याला पाहिजे शांता हुबळीकर--त्याला पाहिजे--नस्सीम--त्याला पाहिजे व्ही. शांताराम--त्याला सावरकर हवेत--पण व्याख्यान ऐकण्यापुरते--त्याला पाहिजेत अण्णासाहेब--महाराष्ट्रीय मंडळांत लोळण्यासाठीं—त्याला पाहिजेत तात्यासाहेब--प्रस्तावना लिहिण्यासाठीं आणि समारंभाचे अध्यक्ष होण्यासाठीं--त्याला पाहिजे कॉंग्रेस--लग्न होत नाहीं म्हणून सारा तरुण वर्ग--'ललना आणि लेखणी' ह्यांच्या मोहिनीखालीं भालून गेला—देश नको त्याला वेष हवा—त्याला देव नको, त्याला 'धेड'

हवा—त्याला बासुंदी नको बोंबील हवे—त्याला वीर हवी—त्याला कबाब हवेत—त्याला साडी हवी—गोल पातळ हवें—त्याला 'केस' हवेत केसरी नको—त्याला 'हरिविजय' नको—सख्याहरि हवा—त्याला 'निबंध-माला' नको वन-माला हवी—! काय—ह्यांत मोठें शहाणपण आहे—आम्हाला काय दारू पिता येत नाहीं—कां लोळायला गटारें नाहींत—आम्हाला कांहीं प्रेम करतां येत नाहीं—कां कादंबऱ्या लिहितां येत नाहींत ?—काय? —मग सांगा पाहूं—आमच्या मनावर तावा आम्ही ठेवून वागलों ते काय गाढव म्हणून ?—आम्हीं तुरुंगांत गेलों—घरीं खायला नाहीं म्हणून ?—आम्हांला कां महाराच्या ताटाला ताट लावून जेवतां येत नाहीं ?—कां आम्हांला तारुण्याचा मस्तवाल कैफ नाहीं—आमच्या आयुष्याचा आम्ही होम केला—ते तरुणांना वळण लागावें—ब्राह्मण्य टिकावें—सहभोजनी बोके माजू नयेत--—परजातीय विवाह होऊं नयेत म्हणून—परंतु ह्या 'बांड आणि दांड' तरुणाला काय त्याचें ?—आणि शौर्य कुठें चाललें आहे ओसंडून—तर पानावर बसलें कीं बटाट्याची भाजी पहिल्यांदा खाण्यांत—सनातन्यांना—मूर्ख, पुच्छगामी—बुरसलेलें म्हणण्यांत—फिदी फिदी दांत विचकून हंसण्यांत—टिंगल करण्यांत कां शौर्य आहे ?—वक्ता सणसणीत बोलला म्हणे विनोद नाहीं—वक्ता विनोदी बोलला म्हणजे विदूषक आहे—वक्ता भारदस्तपणें बोलला म्हणजे 'म्याटर' नाहीं—माझ्या व्याख्यानावर टीका करतांना एक युवक म्हणाला—'म्हाताऱ्याला ××× नाहीं.' —ह्य-ह्य-ह्य-हंसायचें—इकडे सुधारणेच्या नांवानें कोंकलायचें —आणि—लग्न करतांना मात्र पाहिजे—शाखेचीच मुलगी—सारे लोक जिभेनें सुधारक परंतु 'लिंग सनातनी' आहेत—नांवें ठेवण्यांत पटाईत—वेळ आली—कीं 'आमची खाजगी मतें' निराळी आहेत—मग लेका लोकांना कां फसवतो—? विधवा विवाह करा म्हणून उपदेश करायचा—आणि घरांत विधवा

कुजक्षायच्या--सत्याग्रहाला जा म्हणून सांगायचें--आणि 'महाली राजकारण' रंगवायचें--मदत करा म्हणून गांवभर पावतीपुस्तक हिंडवायचें आणि स्वतः मात्र 'खिसा खरपूस' ठेवायचा--बोलायचें एक आणि करायचें अगदीं भिन्न--घटकेंत म्हणतील गांधी हवे--घटकेंत म्हणतील सावरकर हवे--घटकेंत म्हणतील अत्रे हवे--आणि येऊन जाऊन टीका करतील म्हाताऱ्यावर--कांरे बाबांनो ! पाळ्यांत मीठ--आणि संसारांत म्हातारा--हवा ! मिठाशिवाय अन्न नाहीं--आणि म्हाताऱ्याशिवाय रंग नाहीं ! तरुणांचा पित्तप्रकोप झाला म्हणजे म्हातारी--मोरावळाच उपयोगी पडेल. लक्षांत ठेवा--भालाकाराची शिकवणच उपयोगी पडेल--!

ज्ञानेश्वर व्हा नाहीं तर धनेश्वर.

भाऊसाहेब तुम्हांला सांगतो--अरे एक ज्ञानेश्वर व्हा नाहींतर धनेश्वर व्हा--धड ना विद्या ना पैसा--आणि मग काय पोटांत चुना कोंबाल ?--आर्थिक परिस्थिति कोण बिकट आहे--ती सुधारा म्हणावं--प्रत्यक्ष विष्णुची लक्ष्मी आली ह्या युगांत तरी 'पोळ्या लाटाव्या लागतील'--महा श्रीगजानन आले तरी म्युनिसिपालिटींत कारकून व्हावे लागेल--गाईचा रक्षण-कर्ता श्रीकृष्ण आला तरी--दोन पैसे टाकल्याशिवाय सिंगल दूध मिळणार नाहीं--पैसा मिळवा--पोट भरा--स्वतःचें पोट भरतां येत नाहीं, आणि म्हणे आम्ही राष्ट्राचा उद्धार करणार--राष्ट्राचा उद्धार करणें--म्हणजे प्रेम करणें नव्हे--वरं प्रेम तरी करतील का नीट ?--धड 'ब्रह्मचारी' राहणार नाहीं--धड 'गृहचारी' ही राहणार नाहीं--आणि 'विश्वचारीही राहणार नाहीं--देशसेवा नाहीं देवसेवा नाहीं--आणि गृहसेवा त्याहून नाहीं--कांऽहीं नाहीं--ह्याला काय येतें ? त्याच्यांत काय अर्थ आहे--देव म्हणजे दगड आहेत. धर्म म्हणे अंतःकरणांत आहे--बोडकं आहे तुमचे--

दरमहा ' शंभरे ' व्हा--एक भिकारी थाट तरी ठेवा नाहीं तर सरदारी तरी ठेवा--नुसतें टाळ्या बडवे ' अक्षता ' व्हा--

' कामरसांचीं गुन्हाळें '

--आणखी एका व्यसनानें महाराष्ट्राला बेजार केलें आहे--तें म्हणजे लिखाणाचें-- ! दिसली तरुणी कर काव्य--दिसला पुढारी कर त्याचें विडंबन--आणि हे सारे बिघडवले असेल कोणी तर त्या मुंबईच्या विविधवृत्तानें--त्या आलमगिरानें--रामभाऊ तटणीस नॉन मॅट्रिक आहे--Esqr पूर्ण विराम--वाटेल त्याची कर टिंगल--वर्तमानपत्र हातीं आहे--लिही वाटेल तें--सारे संपादक--नॉन मॅट्रिक--कायदा ठाऊक नाहीं--राजकारण ठाऊक नाहीं--आणि वर्तमानपत्र काढतात-- ! ती तरी यशस्वी रीतीनें चालवितात कां ? हा कर्जाचा डोंगर--खप तर झाला पाहिजे--मग ओढ भालाकाराला--दे शिव्या गांधीला--केळकराची काढ खरडपट्टी--सावरकराची घे हजेरी--विधवेला बनव सुवासीन--आणि सुवासिनीला बनव वारांगना--वैयक्तिक निंदा--स्त्रियांची निंदा--' स्त्रिया गरोदर राहतात केव्हां ? ' ' चुंबनें म्हणजे काय ? ' ' नग्नता हवी कां नको ' ' कामवासना आणि तिचे संसारांत स्थान ' --' शांता आपटे ह्या प्रभातमध्यें राहणार कां जाणार '--' सिनेमा नटीला शीलाचें महत्त्व वाटतें कां '--आणि सख्याहरी मठा मुंबईला ने '--त्यानीं म्हणायचें भटकभवानें--त्यानीं म्हणावें--चवचाल चिचुंद्रे '--त्यांना म्हणावें ' पक्पक् आवाज काढ '--त्यांनीं म्हणावें ' हळूंच घाल '-- त्यांनीं म्हणावें ' कमलरस-दीक्षित ' त्यांनीं म्हणावें ' मानापमानांतील धैर्यधर '--अरे ही कां वर्तमानपत्रें कां कामरसाचीं गुन्हाळें--ही लोकजागृति करणारीं साधनें कीं ' इंद्रिय स्फुरणी ' यंत्रें--म्हणावें तरी काय ? लोकांना तरी कांहीं कळत नाहीं असे नाहीं--बायकांमुळें खुशाल मिटक्या मारीत वाच-

तात ! माणसाच्या बौद्धिक आयुष्याचा क्षय म्हणजे--लेखक होणें--पहिली अवस्था काव्य--दुसरी अवस्था विडंबनें--तिसरी अवस्था लघुकथा--चौथी अवस्था कादंबरी--पांचवी अवस्था नाटक--सहावी अवस्था सिनेकथा-लेखक--आणि मग नटी--मग दारू आणि शेवट ' नादारी अर्ज ' ! आणि जर नादारी मिळत नसेल तर वर्तमानपत्राचें प्रकाशन--बाबांनो आयुष्यांत वाटेल तो गाढवपणा करा--परंतु वर्तमानपत्रें काढूं नका-- !

फडके नव्हे पीतांबर--

शृंगाररस हा म्हणे ललित लेखनाचा आत्मा आहे--फडके म्हणे कादंबऱ्या शृंगाररसप्रधान लिहितात--सारें फडक्यांचें वाङ्मय म्हणजे--एक लग्नपत्रिका--सारी धडपड--तडफड--कशासाठीं ? लग्नासाठीं !--आणि मग ? कशाला रे येव्हढा आटापिटा करता--लग्न जुळवायला फडके कशाला हवेत--त्याला भटजी आहेत कीं--असले पुळपुळींत--झिरझिरीत फडके वाङ्मय काय कामाचें ? चांगलें घसघशींत--ठसठशीत पीतांबरी--वाङ्मय हवें--आणि म्हणे शृंगार हा तरुणांना कळतो--म्हाताऱ्यांना कळत नाहीं--प्रथम म्हाताऱ्याला तो कळाला म्हणून--तुम्हीं पाळण्यांत दिसला-आणि सनातनी लोकाच्या शेंडींत जो शृंगार आहे--तो तुमच्या--शृंगार करावा आम्हीं--तुमच्यांत तो दम नाहीं--प्रेम फिसकटलें-मेल गांठाल--जीव द्याल--रडाल--फार तर काव्य कराल--सनातनी रडणार नाहीं--डरणार नाहीं--तो करणार शृंगार--! शृंगार वाङ्मय तुम्हीं लिहून--आमची काय तहान भागणार आणि तुम्ही काय तरुण पिढीला धडे देणार ?--

मीं म्हणे हसायला शिकवलें ?

तों अत्रे--मास्तर--कोण म्हणतो त्याला आचार्य ?--कुठल्या धर्मपीठाचा संस्थापक आहे ?--आचार्य फुकटा फुकटी पदवी

वा.....सं.
ता.१७...
*
दा.ले.

भिळत नसते.—हे म्हणे हंसायला शिकविणार !—प्रथम कार्य शिकविणार तें ठरव म्हणावें—अरे हे फेरीवाले समाजसेवक—मटाराचे दिवस आले—' चार पैशा शेर मटार ' म्हणून ओरडतील, ' खजूर तीन पैशा पावशेर हेच ओरडतील, मटन हेच विकतील, जानवी हेच विकतील—मंगलसूत्रें हेच विकतील—गांधी टोपी घालतील —सावरकरी टोपी घालतील—उन्हाळा आला मलमल वापरतील—पावसाळा आला रेनकोट वापरतील—थंडी आली ग्लेझर वापरतील आज मंडईत तर उद्या मोहोल्ल्यांत, आज मशिदींत तर उद्या मंदिरांत—आज मोटारींत तर उद्या पायीं—हे असले ' रहाटगाडगीं गरगर फिरणारें ' साहित्यिक का शिकवणार हंसायला ? अरे जेव्हां तुझ्या तोंडात दांत नव्हते तेव्हांपासून हा भाऊसाहेब हंसवतोय महाराष्ट्राला—जेव्हां तूं चड्डीच्या आंत दोन बोटांची लंगोटी नेसून, लघुशंकेसाठीं कानांत जानवें घालत होतास, तेव्हांपासून, मी हंसवतोय आणि—आज सांगतों लोकांना म्हणे—मी हंसवतोय—म्हण बाबा—मोठा आहेस तूं—कोण तुला सांगणार ?—

माझें आत्मचरित्र—

भालाकारांनीं काय काय केलें हें सांगायला लागलों तर मला आत्मचरित्र लिहावें लागेल—परंतु आत्मचरित्र लेखनाची ' लूद ' मला खास भरणार नाहीं—एकसष्टी आणि आत्मचरित्रें हीं लिहामला खास भरणार नाहीं—एकसष्टी आणि आत्मचरित्रें हीं लिहावीत कुणीं—ज्यांनीं नुसतीच टिळकांची गादी गुंडाळून कोपऱ्यांत सुखरूप ठेवली त्यांनीं—पराक्रम करणाऱ्या वीरांनीं पोवाडे लिहावयाचे नसतात—ते शाहिरानें रचायचे असतात—भालाकारांचे पोवाडे लिहिणारे शाहीर निर्माण होवोत अगर न होवोत—टिळकांच्या गायकवाडवाड्यांत भालाकाराची तसबीर लटकली जावो अगर न जावो—केसरी प्रबोधांत टिळकांचा शिष्य म्हणून

छायाचित्र प्रसिद्ध होवो अगर न होवो--टिळकांच्या पवित्र खुर्चींवर बसून मांजरांनीं म्यांव म्यांव केलें तरी ज्यांचीं धोतरें महिनाभर परटाला जातील--अशासारखा संपादक त्याला सूर्याजी पिसाळ म्हणो--अगर ज्या कॉंग्रेसच्या आणि तिच्या नेत्यांच्या तत्त्वांचो चुराडा उडविला त्या भालाकाराला--कॉंग्रेस फतवा म्हणून त्यांची निंदा केली जावो--ज्या शंकराचार्यांच्या मठाची किंमत ओसाड मंदिराइतकी आहे त्या मंदिरांत सनातनी भाऊ-साहेबांचा गळा कापून, त्याला सामाजिक जीवनांतून हद्दपार करण्याचें प्रयत्न होवोत--भालाकाराचें नांव कायम टिकणार ! ब्राह्मण्य म्हणजे भालाकार--बाबागाडी म्हणजे भालाकार--शिरा म्हणजे भालाकार--महाराष्ट्राचा भविष्यवादी वसंत लाडोबा म्हणजे भालाकार--गाढव वनलेल्या लोकांना मागें खेचून त्यांचे शिव्याशाप सोसून, ज्याचें कधींहि कौतुक न होणें म्हणजे भालाकार--गोवंड्याचें ज्वर-विंदू म्हणजे भालाकार--रोगी वरा करावयाचा भालाकारांनीं आणि शेवट श्रेय जायचें मंगळाईला--! भालाकाराला आत्म-चरित्र लिहायची गरज नाहीं--भालाकार जें पोटीं तेंच ओठीं ह्या न्यायानें वागला--जें केलें तेंच त्यानें सांगितलें--त्याला कुणाच्याहि बापाची भीति नाहीं--भोपटकरी रक्त कडवें आहे !

* सरस्वतीच्या सिंहासनापुढें—

— १ —

भा. वि. वरेरकर

मामा—(भक्तिभावानें नमस्कार करून) आई, तुला माझे साष्टांग दंडवत. 'साष्टांग नमस्कार' मी म्हणणार नाहीं. कारण ते त्या पुणेरी अत्र्याचे शब्द आहेत. माझें अंतःकरण तुटतें आहे, काळीज कापतें आहे, जीभ फुरफुरते आहे, ओठ बोलायला आतुर झाले आहेत. आई, मला ह्या साहित्यसेवकांनीं तुडविलें—थापाडया म्हणून हिणविलें. तेव्हां माते, ह्या असल्या तोंडानें मी कसा तुझ्यापुढें उभा राहूं.

देवी—भक्ता, हा तुझा भक्तिभाव व कळकळीचे शब्द ऐकून

मनाला संतोष वाटला. खरें बोलणें हें कलियुगांत पाप आहे. खरें बोलणें ह्यालाच दुर्जन थापा मारणें म्हणतात--

मामा—आई, 'सोन्याचा कळस' नामक माझ्या नाटकांत अगदीं हेच माझे विचार मी विठू कृष्णाच्या तोंडीं घातलेले आहेत. देवी, तूं माझें अनुकरण केलें आहेस—तूं माझी शिष्यीण शोभतेस ! माझ्या भाषेचा घाट, बोलण्याचा थाट अगदीं हुबेहूब तूं 'इमिटेट' केलास. तेव्हां तूं माझी शिष्यीण आहेस—मी तुझा गुरु शोभतों आहे--

देवी—गुरुराज, मीं आपलं शिष्यत्व पत्करलं असतं—आनंदानं कबूल केलं असतं; पण--

मामा:—पण—पकार—झालें ! मेलों ठार ! हें पुणं आडवं आलं ! जिथें तिथें हे पुणं माझं नाक ठेचतं आहे. ही दुष्ट वृत्ती वैभवाच्या आड येऊं पहात आहे. आई, पुण्यानं मला नकोसं केलं आहे—संधी सांपडेल तिथें मी पुणेकरांना गुद्दे मारतो आहे. पण—झालं. आला हा पकार ! मला वाक्य सुद्धां पुरं करतां येणें अशक्य झालं—

देवी—शांत हो ! राग आवर, विवेक जागृत कर, भंडकूं नकोस. बेभान होऊं नकोस—माथं थंड ठेव--

मामा:—आई—आई—तुझी ही निव्वळ पुणेरी वृत्ति आहे—भाषेचा Mould हुबेहुब माझा—तळमळ सुद्धां माझ्या इतकीच, मग तूं माझी शिष्यीण म्हणून कबूल कर, म्हणजे ह्या पुण्याचे चांगले वाभाडे काढतों. जर नाहीं तीन तेरा वाजवले पुण्याचे तर नांवाचा मामा—

देवी—मामा, तुझ्या सांप्रदायाचा मला अभिमान आहे, तुझ्या लेखनाची मी वाहवा करिते--

मामा:—देवी की जय !--मामा कीं जय !—वाहवा कीं जय !—कीं जय !—मी विजयी झालों—तूं देवी हरलीस—स्त्री असून

हरलीस. पण मी हें सुख घेणार नाहीं. स्त्रियांना पराजित करणं हें व्रीद मामाचं नव्हे; तें पुण्याचं व्रीद आहे—

देवी:—स्त्रीजातीचा कैवार घेणाऱ्या भार्गवरामा, तुला देव म्हातारा करो.

मामा:—कोण म्हातारा ? मी ! हा मामा तरुण आहे—young आहे—म्हातारा हा तरुण कधींच नसतो ! वयावर वृद्धपणा अवलंबून नसतो. वृत्तीवर असतो ! आई, तुझ्या मुलाखतीनें मी बहोत खुष झालेलों आहे. माझ्यावर लोकमान्यांचें फार प्रेम होतें. 'संन्याशाचा संसार' हें नाटक पाहण्यासाठीं ते मुद्दाम विलायतेहूत आले होते—मी त्यांना receive केलें—५ वाजेपर्यंत त्यांनीं नाटक पाहिलें.—माझ्याबरोबर चहाचिवडा, सिगारेट ओढली—माझी पाठ थोपटली—अन् महाराष्ट्राचे 'शॉ' ही पदवी प्रथम त्यांनीं दिली !

देवी:—आणखीन् कोण कोण बरं मामा, तुझे चहाते आहेत ?

मामा:—नामदार गोखले, सर फिरोजशहा मेहता, डॉ. भडकमकर, वा. म. जोशी, न. चिं. केळकर——

देवी:—अस्सं—हें नव्हतं मला ठाऊक !

मामा:—आई, 'सत्तेच्या गुलामा'चा ड्रॉप प्रथम ओढायला इकडे काका खाडिलकर तिकडे अप्पा टिपणीस होते !—तो पुण्याचा आल्हाद बेचव पत्रे—त्यानें तीन घंटा दिल्या——

देवी:—मामा, खरं का हें ? विचारूं अत्रेकाकांना ?

मामा:—म्हणजे, Don't you believe in me ? इंग्रजी बोललों याबद्दल माफ कर—पण अत्र्यांनीं खरोखर तीन घंटा दिल्या !

देवी:—बाळा, मुंबईच्या मामा, मालवणच्या मल्ला, ही निव्वळ तबल्यावरची थाप आहे—! मामा, तूं थापाड्या आहेस—

मामा:—[संतापून लाल होऊन] मामाच्या हातांतील सोटा नाहीं पाहिलास ? पुन्हां थापाड्या म्हणून म्हण, म्हणजे—

देवी:—मामा, मी त्रिवार म्हणते, तूं थापाड्या आहेस—!

मामा:—[इकडे तिकडे पहात] आवरा—मला आवरा. नाहीं तर माझ्या हातून स्त्रीहत्त्या घडेल !—काय, कुणीच येत नाहीं ? ठीक, मीच आतां मला आवरतों. पण देवी, लक्षांत ठेव—पुन्हां जर ही जीभ मामाला थापाड्या म्हणून म्हणाली तर—तुला सुद्धां कोर्टांत खेचीन !—[असें म्हणून रागानें जातात.]

— २ —

वि. स. खांडेकर

देवी:—वत्सा, सुस्वागतम्.

खांडेकर:—देवी, मस्तक आम्रवृक्षाप्रमाणें लवून, आगगाडीच्या दोन्ही रुळांना जोडणाऱ्या सांध्याप्रमाणें हात जोडून तुला मी वंदन करतों.

देवी:—वत्सा, तुझ्या आगमनानें मला आनंद झाला.

खांडेकर:—आई, उगवत्या अरुणाच्या रम्य प्रकाशदर्शनानें कुठल्या मानवाच्या मनाला मोद होणार नाहीं ! माझें येणें सूर्योदयाइतकेंच वक्तशीर आहे—

देवी:—कविराजा, माझ्याकडे पाहून तुला स्फूर्ति येते का ? माझ्या सौन्दर्याचें वर्णन तूं यथामति करशील का ?

खांडेकर:—त्याचीच तर मी वाट पहात आहे ! देवी, तुझे डांबराप्रमाणें काळे केंस असून—डोक्याचा आंबाडा हा इंजीनच्या पुढील भागाप्रमाणें मला दिसतो आहे. आंबाड्याभोंवतीं घातलेली वेणी—ही मला आळूच्या भाजीभोंवतीं बांध म्हणून लावलेल्या भाताप्रमाणें भासत आहे ! तुझें नाक मला 'रस्ता चालू आहे' अशी

खूण दर्शविणाऱ्या 'सिग्नल' प्रमाणें दिसत आहे ! तुझे ते गाल फुगविलेल्या फुग्याप्रमाणें हुबेहूब दृग्गोचर होत असून ओठ मला कुंकवाप्रमाणें लाल वाटत आहेत. तुझी वदनकांती 'बुढी कीं बाल' प्रमाणें गुलाबी असून उरोभाग फर्ग्युसनच्या हनुमान टेकडीसारखा दिसतो आहे—

देवी:—भाऊसाहेब, तुझ्या ह्या अचाट व अफाट उपमासाम-र्थ्यावर खूष होऊन तुला मी बाणभट्ट जरी नव्हे तरी शामभट्ट ही पदवी बहाल करीत आहे ! मध्यंतरी तूं प्रकृतीस्वास्थ्यासाठीं पुण्यास गेला होतास तेव्हां—

खांडे०—आई, सत्य हें सूर्याइतकें प्रखर आहे. तें कथन करणें माझें कर्तव्य आहे. लघुकथेमुळें मी जरी प्रसिद्धीस आलों तरी फुरशाचा दंश हा माझा प्रसिद्धीकरणाचा नगारा आहे असें मी समजतों ! फुरशाचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. त्यामुळेंच मला शिरोड्याहून पुण्याला हालचाली करितां आल्या, साहित्य संमे-लनाच्या अध्यक्षाचा मान मिळवितां आला,—

देवी०—लघुकथा म्हणजे रे काय ? ह्यापूर्वी मी हरिकथा पुष्कळ ऐकलेल्या आहेत.—लघुकथा मला ऐकाविशील का ?

खांडे०—आई, दरपानीं २॥ रुपये ही माझी विदागी आहे. ती तुला परवडायची नाहीं; तेव्हां तुला नुसत्या तंत्राची ओळख करून देतों ! देवीची इच्छा व आज्ञा असेल तर सेवक सेवेला तयार आहे.

देवी:—उत्साही तरुणा, तंत्राचें गायन साग्रसंगीत कर, म्हणजे तुझी संभवना यथाशक्ती करीन.

खांडे—०माते, लघुकथा ही तरुणीसारखी असते ! कुमारी, तरुणी आणि आई ह्याप्रमाणें तिच्या तीन अवस्था असतात ! कुमारी असतांना तिचें कौमार्य टिकाविलें पाहिजे, तरुणी असतांना तरुणाचा सहवास वर्ज्य केला पाहिजे, आणि आई झाल्यावर पाळण्याची

दोरी हातांत धरून बसलें पाहिजे. ह्या तीन दिव्यांतून लघुकथा पार पडली म्हणजे तिचा समावेश आवडत्या गोष्टींत होतो ! माझ्या लघुकथा जवसाच्या तेलाप्रमाणें उपयोगी आहेत, जेव्हां तुझ्या मंदिराला रंगसफेती, तेलपाणी द्यावयाचें असेल तेव्हां त्या तूं 'रहाट गाडगें आणि कं.' कडून अवश्य मागव ! तुला सवलतीच्या दरानें मिळेल ! काळ हा चोराप्रमाणें वेळेचें हरण करितो व वक्तृत्व हें क्लोरोफॉर्मप्रमाणें मोहिनी घालून मंत्रमुग्ध करितें. तेव्हां माते, मला अर्धचंद्र दे.

देवी:––अर्धचंद्र का, हा चंद्रहार घे ! हे माझे सर्व अलंकार मी तुला तुझ्या काव्यकसरतीबद्दल आदरपूर्वक अर्पण करीत आहे.

खांडे०––आई, माझ्या आईनें नाक टोचलें नाहीं; नाहीं तर ही नथ सुद्धां मी नाकांत घालून गमन केलें असतें. देवी, मी अलंकारांचा भोक्ता आहे, माझे अलंकारावर लक्ष्मीधराइतकें प्रेम आहे. आई, येतो; देव तुझ्यावर कृपादृष्टि करो––

देवी:––हे प्रियभक्ता, तुझ्या ताटातुटीच्या प्रसंगीं माझ्या डोळ्यांतून––

खांडे०––देवी, तूं अशीच रड–तुझ्या डोळ्यांच्या शिंपल्यांतून पडणाऱ्या मौक्तिकांची ओंजळ भरल्याशिवाय मी एक पाऊलहि पुढें टाकणार नाहीं. अहाहा ! देवी, तो पहा पौर्णिमेचा चंद्र–ती पहा रजनी ठिपक्या ठिपक्याचा शालू नेसून–आपल्याकडेच येत आहे––! जीवन अन् कला ही खरोखर पुरणा-वरणासारखी आहेत. हा सर्व सोहाळा पाहून माझें पोट भरलें, हें जीवन–आणि हा सौंदर्यानंद जो उपभोगावयास मिळतो आहे, ही कला ! देवी, हेंच माझें आतां विश्रांतीस्थान-हाच माझा मोक्ष-हेंच माझें शिरोडें–

— ३ —

दत्तो वामन पोतदार

दत्तोपंत—मातोश्री, तुझी पाद्यपूजा करण्याचा इराद्यानें मी आज वेळांत वेळ काढून आलेलों आहे. सध्यां मला इकडचें तिकडे-सुद्धां व्हायला वेळ होत नाहीं.—परवां गंमत अशी झाली कीं—

देवी—काय झाली गंमत.

दत्तोपंत—श्रूयताम् ! अग, तो महाराष्ट्रीय मंडळाचा शिवा दामले—.

देवी—कोण शिवा दामले हा बाई ?

दत्तोपंत—फार बरं मेहनती माणूस आहे ! दिवसांतून १५० नमस्कार–२०० बैठका मारतो !—आहार तरी किती सात्त्विक ! बोलणं तरी किती मोजकं, विनयशीलपणाचं ! नवीन चळवळ निघाली कीं काम करायला अगदीं विहिणीसारखा पुढें ! म्हणजे सांगायचं कारण असं, कीं तो माझा विद्यार्थी असल्यामुळें हे माझे गुण त्याच्या अंगीं उतरले ! इंग्रजी पांचवींत होता, तेव्हां एके दिवशीं—

देवी—ती हकीकत मग सांगा मला–पण शिवा हें नांव कसं पडलं हें अगोदर सांगा.

दत्तोपंत—शिवा–शिवा–शिवा–सांभशिवा हें शंकराचें नमन शिवा ह्या नांवावरून मला आठवण झाली. आपले गोब्राह्मण प्रतिपालक शिवाजी महाराज फार शूर–मोठा चतुर, धोरणी–मराठ्यांचें घरन् घर त्याच्याकरितां खपलें—

देवीः—अहो, हा झाला तुमचा शोध ! पण कांहीं संशोधकांचें असें मत आहे, कीं शिवाजी हा मुळीं जन्मलाच नव्हता ! मराठे-शाहीची स्थापना करणारा शिवाजी हा खरा शिवाजी नसून तोतया शिवाजी होता ! बरं–पण ती कुणाच्या जन्माची भानगड उपस्थित झालेली आहे ? खऱ्या शिवाजीची कीं तोतया शिवाजीची ?—

दत्तोपंतः--थोडा फार माझ्या वचनावर विश्वास ठेवून चल्ला ! संशोधन मंदिरांपर्यंत येण्याचे श्रम वेतले तर शिवाजीचा पाळणा, दूध पिण्याची वाटी, जिजाईची वाळंती, शेगडी, वाज, रिंगणें, ज्या सुईणीनें बाळंतपण केलें तिच्या हातची पैसे मिळाल्याची पावती-हें सर्व दाखवून असें अनुमान निघेल, कीं शिवाजी महाराज हे शहाजीचे पुत्र-जिजाईचे तनय-मराठेशाहीचे संस्थापक असून त्यांचा जन्म इ. स. पूर्वी १२०० वर्षें झालेला आहे ! पुराव्यावर पुरावे-पुराव्याशिवाय संशोधक बोलायचा नाहीं-

देवीः—दत्तमहाराज, तसें नाहीं अं मी म्हणायला तयार ! संशोधक हे पुरलेले उकरल्याशिवाय बोलायचे नाहींत असें म्हणा !

दत्तोपंतः—बरं. तसंहि म्हटलं तरी हरकत नाहीं बिघडतें कुठें ? माणसाची प्रकृति बिघडते केव्हां-व्यसनाधीन झाल्यावर. संभाजीराजा व्यसनी होता, म्हणून मराठेशाहींत बेबंदशाही माजली. त्या औंधकरानें नाटक लिहिलें आहे. फार चांगलं आहे तें नाटक प्रथम प्रयोगाला मी हजर होतों. तात्यासाहेबही हजर होते-अरेच्या ! बरी आठवण झाली. आज तात्यासाहेबांनीं मला जेवायला मुंजा म्हणून बोलावलं आहे, तें विसरलोंच.

देवीः-जेवायला नर्सोपंताकडे, हात धुवायला कुठें जाणार ? बहुतकरून रियासतकार सरदेसाई यांच्याकडे ! आणि वामकुक्षी करायला जाणार नू. म. विद्यालयांत ! किती हा व्याप आहे तुमच्या पाठीमागें. मला वाटतें, तुम्ही लग्न केलें नाहीं हें ठीक झालें नाहीं-तर बिचाऱ्या माऊलीला पहिल्या मुलाच्या वेळेस जें दर्शन देऊन जायचें तें व्रतबंधाचे वेळेस मातृभोजनाची पंगत गांठायला यायचें. लग्नाशिवाय आयुष्य कंठणें जरा अडचच जात असेल नाहीं महाराज !

दत्तोपंतः—छे हो, आपली कांहींतरी खुळी समजूत आहे ! दिवसभर सपाटून काम केल्यावर झोंप वाटच पहात असते. पहाटे पांचचा गजर झाला कीं थोरामोठ्यांच्या भेटी-महाराष्ट्र विद्या-

पिठाची खटपट–संशोधन–एक का अनेक व्याधी आहेत पाठीमागें. मला तर आई वेळ पुरत नाहीं बघ ! तुझ्याकडे येईन येईन म्हणून आज ३ वर्षं घोकतों आहे, तेव्हां आज सवड झाली·झालं, वाजले वारा–तात्यासाहेब पाटावर तिष्ठत असतील. घेतों रजा, दया लोभ असूं द्या. एकदां संशोधन–मंदिरांत सहज संध्याकाळच्या वेळेस फिरतां फिरतां येऊन संशोधनाच्या कार्यावर नजर टाका—(जाऊं लागतात.)

देवीः—अहो दत्तात्रय, पाद्यपूजेचें विसरला वाटतें ?

दत्तोः—विस्मृती होते पहा अलिकडे ! वेळ पडला थोडा अन् सोंगं पडलीं फार ! (गाठोडें सोडूं लागतात.)

देवीः––दत्तदिगंबर एकनाथ, अहो, हें काय पूजेचें साहित्य कीं––

दत्तोपंतः––वडगांवहून हें गाठोडें जें आणलें तें तसेंच पडलें होतें ! बरी आठवण झाली–हें मंदिरांत नेऊन द्यायचं होतें ! यांत तानाजीची घोंगडी आहे, येसाजी कंकाच्या ' श्यामसुंदर ' वहाणा आहेत, पिराजीची भाकरी खाण्याची थाळी आहे–हा पाणी प्यायचा गडवा कुणाचा आहे, त्याचा शोध लागायचा आहे तेवढा.

देवीः––तो लावून आल्यावर मग पाद्यपूजा करायला येणार वाटतें ? हें पहा––

दत्तोपंतः—हें आपणच पहा. आजच्या दिवस निरीक्षण करा. मग उद्या जेव्हां पूजा करायच्या हेतूनें येईन तेव्हां घेऊन जाईन.

देवीः—असें करूं नका आपण ! हें अगोदर घेऊन चला संशोधन मंदिरांत; नाहीं तर गाठोडेंहि इकडे पडणार आणि पुन्हां त्याचें संशोधन सुरू होऊन–आलं असेल तुमच्या लक्षांत– ! अगबाई ! अन् तुम्हांला तात्यासाहेबाकडे जेवायला जायचें होतें ना ?––

दत्तोपंतः——खरंच कीं—बिचारा ब्राह्मणांची वाट पाहून पाहून आळोखे पिळोखे देऊन कंटाळून——

देवीः——हे बच्चा,—अगोदर माझी रजा घे—आणि जा पाहूं कसा केळकराकडे—! वाटेंत ' तमाशा पहात उभे राहूं नये—' आहे-ना ध्यानांत ? धांवत जा पाहूं—कुठेंहि—कुणी भेटले तरी बोलूं नका—

दत्तोपंतः——छेः छेः आतां थेट टिळकरोड——! हा पहा पलायन करतोच——(खाकोटीला गांठोडें मारीत गर्दींनें जातात.)

— ४ —

न. चिं. केळकर

देवीः——अगबाई——! आपण हें मंदीर समजला तरी कसलें ? गजाननाचें कीं जोगेश्वरीचें ? आणि आलात तर ह्या असल्या थाटांत, हातांत चांदीची वाटी, त्यांत अक्षता—आणि मागें आपल्या सौभाग्यवती—असें यावयाला हवें होतें.

केळकरः——अक्षत देण्याकरितां मी आलेलों नाहीं ! कदाचित् लावतां आल्या तर वाटाण्याच्या अक्षता लावण्याकरितां आलेलों आहे.

देवीः——नाहीं—आपलें वाटलें असें इतकेंच ! आपल्या ह्या पोषाखाकडे पाहून १२ मास घरांत कार्यच चालू आहेत असा कयास नवख्यानें बांधला तर चुकीचा नाहीं होणार !

केळकरः——मी हिंदुस्थान माझें घर समजतों. आणि त्याचें कार्य बारा महिने मी करितच असतो ! त्या कार्यासाठीं हा असला व्याही थाटाचा पेहराव करावा लागतो. माझ्यामधील हा गुण वंशपरंपरा-गत जरी नसला तरी नांव साम्यपरंपरागत आहे !

देवीः——हें संशोधनकार्याचें वेड वाटतें ? कसें तें तरी सांगा——

केळकरः--मला कुणी नरसोपंत म्हणतात कुणी तात्यासाहेब म्हणतात ! पंत व तात्या ह्या नांवानें ज्या व्यक्ति ओळखल्या जातात, त्यांत कांहीं तरी अलौकिकत्व हें असतेंच ! पंत ह्या नामसाम्याकडे वळूं. मोरोपंत–पहिल्या दर्जाचे कवि; पंतप्रतिनिधि औंधकर–हनुमानभक्त, रसिक, सुशिक्षित; बाळाजी विश्वनाथपंत–पेशवाईचे आधारस्तंभ; हरिपंत फडके–नांवलौकिक महशूर; रामकृष्णपंत–भडकमकर–सुप्रसिद्ध डॉक्टर; कृष्णाजीपंत खाडिलकर–प्रख्यात नाटककार !

देवीः--आणि तात्याची काय वाट लावली ?

केळकरः--तात्यासाहेब कोल्हटकर–साहित्याचार्य; तात्यासाहेब टोपे–अव्वल दर्जाचा सेनापति; तात्याराव सावरकर–उभ्या महाराष्ट्रभर दरारा--आई, अशीं एक हजार उदाहरणें मजजवळ तयार आहेत.

देवीः--ह्या बुद्धिविलासाकडे पाहून मनाला आनंद वाटला !–हो, पण आपण ह्याचा कधीं विचार केला आहे का, कीं लोक नेहमीं आपल्याबद्दल म्हणतात कीं, 'तात्या ना, शब्दांत कधीं सांपडायचा नाहीं !'--मी लावली आहे त्याची उपपत्ती ! तुम्हाला त्याची कल्पना मी आणून देईपर्यंत सुद्धां येणार नाहीं--

केळकरः--पराजीत होणें–आणि तें सुद्धां तुल्यबली विद्वान् विदुषीकडून होणें–हें एक मोठें भूषण आहे !

देवीः--अपयशाचें माप पदरांत घेतेवेळीं सुद्धां ही मल्लिनाथी कां ! आपलं नांव काय ?

केळकरः--नरसिंह.

देवीः--नरसिंह नांव आपलें आहे तें तोंडून तुम्हींच बोलला ! ऐका तर आतां--हिरण्यकश्यपूला ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर तुला मरण कदापि येणार नाहीं; माणूस–पशू–अस्त्र हीं तुला मारूं शकणार नाहीं असें आश्वासन दिलें.

केळकर:––हें मला ठाऊक आहे––

देवी:––कायदेमंडळांत विरोधी पक्षाला आपण अडवित आहोंत असें समजूं नका ! शांत चित्तानें मी सांगतें तें ऐका–हं, म्हणजे हिरण्यकश्यपूनें देवाला शब्दानें बांधून घेतलें कीं – तूं अमर आहेस ! पुढें तो उन्मत्त होऊन छळ करूं लागला, देवभक्तांना गांजूं लागला––प्रत्यक्ष मुलगा जो प्रल्हाद तो नारायणभक्त असूनहि त्याचें त्यानें प्राणांतिक हाल सुरू केलें–पापाचा भार पृथ्वीला होऊं लागला–देवाला भक्त बलिष्ठ झाला. वरदान दिल्यामुळें, त्याचें पारिपत्य करतां येईना ! तेव्हां भक्ताचा शब्द खरा करून त्याला मारलें पाहिजे, ह्याकरितां ऐन सायंकाळीं–धड ना माणसाचें धड ना पशूचें अशा स्वरूपांत नरसिंह अवतारले–व अखेर नखानें हिरण्यकश्यपूचा उंबरठ्यावर–तुम्हाला ही कथा ठाऊक आहेच ! नरसिंह हा देव शब्दांत न सांपडणारा असून इच्छित कार्य कसें तडीला नेतो, हें पुराणानेंच दर्शविलेलें आहे, आपलें नांव नरसिंह–राजकारणांत म्हणा, व्यवहारांत म्हणा––कधीं आपण शब्दांत न सांपडण्याचें कारण नरसिंह ह्या नांवाच्या साम्यामुळेंच !

केळकर:––पुरावे दिले पाहिजेत माझ्या असल्या वागणुकीचे–

देवी:––कायदेभंग केला–मिठ विकलें–सहभोजन केलें, पण फिरून आपलें बोलून मोकळे कीं 'तुरुंगांत सरकार घालत नाहीं त्याला काय करूं'––हा पुन्हां वर प्रश्न ! पगडीसुद्धां आपण डोक्याची काढली ! वेळ निघून जातांच पुन्हां आपली डोक्यावर ! असहकार चळवळींत तुम्ही गांधीप्रमाणें टोपीलाहि डोक्यावर घेतलें. जरा गांधी घसरत आहे हें दिसतांच टोपी दूर सारून पगडी चढविली. कुणी अहेर म्हणून गांधी टोपी दिली तेव्हां त्याचा स्वीकार केला–पण डोक्यावर ती ठेवण्याबद्दल आग्रह केल्यावर 'अहेरांचे वापरायचें नसतें, तें ठेवून द्यायचें असतें' ह्या शब्दफेकीनें हात झाडून मोकळे ! खरी चेंडूसारखी आहे वागण्याची तऱ्हा आपली.

जोंपर्यंत दाबला आहे तोंपर्यंत दडपून रहावयाचें–दाब सुटतांच पुन्हां आपले तात्यासाहेब केळकर !

केळकरः—आई–अग, असा वागतो आहे म्हणून माझ्यासाठीं अध्यक्षाची खुर्ची रिझर्व आहे !–नाहींतर मला कुणीसुद्धां विचारलें नसतें !

देवीः––ही खुळी समजुत आहे ! अरे, तुझ्यांत असें कांहीं डोळे दिपवून टाकणारे गुण आहेत कीं–टाकून द्यायचे म्हणून मनांत आणलें तरी तूं चारचौघांतच राहशील ! इंद्राला जसे विपुल डोळे आहेत तद्वतच तुला अनेक कला अवगत आहेत. प्रत्येक कलेंतील अंतर्दृष्टी तुला आहे !

केळकर––मुलाचें कौतुक करणें हें मांउलीचें व्रीदच आहे ! आई बोलेल ते गौरवानेंच; आई कुरवाळील तें प्रेमानेंच–मुखांत घास घालील तो मिष्टान्नाचा–! आई; तूं मात्र मुलांचे अपराध पोटांत घालतेस,–गुणाप्रमाणें दोषाचीही पाखरण देवानें माणसांत केलेली असते. मी गुणी आहे असें लोकांना वाटतें–दुर्गुणी आहे असा भास कधीं कधीं होतो–! केळकराजवळ कांहीं नाहीं असें जरी कुणी म्हटलें तरी मला त्याचा विषाद वाटणार नाहीं;–पण जें मजजवळ आहे तें मात्र जर कुणी नाकबूल करूं लागला तर केसरी-सारखा धांवत जाऊन त्याच्या नरडीचा घोट घेईन ! केळकराजवळ लोकमान्यांची पुण्याई आहे–अंतःकरण आहे–रसिकता आहे–हें ज्या दिवशीं नष्ट होईल त्यावेळेस लोकमान्यांची सेवा करण्याकरितां मी आनंदानें जाईन !

देवीः—वत्सा––देव तुला उदंड आयुष्य देवो.

केळकरः––(पाया पडतात–गहिवरल्यामुळें देवीचे पाय ओले होतात.) आई––हें माझें पूजेचें साहित्य ! गंगेपेक्षांहि पवित्र असलेलें–गहिवरानें डोळ्यांतून वाहणारें पाणी––सद्भाव हीं गुलाबाचीं फुलें––एकनिष्ठ हें चंदन–सत्य––हें निरांजन !––आणि हें

सारें साहित्य हृदयाच्या तबकांत घेऊन नित्य नियमाने तुझ्या दारीं येणें हा माझा बाणा !

(केळकर एकवार नमस्कार करितात—देवी आशीर्वाद देते.—केळकर मंदगतीनें व जड अंतःकरणानें निघून जातात.)

—५—

कृ. प्र. खाडिलकर

देवीः—कोण आपण ? आपलं नांव काय ? आपण राहतां कुठें ? आणि आज तीन दिवस झाले, अगदीं नियमानें सूर्य आपल्या सोनेरी किरणानें वसुंधरेला भूषवित आहे—पक्षांचें गोड गुंजन चालूं आहे—पुष्पांचा सुवास दरवळत आहे—अशी संधी साधून माझ्या पूजेसाठीं येणारे आपण कोण ?

काकासाहेबः—मी कोण आहे तुम्हांला ठाऊक नसेल, पण तुम्ही कोण आहांत, कुठें राहतां—काय करितां—आपल्याला काय आवडतें, हें सारं मला ठाऊक आहे.

देवीः—पण माझ्या प्रश्नांचें हें उत्तर नव्हे.

काकासाहेबः—पण उत्तर प्रश्नाला दिलंच पाहिजे असं कुणीं सांगितलं आहे ? माझ्या सांगण्यावरून मी कोण आहे हें तुम्हाला कळलं असेल असं मला वाटलं, पण—

देवीः—नाहीं कळलं; मग कोण आपण ? माझी पूजा, माझं दर्शन जें आपण घेतां तें कोणत्या हेतूनें ? नव्हे कोणत्या नात्यानें ?

काकासाहेब—एकभक्त—निस्सीम—भक्त—एक वेळ सेवक म्हणा हवं तर !

देवीः—(हंसून लाजते) म्हणजे आपण माझे दास म्हणायचे

तर ! खरं सांगायचं अं ? कोण वरं आपण माझे ? उशीर कां बरें उत्तर द्यायला लावायचा ? कोण आपण तें चटकन सांगून मोकळं व्हायचं !

काकासाहेब:—लाडिकपणानें बोलून, माझ्यावर मोहनी पसरण्यांत तुला यश मिळेल अशी जर तुला घमेंड असेल, तर ती उराशीं बाळगूं नकोस ! बायका लाघवी असतात. लबाड बोलण्यांत चोचले भरलेले आहेत—मुरडून—लाजून--मला तूं जिंकूं पाहतेस काय ?

देवी:—(हंसून पुन्हा मुरका मारते.)

काकासाहेब:—लाजतांहि धड येत नाहीं—हंसतांहि येत नाहीं—स्त्री कशाला झालीस ? लाजायचं कस, हें प्रथम मीं नारायणाला शिकवलं—हंसतांना कुंदकळ्यासारखे कसे दांत दाखवावयाचे हें प्रथम मीं नारायणाला सांगितलं—काळी चंद्रकाळा केव्हां,—कोइमतुरी पातळ केव्हां,—पॅरिसचीं पातळं केव्हां,—कधीं—कशीं नेसायची हें प्रथम मीं त्याला शिकवलं—

देवी:—अस्सं अस्सं; म्हणजे आपण नारायणरावांचे गुरु म्हणतां कवि कृष्ण—तुम्ही नका सांगूं मला तुमची महती !—हो, प्रश्नांचं उत्तर दिलंच पाहिजे असं कुणीं सांगितलं आहे ?

काकासाहेब:—राजकारणाच्या आखाड्यांत मी प्रथम लोकमान्यांच्या बरोबर उतरलों; माझ्या लेखणीनें मी महाराष्ट्र रसिकांना मोहिनी घातली;—टिळकांच्या पाठीमागें सावलीसारखा हिंडलों; त्यांची सेवा केली. ते मला सोडून गेले—मला मग माझा स्वतंत्र सांप्रदाय निर्माण करावा लागला.

देवी:—पूर्वी लोकमान्यांचे आपण शिष्य असतांना पगडी डोक्याला घालीत होता तर ! त्यांच्या पाठीमागें त्यांना विसरून

मग आपण चरखा घेऊन सूत कातूं लागला;--आणि उरलेल्या वेळांत गंधर्वाकरितां नाटकं लिहूं लागलांत--

काकासाहेब:--देवता झालीस म्हणून अट्टाहासानें माझी निंदा करूं लागलीस, तर--तुझ्यावर आज पुष्पांचा वर्षाव करीत असलों तरी उद्यां ह्या मंदिराच्या रस्त्याला नव्हेच नव्हे, पण ह्या दिशेनें वारा येत आहे असं समजतांच--श्वासोच्छ्वासानें प्राण गुदमरूं लागला तर तसाच भूमीवर तडफडत पडेन ! तूं माझी देवता नाहींस--मी तुझा भक्त नाहीं ! देव-भक्तांचे प्रेमळ बंध ह्या क्षणाला मी तोडून टाकीन.

देवी:--स्वाभिमानी भक्ता--शांत हो ! माझ्यासाठीं क्रोध आवरायचा ! रंगभूमीच्या लाडक्या कवि कृष्णा,--तुझ्या तेजस्वी नाट्यरत्नानें माझे डोळे दिपून गेलेले आहेत. उज्वल ध्येयवाद, एकनिष्ठपणा, ओजस्विता हे गुण तुझ्याप्रमाणें तिथेंहि नांदत असलेले मला आढळले--- ! राग शांत झाला आहे म्हणायचा मग आतां विचारूं का आपल्याला ?---रागवायचं नाहीं असा कबुलीजबाब अगोदर दिला तर मग विचारण्याचं धाडस करतें.

काकासाहेब:---स्वाभिमानाला डिवचल्यानंतर जर माणसानें प्रतिकार केला नाहीं तर तो माणूस कसला ! तो जनावर म्हटला पाहिजे---

देवी:---रागावणार नाहीं असं वचन देण्याची आपण---

काकासाहेब:---विचार--खुशाल विचार !

देवी:---आपल्याला देशाविषयीं कळकळ आहे, हें आपल्या राजकारणांतील जुन्यापुराण्या कारकीर्दींवरून दिसून येतं. मोहनदासांचें शिष्यत्व स्वीकारल्यापासून आपण एकदा तुरुंगवास--कांहीं वर्षं 'नवाकाळ' पत्रांतून टाकांच्या फेंकी--डोक्याला गांधी टोपी--अंगावर एक खादीचं उपरणं--ह्यापलिकडे काय केलं आहे ? नाहीं म्हणायला नाटकांतून शांती--धर्म--असहकार--इत्यादि जाडे शब्द

वाटून, मी महात्माजींचा शिष्य आहे, इतकीच स्मृती जिवंत ठेवली म्हणावयाची ! राष्ट्र मृत्युशय्येवर पडलं असतांना—आपण सांगलीला दत्तमंदिरांत ज्ञानेश्वरीवर प्रवचनं देतां—कुठें गेलं तुमचं देशप्रेम ? कीं वृद्धपणाबरोबर देशाचा अभिमानहि केव्हां केव्हां वृद्ध होतो ?

काकासाहेब:—हृदय फाडून पहा, त्यांत तुला देशप्रेम दिसून येईल—!

देवी:——असल्या परिणामकारक वाक्याच्या फेकीनें मी भेदरून जायची नाहीं. मला समाधानकारक उत्तर मिळालंच पाहिजे.

काकासाहेब—कालापुढें प्रत्येकाला मान वांकवावी लागते ! एक वेळ माझा काल होता—मी त्यांत आपल्या पराक्रमाची शिकस्त केली. पैसा, लौकिक कमावला ! राजकारणांतील लाथाळीं पाहून मीं अंग काढून घेतलं. वाङ्मयांतहि मीं यश कमावलें व मग सेवानिवृत्त झालों. पोरंबाळं आहेत—संसारहि थाटला—समाधानानें दिवस काढले ! ऐहिक आशा संपली म्हणून लोकमान्यांनीं (काकासाहेब डोळ्याला उपरणें लावतात.) ज्या गीतारहस्याच्या लेखनानं आपलं नांव अजरामर केलं, त्याच ग्रंथाचं परिशीलन मी कृष्णातीरीं करून मी माझे आयुष्यांतील शेवटचे दिवस घालविणार ! संसाराची समाप्ती झाल्यावर मग परमार्थाचा ध्यास लागतो. मी तुझ्या दर्शनाला आज तीन दिवस नियमानें येत आहे—तसाच देह समर्थ आहे तोंपर्यंत येत जाईन !

देवी—अगदीं नियमानें येत जा—अगदीं ह्याच वेळेस—मी माझे डोळे मंदिराच्या दरवाजाकडे लावून आपली वाट पहात असल्याचं आपल्या दृष्टीस पडेल——

(खाडिलकर डावा पाय सरपटत नेत जाऊं लागतात.)

— ६ —

प्रो. ना. सी. फडके

फडकेः--(दारांतून) May I come in? It's exactly 10.

देवीः—वत्सा, तुझा विजय असो! दारांत पाऊल ठेवतांच आंग्लभाषेच्या वाग्सुमनांनीं माझा सत्कार केलेला पाहून ही देवी मनांतून खिन्न झालेली आहे. माझ्या कोहिनुरा, मराठी देवीचा भक्त म्हणून अखिल महाराष्ट्रांत तुझी कीर्ति महशूर आहे. अशा खंद्या लेखकानें

फडके—just wait देवी, तूं उमाळ्यानें उपदेश करीत असलीस तरी 'कॉन्व्हर्सेशन'च्या 'टेकनिक्'चें तूं उल्लंघन करीत आहेस, असें मी टिच्चून—डोक्यावरची हॅट काढून—नेक्टायची नॉट घट्ट करून सांगतों—

देवीः—त्रुटित संभाषण पद्धतीच्या तंत्राचें मी परिशीलन न केल्यामुळें, हे वत्सा, मला तूं उदार अंतःकरणानें क्षमा कर! तुझ्याकडील क्षेमकुशलांचें प्रथम विवेचन करूं! कोल्हापुरची हंवा तुला मानवते का?

फडकेः--देवी, कोल्हापूर म्हणजे दुसरें 'होलीवुड' आहे वरं! देवी, तुझी आक्का आहे तिला विचार कोल्हापुरांत काय गंमत आहे ती! देवी अंबाबाई सदैव प्रसन्न असते—आणि माझ्यासारख्या अनेक कलावंतांच्या कौशल्याचें ती मनापासून कोड पुरविते! स्वर्ग एकीकडे वाटतो—मी नंदनवनांत विहार करतों आहे असें मला क्षणोक्षणीं वाटतें. ह्याच माझ्या आनंदाला मी कला म्हणतों. इतर रसिकांना माझ्या आनंदाचें वावडें आहे--

देवीः--खरं सांग हं नारायणा! माझा अन् आंग्लभक्तांचा परिचय नाहीं. तूं त्यांच्या वाङ्मयाशीं समरस झाल्यामुळें—हे विचार

३७

तुझे आहेत असें समजून--तूं स्वतःचे आहेत अ[illegible] सांगत सुटलीस ! १९३२ सालांत तुझ्यावर गणेशचतुर्थीच्या [illegible] चंद्रदर्शन झाल्यामुळें चौर्याचा आरोप आल्याचं तुझ्या लक्षांत असेल.

फडकेः--माई, I love English authors more than कसं सांगू--मला त्यांच्याबद्दल प्रेम वाटतं.

देवीः—हो, बरी आठवण झाली, प्रेमाचें पोवाडेगायन हेंच तुझ्या लेखनाचं ध्येय आहे, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. त्याबद्दल तुला काय वाटतें ?

फडकेः--देवी, प्रेम--प्रेम--प्रेम ! प्रेमांत जग आहे--जगांत प्रेम आहे ! स्त्री ही प्रेमाची मूर्ती आहे ! देवी, तूं प्रेममय आहेस, सिनेमानटी प्रेममय आहेत, कॉलेजकुमारिका प्रेममय आहेत--जिथें स्त्री आहे तिथें प्रेम आहे ! बांगडी--वेणी--फणी--गुलाबी पातळ --धनुष्याकृती भुंवया--केळीच्या खांबाप्रमाणें दिसणाऱ्या पोटऱ्या--हें पाहिलें, कीं हा फडके बेभान होतो--तो धुंद होतो--त्याला कांहीं--सुचत नाहीं--रुचत नाहीं.

देवीः—वत्सा, स्त्रीजातीचा कैवार घेऊन तूं आत्मघाताचा कां मार्ग स्वीकारीत आहेस ? स्त्री हा पुरुषाचा मित्र नसून शत्रू आहे. कुठल्या स्त्रीनें पुरुषाचें हित केलेलें आहे ?

फडकेः—माते, आई माझा अनुभव निराळा आहे ! वयाच्या १५ व्या वर्षापासून मला स्त्रीजातीची माहिती झाली आहे ! स्त्री हा आनंद आहे--स्त्री ही कला आहे--हें आज पूर्ण परिचयानें व अनुभवानें मी तुला सांगत आहे ! स्त्री ही स्त्री आहे--तिच्यावर नीतिबंधनें घालून समाजानें तिला डांबून ठेवलेलं आहे--मी तर असंही म्हणेन कीं, स्त्रियांना विवाहाशिवाय मातृपद मिळालं पाहिजे !

देवीः—अरेरे ! अज्ञानें का बाळा, उद्धार होणार ! स्त्री ही आई असते बरं ! ती पवित्र आहे. ती बंधनांत आहे तोंपर्यंत जग

चाललं आहे. तिच्यावरील बंधन काढून स्वैर सोडली कीं, मग ती एक आग आहे ! वत्सा, अजून तूं लहान आहेस !

फडकेः—देवी—I am a father of about half a dozen children—तरीहि अजून तूं मला तरुण समजतेस ! देवी, माझी वाङ्मयसुमनें मीं तुझ्यापुढें सादर करण्याकरितां आणलेलीं आहेत. मी मोठ्या नम्रभावानें तीं सादर करीत आहे—

देवीः—(पुस्तकें चाळून पाहून) वत्सा, तुला एक शंका विचारूं कां ?

फडकेः—आई, शंकानिरसन करणं हें तर प्रोफेसराचं आद्यकर्तव्य आहे. विचार—आई, खुशाल विचार.

देवीः—संततिनियमनावर बाळा, पुस्तकं लिहून—

फडकेः—हां, पुढं बोलूं नकोस. समजलों मी. पण आई,—मी कलेसाठीं कला म्हणतों ती हीच ! वाङ्मय आणि जीवन ह्याचा मेळ कधींहि बसूं न देणें हेंच प्रतिभेचं साधन होय !

देवीः—तूं माझ्या दारीं आला आहेस, सप्रेम भेट म्हणून सुमनें सादर केलेलीं आहेस, तेव्हां तुझ्या कल्याणासाठीं तुला एक गोष्ट सांगते, ती शांत चित्तानें श्रवण कर. त्यांतच तुझें कल्याण आहे. माझ्या लाडक्या बाळा, पेशव्यांच्या पुण्यनगरींत शनिवार पेठेंत दत्तो वामन पोतदार नांवाचे एक अत्यंत सुविद्य, सुसंस्कृत ब्रह्मचारी राहतात; त्यांच्या घरीं बारा वर्षें जाऊन रहा, म्हणजे तूं पावन होऊन परलोकीं सुखी होशील ! वत्सा, हा हृदयीं बोल धर, अन् जन्माचा सुखी हो.

फडकेः—' वंदन तुज माय (माझी) देवी हे अखेरचे ' (हें भावगीत म्हणून अखेरचा निरोप व वंदन घेऊन छाती पुढें काढण्याचा प्रयत्न करीत परततात.)

— ७ —

श्री. म. माटे

मास्तर:—आई जोहार ! हा पुण्यपुरीचा चित्पावन ब्राह्मण जोहार करीत आहे–त्याचा स्वीकार कर.

देवी:—हे सभ्य पुरुषा, चित्पावन ब्राह्मणा, मर्द मराठ्या, असा उंबरठ्यावरच कां उभा ? ये, असा कटीवर हात ठेवून पायरीवर उभा राहूं नकोस. असा माझ्या देवळांत ये.—

मास्तर:—आई, लहानपणीं तुझ्या अंगावर दूध प्यायलों, तुझ्या अंगाखांद्यावर खेळलों, नाचलों, बागडलों, मला तूं लहानाचा मोठा केलास, मला तूं बुद्धि दिलीस–तुझ्या ह्या कृपाप्रसादानें मी संतुष्ट झालों. मी यज्ञोपवीत धारण करितों, पाटावर बसतांना पीतांबर नेसून तोंडांत घांस घेतों. त्रिकाळ स्नानसंध्या करितों, म्हणून तूं मला आई आंत बोलावते आहेस ! हे सभ्य विनयशील माते, तुझी गैरसमजूत झालेली आहे. हा बापू माटे एकटा तुझ्या पायाशीं येऊन चार युक्तीच्या गोष्टी ऐकेल, असें जर तुला वाटत असेल तर माफ कर—

देवी—पंतोजी, दारांतूनच कां गुलगुल गोष्टी करितां ? कोण आहेत आपल्या पाठीमागें ? त्यांना घेऊन आंत या ना.

मास्तर:—आई, पहा बरं, विचार कर अन् मग मला आंत यायला परवानगी दे. माझ्या पाठीमागें असलेल्या जमावाचं दर्शन होतांच तुझ्या अंगांत श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य संचरेल आणि मग—

देवी:—वत्सा, मी तुला अभय देते.

मास्तर:—आई, पदर पसरून प्राणाची याचना करणें हें माझें तर नव्हेच, पण माझ्या पाठीमागें असलेल्या हरिजनांचेंही ब्रीद नव्हे. येऊं ? अस्पृश्यांना तुझ्या मंदिरांत घेऊन येऊं ?

देवी:—मी तुझ्यासह त्यांचें आनंदानें स्वागत करीन.

मास्तर:—(पाठीमागें जनसमुदाय आहे ह्या कल्पनेनें, मोठ्या आवेशानें)—या देवांच्या दूतांनो, या, माणुसकीच्या जिण्याला मुकलेल्या माणसांनो—ही पर्वणी साधा. ही साधनद्वादशी आहे; तेव्हां हे मर्द मराठ्यांनो, हे महादजी शिंद्याच्या वंशजांनो, या, देवीच्या दर्शनाला देवालयांत या. जें महात्मा करूं शकला नाहीं तें केवळ माझ्या विनयाच्या बोलीनें साधलं. चोखोबाच्या अस्पृश्यांनो, आतां तुमच्या उद्धाराची वेळ आलेली आहेच. ही संधी दवडूं नका.

देवी:—मास्तर, पाणी पिण्याची सुटी झाली असेल तर अगोदर पाणी पिऊन या—आणि मग आपलं भाषण सुरू करा! कशाला हें सोंग करितां? कुठें आहेत अस्पृश्य तुमच्या पाठीमागें? देवालयांत म्हणे आम्हांला येऊ द्या! तुमच्याकरितां देवालयें उघडीं आहेत—तीं महारवाड्यांत ओसाड पडलेलीं आहेत! जा, तिथें जाऊन मेटा विठ्ठलाला! त्या देवळांत गोकुळाचा आनंद निर्माण करा आणि मग आमच्या देवालयांत येण्याची भाषा करा!—

मास्तर:—(हंसून—व किंचित खाकरून खांदा उडवीत) आई, अग, आम्हीं काय हें ढोंग केलें? खोटें बोलणें हें पाप आहे हें ह्या सनातनी सुधारकानें तुला सांगायला का हवें आहे? आईसाहेब नंगा नाच सुधारकांनीं सुरू केला आहे असें म्हणतेस. शोभत नाहीं तुला ग आई! असा जर नाच सुरू केला असतां तर नैवेद्य तुला वेळेवर मिळाला असतां का? वेदप्रमाण हा सिद्धांत आहे! अस्पृश्यांकरितां देवालयें मोकळीं आहेत! आई, थट्टा कां करतेस तूं? तुझ्याशपथ मी आज २० वर्षें करीत असलेल्या कार्यावर तूं एका क्षणांत पाणी घातलंस. आई श्रीची अन् तुझी ह्यापूर्वी कधीं भेट झाली होती कां? मला त्यांच्याबद्दल आदर आहे; पण त्यांची शिकवणूक आकुंचित आहे, असें माझें स्पष्ट मत आहे. त्यांच्या नादीं लागून—

देवी:—मास्तर, हा ७ वी अ चा वर्ग नव्हे कीं परशुराम भाऊचे मेंढारगृह नव्हे ! कीं आपलें अंगण समजून खुट्ट झालें कीं येऊन रणशिंग फुंकणाऱ्याकरितां बांधलेलें टिळकस्मारक मंदिरही नव्हे ! मास्तर, जीभेला आळा घाला—ही गायकवाडवाड्यांतील 'केसरी' कचेरी नव्हे !

मास्तर:—आई ! 'आई' ह्या शब्दानें तुला संबोधणं म्हणजे त्या शब्दाचा अपमान करणें होय ! अस्पृश्यांनीं मंदिरांत प्रवेश केला नाहीं म्हणतेस ? (बापू माटे खिशांतून राजभोज व सकट ह्यांचा फोटो काढतात) हा पहा राजभोज–सकटांचा फोटो ! माझ्या –एका सनातनी सुधारकांच्या खिशांत असून तो घेऊन तुझ्या मंदिरांत आलों आहे ! कोण म्हणतो मंदिरप्रवेश झालेला नाहीं ? हा पहा प्रत्यक्ष पुरावा !—

देवी:—मास्तर, बरळूं नका !—असें जर कांहीं बोलाल तर दोन तास बाकावर उभे करीन !—महाराप्रिय मास्तरा, हा नाद सोड आणि तूं—

मास्तर:—(खवळून व मिशा झाडून) प्रत्येक शिवीनिशीं हंटर पाठीवर ओढते आहेस ! मास्तराचा इंगा अजून ठाऊक नाहीं तुला !—

देवी:—काय रे, मघापासून मारे डोळे बारीक करून–तोंडांत खडीसाखर ठेवलेल्या हरिदासासारखें गोड बोलतो आहेस तें कोणत्या आधारावर ?—

मास्तर:—झालं–! माझं अवतारकार्य संपलं !–अशी सोन्याची संधी कोण दवडील ?—हे माझे विचार मी लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या 'विज्ञानबोधां'त अधिक स्पष्टपणें लिहिलेले आहेत–! श्रींची व माझी झटापट–राजवाडे, अश्लील मराठे, गो. म. जोशी ह्यांचे सामने–हें अत्यंत मनोरंजक प्रकरण 'बालबोध' नांवाच्या तयार होत असलेल्या ग्रंथांत समाविष्ट केलें असल्यामुळें फार बहार

उडालेली आहे ! तो ग्रंथ वाचनीय झाला असून किंमत माफक आहे–ट. ख. ही माफक आहे.—मिळण्याचीं ठिकाणें मागाहून जाहीर करीन–! आई—

देवी:—वस्ताद आहेस तूं बाळा ! ग्रंथ कसे खपावेत, ही कला तूं शिकलास !

मास्तर:—वेळ फार झालेला आहे, तेव्हां–हो, पण एक आग्रहाची व प्रेमाची सूचना तुला करायची आहे–ती म्हणजे अजून तुझें लग्न झालें नसेल तर–गिरीला जाऊन ठोक ! फार मजा आहे बरें त्यांत...?—अनुभवावरून सांगतों !–मग केव्हां यादी करायला सांगायची ?–वस्ता बांधायला सांगायचें आहे लक्षांत ! रुखवताचें सामान मिळेल यशवंतरावाकडे !–चांगले आंबेमोहोर तांदूळहि तिथें मिळतात बरें !

देवी:—लग्न न करण्याचा मीं निश्चय केलेला आहे !

मास्तर:—छे–छे–छे–हें वेड काहीं डोक्यांत घेऊं नकोस;– आपले चार हात करून मोकळी हो ! मनाची वाळवण कां करतेस ? लग्न झाल्यावर पहिला बाळंतविडा हा सनातनी सुधारक घेऊन येईल –हें लक्षांत ठेव !– (घंटा वाजते.) लवकर लग्न होणार (पुन्हां घंटा वाजते)–आतां मुलगा होणार हें नक्की—आणि तो पुढल्या वर्षीं मास्तरांच्या मांडीवर बाळंत्यांत गुंडाळून (घंटा मोठ्यानें वाजूं लागते) –अन् तो लबाड खात्रीपूर्वक माझ्या मिशा ओढून—

देवी—मास्तर, मोठे गोड माणूस आहांत वरं तुम्ही !–लग्नहि करिते–अन् पाहिन मी तुम्ही बाळंतविडा आणायला विसरतां कीं मी—

मास्तर:—(हंसून जातां जातां) आहे आहे, लक्षांत आहे माझ्या—

— ८ —

माधवराव जोशी

[' म्युनिसिपालिटी ' व ' विनोद ' कर्ते]

[डफ व तुणतुणें घेऊन एका कानावर हात टेऊन माधवराव नमन म्हणत देवीच्या देवळांत येतात.]

काव्यदेवते ! स्फूर्तीदेवते ! तुला ग मी नमितो घालुनि लोटांगण माधव तो— ! आई–अग ऊठ. किती वेळ दिली आहेस ताणून ? —कोंबडा आरवला, गवळी रतीब घालायला घरोघर गेले, हॉटेलांत कपबशांचा खडखडाट सुरू झाला, गुजराथी तोंडांत मुसळ घालून घुसळून–घुसळून दंतमंथन करूं लागले, खेडेगांवांतील लोक हातांत तांब्या घेऊन नदीच्या कडेला जाऊं लागले–तरी बाई, अजून तुला अंथरुणाचा मोह कसा सुटत नाहीं ? केव्हांपासून हा तुझा काका दाराशीं शंखनाद करीत आहे !–कीं तुम्हां देवींना भूपाळ्या म्हटल्याशिवाय उठवतच नाहीं ?

देवी:––काका, एखादी सुंदर भूपाळी म्हणशील कां ?

माध०:—त्याशिवाय नाहींच उठणार का ? —अग अंबाबाई, तूं मला समजतेस तरी कोण ? स्वर्गांतला गंधर्व कीं इंद्राची एकादी चवळीच्या शेंगेसारखी अन् टाम्याटोसारखी लालबुंद अप्सरा ? म्हणे भूपाळी म्हण !—माझ्या ह्या नरड्याच्या नळकंड्यांतून जर ' सा ' लागला तर तुझी रवानगी करावी लागेल मला नव्यापुलावर—! गा म्हटलें कीं किंचाळणें–नाच म्हटलें कीं थयथयाट सुरू करणें—आणि अंथरुण दिसलें कीं पाय पसरणें–हें माझ्यासारख्या कवीचें काम नाहीं ! असतील असे कांहीं लाळघोटे तुझे कवि तर धाड त्यांना लंकेंत—वनवासी सीतेच्या भोंवतीं पिंगा घालायला ! आणि फारच जर असेल त्यांच्यावर प्रेम, तर कर त्यांची उकडहंडी !

देवी—वाई–वाई–वाई–! शर्थ झाली भक्ता तुझ्यापुढें ! अरे–

माध०:—अरे काय ? एवढा मोठा ७ फूट १५ इंच कच-कचीत ताडा–माडासारखा लांबलचक ताठ उभा असतांना—तोंडावर इकडे १। शेर, तिकडे १। शेर मिश्यांचा झुपका अभिमानानें वाहतो आहे–अग, फार काय, तीन चार मुलींचा जन्मदाता बाप आहे–अशा मला तूं पहिल्या दिवसाचें नाळ न कापलेलें —बाजेवर 'म्या–म्या' करीत पडलेलें कुकुलें वाळ समजून 'अरे' अशी हांक मारतेस तर मी तुला 'ग' म्हणतों–काय करणार आहेस माझें वांकडें ? माझ्या कपाळाचें कांतडें तर नाहीं ना काढून नेणार ? आणि जरी नेलें तरी जोंपर्यंत हे हात तयार आहेत, तोंपर्यंत असल्या देवींना एका फटकाऱ्यासरसें उलथें पालथें करून सोडीन !—

देवी:—अहो—

माध०:—अं–आली मध्यबिंदूवर–कंपास ठेवून वर्तुळ काढण्याच्या रितीपर्यंत आली. काय हो, आपलें म्हणणें आहे ?

देवी:—नाहीं–कांहीं–कांहीं रसिकांचे माझ्याकडे तक्रारी-अर्ज आलेले आहेत, कीं आपण अश्लील नाटककार आहांत म्हणून !

माध०:—तुझें हें सिंहासन म्हणजे हेल्थ ऑफिसरची कचेरी समजून कोणते रसिक घरांतील मोरींत गाळ सांचलेला आहे असें अर्जद्वारें कोंकलत आहेत ? लेकांनो म्हणावें शिमगा करायचाच असेल तर तो करा कीं फाल्गुनांत ! वेळीं अवेळीं कां माझ्या नांवानें खांद्यावर टीकेचा कुंभ घेऊन माझ्या वाङ्मयसरणाभोवतीं गरगर चक्रा मारून, भोवळ येऊन तो फुटल्यावर–हाता तोंडाची गांठ घेतां ! चोर लेकाचे ! रसिक म्हणून वर मिशाला तूप लावतात ! मी आचरट लिहितों काय ?

देवी:—हा प्रश्न तुम्हाला माझा नव्हे. रसिकांचा आहे !

माध०:—अजून आपण नवतीची नार, लज्जतदार–दिसायला

मजेदार–टेसवाला आहे म्हणून तुझ्या दारांचे उंबरठे हे रसिक झिजवित आहेत ! आर्ज ३५ वर्षें मी नाटकें लिहितों आहे. पण एकादा रसिक आपल्या आयुष्याचा विमा उतरून, माझी माडी चढून चर्चेला आला नाहीं—! हाच माधवराव—मैनाबाई—

देवी:—हं माधवराव, तुम्हांला कृष्णराव मराठ्यांची शपथ आहे पुढें हें वाक्य बोलला तर !—तुमच्यावरील आरोपांचें समर्थन करा—

माध०:—समर्थन नव्हे, चांगलें चंदन उडवितों ? मी शब्दकोश तयार केलेला आहे–तो तुझ्यापुढें कथन केला म्हणजे तुझ्या मनाला अगदीं बंड गार्डनमधील जाईच्या मंडपांत विहार केल्यासारखें वाटेल.

देवी:—कंटाळवाणा न होतां जर सांगतां आला तर पहा—

माध०—सूचना मान्य ! ऐक, रसिक–म्हणजे करून करून भागलेला व देवपूजेला लागलेला पेन्शनर ! अश्लील-म्हणजे अंधारांत केलेलीं कृष्णकृत्यें बाहेर आणणारा लेखक. विनोद–म्हणजे दिवस गेलेली बाई नाटक पहायला आल्यावर हंसून हंसून जर मोकळी झाली तर तो विनोद–नाहींतर कुठें गालाला खळी पडते आहे, ना तोंच पुन्हां स्मशानवैराग्य तयार, हा विनोद रसिकांचा ! संपादक–डोक्यावर आळवण्डाची परडी घेऊन विरोधी पक्षावर बोटें मोडणारी ७५ वर्षांची खट्याळ म्हातारी ! हाऊस फुल्ल–वसंतसेनेसारखें पांढऱ्या पासाचें पातळ नेसून, तीन घंटा झाल्यावर तुफान तोबा होतो तो ! कुलीन–कुणापुढेंही जी लीन होते ती !

देवी:—कोश–खरोखरच माधवराव; अभिनव आहे बाई !

माध०:—आतांशीं कुठें कव्हर काढून, पहिल्या पानावर मजल आलेली आहे––

देवी:––शितावरून भाताची परीक्षा–! माधवराव, आपलें डोकें म्हणजे अगदीं खडकवासल्याचें धरण आहे !–बरं, तें जाऊं दे. बराच वेळ मीं आपला घेतला, नाहीं !

माध०:—सरळ 'जा' म्हणून आपल्याला सांगितलें तरी राग येणार नाहीं ! हें पहा—जातों मी आतां—जें कांहीं बोललों तें प्रेमानं बरं कां !—खरें तें सांगितलें; मनांत कांहीं एक ठेवायचें नाहीं— ! कांहीं चुकलें-माकलें असेल—तर दोन हस्त आणि तिसरें मस्तक ठेवून—घरचा रस्ता धरितों.

(नमस्कार करून जातात.)

— ९ —

विभावरी शिरूरकर

देवी:—कोण ग तूं बुरखेवाली ? पडदानशीन् स्त्री असली म्हणून काय झालें ?—जात नको का कळायला ? बोल, कोण ग आहेस तूं ?

विभा:—स्त्रियाच पडदा घेतात असें नव्हे; तर पुरुषहि कधीं कधीं आडपडदा ठेवून वागण्याचें धोरण ठेवतात—!

देवी:—मग आहेस तरी तूं कोण ? स्त्री कीं पुरुष ?

विभा:—एक वाङ्मयप्रेमी.

देवी:—नुसतें वाङ्मयप्रेमी असें म्हणून भागायचें नाहीं.—नाहीं तर जातें कशी जन्मनोंदणीच्या कचेरींत आणि करून येतें विचारपूस तुझी !

विभा:—काय विचारपूस करणार ? बुरखेवालीची माहिती सांगा म्हणून ? मग नांव सांगतें माझें—विभावरी शिरूरकर !

देवी:—अस्सं अस्सं—आलें लक्षांत माझ्या. केवळ नांवाचें संशोधन करण्यांत जो कांहीं वाष्कळ साहित्यसेवकांनीं वेळ घालविला त्यांच्या अखेर तोंडाला पानं पुसणारी बया होय ? बरं, पण हें

बाईचें टोंपण नांव आहे कीं बुवाचें आहे ? माणसानें समजायचें तरी काय ?

विभाः—पुस्तकावर लिहिलेलें आहे ढळढळीत-लेखिका—विभावरी शिरूरकर बी. ए. म्हणून !

देवीः—अहो, पण या युक्त्या कळतात मला—कदाचित् पुस्तक खपण्याकरितां हें खूळ काढलें असेल !—विभावरी शिरूरकर ह्या नांवावरून कांहीं एक बोध होत नाहीं. मग बुरखेवाले—कीं वाली ?—कोण असेल अगर असाल—कृपा करून नांव सांगा. नर कीं मादी ? स्त्री कीं पुरुष ?

विभाः—नरो वा कुंजरोवा ! देवी, आपल्याजवळ नांवाचा स्फोट करायला हरकत नाहीं; पण हरिभाऊंची मला अशी सक्त ताकीद आहे, कीं प्राण गेला तरी नांव सांगूं नकोस—

देवी—मग प्राण गेल्यानंतर कशी काय सांगणार आहेस ?

विभाः—कांहीं दिवसापूर्वी मी गतप्राण झालें होतें; परंतु पुन्हां 'विरलेलें स्वप्न' हें पुस्तक लिहिण्याकरितां जिवंत झालें. पुनरपि मरणम्—पुनरपि जननं—हें चालूच राहणार. बरं—पण हो, लेखनावरून लेखकाविषयीं कांहीं कयास बांधून त्यावरून कांहीं अनुमान काढतां येईल का तुला ?

देवीः—माझा किनई, लेखनावरून कयास बांधण्यावर आजिबात विश्वास नाहीं ! माझे अनुभव तरी विपरीत आहेत. दारूचा धिक्कार करणारा लेखक गटारांत पडलेला मीं पाहिलेला आहे; स्त्रियांचा कैवार घेणारा लेखक घरच्या बायकोला टाकून देऊन स्त्री-सुधारणेच्या गप्पा मारीत बसल्याचीं उदाहरणें मजजवळ आहेत, संततीनियमनाचा पुरस्कार करणाऱ्या समाजशास्त्रज्ञाच्या घरीं वर्षाचा पाळणा आहे; देशप्रेमाचे पोवाडे गाणारे कवि देशसेविकेच्या भोंवतीं पिंगा घालीत आहेत; मातृप्रेम—भगिनीप्रेम ह्या विषयावर कंठ शोषून व्याख्यानें देणारे वक्ते, डॉक्टरच्या माड्या चढतांना मला दिसत

अहेत–हे असले एक एक सह्याद्रि–हिमालय–अरवली पर्वतासारखे दाखले जवळ असल्यावर असले वेडे मनोरे बांधण्याचें धाडस मीं कधीं केलें नाहीं ! लेखन लिहिणारा पुरुष आहे कीं बाई आहे, हें जाणणें सुद्धां अवघड आहे ! कारण कुठल्याहि मार्सिकांत स्त्री-लेखिकेचा लेख वाचला तरी पुरुषानें लिहिल्यासारखा वाटतो.–वरं पुरुषानें लेख लिहिला हें केवळ नांवावरून म्हणायचें;–बाकी लेखन जर चाळून पाहिलें तर निव्वळ बायकी !

विभाः––खरं आहे–पण माझें लेखन वाचून तें एका––

देवीः––बाईनें लिहिलेलें आहे असें वाटतें ! स्त्रीनें लिहिलेलें नसलें तर एका जिवंत हृदयानें लिहिलेलें असा आत्मविश्वास वाटतो ! सहानुभूतीच्या शाईनें अनुभवाच्या कागदावर लिहून तें सदय अंतः-करणानें टिपलेलें आहे. हा भास वारंवार होतो ! त्या वाङ्मयप्रेमी युवतीचें अंतःकरण भ्राजलें आहे, अनेक ठेंचा लागलेल्या आहेत, हें मात्र बालंबाल खरें ! आणि मला असें वाटतें, नांवाचा स्फोट व्हावा ही जर प्रांजल इच्छा असली तर त्याचें कारण एकच असावें. स्त्री असली तरी धीट आहे, निर्भीड आहे. डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारी आहे, म्हणून तिचा गौरव करतां आला तर पहावा, ह्या निर्मळ उद्देशानें नामगौप्याचा तिनें स्फोट करावा ही इच्छा !

विभाः––गौरव कशाचा करणार ? संसारांत बायकांना गुला-माहून हलक्या दर्जानें वागविलें जातें–त्याचा ? कीं तें सुरस–मोहक भाषेंत लिहिलें गेलें म्हणून ? गौरवाची अपेक्षा मी करित नाहीं–झोंपी गेलेल्या समाजाला जागें केलें–डोळ्यावरची झांपड नाहींशी केली–स्त्री ही एक जात आहे तिला भावना आहेत, अंतःकरण आहे–थोडे फार हक्क आहेत, येवढें जरी कळलें तरी माझा कार्य-भाग झालेला आहे ! माझीं मतें श्लील असोत अगर अश्लील असोत–त्यांचें खंडन , नुसतें विद्वानांनीं करून वृत्तपत्रांचे रकाने

भरावेत--मी मात्र चित्रकाराप्रमाणें जें दिसलें तें पुढें आणून ठेवलें. तें समाजानें डोळे फोडून पहावें म्हणजे झालें.

देवी:--खरोखर, आज मात्र माझ्या मनाला संतोष वाटत आहे-कां बरें ?—

विभा०—एका जातीच्या दोन अंतःकरणांचें मीलन झालें म्हणून असेल !

देवी:—म्हणजे ? तूं बुरखेवाला नसून बुरखेवाली आहेस तर ? आतां सौभाग्यवती आहेस कीं कुमारिका आहेस हें मात्र सांगणें कठीण आहे ! सौभाग्यवती असावीस, असें शरीरयष्टीवरून दिसतें, जर नसलीस तर प्रौढ कुमारिका असशील ! काय करायचें मला बाई तुझ्या नांवाशीं ? खणा-नारळानें ओटी भरून करते कशी रवानगी.

विभा०—कर माझी रवानगी लवकर, नाहीं तर तिकडून--

देवी:—तिकडून ? म्हणजे ? लग्न झालें आहे कां तुझें ? कीं कुठल्या प्रियकराशीं संधान जुळविलें आहेस ? कांहीं कां असेना-पण बाई, हो एकदांची वरमाई !

(खंणा-नारळानें ओटी भरल्यावर विभावरीताई नमस्कार करते.)

देवी:--अष्टपुत्रा सौभाग्यवती--

विभा०--(मध्येंच हंसून) आई, कालमानाप्रमाणें आशीर्वादाची शब्दरचना बदलायला पाहिजे, बरं का ?

(पुन्हां एकवार नमस्कार करून विभावरीताई जाते.)

— १० —

कवि यशवंत

यश०:— दऱ्याखोऱ्यांतला आला
कवी हा खास दरबारा
मराठ्यांच्या महालक्ष्मी
तुला घे शाहिरी मुजरा.
जगाचा मानितों स्वामी,
स्वतःला मी महामानी,
तुझ्या धामीं,
तुझ्या कामीं,
परंतु दास तो मानी.

—देवी, माते, तुझ्या मंदिरांत आलों, तें कशासाठीं ? आई, मला जें जगांत सांपडलें नाहीं त्याचा शोध इथें लागेल म्हणून मी आलेलों आहे ! आई, ह्या दमलेल्या प्रवाशाला इथें समाधानाची पाणपोई सांपडेल का ? डोक्यावर तळपत असलेल्या प्रखर सूर्याच्या तापानें जिवाची तल्खी झालेल्या मला—तूं घोटभर पाणी देणार नाहींस कां ? मला तहान लागलेली आहे ग—! देतेस कां पाणी—?

देवी:—पोरा,—आई म्हणून हांक मारल्यावर—पोटाशीं येऊन कमरेला घट्ट मिठी मारल्यावर—वेड्या, तुला मला दूर लोटतां येईल कां ? बाळा—अरे, मायेचा शब्द मुखानें ज्या आईला बोलतां येत नाहीं ती आई कसली ! बावरलेल्या मनाला—हताश झालेल्या मनाला—जिला सांवरून धरितां येत नाहीं ती आई कसली ? कळवळलेल्या अंतःकरणानें याचनेचा शब्द टाकून—तूं आईला—

यश०:—चुकलों, माफ कर ! तहान लागलेली आहे ! जीव घाबरलेला आहे; जिभेला स्वाभिमानाची भाषा बोलतां आली नाहीं—तिनें याचना केली—निराशेनें कडवट झालेल्या तोंडांत ती राहाते म्हणून तिनें संवयीप्रमाणें असा सवाल केला.


देवी:—निराशा ज्यांच्या कपाळीं सदैव असते त्यांना खरंच साशंक मनानें पहावें लागतें ! अनुभव जिथें तिथें येऊन सांगू लागतो—'विसरलास इतक्यांत—आतांच तुला ठोकर लागलेली आहे, सावध ऐस.'

यश०:—आई,—तहान लागलेली आहे ग मला ! घोटभर पाणी दे—अगदीं लवकर दे. माझा जीव किनई कसा घाबरा झालेला आहे—देणार नाहीं कां तूं मला पाणी ?

देवी:—देते ! पण अगोदर मला सांग, असा निराश—उदास—हताश—कां वरं झालास तूं ?

यश०:—हा प्रश्न मला विचारणारं एक तरी हृदय आहे म्हणायचं ! जेथून मी निघून आलों, तिथें इतक्या प्रेमानें कुणी कुणाबद्दल विचारपूस करीत नाहीं,—तिथें माणुसकी नाहीं, अंतःकरणाचा ओलावा नाहीं—गुणाची मोजदाद नाहीं, जसे अनेक त्यांतलाच मी एक असं समजून सगळेजण वागतात. मोकळ्या मनानें कुणाला सांगायला गेलों तर कुणी ऐकेल असा विश्वास वाटत नाहीं—आणि ऐकून अखेर जर कांहीं पदरांत पडायचं असेल तर मग—नशीबच तुझें फुटकें—त्याला कोण काय करणार ? आणि त्यावर दांत वेंगाडून उपहासानें हंसण्यानें विरजण घालायचं ! आपुलकीच्या भावनेनें मला कुणीं विचारलें नाहीं—जें जें मी मागितलें तें तें मला मिळालेलें नाहीं—म्हणून मी असा उदासीन आहे !

देवी:—ही करुण कथा ऐकून नुसता सहानुभूतीचा शब्दहि कुणी तुझ्याशीं बोललें नाहीं ?



यश०:—नाहीं; उलट मला झिडकारलं लाथाडलं—रडतोंड्या, दुबळा—म्हणून खिजविलं ! असल्या परिस्थितींत वाढणाऱ्या माझ्या प्रतिभेला काय गातां येईल ? अनुभव ! त्या अनुभवांत निराशा, आशा, ह्यांचें युद्ध— ? जीवन हें काव्य आहे असें म्हणतात. मला जसे जसे अनुभव आले तसे तसे ते रसिकांपुढें सांगितले तर त्यांत माझा काय दोष आहे ? स्वतःला न फसवितां जें सांगतां आलें, त्यांतून जर कांहीं घेतां येण्यासारखें असलें तर घ्यावें, ही माझी इच्छा आहे ! आई, निराशहृदयी माणसाच्या वृत्ति बधीर झालेल्या असतात, त्याला निराशाच कणखर करीत असते,—आणि त्याचेच सूर त्याच्या काव्यांत आढळून येतात. जगाविषयीं मीं बेफिकिरी दाखविली ती निराश झाल्यावर, आणि त्यामुळेंच कणखर असा आशावाद माझ्या ठिकाणीं बळावलेला आहे.

देवी:—ज्या जगांत तूं राहतोस, तिथें ही असली बजबजपुरी आहे म्हणतोस ? मला नुसती कल्पना होती, प्रत्यक्ष पुरावा हा आज माझ्या डोळ्यांपुढें आलेला आहे. कविराज, जगांत जशी तुझी परवड झाली तशीच संसारांतसुद्धां तुझ्या वांट्याला आली ना ? संसारांत तुला—

यश०:—नाहीं—सुख नाहीं. तिथेंसुद्धां कांटे पसरलेले आहेत—संसाररथाचें सारथ्य करणारी गृहिणी मला लाभलेली नव्हती; आणि अजूनहि मला—

देवी:—लोकनिंदेचे प्रहार सहन करून पुन्हां बोहल्याच्या पायऱ्या चढूनहि अजून सुख नाहीं—असं कां बरं म्हणतोस ?

यश०:—याला कारण सद—सद्विवेकबुद्धि. ती जागृत आहे म्हणून मी दुःखी आहे ! एका गृहिणीचा, सुख मिळत नाहीं म्हणून त्याग करून दुसरीचा स्वीकार केला, ही गोष्ट मनाला बोचते आहे ! तीही एक स्त्रीच होती—देवानें तिच्यांत माझ्या समाधानाच्या

गोष्टी सांचविल्या नाहींत, म्हणून दूषण देऊन मीं तिचा त्याग केला असें नाहीं-तर आई—

देवी:—मग कां त्याग केलास ? त्या माऊलीला कां दूर लोटलेंस ? तिच्या सहवासांत अर्धेंअधिक आयुष्य घालविल्यावर—काव्याच्या कीर्तीचा झेंडा तिच्या भाग्यानें आणि तुझ्या नशिबानें फडकला—त्या स्त्रीचा कां त्याग केलास ?

यश०:—स्वार्थाकरितां—स्वतःच्या सुखाकरितां ! मी कृतघ्न झालों, वंचना केली, तिच्या अंतःकरणाच्या तारा तोडल्या, मोठें थोरलें पाप केलें, माझ्या भावना न दुखवण्याच्या भरांत एक हृदय, दुखविलें—नव्हे कायमचें जखमी केलें ! आई—मी तुझ्या चरणांवर हात ठेवून सांगतों—नाहीं—अपराधाचें पारडें माझ्याकडे झुकलें...! मीं तें कबूल केलेलें आहे ! मग आई, मला तुझ्या दारीं समाधानाचें घोटभर पाणी मिळेल का ? पोळलेल्या जीवाला चंदनाच्या उटीचें लेपन करशील कां ? माझ्या प्रामाणिकपणाच्या वागणुकीला अखेर यश मिळून तुझ्याकडून प्रसादाचा नारळ माझ्या हातांत पडेल का ?

देवी:—वत्सा, तुझा संसार सुखाचा होईल, तुझ्या आकांक्षा सफल होतील; माझें तुझ्यावर सदैव प्रेम राहील. ज्या ज्या वेळीं संकटांत तूं माझें स्मरण करशील त्या त्या वेळीं, नुसत्या माझ्या नामस्मरणानें तुझी मुक्तता होईल !—[देवी यशवंताच्या हातांत प्रसादाचा नारळ देते ! कवि यशवंत भक्तिभावानें नारळ घेऊन त्यावर कविता तयार करीत जातात]

—११—

य. गो. जोशी

(य. गो. जोशी आपल्या दुचाकीसह मंदिरांत येतात आणि लवंगी ऊर्फ अण्णाराव भोपटकरी विडीचे फवारे कसब्या पेठेंतील धुराडें ज्या गतीनें सोडील त्याच गतीनें सोडतात.)

देवी:—कांहीं वागण्याचें तंत्र ठाऊक आहे कां ? मंदिरांत कसें यावें ? केव्हां यावें ? कोणता पोषाख करावा ?' तोंडांत विडी—हातांत पिशवी—आणि बसायला दुचाकी—मंडई करायला निघाला कां माझे दर्शन घ्यायला आलात !

य. गो.:—आई, मी कशासाठीं आलों हें तुला सांगावें लागतें ?—आई, अजून ह्या य. गो. च्या अंतःकरणाची पारख तुला झालेली दिसत नाहीं—अजून तुझ्या डोळ्यांपुढें सुटा-बुटांत आणि उलटे केस फिरवून ' रिकाम्या ' डोक्यानें येणारे साहित्यिक नाचताहेत वाटतं ?—आई, वागण्याचें तंत्र—बसावयाचें तंत्र-तंत्र°—वीट आला आहे मला ह्या शब्दांचा—

देवी:—तंत्र ह्या शब्दाचा येवढा तिटकारा कां आला ?

य. गो.:—आई—भावनांचीं कारंजीं आम्ही तंत्राच्या जाळीदार झारींतून कां उडवावयाचीं ? अंतःकरणाच्या पाझराचे पाट—म्युनिसिपालिटीच्या पाण्याप्रमाणें कां मर्यादित कालांत सोडावयाचे ? शब्दांचे काजवे—भाडेकऱ्याला दिलेल्या विजेच्या दिव्याच्या तालावर कां नाचवावयाचे ?—आई—आम्हाला काय वाटतें हें आम्हाला ज्या प्रकारें वाटतें त्या प्रकारानें सांगतां आलें पाहिजे ? आई—तंत्र हें सिनेमा—डायरेक्टरइतकें घातकी असून चांगल्या विचाराचा आणि वाङ्मयाचा ' विचका करणारें ' आहे—

देवी:—अरे—आतांपर्यंत—ते तुमचे शिरोडकर—खांडेकर—कोल्हापुरी प्राध्यापक अप्पासाहेब फडके—येऊन ते तेरा—वर्षीं—पहांटेच्या प्रहरीं 'सकाळ—त्रिकाळ' आवेशानें ओरडणाऱ्या पोऱ्याइतकें, तंत्राच्या नांवानें घोषणा करीत होते—आणि तूं तर?

य. गो.:—आई—मुलाला मांडीवर घेऊन कसें खेळवावें? रागावलेल्या पतीची समजूत कोणत्या शब्दानें करावी?—परिस्थितीच्या वणव्यांत सांपडलेल्या संसारी माणसांची सुटका कशी करावी?—रंगभूमीवर पाय ठेवतांच साऱ्या श्रोतृवर्गाचीं मनें कशीं खेंचून घ्यावीं—हें तंत्रानें शिकतां येत नाहीं—आई—त्याला अंतःकरणाची जोड असावी लागते—

देवी:—खरं आहे—मला वाटलें—तूं वहिनीच्या बांगड्या—कोथिंबिरीच्या काड्या—दुधावरची साय—सुपारी—कर्ज फिटलें आणि सावकार गमावला—ह्या गोष्टी लिहितांना—कुठल्या एकाद्या इंग्रजी लेखकांच्या लेखनांत 'कायाप्रवेश' करून—आम्हाला वेड लावलेंस—अरे, पण तुला एक शंका विचारावयाची आहे—तूं जें लिहितोस तें सारें—आसपासचें—व्यवहारांतलें कां लिहितोस? जें घडतें, जें दिसतें तेंच लिहिण्यांत काय कला आहे— ? तूं कलेसाठीं लिहितोस कां जीवनासाठीं लिहितोस?

य. गो.—(एकदम मोठ्यानें किंचाळून—) आई—ग—

देवी:—विंचू चावला कीं काय?

य. गो.—साहित्त्यिकांला फुरसें चावतें—विंचू नाहीं चावत—

देवी:—मग येवढ्या मोठ्यानें किंचाळायला काय झालें?

य. गो.—मघाशीं काय म्हणत होतीस—त्याचें उत्तर आमच्या पुण्यांत अशीं कांहीं एरंडांचीं गुऱ्हाळें आहेत—तिथें—हा टाक तुझा ऊंस—आणि जर कांहीं तुला 'रस' मिळाला—तर तो विकून हो मोकळी—! आई—कलेसाठीं 'कला—म्हणजे

निवडणुकीपुरती कॉंग्रेस—आणि जीवनासाठीं कला—म्हणजे महात्मा गांधींचें उपोषण—आई—कलेसाठीं कला—म्हणजे प्रभातचा 'वहां' आणि जीवनासाठीं कला—म्हणजे हंसचा 'ब्रह्मचारी'.

देवीः—आणि तूंहि लिहितोस ना सिनेमाच्या गोष्टी—काय झालें तुझ्या 'माझ्या मुलाचें?'—

य. गो.—आई—तो 'माझा मुलगा' नव्हता.

देवीः—मग कुणाचा होता?

य. गो.—आई तो माझा नव्हता—तो तुझाहि नव्हता—प्रत्येकाचा होता—नव्या मार्गानें प्रवास करणाऱ्या तरुणाच्या मार्गांत काय अडचणी येतात हें समजणाऱ्या लोकांचा तो होता—तरुणांच्या मताचा आणि मनाचा कसा चुराडा होतो—हें जाणणाऱ्या रसिकांचा होता—बाप आणि मुलगा ह्या दोघांच्या एकाच ध्येयाच्या देवळाकडे जाणाऱ्या भिन्न मार्गांचें तें सत्य चित्र होतें—! जगण्यासाठीं झळणाऱ्या अंतःकरणाची ती आग होती—

देवीः—सारें खरें आहे बाबा—पण कुठें तुफान मेंल कुठें ब्रह्मचारी—कुठें जन्टलमन डाकू—आणि कुठं तुझा 'माझा मुलगा'—चिटपांखरूं तरी फिरलं कां प्रभात चित्रमंदिराकडे?

य. गोः—आई—तूं केव्हांपासून सिनेमा पाहूं लागलीस—'ही पहा तुफान गर्दी'—'ओळखा पाहूं' म्हणून 'आर. बी.' सारखी डोक्यावर फुली करून—बक्षीस रुपये पांच घेऊन जा—अशी जाहिरात मीं केली असती! आई—तुफान गर्दीचें वाढत्या लोकप्रियतेचें—आणि चर्चेचें कथानक मला लिहितां येत नाहीं—माझ्या स्फूर्तीला उत्तेजक पेय लागत नाहीं.—कंपनीच्या मालकांना दिवाणी तुरुंगांतून सोडवून आणण्याकरितां लागणारी 'आघुक माघुक' कथानकेहि तयार नाहींत—तुंबली मोरी—कर अर्ज म्यु० कडे—लागली भूक—कीं गांठ एकादा पित्त्या—दिसली तरुणी—कीं

कर प्रेम--अशाच तंत्रानें नाचणारीं कथानकें ह्या जन्मांत लिहिणें शक्य नाहीं.

देवी-•—मग जन्मभर—हीं सायकल—'माझें प्रकाशन' 'चित्त-रंजन माला'—आणि मुंबईचें खेटे—हें कांहीं चुकत नाहींत—

य. गो.—आई-जोशीबुवांची जात तूं ओळखली नाहींस—पैशाच्या नादानें नाचणारा असा हा साहित्यिक नाहीं—केंस काप-ण्याचे ४ आणे—नुसत्या दाढीचे २ आणे-एकदम दोन्ही केल्यास फक्त चार आणे--असा लेखक नाहीं--दिसली पथारी पसर पाय-दिसले पैसे देणारें मासिक कीं लिही--मारुतीच्या शेपटाइतकें लांब लेखन—दिसला सीझन मॅनेजर--पसर हात पासासाठीं—दिसली सायकल--कीं हिंड गांवभर--य. गो. जोशी पैशानें विकला जाणारा लेखक नाहीं--पोटासाठीं लिहीन--पोटासाठीं कष्ट करीन-परंतु जें मानवत नाहीं—आवडत नाहीं आणि पचत नाहीं--अशा मार्गानें जाऊन--जगणारा मी लेखक नाहीं--

देवी—मला वाटलें नुसत्याच ओंठावर मिशा बाळगणारा लेखक आहेस--परंतु--आहे--त्यालाहि पीळ आहे—आंकडे आहेत—

य. गो.—आई—येतो--तुझ्या लेकराला आशीर्वाद दे--

देवी:--बाळ--तुझ्या वाङ्मयाचें स्थान महाराष्ट्रीय जनतेच्या अंतःकरणांत राहील. तुझ्यासारख्या जिवंत आणि जळणाऱ्या लेखकांचें मराठी वाङ्मयांत स्थान ध्रुव ताऱ्यासारखें अढळ राहील--आणि तुझीं निष्पाप—प्रेमळ हसरी--दुचाकीवरील मूर्ति पाहतांच--हाताला ओढून संसारी माणसें तुला मानानें स्वयंपाक घरांत नेऊन, तुझा गौरव करतील—जा वत्सा—तुझा विजय असो.

(य. गो.—पुन्हां एकवार नमस्कार करितात आणि विडी शिलगावून देशमुखवाडीचा रस्ता धरतात.)

— १२ —

प्र. के. अत्रे

(आचार्य अत्रे-आपल्या स्वतःच्या मोटारगाडींतून मंदिरा-पर्यंत येतात. हातांत—स्वतःच्या शरिरास शोभेल इतकी जाड पेन्सिल—मतदारांची यादी—आणि दोन्ही बाजूंस दोन बालमोहन संगीत मंडळीमधील रंगभूमीचे जय-विजय.)

अत्रे:—(आपली खादीची विजार—बिस्तान्यावर टाकलेल्या चादरीसारखी ओढत)—अरे—२३९३—सांपडला शेज नंबर—हेंच दिसतें आहे सरस्वती देवीचें मंदिर—हीं विड्यांचीं अर्धवट जळालेलीं थोटकें—हीं पादत्राणाच्या अभावीं उमटलेलीं धुळींतील पावलें—ह्या पिचलेल्या बांगड्या—सुकलेलीं फुलें—आणि चुरगळलेले कागद—आणि—बोथट झालेलीं निर्फे—थांबरे मी पाहून येतों—(मोठ्यानें हाका मारीत) सरस्वती गजोबा शेज नं. २३९३ इथेंच राहतात काय ?

देवी:—सरस्वती गजोबा—आणि शेज नं. २३९३ ही काय भानगड—हें माझें मंदिर आहे—इथें शेज नंबर—अन् काय?

अत्रे:—आई—मी उभा आहे—म्हणून आलेलों आहे—मतें हवीं आहेत मला तुझीं—कॉंग्रेसच्या तिकिटावर उभा राहिलों आहे मी—

देवी:—मंडईतला चार आणेवाला कॉंग्रेसभक्त आहेस कां एखादा बलभीम साहित्यिक आहेस? कां एकाद्या शहाजान मोटार कंपनीचा एजंट आहेस-? ती तुझी चार आणे किंमतीची तिरवी गांधी टोपी, वस्ताद गुलाम महंमदी छाप—विजार—आणि रांजणाभोंवतीं गुंडाळलेल्या पांढऱ्या स्वच्छ कपड्याइतका अघळपघळ कोट—आहेस तरी तूं कोण ?

अत्रेः—आई—मी कोण आहे हें तुला ठाऊक नाहीं ? बाल-मोहन संगीत मंडळींतील तुपाची धार भातावर सोडणाऱ्या स्वयं-पाक्यापासून—ते 'व्हिटेक्स वापरा' असा उपदेश करण्याची ज्याच्या खत्म झालेल्या केसांकडे पाहून उसळी यावी अशा दामूअण्णापर्यंत—विचार मी कोण आहे तो ! स्टेशनवरील हमाला-पासून—ते बेवडा दिला कीं—'कॉंग्रेस कीं जय' असें ओरडणाऱ्या नवटाकी देशभक्ताला विचार मी कोण आहे तें—हंसच्या दर-वाज्यावर पहारा करणाऱ्या शीखापासून—ते बाबूराव पेंढारकरा-पर्यंत विचार मी कोण आहे तें ?—

देवीः—म्हणजे केशवकुमार—केशवकुमार—म्हणून म्हणतात—ते तुम्हीच वाटतं ?

अत्रे (मिस्कीलपणें)—हो कीं—! अहो—केशव कुमार म्हण-तात तोच मी—आचार्य अत्रे म्हणून ज्यांचे फोटो वेळीं अवेळीं वृत्तपत्रांतून येतात—तोच मी—

देवीः—साहित्यिक आणि कॉंग्रेस भक्त—अय्या—ब्रह्मचारी आणि संसारी—खानावळ आणि सुग्रास अन्न—मास्तरीण आणि खूप सुरत—तरुणी आणि आंबडा—वेड्या, कशालारे त्या कोंडवाड्यांत गेलास ? तुझ्या साहित्य संसाराचा शेवगांशेगांव कां करावयाचा आहे ? कॉंग्रेसमध्यें शिरून काय करून दाखविणार ? कुणाचे विडंबन करणार ? गांधीचें कां वल्लभाईचें ? लक्ष्मीबाई टुरयांचें कां द्वारकाबाई भटाचें ? महात्मा गांधीच्या चुरगळेल्या पंचाचे कीं मुर्दाड चरख्याचें ?

अत्रेः—आई—कॉंग्रेस हीच देशाची शक्ति आहे—कॉंग्रेस हीच देशाची स्फूर्ति आहे. कॉंग्रेस हीच वाङमयाची आदिदेवता आहे—

देवीः—वाया—गेलास—अगदीं वाया गेलास रे बाबा—कॉंग्रेस-मध्यें जाऊन कुठल्या साहित्यिकांचें कल्याण झालें आहे ?

अत्रेः—कां असें कां म्हणतेस ?

देवी:—खाडिलकर—गांधी टोपी डोक्यावर ठेवली नाटकांचा केला सावरमती आश्रम—वीर वामनराव—अग आई—त्यांनीं तर अगदीं देशाला आग लागली आहे अशा समजूतीनें नाटक लिहायला सुरुवात केली—ते वामणगांवकर—सगळ्याच्या—लेखण्यांना टकळीचें स्वरूप आलें—आणि तुझा तो मामा वरेरकर—

अत्रे:—म्हातारपणामुळें—त्यांच्या नाटकाला T.B. झाला आहे—कॉंग्रेसचा आणि त्याचा खरें बोलण्याइतका सुद्धां संबंध नाहीं—माझ्या साहित्यसेवेवर काय कॉंग्रेसचा परिणाम झाला आहे ?

देवी:—सांगू—वंदे भारतम्—नुसता आरडा ओरडा—मी उभा आहे—'मी आणि माझी निवडणूक !—उद्यांच्या संसारांतील तेजस्वी करुणा आणि बदफैली विश्राम कुठें आहेत तुझे ? घराबाहेर ह्या सर्वांगं सुंदर नाटकांतील नांवाप्रमाणें निर्मल असणारी निर्मला—एकाएकीं कुठें नाहींशी झाली—? लग्नाच्या बेडींतील लग्नसंस्थेच्या दोषाचें दिग्दर्शन करणाऱ्या जोडगोळ्या कुठें गेल्या ? प्रत्येक वाक्या गणिक आम्हाला हंसवणारी तुझी विनोद बुद्धि आज म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यांत मध्यें गच्च बसली. महाराष्ट्राचा हंसरा आणि लाडका लेखक आज शेंदूर फांसणाऱ्या संस्थेंत सामील झालेला आहे ! नाट्यदेवीचें वस्त्रहरण प्रसंगीं आपल्या नाट्य वस्त्रालंकारांनीं लाज राखणारा—श्रीकृष्ण—आज—आपल्या हातांनीं—

अत्रे:—आई—

देवी:—कांहीं बोलू नकोस हॅट काढून गांधी टोपी घातली—हिंदुधर्म कीं जय म्हणून सावरकरांचा उदो उदो केलास—आणि कॉंग्रेसमध्यें जाऊन विरुद्ध पक्षांची एकाद्या भिक्षुकाप्रमाणें श्राद्धपक्षें घालूं लागलास— ?

अत्रे'—आई वेळ येईल—तशी पाठ देणें—काळ येईल तसें वागणें—

देवी:--इतरांच्या आवाजाला साथ देऊन--जय-जयकार करणें हें तुझें काम नव्हे--हें राजकीय वेषांतर सोडून पुन्हां तूं सुटा-बुटांत ये--ह्या तुझ्या शुभ्र आणि निर्मळ अंलकाराकडे आणि वेषांतराकडे पाहून--संन्यासी झालेल्या अर्जुनाची आठवण होते-साहित्य सुभद्रेचें हरण करून--पुन्हां रासिकांसभोर 'सोन्याच्या गाड्यांतून' केव्हां येशील ?

अत्रे:--आई--होऊं नये झालें--आतां 'गुपचूप'--आई-काय करूं--कोणत्या मार्गानें जाऊं ?

देवी:--ऐक--प्रथम एक डझनभर 'श. वा.' सोपच्या वड्या आणून टिळक तलावांत स्नान कर-नंतर हीं पांढरीं वस्त्रें वस्त्राविना हिंडणाऱ्या ½ कॉंग्रेस भक्ताला ग्रहणाचें दिवशीं दान कर--कांहीं दिवस शिवाजी आखाडा-म्युनिसिपालिटी आणि अध्यक्षस्थान वर्ज करून--स्वस्थ बस--लोकशक्ति आणि इतर गोंधाळ पत्रांचें वाचन बंद करून दिवसभर शेंगादाणे खात--बस, मोटारीवरचा तिरंगी झेंडा काढून--भगवा झेंडा लाव--

अत्रे--आणि असें नाहीं केलें तर--

देवी:--शरीरानें 'गामा' राहशील आणि वाङ्मयाचा दृष्टीनें मुंबई ऑफिसांतला कारकून बनशील--

अत्रे--आई-येतों मी-मुलाला आशीर्वाद दे-

देवी:--आशीर्वाद मग-अगोदर दे. भ. चीं वस्त्रें टाकून-वाङ्मयसेवकांचीं वस्त्रें धारण करून ये--

अत्रे:--आई येतों मी-(जातांना)-मत मागायला आलों--आणि कानपिचक्या घेऊन--

(अत्र्यांचा उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहून)

जयविजय:--साहेब--

अत्रेः—साहेब–कसला–अगदीं 'देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण' केले मला—

जयविजयः—काय झालें काय !

अत्रेः—(मोटारचे हॉर्न वाजवितांना) केस विंचरून 'छबीला' शोभा आणावी म्हणून 'केश कर्तनालयांत' आलों आणि—अगदीं "गं. भा." होऊन यावें, असें झालें आहे—

(अत्रे—मोटारींतून बसून कूच करितात.)

∴ साहित्यिकांचें स्वयंवर—

प्रवेश पहिला

(**स्थळ**—टिळक स्मारकमंदिर; देखावा—मुख्य दरवाजा-पाशीं दोन होतकरू साहित्यिक निमंत्रित साहित्यिकांचें स्वागत व निमंत्रणपत्रिकेची पाहणी करीत आहेत.)

एक बातमीदार—किती वाजतां समारंभ सुरू आहे ?

सा. नं. १—कुठल्या वृत्तपत्राचे बातमीदार आहांत आपण ?

सा. नं. २—बातमीदार असाल; पण निमंत्रण आहे कां ?

ए. बा.—ही पहा निमंत्रणपत्रिका—

सा. नं. १—ही निमंत्रणपत्रिका स्वयंवराची नसून आज भिकारवाडींत ' बेसन–भाकर ' आहे त्याची आहे.

सा. नं. २—जा, पोटभर खा—! अशा निमित्तानं तरी तुमचा एखादा दिवस भागत असेल—(बातमीदार जातो).

सा. नं. १—वा ! दत्तोपंत पोतदारांना कशाला दिलें ह्या स्वयंवराचें आमंत्रण—?

सा. नं.२—समारंभाला शोभा यावी म्हणून दिलें असेल झालें ?

दत्तो०—काय रे ? अजून कुणीच कशी मंडळी जमली नाहींत ? मी घाईघाईनें आलों मुहूर्त साधण्यासाठीं—

सा. नं. १—आणि दत्तोपंत, ही पिशवी कशाला आणली ?

सा. नं. १—हिंडतां-हिंडतां-कांहीं सांपडलें तर पिशवींत टाकून मोकळें व्हावें म्हणून.

दत्तो०—अरे वा ! या बापूसाहेब—

बा. चाफेः—हं-हं-हं, दत्तोपंत, वेळेवर आहे ना ? चला, आंत बसूं बोलत. चला; अरे, पण निमंत्रणपत्रिका-हं-(खिशांतून काढून)-

सा. नं. १—हें तर कॉलेजचें टाइमटेबल आहे.

बा. चाफे.—असें झालें काय ! बरें दत्तोपंत, तुमची तरी दाखवून चला.


दत्तो०—माझी निमंत्रणपत्रिका सांपडली; हं, चला.

सा. नं. १—अहो, हें झोन तिकिट आहे.

सा. नं. २—पण तें तरी त्यांचं आहे का ? सही आहे तात्या-साहेब केळकरांची ! बरें—

दत्तो०—बापूसाहेब, ही आमची विद्यार्थी मंडळी आहेच—तशी अडचण नाहीं पडायची.

बा. चाफे०—तेंही खरें आहे.....(कण्हल्यासारखे हंसत हंसत जातात).



सा. नं. १--अरे, हे वामन मल्हार

सा. नं. २--हे लोकशिक्षण, ते ज. स. करंदीकर-

सा. नं. १--झाडून सारें विश्राम मंडळ बोलावलेलें दिसतंय.

सा. नं. २--नाहीं तर स्वयंवराच्या धांदलींत पेन्शनरांना निमंत्रणें नेमकीं जायचीं आणि तरुण उमेदवार सगळे विसरून जायचे ! अरे, य. गो. आज अगदीं घोटून आले आहेत.

सा. नं. १—यशवंतराव, एका 'स्वारींत' तरी यायचें !

य. गो.--चार पायांच्या वाहनापेक्षां दोन पायांचेंच हक्काचें वाटतें; मी तरी सायकलीवरनं आलों; पण हे आमचे--ना. वि. कुळकर्णी 'टांगा' टाकीतच आले आहेत; आणि वि. वा. हडप—

सा. नं. १—अहो, महाराज निदान टोपी तरी घालून यायची.

सा. नं. २—डोक्याची मजल टोपी ठेवण्यापलीकडे गेली आहे.

य. गो.—कांहीं जमली आहेत कां मंडळी ?—नारायणराव, मला-हडप- (जातात)

सां. नं. १—अरे, ही मोटार !

सा. नं. २—आचार्य अत्र्यांची दिसते.

सा. नं. १—आणि आंत-वरेरकर !

सा. नं. २—दोरावजींच्या रेस्टोरामध्यें पुरणाची पोळी मिळण्यासारखें आहे.

सा. नं. १—आणि अप्पासाहेब फडके-

सा. नं. २—खांडेकर मास्तर— !

सा. नं. १--पण आचार्यांचा जानी अंतोवा दिसत नाहीं.

सा. नं. २--तें पाहा उपरणें वाऱ्यानें उडतें आहे.

सा. नं. २—जा, पोटभर खा—! अशा निमित्तानं तरी तुमच्या एखादा दिवस भागत असेल—(वातमीदार जातो).

सा. नं. १—वा ! दत्तोपंत पोतदारांना कशाला दिलें ह्या स्वयंवराचें आमंत्रण—?

सा. नं. २—समारंभाला शोभा यावी म्हणून दिलें असेल झालें !

दत्तो०—काय रे ! अजून कुणीच कशी मंडळी जमली नाहींत ? मी घाईघाईनें आलों मुहूर्त साधण्यासाठीं—

सा. नं. १—आणि दत्तोपंत, ही पिशवी कशाला आणली ?

सा. नं. १—हिंडतां-हिंडतां-कांहीं सांपडलें तर पिशवींत टाकून मोकळें व्हावें म्हणून.

दत्तो०—अरे वा ! या बापूसाहेब—

बा. चाफे:—हं-हं-हं, दत्तोपंत, वेळेवर आहे ना ? चला, आंत बसूं बोलत. चला; अरे, पण निमंत्रणपत्रिका-हं-(खिशांतून काढून)-

सा. नं. १—हें तर कॉलेजचें टाइमटेबल आहे.

बा. चाफे.—असें झालें काय ? बरें दत्तोपंत, तुमचीं तरी दाखवून चला.


दत्तो०—माझी निमंत्रणपत्रिका सांपडली; हं, चला.

सा. नं. १—अहो, हें झोन तिकिट आहे.

सा. नं. २—पण तें तरी त्यांचं आहे का ? सही आहे तात्या-साहेब केळकरांची ! बरें—

दत्तो०—बापूसाहेब, ही आमची विद्यार्थी मंडळी आहेच-तशी अडचण नाहीं पडायची.

बा. चाफे०—तेंही खरें आहे.....(कण्हल्यासारखे हंसत हंसत जातात).



सा. नं. १--अरे, हे वामन मल्हार

सा. नं. २--हे लोकशिक्षण, ते ज. स. करंदीकर-

सा. नं. १--झाडून सारें विश्राम मंडळ बोलावलेलें दिसतंय.

सा. नं. २--नाहीं तर स्वयंवराच्या धांदलींत पेन्शनरांना निमंत्रणें नेमकीं जायचीं आणि तरुण उमेदवार सगळे विसरून जायचे ! अरे, य. गो. आज अगदीं घोटून आले आहेत.

सा. नं. १—यशवंतराव, एका 'स्वारींत' तरी यायचें !

य. गो.--चार पायांच्या वाहनापेक्षां दोन पायांचेंच हक्काचें वाटतें; मी तरी सायकलीवरनं आलों; पण हे आमचे--ना. वि. कुळकर्णी 'टांगा' टाकीतच आले आहेत; आणि वि. वा. हडप—

सा. नं. १—अहो, महाराज निदान टोपी तरी घालून यायची.

सा. नं. २—डोक्याची मजल टोपी ठेवण्यापलीकडे गेली आहे.

य. गो.—कांहीं जमली आहेत कां मंडळी ?—नारायणराव, मला—हडप— (जातात)

सां. नं० १—अरे, ही मोटार !

सा. नं. २—आचार्य अत्र्यांची दिसते.

सा. नं. १—आणि आंत-वरेरकर !

सा. नं. २—दोराबजींच्या रेस्टोरामध्यें पुरणाची पोळी मिळण्यासारखें आहे.

सा. नं. १—आणि अप्पासाहेब फडके-

सा. नं. २—खांडेकर मास्तर— !

सा. नं. १--पण आचार्यांचा जानी अंतोवा दिसत नाहीं.

सा. नं. २--तें पाहा उपरणें वाऱ्यानें उडतें आहे.

सा. नं. १––आली रे साहित्यसेवकांची धाड–(सगळेजण मोटारींतून उतरतात. अत्रे हॅट हातांत घेऊन प्रवेशद्वारापाशीं येतात.)

सा. नं. १––अहो आचार्य, हें काय ? हॅट काय माझ्या हातांत दिली ? मीं हात पुढें करून निमंत्रणपत्रिका कुठें म्हणून विचारलें.

निमंत्रणपत्रिका–

अत्रे––डोअरकीपरच्या कामाकरितां मी आमच्या कंपनीच्या मालकाला शिफारस करीन ! चला खांडेकर––अप्पासाहेब–

वरेर.––आम्हा मुंबईकरांचा अपमान आहे. निमंत्रणाशिवाय स्वयंवराला यायला आम्हीं काय जोगेश्वरीवरच्या कट्ट्यावरचे भट आहोंत वाटतें.

फडके––कोल्हापूरहून फर्स्ट क्लासनें आलों आहे.

खांडे०––आम्ही तिसऱ्या वर्गाच्या डब्यांतील प्रवासी.

अंतोबाः––चला, जाऊं द्या हो;–ही घ्या दोन झुणका-भाकरींचीं मोफत तिकिटें. आमचें साप्ताहिक सप्रेम भेट पाठवीत जाऊं– जमवून–घ्या–बोला–

अत्रेः––झुणका–भाकर कीं जय–

अंतोबाः––वंदे भारतम्–

फडके––श्रीमत् छत्रपति राजाराम महाराज की जय !

खांडे०––फुरसें कीं जय––

(सर्व जातात)

(गर्दी जमलेली पाहून–द्वाररक्षक–स्वागताध्यक्ष साहित्यिक उसासे टाकूं लागतात–उदयोन्मुख–होतकरू–निमंत्रित–बघे–मिरवे–अशांचा जमाव झाल्यामुळें कार्यांत थोडी ढिलाई होते.)

सा. नं. १––अहो, कुठें चाललात ?

सा. नं. २––निमंत्रणपत्रिका ?

सा. नं. १—आंत सोडतां, कां सकाळचा अंक काढूं खिशांतून ?

सा. नं. २—हें पाहिलेंत कां सह्याद्रीचें वार्षिक फाईल—

सा. नं. १—हा चित्रमयजगत्.

सा. नं. २—हें भद्रायु.

सा. नं. १—ज्ञानमंदिराचा ' गणेश–अंक. '

(द्वाररक्षकांच्यावर असल्या अमोघ अस्त्रांचा मारा केल्यावर त्यांनीं ' लाइन क्लिअर ' म्हणून दर्शविलें.)

प्रवेश दुसरा

(स्थळ—टिळक स्मारक मंदिराचें सभागृह. अध्यक्षस्थानीं भीष्मक महाराज बसले असून, त्यांच्या शेजारच्या खुर्चींवर विदर्भ साहित्यसुंदरी हातांत माळ घेऊन चिंतन करीत स्वस्थ बसलेली आहे. लहानापासून थोरापर्यंत वाङ्मयप्रेमी जमले असून सारी सभा शांत बसलेली आहे.)

माटे––(आपल्या भरघोंस मिशावरून हात फिरवीत व पोटाला कुरवाळीत) सभ्य गृहस्थहो, विदर्भ देशच्या साहित्यसुंदरीच्या स्वयंवराला निमंत्रित, आमंत्रित नि उपस्थित साहित्यिकांनो–भीष्मक महाराजांतर्फें व तुमच्या पुणेकर समाजातर्फें हा सनातनी सुधारक–

स्वागत करीत आहे! अशा प्रसंगीं माझ्यासारख्या 'भव्य' पुरुषाची योजना भीष्मक महाराजांनीं केली हें योग्यच ! भीष्मकमहाराजांच्या बोलण्यावरून विदर्भ साहित्यसुंदरीचें-स्वयंवर पुण्यांत ह्या टिळक स्मारकमंदिरांत—विद्वान् साहित्यिकांना निमंत्रण देऊन करावें असें दिसतें ! पुण्याचा लौकिक श्रुतच आहे. विदर्भ देशाच्या अनेक युवतींचें स्वयंवर ह्या नगरींत योजलें, तरी त्याचा समाचार संपूर्ण घेण्याचें सामर्थ्य—आम्हा पुणेकरांत आहे असें मी जाहीर करतों ! निमंत्रित साहित्यिकांनीं—आपआपल्या साहित्यसेवेची महति सांगावी. विदर्भताई त्या श्रवण करतील व स्वयंवराची माळ योग्य साहित्यवराला घालतील ! आणि पुढच्या विदर्भ साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद अर्थात् त्यालाच दिलें जाईल. अध्यक्षपदाची ही अभिनव निवड आहे. भीष्मकमहाराजांचा निकाल अखेरचा समजला जाईल नि तो बंधनकारक समजून कायदेशीर इलाज करतां येणार नाहीं ! माझी साहित्यसेवा—

अंतोवा (मध्येंच)—बापूसाहेब, वा ! तुम्ही तर अगदीं मान पुढें करून तयार आहांत ! तुमची साहित्यसेवा एकाद्या विदर्भ देशाच्या पन्नाशी उलटलेल्या तरुणीच्या स्वयंवराच्या वेळीं सुनवा.

य. गो.—(विडीचा झुरका मारीत)—मास्तर, तुम्हांला माझें हेंच सांगणें आहे, आतां बसा बुवा—

अत्रे—लघुकथालेखक ती मानुरकरी इथें ओढायची नाहीं.

य. गो.—कलेक्टरचा हुकूम न्यायमंदिरांत—टि.—स्मारक-मंदिरांत नाहीं. विज्ञानबोध—महाराष्ट्र शतसांवत्सरिक हा निम्मा खपला; दुसरी आवृत्ति काढतों; बसा.

माटे—यशवंतराव व इतर विरोधकहो, तुमच्या उकळत्या उत्साहाचें स्वागत करून मी आपला घरीं जातों—नको, पण त्यापेक्षां सध्यां खालींच बसतों.

भीष्मक—तुमचें स्वागत झालें-आतां श्री. नी. चाफेकर, दत्तोपंत पोतदार, ज स. करंदीकर ह्यांचीं भाषणें.

हडप—विदर्भ साहित्यसुंदरीचें स्वयंवर तरुण असतांनाच व्हावें अशी इच्छा असेल, तर श्री. नी., द. वा., ज. स. ह्यांना तसदी देऊं नका ! तिला म्हातारपण येईपर्यंत ह्यांचीं भाषणें आवरलीं तरी मेहरबानीच ! शिवाय, तुमच्यादेखत हा समारंभ साजरा होईल कीं नाहीं हेंही सांगतां येणार नाहीं—

वरेरकर—हें पुणेरी चक्की पागोटें-मारुतीच्या शेपटासारखें दीर्घ आहे !

भीष्मक—आतां मीं निमंत्रित केलेल्या-साहित्त्यिकांना आपली सेवा श्रुत करण्यास विनंति करितों—पहिला मान—

वामनराव जोशी—ह्या मानाकरितां इथें 'सोन्यामारुति होईल.' सभागृहांत शांतता राहावी, कार्य निर्विघ्नपणें पार पडावें, आलेल्या साहित्त्यिकांचा ड्रेसिंगचा खर्च वाचावा अशी इच्छा असेल तर तो मान तुम्हींच ठरवा अशी विनंति मी करीत आहे.

भीष्मक—प्रथम विरोध ज्या वीरांनीं केला, ते य. गो. त्यांना मी हा मान देतों.

(अनेक अतिरथी साहित्त्यिक—दांत ओंठ खाऊन बसल्या ठिकाणींच मनांतल्या मनांत 'जेधे मॅन्शन' करतात.)

य. गो.—(कोटाची कॉलर सावरीत-व कातरलेल्या मिशांवर हात फिरवीत) मी जो बोलणार आहें, तो ना. ह. आपटे, ना. वि. कुळकर्णी व माझ्या स्वतःतर्फें ! मी प्रकाशक, ना. वि. कुळकर्णी प्रकाशक, आपटेही प्रकाशक; व तिघांच्या गोष्टी प्रभातसिनेटोननें चित्रित केलेल्या आहेत ! आम्हीं अगदीं-दादोजी कोंडदेव वळणाचे -स्वच्छ मनाचे निरुपद्रवी-साहित्त्यिक आहोंत ! स्वयंवराची माळ मला घातली काय अगर ना. ह. आणि ना. वि. यांना घातली काय, सारखेंच; शेवग्याच्या शेंगा-सुपारी-कोथिंबिरीच्या काड्या—

फडके:—ही वाणसौद्याची यादी सांगतां काय ? गेस्ट हाउसच्या सरपोतदारांना हवें तर नेऊन द्या. भरसभेंत काय सांगतां—

य. गो.—हीं माझ्या लघुकथांचीं नांवें आहेत—

अत्रे—बटाटेवडा, मिसळ, मस्काऱ्लाईस, घावन, हीं आगामी कथांचीं नांवें घ्यावींत अशीं मी गेस्ट हाउसचा हितचिंतक म्हणून सुचवतो.

य. गो.—भीष्मकमहाराज, असल्या वात्रट लोकांत बसण्यापेक्षां मी आपला सायकलवर टांग मारून घरीं जातों कसा ! सभेचा विरस होऊं नये म्हणून मीं कांहीं न बोलतां निषेधार्थ जागच्या जागीं खालीं मान घालून बसतों.

भीष्मक—श्रीयुत खांडेकर !

खांडे०—आम्ही व अत्रे—

अत्रे—खांडेकर, मी तुमचा इथें प्रतिस्पर्धी आहे !

खांडे०—आपण एका सिनेमा कंपनीचे कथा-लेखक आहोंत.

अत्रे—मग दोघे मिळून कथानक लिहूं. इथें काय त्याचा संबंध ?

खांडे०—तुम्ही मास्तर—मी मास्तर.

अत्रे—आरवलीला कॉलेज काढणार असाल, तर फुकट काम करीन. इथें तुम्ही मला वरेरकरासारखे आहांत—मी अर्जदार—तुम्ही अर्जदार.

खांडे०—मी तुमच्या मोटरींतून आलों.

अत्रे—टांगा—खर्च वांचला, दुसरें काय !

खांडे०—तुमचा नेहमींचा पाहुणा—

अत्रे—गेस्टहाउसमध्यें उतरत चला—!

खांडे०—मास्तरनीं मास्तरला छडीनें झोडपावें. भीष्मकमहाराज, ११ ते ५ शाळेचा व्यवसाय करून मीं अनेक कांदबऱ्या—लघुकथा

लिहिल्या आहेत. हे प्रसिद्ध झालेले ग्रंथ वाचा आणि मग मला उत्तर लिहा ! आज तात्यासाहेब केळकर हजर नाहींत; नाहीं तर माझी थोरवी त्यांनीं गाइली असती–! हें पहा अभिप्रायाचें कटिंग बुक. तें माझ्या वतीनें सर्व कांहीं सांगेल. (असें म्हणून खालीं बसतात.)

भीष्मकः—वरेरकर.

अत्रेः—तुम्ही असाल विदर्भसुंदरीचे बाप; पण पुण्याहून धड अंगानें जायचें असेल, तर हा मान माझा आहे ! मी वरेरकरांच्या आधीं बोलणार–

वरेर०:—अरे जा जा, मीं नागपूर युनिव्हर्सिटीचा एम्. ए. चा मराठीचा परीक्षक झालों आहे, शिवाय मी वयानेंही मोठा आहे.

अत्रेः—वयानें मोठे असाल; पण पोरकटपणा अजून कायम आहे. भीष्मकमहाराज, वरेरकरांना बोलूं दिलेत, तर मी ही सभा कबुतरासारखी उडवून लावीन.

फडकेः—अत्रे, हा दम कुणाला देतां ? मीही कोल्हापुरचा—

अत्रेः—पण मल्ल नाहीं, तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर आहे !

वरेर०:—जोंपर्यंत हें विडीचें थोटूक हातांत जळत आहे, तोंपर्यंत मी सभा नेस्तनाबूत करण्याच्या बल्गना करणार.

फडकेः—वरेरकर–अत्रे ह्यांची एवढीच घमेंड असेल, तर मीही कुणाला बोलूं देणार नाहीं. वरेरकर, अत्रे जर बोलायला लागले, तर माझ्या खिशांतील हीं अंडीं मीं फेकून मारीन !

भीष्मकः—खिशांत अंडीं ? अंडीं म्हणजे काय ?

अत्रेः—आजच पुण्याला आलां आहांत; इतक्यांत नाहीं तुम्हांला ही भानगड कळायची ! मी आतां बोलूं लागतों.

फडकेः—आम्ही व वरेरकर गायनाला सुरवात करूं.

अत्रेः—आपण तिघे मिळून सूत्रधारासारखें गाऊं ! गाण्याचा दम मला देऊं नका !

विदर्भसुंदरीः—मीच आतां वादाचा निर्णय देतें !

अत्रेः—निर्णय देतांना ८ तास भाषण केलें तरी आम्ही तें ऐकून घेऊं-! ऐकण्यासारखें कांहीं नसलें तरी बघण्यासारखें बरेंच आहे.

विदर्भसुंदरीः—आचार्य अत्र्यांनीं प्रथम बोलावें.

अत्रेः—(लाजत) हूं हूं, कशाला, कशाला ? बरें तर, बोलतोंच. (वरेरकर—फडके ' अंध-मूक ' शाळेचे विद्यार्थी बनतात.)

अत्रेः—वसंतऋतूंतील कोकिळेचें गायन ऐकल्यावर—नव्या पुलावर आपल्या भसाडया आवाजांत ' सुनोजी मिरे—कहना पाकिटे अत्तर कीं लेना '—हें पद ऐकण्यांत स्वारस्य आहे का ? भीष्मकमहाराज, तुम्ही जर ज्ञानप्रकाश वाचीत असाल, तर हा अत्रे काय दर्जाचा आहे हें कळेल. कधीं काळीं आमच्या दामूअण्णांची कंपनी विदर्भ देशाला आली, अगर तुमचें राहणें स्वयंवराच्या निमित्तानें इथें झालें, तर हंसाल—किती हंसाल ! आमचा आणि विदर्भताईच्या विवाहाचा योग असेल, तर भीष्मकमहाराज, तुम्हाला व तुमच्या कन्येला आलटूनपालटून संसारांत हंशा—टाळ्या वाजवाव्या लागतील—— ! मी नारळाचें झाड, तर या हरबऱ्याचें—मी घोरपडे शाई, तर त्या अफगाण स्नो—मी लेखक—तर त्या जिवंत वाऱ्या—मी दगडी पूल, तर त्या अपोलो बंदर—मी सासवड—तर त्या बोरीबंदर—— ! मी S. M. C. चा इंटरचा डबा, तर त्या फ्लाइंग राणी. मी पुरुष—त्या स्त्री, मी वर—त्या वधू—— ! आमच्या ह्या प्रशस्त ' स्थळाचें ' लक्षांत असूं द्या. विशेष माहितीकरितां—ज्ञानप्रकाश पो. बॉ—लिहा. आतां वरेरकर—बोला—

वरेरकर (एकदम उठून):—काय बोला—आतां काय बोला ? विष्णुसहस्रनाम म्हणूं का शनिमहात्म्य वाचून दाखवूं ? विदर्भताई,

अन्यांच्या ह्या घमेंडीला उत्तर देण्याचें सामर्थ्य माझ्या ठिकाणीं आहे. त्यांना जर स्वतःच्या विनोदाचा अभिमान असेल, तर माझा हाच मुलाच्या बाप—सत्तेचे गुलाम वाचा; आमचे बापूराव आज दिवंगत झाले; नाहीं तर माझें नाट्यवैभव तुम्हाला दिसलें असतें. स्त्रियांचा कैवार घेणारा मी पहिला लेखक आहे; तुम्हाला त्याचा कांहीं अभिमान वाटत असेल, तर स्वयंवराची माळ तुम्ही घाल तांना विचार करा. विनोदाला महत्त्व देणार असलां, तर चिं. वि. जोशी, वा. वि. जोशी, कॅप्टन लिमये यांना वगळूं नका— ! विनोदी नाटककार माधवराव जोशी हे—

देवभक्तः—माधवराव जोशांच्या विनोदाचा अगदीं—'ज्ञानकोश' झाला आहे !'

वरेरकरः—सगळ्यांत जुना—सगळ्यांत पहिला—अशा वाङ्मय-सेवक वरेरकरांच्या गळ्यांत स्वयंवराची माळ पडली पाहिजे. माझ्या गळ्यांत माळ पडली, तर विदर्भबाईचा संसार सुखाचा होईल. माझ्या संन्याशाच्या संसारांत वेणू वेलणकर आणि गोदू गोखले ह्या माझ्या दोन मुली त्यांना कमी पडूं देणार नाहींत.

हडपः—वरेरकरांच्या गळ्यांत स्वयंवराची माळ जर विदर्भताई घालणार असतील, तर प्रथम त्यांनीं आपलें नांव अनाथ हिंदु महिलाश्रमांत दाखल करावें.

शं. वा. कि :—त्यापेक्षां त्या माळेचा उपयोग पुण्यांत असलेल्या अनेक मारुतीकडे व्हावा अशी माझी सूचना आहे.

होतकरू कविः—(चवताळून)—शंकरराव, वरेरकरांच्या गळ्यांत माळ पडो वा ना पडो, पण फडक्यांच्या गळ्यांत ती पडणार असेल, तर विदर्भताईचें नांव स्वखर्चानें सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें दाखल करतों.

भीष्मक—शांत व्हा ! साहित्यिकांनो शांत व्हा ! फडक्यांनीं आपली साहित्य कामगिरी—

फडके—इथें तोंडानें बडबडण्यापेक्षां मीं जर ती लिहून काढली, तर माझी एक काश्मीरची सफर होईल.

भीष्मक—मोठमोठ्या साहित्यिकांचीं भाषणें झालेलीं आहेत. बाळे, स्वयंवराची माळ तुला कुणाच्या गळ्यांत घालायची असेल ती घाल ! तुझें मनोगत, तुझ्या कल्पना सभेपुढें मांडून ज्याला तूं वरणार असशील, त्याच्याशीं साहित्यसंसार सुखानें कर ! तूं प्रौढ आहेस, समंजस आहेस, सूज्ञ आहेस, विदर्भ देशाचा लौकिक आणि तुझी योग्यता जाणून ही माळ ज्याच्या गळ्यांत तुला घालावयाची असेल, त्याच्या गळ्यांत खुशाल घाल. स्वयंवराच्या वेळीं रुक्मिणीला जसें मीं सांगितलें, तसेंच आज तुला सांगतों.

(विदर्भ साहित्यसुंदरी खुर्चीवरून उठून हातांत माळ घेऊन उभी राहते. भीष्मकाच्या पायावर डोकें ठेवून मग भाषण करावयास सुरवात करते. श्रोतृसमुदाय अगदीं तटस्थ असतो.)

विदर्भसुंदरी—(स्वयंवर नाटकांतील रुक्मिणीच्या 'पोज' मध्यें गंधर्वाच्या थाटांत) विदर्भदेशच्या सीमेचें उल्लंघन करून पेशवाईच्या पुण्यांत—साहित्यिकांच्या नंदनवनांत आलें—मनाला कसें मोकळें वाटलें ! सायंकाळच्या कोंवळ्या किरणांनीं मुळामुठा नदीच्या मोकाट पात्राला येणारी शोभा, सकाळ-संध्याकाळ केशरचना करून सायकलीवरून गांवांत हिंडणारे तरुण, पावडरीचा मारा तोंडावर करण्यास विसरल्यास जमणारे धुळीचें कीटण, रस्त्यांतून, गाडींतून किंवा मोटारींतून जातांना बसणारे धक्के,—उगीच नाहीं इतकें रम्य स्थान—पुणें—साहित्यिकांना आवडलें ! स्वयंवरानंतरचा कांहीं काळ इथें राहण्याचा हट्ट मीं धरीन हो ! मला किनई, खानावळींतून डबे आणायचें मुळींच जड वाटायचें नाहीं. टेंचाळलेल्या पायाकडे

आणि तुटलेल्या चपलेकडे पाहून—मी साफ सांगतें हं—हातांतून डबा हिसकून नाहीं घ्यायचा ! तसेंही नको. डब्यांतील आमटीनें माझं पातळ भिजलें; तुपाचा वास सहन झाला नाहीं, तर खट्याळपणानें हंसत माझ्याकडे पाहिलेलें मला आवडायचें नाहीं. आपण साहित्यिकांबरोबर ब्रिज खेळायला गेल्यावर व्याख्यानें देऊन दमलेल्या गळ्याला विसावा मिळावा म्हणून लिंबाचें सरबत—ऊन ऊन चहाचा कप तुमच्या टेबलावर, आणून ठेवीन—! साहित्यिकांपुढें कशा रीतीनें वागावें—कुठल्या साहित्यिकापुढें कसला पेला आणून ठेवावा, हें इतर युवतींला कसें समजणार ? बाबांनीं मला पुष्कळ शहाणे म्हटलें, परंतु ही स्वयंवराची माळ मी कुणाच्या गळ्यांत घालूं ? साहित्यसेवकांमध्यें नांदत असलेला हां सलोखा माझ्या स्वयंवराच्या माळेचे शतशः तुकडे करील ! ह्या वेळीं ही साहित्यसुंदरी कोणालाच माळ घालूं इच्छित नाहीं. माझ्या स्वयंवरानें कलह माजावेत, वैमनस्य वाढावें असें कसें वाटेल ? ही स्वयंवराची माळ पुण्यपुरीच्या लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याला घालून माझें स्वयंवर मोडल्याचें मी जाहीर करतें.

अत्रे—अहो भीष्मक, आपल्या मुलीचें स्वयंवर तुम्हीं आरंभलें आहे, का तिची व्याख्यानमाला सुरू केली आहे ?

वरेरकर—(अत्र्यांच्या गळ्यांत पडून)—अहो अत्रे, हें काय झालें हो ?

गद्रे—धड ना अत्रे, धड ना वरेरकर; शेवटीं लोकमान्य—

कवि यशवंत—आणि हीं मंगल अष्टकें ?

गिरीश—उभयतांचीं छापूं झालें ज्योत्स्नेंत.

फडके—स्वयंवर मोडलें—आमचा पराभव झाला—आमच्यासारखें झालें.

(मास्तर कृष्णराव गडबडींत येतात)

मास्तर—निदान शेवटीं झिंझोटी रागांतलें वंद्दे मातरम् तरी एंका—

(वंदे मातरम् गीत झाल्यावर टिळक–स्मारक–मंदिराला ८ व्या आठवड्यांत धुमधडाक्यानें चालणाऱ्या चित्रपटाचें स्वरूप येतें.)

**
** # विचार-तरंग—

देवा !

: : १

कंपनीच्या बिऱ्हाडीं—प्रशस्त दिवाणखान्यांत गालिच्यावर वृत्तपत्रें चाळीत बसलों होतों. हातचीं वृत्तपत्रें चाळून होतात न होतात—तोंच माझी भेट घेण्यास कुणी तरी आलें आहे असा निरोप घेऊन गडी आला. त्याला वर पाठवून द्यावयास मीं सांगितलें. ते गृहस्थ मराठी वाङ्मयांत श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या मासिकाचे संपादक होते. त्यांना पाहतांच—मीं त्यांचें आदरपूर्वक स्वागत केलें—

या—या देवा !—कुणीकडे आज स्वारी इकडे सकाळच्या प्रहरीं ? तुम्हीं कामाचीं माणसं—विनाकारण नाहींत यावयाचीं आमच्याकडे ? अरे—कुणी आहे का तिकडे—

—हें पहा मी चहा—घेत नसतों—

—चहा नसाल घेत—दूध !—मग दूध सांगतों—वरती एक कप दूध पाठवून द्या वरं लवकर ! काय देवा—हुकूम आहे आपला ?

—आमचा कांहीं लोकांचा असा विचार आहे, कीं एक तुमच्या विषयीं माहिती देणारा खास अंक काढावा. आपली जर कांहीं त्याला हरकत नसेल—तर लवकरच काढूं—

प्रभूची इच्छा असली तर काय होणार नाहीं ! तसें पाहिलें तर माझ्यांत काय मोठें असें आहे कीं, तुम्हीं खास अंक काढायला प्रवृत्त व्हावेत ? तुम्हा सर्वांच्या अन्नावर मी जगलों आहे. गुणवान् लोक लेकराचें लाड करून कौतुक करीत आहेत—नाहीं तर माझ्या-सारख्या साध्या नटाला काय मोल आहे ?

—असें कां म्हणतां वरं ? महाराष्ट्राच्या रंगभूमीचे तुम्ही कोहिनूर आहांत—रंगभूमीचे तुम्ही लाडके लाल आहांत—आज-पर्यंत पुष्कळ स्त्रीनट होऊन गेले असतील, परंतु तुमच्यासारखे तुम्हीच !

—नाहीं बरं देवा—असं म्हणूं नका ! आमच्या कंपनींत माझ्याहीपेक्षां गुणी माणसं आहेत—ते आहेत म्हणून मी आहे ! एकट्या मला काय मोल आहे ?

—हवं तर तसा म्हणा तुम्ही ? मला मात्र वाटतें तें असें—मग कराल ना मदत—सारी,—लागूं अंकाच्या तयारीला ?

—आमच्या घरांत एकदां मातोश्रीला विचारून येतों आणि मग—नाहीं तर देवा असें करा—चला तुम्हीच घरांत अन् विचारा—आमच्या आईला—

× × ×

ते आले ना ?

(लें.....?)

थिएटरवर गर्दी मनस्वी उसळली होती—तिकिट मिळेल कीं नाहीं ह्याच भीतीनें मीं नाट्यमंदिराच्या दरवाजांत पाऊल टाकलें—प्लॅनवर जाऊन पाहतों तों दोन तिकिटें शिल्लक होतीं—तींही पावणेसहाचीं. दहा-दहांच्या दोन नोटा फेंकल्या, जागेवर जाऊन बसलों ! रंगमंदिरांत धूपाचा सुवास नि धूर दरवळत होता—साथीदार आपआपल्या हत्याराला लहान मुलासारखें—एखादें काम करून घेण्यापूर्वी कुरवाळीत असतात—त्याचप्रमाणें ते गमतीनें खेळत होते. सारंगीवर गज्र फिरविला—तबल्यावर थाप पडली—ऑर्गनवर बोटें फिरविलीं—बाजूचे दिवे लागले—नाटकाचें नमन सुरूं झालें ! दुसऱ्या प्रवेशाच्या सुरवातीला—राजवाड्यांच्या पायऱ्या उतरत उतरत—येणारी ती नयनमनोहर मूर्ति—रंगभूमीवर पदार्पण करितांच सुटणारा घमघमाट—आणि अत्यंत लाडिकपणें आपल्या भावाला 'ते आले ना' म्हणून प्रश्न विचारतांना दिसणारी चतुराई !—कुणी विसरेल का असल्या मूर्तीला ! 'म्हणूं का आणखीन् गाणें एखादें !' '...म्हणतात ना तीच मी ! सर्वांच्या आधीं मीं पाहिलें—'अथपासून इतिपर्यंत समरस होऊन—जणूं मीच राजकन्या म्हणून दरबारी थाटांत वावरणारी ती—बांधेसूद मूर्ति !—आमची पिढी भाग्यवान् आहे. मराठी नाट्यमंदिराच्या वैभवाच्या काळांतील—हा क्षण—हा काल अमर आहे असें मला वाटतें !—दुर्दैवानें पुढच्या पिढीला असल्या भाग्यशाली नटांचीं छायाचित्रेंच पाहून—निश्वास टाकावे लागतील—

× × ×

जांवई हवा तरी ?

(ले.....?)

परवां मी सहज सुट्टीमध्यें गांवीं गेलों होतों. माझ्या लग्नाविषयीं घरांत बोलणीं चालूं होतीं. मला बायको कशी हवी असा प्रश्न विचारतांच—अडखळलों—लगेच जवळच बसलेल्या वडिलांच्या मित्रांनीं बोलून टाकलें—" अहो, हीं पोरं शहरचीं—त्यांना काय विचारतां मुलगी कशी हवी ती ! त्यांच्या ट्रंका चाळा म्हणजे—जे—निवडक फोटो सांपडतील—त्या साच्यांत बसेल अशी द्यावी त्यांना गांठून, कीं हीं पोरें जाम खूष—! आतां ह्या स्वारीना कशी हवी आहे—तर तो पहा तुमच्या डोक्याबर असलेला...फोटो "—तो फोटो नटसम्राटाचा होता. जांवई हवा तरी नटसम्राटासारखा—बायको हवी तरी नटसम्राटासारखी ! थोडक्यांत समीकरण मांडतां येईल.

नटसम्राट – लुगडें = जांवईबुवा.


नटसम्राट + लुगडें = भावी वधू !

आमच्या कॉलेजांत तरी काय विद्यार्थिनी, केसांची वळण, चालण्याची ढब—मुरके—बोलणें—सारें हुबेहुब—नक्कल ! कॉलेजच्या स्नानगृहांत—पदें गुणगुणतात कुणाचीं विद्यार्थी—! डोळ्यांपुढें ती मूर्ति ! आजकाल आमच्या तरुण-तरुणींच्या फॅशनचा आदर्श—तुमच्या खास अंकाचा नायक होऊन बसलेला आहे ! गणिताचे प्रोफेसर हातांत पुस्तक घेऊन—घाईघाईनें शिरतांच सहज मी उद्गारलों, ' या देवा—इतका उशीर ! ' वर्गांत—एकच (कंसांत हंशा)

× × ×

माझी काळजी तुम्हाला

(ले.....?)



सगळ्या कंपनींतील नटवर्गाच्या एकच आश्चर्याचा विषय होऊन बसलेला होता—कीं आतां या संकटांतून आपला अन्नदाता पार पडणार कसा ? केवढा मोठा धक्का आम्हांला बसला—स्टेजवर पडदे ओढणाऱ्या गडयापासून ते कंपनींत श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या नटापर्यंत एकसारखी वागणूक—जें मालक खाईल तेंच नोकराला—कधीं दुजा भाव नाहीं—कीं कधीं—संताप नाहीं—कधीं देवधर्म चुकला नाहीं कीं कधीं धर्मदाय टळला नाहीं !—एव्हढा मोठा कर्जाचा डोंगर कसा ओलांडून जावयाचा ही घोर चिंता ! मालक आपल्या नेहमींच्या संवयीप्रमाणें दिवाणखान्यांत इकडून तिकडून येरझाऱ्या घालीत होते—आम्ही कांहीं नोकर मंडळी जातांच—आमच्याकडे हंसतमुखानें पहात म्हणाले—

—कां बरं इकडे येणें केलें ? आणि सगळे एकदम आलांत ?

—मालक—तुमचें अन्न आम्ही खातों आहे—आम्हांला जर कांहीं हातभार लावतां आला तर लावावा अशी आमची इच्छा आहे ! आमचे पगार देऊं नका, पण एकदां तुम्ही ऋणमुक्त झालांत कीं, आम्हाला सर्व कांहीं मिळालें—

—किती थोर मनाचे तुम्ही ! तुमची सहानुभूति मला मिळाली हीच मदत मोठी असें मी समजतों !—तुमचे पगार ठेवून तुमची गैरसोय करणें माझ्या मनाला तरी बरं वाटत नाहीं ! प्रभूच्या मनांत असेल तर—तुम्हाआम्हांला पोट भरून देऊन माझा भार तो हलका करील ! माझी काळजी—तुम्हांला—जनताजनार्दनाला—तो चार हातानें देऊं लागला म्हणजे आपल्याला इतकें मिळेल कीं त्याचा सांठा सुद्धां करणें अपुरें पडेल !—

आम्ही परतलों—मालक पुन्हां येरझाऱ्या वालूं लागले. कांहीं दिवसांनीं मला कळलें कीं—फार मोठे मोठे लोक येऊन कर्जाची फेड एका रकमेनें करण्यास सरसावले—परंतु आमच्या मालकानें कुणाच्याही पैला स्पर्श करण्याची तयारी दर्शाविली नाहीं! ते नेहमीं म्हणत असत—'आमची सेवा जर मनोभावानें होत असेल, तर तो प्रभू आम्हाला कालत्रयींही कमी पडूं देणार नाहीं!' काय हा आत्मविश्वास—कुठल्या प्रतीचें हें मनोधैर्य!—पायापाशीं लक्ष्मी लोटांगण घालत येत असतां, तिला श्रमानें मिळणारी नाहीं म्हणून दूर लोटणें एव्हढा मनाचा थोरपणा—प्रत्यक्ष कुबेराच्याही अंगीं नसेल!

× × ×

'आई, तुलाही अर्धपोटी राहावें लागतें ना?'

(ले.....?)

स्त्रियांना गरोदरपण—व्यापाऱ्यांना नादारी—कितीही मोठ्या इन्शुअरन्स कंपनीचा एजंट असला तरी हेलपाटे—आणि नारळींच्या व्यवसायांत पडणाऱ्या गृहस्थाला कर्ज—ह्या गोष्टी म्हणजे अगदीं दगडावरची रेघ! काळजींतून मुक्त झाल्याचा सुस्कारा टाकण्याची सोय म्हणून नसते! आमच्या कंपनीची स्थिति अत्यंत शोचनीय झाली होती! इकडे बोलपट सृष्टीच्या वैभवाचा काळ—नव्या नव्या उदयोन्मुख नटींचें रुपेरी पडद्यावर आगमन—ढोळे दिपवणाऱ्या जाहिराती—अशा प्रचंड परिस्थितीला तोंड देण्याचें सामर्थ्य नाटक कंपनीच्या लोकांना अशक्य, त्यांतून—मालकाचें होत असलेलें उतारवय—उत्पन्नांत दिसून येणारी कमतरता—वाढता खर्च—प्रपंचाची काळजी—साऱ्या कांहीं गोष्टी एकवटून आल्या! सगळ्या गोष्टींची माणूस बतावणी करूं शकेल, परंतु

पैशांची करतां येणें अशक्य आहे ! एवढा मोठा गाडा चालविणें फार मुष्किलीचें—७०-७५ माणूस पानावर येऊन बसलें म्हणजे कल्पना येते त्या संकटाची. पुन्हां पगार ! पुष्कळ लोकांनीं सांगितलें कीं, 'कंपनी बंद करून मालकांनीं स्वस्थ बसावें. मालक मोठ्या मनाचे. त्यांच्यापुढें प्रश्न एकच पडे—इतके दिवस माझ्यावर अवलंबून असणारी ही मंडळी—ह्यांची उपासमार मी कशी करूं ? नाटक कंपनींतला नट—व्यवहारी जगांत काय आहे त्याला किंमत ? —जेथपर्यंत रेटतां येईल तेथपर्यंत रेटण्याचा निर्धार मालकांनीं केला ! —थिएटरवर मालक आले म्हणजे 'Cash Box' कडे पाहून म्हणायचे, "आतां आमच्याप्रमाणें आई तुलाही अर्धपोटी रहावें लागतें ना ?"

× × ×

'लेकराची मीठभाकर !'

(ले.....?)

"खरं आहे देवा सारें—तुमच्या फिल्मकंपनींत येण्याविषयीं तुम्ही आग्रह करितां हें कबूल ! पण असं पहा—हीं सारीं आमचीं देवमाणसें—त्यांची सोय नको का लावायला—त्यांचे पगार नको का त्यांना द्यायला ? मला जशी पैशांची जरूर आहे—तशी त्यांना नाहीं का ?"

—" आपल्याला वाटेल तितकी रक्कम मी देतों ! तुमच्या नटांचा पगार तुम्हांला देतां येईल इतकी रक्कम तुम्हांला पोहोंचती केली म्हणजे तर, कराल करारावर सही !"

" देवमाणसं तुम्ही ! आमची वेळ तुम्ही संभाळलीत ! आतां आम्हाला संभाळा ! बोलपटसृष्टि अगदीं अपरिचित तेव्हां—"

—" त्याची तुम्हाला काळजी नको ! "

मालकांनीं करारावर सही केली. सात-आठ दिवसांच्या अंत-रांनीं एका मुठीनें आमचे पगार देऊन टाकले.

तो दिवस कंपनीचा शेवटचा होता. रात्रीचीं जेवणं चालूं होतीं. मालक स्वतः पंगतींत उभे राहून समाचार घेत होते.

प्रत्येकाच्या पानापुढें हात जोडून म्हणावयाचें, " इतक्या दिवस जशी मीठभाकरी लेकराची गोड करून घेतली तशी आज मानून घ्या ! प्रभूची इच्छा असली तर आपण पुन्हां एकत्र येऊन—प्रेमानें भाजीभाकर खाऊं ! "

उभ्या महाराष्ट्रांत एकच विषय ज्याच्या त्याच्या तोंडीं झाला कीं —" ...आतां हा रंगभूमीचा राजा रुपेरी पडद्यावर कोणत्या स्वरूपांत दिसणार ! "

× × ×

' मी दासी नाहीं-मी स्वतंत्र आहें '

(ले.....?)

माणसाला आयुष्यांत अशक्य असें कांहीं नाहीं, असें वाटतें कुठंपर्यंत—जोंपर्यंत कालप्रवाह अनुकूल आहे—तोंपर्यंत ! पण एकदां तो ओघ बदलला कीं झालें, दांतीं तृण घेऊन परिस्थितीपुढें उभें रहावें लागतें. मोठमोठाले पराक्रमी राजे पार धुळीला मिळाले, वैभवशाली सिंहासनें ओसाड पडलीं—वैभव सुद्धां टिकण्याचा एक काळ असतो. वैभव हातीं आल्यावर तें टिकवितां आलें पाहिजे !-तसें जर म्हणावयाचें तर मग बालपण—तारुण, वार्धक्य ह्या तिन्ही अवस्थेंतून प्रवास करावयास लागतो ना ? मग म्हणावयाचें तरी काय—कुठल्याही गोष्टीला अंत असतो. अमर असें जगांत कांहींच नाहीं. मग महाराष्ट्रा, आतां तूं कां हळहळतोस ? कशाकरितां अंतः-करण तोडतोस ? 'ही पहा मी जळायला आलें' अशी म्हणणारी मेनका

तुला रंगभूमीवर दिसणार नाहीं म्हणून ? संसाराची विस्कटलेली घडी आतां नीट बसणार ह्या आशेनें सुधाकराला 'खरं सोडायची झाली ना ?' असें आनंदानें विचारणारी सिन्धू पुन्हां दृष्टीस पडणार नाहीं म्हणून ? पंढरपूरच्या देवालयांत हातांत झांज घेऊन—नाचत नाचत 'अगा वैकुंठीच्या राया' म्हणत टाहो फोडणारी कान्होपात्रा रंगभूमीला मुकली म्हणून ? 'मी दासी नाहीं स्वतंत्र आहे' असें दिमाखानें सांगणारी द्रौपदी—आपल्या गानमाधुरीनें वेड लावणारी—साऱ्या महाराष्ट्राची गानदेवता—रंगभूमीची लाडकी राणी—तिचें तें वैभव लोपणार म्हणून महाराष्ट्रा तूं दुःखाचे श्वास—सहानुभूतीचे हुंदके देतोस ? महाराष्ट्राच्या रसिकवृंदा—आतां तुला त्या वैभवाला पारखें व्हावें लागेल !—आतां तुला त्या रंगभूमीवर हिजड्याचें हास्य—जीवनाचें भेसूर चित्र—अश्लीलतेनें अथांग ओथंबलेलीं किळसवाणीं नाटकें दिसतील ! आतां तूं आशेची ज्योत अंतःकरणांत तेवत ठेवून—भविष्यकाळाकडे डोळे लावून वाट पहात बस !

× × ×

अंक वाचून मीं तो दूर ठेवला. माझ्या गमावलेल्या—हरपलेल्या वैभवाबद्दल हळहळणारे कितीक लोक आहेत—हें समजतांच दुःखमिश्रित आनंद झाला. नवविध वाद्याच्या स्वरश्रवणानें जो आनंद लुटतां येतो तो आनंद आज हीं भिन्न मतें वाचून झाला ! फुलांचा घोंसदार गुच्छ हातांत घेऊन सुवास घेतांना जो आनंद—जे रोमांच अंगावर उभे राहतात—तें सुख आज मला अंक चाळतांना मिळालें. माझ्या डोळ्यांसमोर माझें उभें आयुष्य उभें राहिलें. वैमवाच्या शिखरावर चढणारा मी—आज पुन्हां पहिल्या पायरीवर पांगळ्या पायानें उभा असल्याचेंही मला दिसलें ! मला अभिमान वाटतो कीं, मी निष्कांचन झालों तरी—जीं जीं माणसें माझ्या सहवासाला होतीं, तीं तीं मीं हांक मारतांच पुन्हां येतील !—पुन्हां

हात पुढें करून भीक मागितली तरी—तीं लोक मला आनंदानें वाढतील ! नट म्हणून रंगभूमीवर नाचलों तरी लोक उंबरठ्यांत पाऊल ठेवतांच मला हाताला धरून गादीवर बसवतील—आणि ज्या ज्या वेळेला नाट्यमंदिरांत रसिक येतील—त्या त्या वेळेला मीं केलेल्या सेवेची आठवण होतांच, त्यांना गहिंवरल्यासारखें झालें तरी मी माझ्या आयुष्याचें सार्थक झालें असें समजेन ! झरकन् अंक हातीं घेतला. घरांत आई, सर्व कुटुंबांतील मंडळी बसली होती तेथें जाऊन—आईच्या पुढें अंक टाकून म्हणालों, " आई, पाहिलंत, माझे अन्नदाते काय म्हणतात तें माझ्याविषयीं ? " आणि तुम्ही सारी मंडळी आम्हाला मात्र अगदीं—आतां तरी आमचें ऐकाल ना ? "

खोडलेली खुर्ची : : २

बाहेर स्वच्छ चांदणें पडलें होतें. नुकतांच मी अंगांत तलम सदरा घालून आराम-खुर्चीवर पडलों होतों. तोंडांत बडी-शेप चघळीत नि धोतराच्या सोग्याशीं खेळत असा बराच वेळ मी शांत चित्तानें बसलों होतों. आवडत्या 'कॅमल' सिगारेटचे फवारे सोडीत चंद्राच्या सौंदर्याची शोभा मनमुराद पाहात होतों. धुराचे फवारे मी सोडीत असें तेव्हां फार फार आनंद वाटावयाचा मला. चंद्राभोवतीं अधून-मधून घोटाळणारे पांढरे ढग पाहून मला वाटूं लागलें-चंद्रदेखील माझ्यासारखीच सिगार ओढीत, धुराचे लोट सोडीत नसेल ना ? माझ्या गोड नि मादक सहवासांत मिठाचा खडा-माझ्या मित्राच्या आगमनानें पडला. अतिशय खेळकर वृत्तीचा होता तो. विलक्षण स्वभावाचा माणूस. एकदां नाहीं म्हटलें कीं प्राण गेला तरी एकहि क्षुल्लक गोष्ट करावयाचा नाहीं आणि मनांत आलें कीं ती गोष्ट कितीहि कष्टसाध्य असली तरी केल्याशिवाय राहावयाचा नाहीं.

असेंसुद्धां म्हणतां येईल त्याच्याबद्दल कीं, आयुष्य तो रावबीत होता-मन मानील तसें. त्याचें आयुष्य कसें होतें म्हणून म्हणतां येईल बरें ? ठाऊक असेल तुम्हांला-एखादा धनाढ्य माणूस खिशांत भरपूर नोटांचीं बंडलें घालून प्रदर्शनाच्या आवारांत हिंडावा-अन् जें जें वाटेल तें तें विकत घ्यावें-आणि ह्या पर्वणींत 'साहेब बूट पॉलीश-' म्हणून जरी कुणीं विचारलें तरी 'परवडत नाहीं-' असें सुद्धां उत्तर देईल-तो त्या वेळेला-म्हणजे मन मानेल तेथें पैशाची पिशवी खुली-आणि नको असेल तिथें अगदीं बंद ! त्याच्या ह्या स्वभावाची मी खूप-खूप टिंगल करीत असें. माझ्या बोलण्याकडे तो लक्ष न देतां खट्याळपणानें हंसत असे.

ज्या वेळेला तो आला-तेव्हां तो म्हणाला—

—येतोस का आज? फार दिवसांनीं बालगंधर्व पुण्याला आला आहे.

—म्हातारा झाला आहे, असें लोक म्हणतात ०पण अजून थिएटरवरची गर्दी कांहीं कमी होत नाहीं—कोणतें नाटक आहे त्याचें?

—स्वयंवर.

—वेडा आहेस तूं. सध्यां नऊ इथेंच वाजले. पावणेसहाचीं काढलीं तरी मिळणार नाहींत आतां—ठाऊक आहे साहेबजी.

—माझी एक अट आहे—त्या नंबरच्या खुर्चींशिवाय कधींहि कुठेंहि बसत नाहीं मी.

—कां? प्रेमाची स्मृति–प्रेमाची मूर्त्ति—

——वेडा कुठला——आयुष्याचा 'हंस' नि न्यू थिएटर्स करून नाहीं घेतला मी अजून. फार चांगली आहे ती जागा. तो नंबर मिळाला नाहीं तर मी तसाच परत फिरतों——.

माझें भविष्य खरें ठरलें——प्लॅनवर बसणाऱ्या इसमानें सांगितलें –पुढल्या चार नाटकांकरितां एका गुजराथी इसमानें तो नंबर राखून ठेवलेला आहे. मुक्काम आहे तोंपर्यंत मी येवो अगर न येवो–पैसे घेत जा——नंबर–मात्र खोडून ठेवा! असें त्यांनीं बजावून सांगितल्याचें मला सांगितलें. मीं फक्त कांहीं वेचकच शब्द नाट्यगृहाच्या बाहेर पडतांना उच्चारले. जगांत कांहीं कांहीं वेळेस——माणसाची स्थिति 'खोडलेल्या खुर्ची' सारखी होते——

माझ्या ह्या गंभीर वाक्याचा अर्थ काय म्हणून त्यानें मला विचारलें——

'चेष्टा करीत नसशील तर असाच सवड काढून ये घरीं–सांगीन मी तुला–काय सांगायचें आहे तें——

× × ×

कल्पना नव्हती मला मुळींच कीं तो माझ्या वरीं येऊन आठवण-पूर्वक वाक्याचा अर्थ विचारील म्हणून. ज्या वेळेस तो माझ्या-कडे आला त्या वेळेला अगदीं नेहमींची त्यानें वात्रटवृत्ति सोडून दिली होती आणि मी जें कांहीं सांगणार तें ऐकायला जी एकाग्र-वृत्ति लागते—त्या तयारीनें तो माझ्याशेजारीं—नुकत्याच नवीन खरेदी केलेल्या खुर्चींवर बसला.

खोलींत मंद दिवा जळत होता. त्यानें माझ्या पाठीवर स्नेहपूर्ण भावानें हात फिरवून हकीकत सांगण्यास विनंति केली. गोष्ट सांग-ण्यापूर्वीपासून तो माझ्या चेहऱ्याकडे टक लावून पहात होता. मी गोष्ट सांगण्यास सुरवात केली.

——तिचें नांव होतें सुलभा—वयानें एकवीस वर्षांची होती ती—फार सुंदरहि नव्हती आणि अगदीं कुरूपहि नव्हती. चार मुलीं-सारखी होती ती.

——अजून तिच्या भुंवयांचें, तिच्या डोळ्यांचें वर्णन केलं नाहींस—चुकल्याचुकल्यासारखं वाटतं मला. सांगून हो मोकळा——

——खरं सांगूं—तिचं वर्णन मला खरोखरच करतां यायचें नाहीं—आतां तुझा आग्रह आहे म्हणून करतों हवं तर. मला जर तिनें कोणत्या गोष्टीमुळें मोहिनी घातली असेल तर तिच्या गोड गळ्यानें—अजूनपर्यंत इतका गोड आवाज मीं ऐकला नव्हता. किती गोड म्हणून सांगूं—ती गायला लागली कीं वाटे—तासन् तास ऐकत बसावें तिचें गाणें ! एके दिवशीं संध्याकाळीं सहज फिरतां फिरतां—तिची नि माझी गांठ टेकडीवर पडली. वेळ संध्याकाळची होती—सूर्याचीं केशरी किरणें तिच्या गौरवर्णाला अधिकच शोभा देत होतीं. अस्मानी रंगाच्या तलम पातळामुळें—तिच्या शरीराचे अवयव न् अवयव उठावदार दिसत होते. मला पहातांच—तिनें नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अगदीं हंसत—हंसत उजव्या हाताचें मधलें बोट नाजूक

जिवणीवर ठेवून—कांहींशा आपलेपणाच्या नजरेनें ती मला म्हणाली,

—दाखवूं का गाणें म्हणून ?

—नको—कुणी जर असें आपल्याला पाहिलें तर ?

—किती भित्रे आहांत तुम्ही—पुरुष म्हणून मिरवतांना—

—सुलभा—फार जपायला लागतं आम्हां पुरुषांना—

—नाहीं—पटत मला.

—कसें पटणार ?

—माझ्यासारख्या विवाहित स्त्रीशीं तुमच्यासारख्या विवाहित माणसानें मोकळेपणानें गुजगोष्टी करण्यांत काय पाप आहे ? मी अविवाहित असतें, तुम्ही विवाहित असतां—तर एक गोष्ट निराळी.

मला व्यवहार समजतो—काव्य समजत नाहीं.—

थापा मारतां तुम्ही—काव्य ज्याला समजतं, त्याला व्यवहार समजत नाहीं असें म्हणणें—म्हणजे—?

—खरं सांगतों आहे मी.

—मग नाहीं मला गाणें म्हणूं देणार ?

—पुन्हा केव्हांतरी—मी मुद्दाम होऊन तुला बोलावीन. मग तर होईल ना तुझें समाधान.

—हिरमुसल्या चेहऱ्यानें ती गेली—जातांना कसलें तरी मधुर परंतु करुण स्वर माझ्या कानावर पडले. खरोखरच माझ्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. केव्हांहि तोंडांत साखर टाकली तरी ती गोड लागणार. कोकिळेनें किंकाळी फोडली तरी ती मधुर वाटणार, सुलभा म्हणजे जिवंत संगीत होतें !

—तिला वाटे मी तिच्यावर अगदीं अधिकार गाजवावा. परंतु—

—दोघेहि भित्रे दिसतां मला तुम्ही—प्रेम आणि व्यवहार ह्यांचा संबंध मारवाडी आणि सत्य ह्यांच्याइतका असावा—खरोखर तुम्ही दोघांनीं जर एकमेकांवर प्रेम केलें असतें तर मला वाटतें-पण मी तुला विचारतों खरें—खरं प्रेम तुझ्यावर होतें हें कशावरून ?

—साक्षीदाराला प्रश्न विचारावेत तसेच तूं मला विचारतो आहेस—पुरावा पाहिजे असेल तर तुला—सांगतों—

—अरे—एकाएकी असा स्तब्ध कां बसलास ? तुला बोलावयाचें आहे ना ?

—आठवणीनें जीव कसा गुदमरूं लागतो—हुरहुरल्यासारखें वाटतें—पोटांत कालवाकालव सुरू होते—शुद्ध ओठांतच घुटमळूं लागतात. जखमा जागृत होतात—वेदना सुरूं होतात, परंतु त्यांतहि एक प्रकारचें सुख वाटतें ! श्रावण महिन्याचे दिवस होते ते. पाऊस बाहेर धो धो पडत होता—असाच मी स्वस्थ चित्तानें एकटाच बसलों होतों—घरीं कुणीहि नव्हतें—संध्याकाळीं साडेसहा वाजण्याची वेळ होती. माझ्यापुढें येऊन ती उभी राहिली—सर्वांग अंग तिचें भिजलें होतें—केंसहि ओलावले होते—गोऱ्या गालावर पाण्याचे थेंब ठिपकत होते—थंडीनें ओठ कांपत होते—तिला विचारलें मीं—

—कशाला आलीस ह्या वेळेला ?

—'पावसानें वाटेंत गांठलें—घर दूर आहे—पाऊस थांबेल असेंही वाटत नाहीं—म्हणून विसाव्याला मी आलें आहे—पाहिलेंत किती गार पडलें आहे माझें अंग तें—'

—तिनें माझा हात—आपल्या हातांत घेतला—तिच्या डोळ्यांत आंसवें चमकलीं असावींत—मीं लगेच विचारलें—

—रडतेस तूं ?

—छे, मुळींच नाहीं—पावसाचें पाणी निथळताहे केसांतून—

—खोटं.

—कशावरून ?

—आवाज सांगतो आहे.

—गारठ्यामुळें मला बोलातांहि नीट येत नाहीं—जातें मी—मला वाटलें तुम्ही—

—ती तशीच गेली. तिच्या मनांतील खळबळ मीं ओळखली—परंतु पुन्हां मीं मनाला प्रश्न विचारला—

—खरेंच कुठें असते सध्यां ? किती गोड मुलगी होती—देतोस मला तिचा पत्ता—

—प्रेम करणार आहेस तिच्यावर तूं ?

—अजून निश्चित ठरविलें नाहीं—पत्ता सांगितलास तर तुझ्या अपरोक्ष—नकळत तिच्यावर प्रेम करीन—अशी भीति मात्र बाळगूं नकोस—दे कीं पत्ता.

—तुला वाटेल मी थाप मारतों आहे—परंतु मलाच जरूरी आहे त्याची. कुठें गेली कुणास ठाऊक ती. अधून मधून मला तिचीं पत्रं येत असतात—त्यावर पत्ता नाहीं—फक्त नांव असतें तिचें—

—प्रेमपत्रं कुणाचीं वाचूं नये म्हणतात.

—नाहीं, तीं मी प्रसिद्ध करणार आहे. फार गोड लिहिलीं आहेत—अंतःकरणाचा ठाव घेणारीं नि पीळ पाडणारीं आहेत—

—तुझ्या पुस्तकांचा पहिला ग्राहक म्हणून माझी नोंद करून ठेव—वर छायाचित्र कुणाचें—

—थांब तुला दाखवतों.

—असें म्हणून मीं त्याच्यापुढें फोटो टाकला. फोटोकडे किती तरी वेळ तो निर्विकार मनानें पाहात होता—

—फोटो पाहून तो माझ्या हातांत त्यानें दिला. मी त्याला म्हणालों—

'कदाचित् ती मला विसरलीहि असेल—'

'चुकतो आहेस तूं—विसरण्याचा प्रयत्न करीत असेल—'

—फारसें न बोलतां तो निघून गेला.

× × ×

सुहास—

आश्चर्य वाटत असेल तुम्हांला माझें नाहीं ? कदाचित् वेडीहि म्हणत असाल मला तुम्ही. सुहास, सुहास ? मी वेडी नाहीं—माझें मन वेडं आहे—माझें अंतःकरण वेडं आहे—म्हणून मी तुम्हांला पत्र लिहित असतें—उत्तराची अपेक्षा मी करीत नाहीं—कारण मला माझं मन तुमच्यापुढें उकलून दाखवायचं म्हणून—तुम्ही म्हणाल मला नाहीं का तसंच वाटतं ? तुम्हांला आठवत असेल—तुम्हीं नेहमीं म्हणतां मला काव्य समजत नाहीं व्यवहार समजतो—! व्यवहार माणसाला 'विसरायला शिकवतो'—'काव्य जगायला शिकवतें.' व्यवहाराच्या आठवणी बुजतात—काव्यानं कोरलेल्या आठवणी अंतःकरणांत ताजमहालासारख्या अमर राहतात. सुहास, विवाहित स्त्रीनें विवाहित पुरुषावर प्रेम करणें पाप आहे—असें मला देखील वाटतं—परंतु पाप नि पुण्य हा विचार आनंदानें नाचणाऱ्या मनाला शिवत देखील नाहीं—बागेंत आनंदानें नाचणाऱ्या मुलाला कुणीं सांगितलें मखमली हिरवळीवर नाचूं नकोस—उमलत्या कळ्या तोडूं नकोस—गुलाबांच्या पाकळ्या कुस्करूं नकोस—ऐकेल का तो ? तो ऐकत नाहीं—सुहास, ह्याचं कारण त्याला हंसत जगायचं असतं—! मलासुद्धां असं वाटत होतं, कीं आपणहि असं जगावं—! नाहीं जगतां येत तसं मला—त्याला नाइलाज आहे माझा—! आयुष्यांत जर मनाला आनंद वाटेल त्या रीतीनें जगतां येत नाहीं तर—सुहास—त्या जीवनाला तुम्ही काय म्हणाल ! आवडत्या वस्तु दूर जाव्यात—आवडतीं माणसं जवळ करतां येऊं नयेत—त्यांच्याशीं बोलतां, त्यांच्याशीं हंसतां खिदळतां येऊं नये—मला वाटतं तें गुलामाचं जीवन होय. गाईच्या गोठ्यांत वावरणाऱ्या वासरांचें तें जीवन होय—!

मला वाटतं सुहास तुमची माझी ओळख फारफार उशीरां झाली—उद्यांच्या गोष्टी काय होणार आहेत—हें जर माणसाला कळत

असतं तर—मला वाटतं त्यांनीं आपली फार सोय करून घेतली असती—निदान मी तरी तुमच्या ओळखीसाठीं धडपडत आलें असतें—आयुष्य ही शर्यत आहे कीं काय मग ? जो घोडा धांवतांना 'अखेर' आधीं गांठेल—त्याच्यावर पैसे लावणाऱ्याना हंसायचा अधिकार ? वाकीच्यांना नाहीं ? माझे पति मला आवडत नाहींत असेंहि नाहीं अन् मला ठाऊक आहे तुमचेहि तुमच्या पत्नीवर अतिशय प्रेम आहे—उभयतांमधील दुवा जोडला जाण्याचें कारणहि निराळें आहे—माझ्या गुणाचें तुम्ही कौतुक करतां—माझ्या गाण्याकरतां तुम्ही वेडे होतां—माझ्याशीं तुम्ही भीत भीत पण फार फार मोकळेपणानें बोलतां. आयुष्यांत—माणसाभोंवतीं कौतुक करणारीं माणसं नसलीं तर—तर त्याचं जीवन रानांत फुलणाऱ्या फुलासारखं दुर्दैवी ठरतं ! जगांत माणूस धडपड करतो एक कौतुकासाठीं आणि कीर्तीसाठीं. कौतुक करणारीं माणसें भेटलीं तरी टिकत नाहींत आणि कीर्ति ? मला नेहमीं असं वाटतं एकादा जिन्नस खरेदी करण्यापूर्वीं—जसा दुकानदार नाना प्रकारचे नमुने दाखवतोना तसें एकदां माणसाला लग्न होण्यापूर्वीं खूप खूप मुली अगर मुलें दाखवावींत.

कितीक सुखानें जगतील सुहास ! पुढल्या जन्मीं मी जर स्त्री झालें तर सुहास—कुठल्या तरी कॉलेजांत प्राध्यापक म्हणून काम मोफत करीन—तुम्ही पुरुष झालां तर कुठेंहि प्राध्यापक व्हा—आणि मग आपण लग्न करूं या— ! आम्हां मुलींना अगदीं झटपट रंगाऱ्यासारखें हळद लावून उजवून टाकतात—तुम्ही नेहमीं सांगतां—मानवी आयुष्य हें खोडलेल्या खुर्चीसारखे आहे—पटतं मला कधीं कधीं—वाटतें तोडून टाकावेत हे पाश—आणि तुमच्या हातांत हात घालून—गोड गोड गाणीं गावींत—गायकांचें गाणें उत्तम साथीदाराशिवाय रंगत नाहीं—सुरेल सांथ नसली तर पट्टीच्या गवयांचें गाणेंसुद्धां फिकें पडतें. इथं सुहास, संसार कांहीं तासा दोन तासांची मैफल नाहीं—जन्मभर एकमेकांची सांथ एकमेकांना करायची असते—

सुहास-माझें हें तुम्हांला शेवटचें पत्र आहे-आतां मी तुम्हांला विसरण्याचा प्रयत्न करणार आहे-तुम्हांलाहि मी विसरण्याचा प्रयत्न करा म्हणून सांगतें आहे-कारण ठाऊक नसेल तुम्हांला-समांतर रेषा कधींच्च एकमेकांना मिळत नाहींत. आयुष्यांत अशा तऱ्हेनें समाधान-मानून घेण्यासाठीं भूमितीचा सिद्धांत मला तुम्हाला सांगावा लागत आहे-क्षमा करा मला.

—सुलभा.

धुतलेले तांदूळ : : २

परवा गंमत काय झाली, कीं सहज मी रस्त्यानें विचार करीत रेंगाळत चाललों होतों. योगायोग असा आला कीं, त्याच दिशेनें माझे अगदीं जवळचे आप्त चालले होते. मला वाटतें, त्यांनीं मला पाहिलें असावें. याशिवाय त्यांनीं मुद्दाम कांहीं रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें चालण्याचें धाडस केलें नसतें. माझ्या वाऱ्यालाही उभे न राहाण्याची प्रतिज्ञा त्यांनीं जर केली असली, तर कोणास ठाऊक ? गेल्या वर्ष-सवावर्षांत हे असले प्रकार किती तरी घडून आले असतील. नातेवाईक फिरले असें नाहीं, पण पूर्वीचे जिवाला जीव देणारे दोस्त सुद्धां—मी मेलों आहें कीं जिवंत आहे ह्याचीसुद्धां चौकशी ते करीत नसत ! सणवार—लग्नाकार्यांत मला कोणीही बोलावूं नये—बोलावलें तर पानसुपारी देऊन माझी बोळवण करावी ! मला माझ्या दोस्तानें तोडलें—नातेवाईकानें दूर केलें, फार काय सांगूं, पैसासुद्धां बिचारा माझ्या खिशांत राहण्याचें नाकारूं लागला ! पैशानें माझ्याकडे आपुलकीच्या भावनेनें पाहिलें असतें तर—मला फोणीं टाकलें असतें का ? कोणाची माझ्या तोंडावर थुंकण्याची छाती झाली असती का ? आणि मला कोणीं दुर्जन—उडाणटप्पू—व्यसनी—दरवडेखोर म्हणून संबोधलें असतें का ? जिभेला पैशाच्या जडपणामुळें बोलणें मुष्किलीचें झालें असतें—नाण्याच्या नादानें वाचा बंद झाली असती !


मी गेल्यावर—जड देहाला कवटाळून रडतील—माझ्या देहालाऊन अश्रूंचा अभिषेक करतील, माझ्या ठिकाणीं नसलेल्या गुणसुमनांनीं मला नटवतील—पण मला त्याचें काय होय ? दूर असलेला माझा आत्मा ही लबाडी पाहून म्हणेल—"पाहा वरं—! हें असं आहे, मरणानं तुला मोल आलेलं आहे; जिवंतपणीं तुला जवळ

केलं नाहीं. कां, तर कदाचित् तोंड वेंगाडून चार दिडक्या मागेन म्हणून ? पण आतां तुला बोलतां येत नाहीं, ऐकतां येत नाहीं, तेव्हां तुझ्याजवळ बसून हे लबाड पाहा कसे हुंदके देऊन, कळवळून गोड बोलत आहेत ! तुम्हाला वाटेल, मी इतका कां वाईट आहें म्हणून ? कोणतें मोठें पाप मीं केलें आहे ? कोणाचें घोडें मारलें आहे ? कोणाच्या घरावरून नांगर फिरविला आहे. अपराधी असल्या-शिवाय मला उगीच कां कोणीं असें वागवितें ? अपराधी मी आहें—नाहीं कोण म्हणतो ? दरवडेखोर आहे—लबाड—हलकट—वाटेल तें म्हणाल तो मी आहे ! हा कबुलीजबाब मीं दिला आहे ! पण शब्दांच्या पाठीमागें माझ्या भावना आहेत—माझें हृदय आहे—थोडाफार चांगुलपणाही आहे ! मी हा असा झालों तो कोणासाठीं ? माझ्यासाठीं ? छे; स्वार्थबुद्धीनें मी वागलों ? काय जें केलें असेल, तें देवाघरीं रुजू आहे ! लबाडी केली, ती मला हृदय होतें म्हणून—फसवेगिरी केली, ती माझ्या डोळ्यांना एका नातेवाईकाच्या घराचा नायनाट व्हावा हें बरें दिसेना म्हणून ! माझी दयाबुद्धि जागृत झाली, ती—तो माझ्या दाराशीं रडत बसला होता—सर्वस्व गमा-विण्याची वेळ आली होती. त्याची बायको भरलेल्या कपाळानें—मला तें सांगतां येत नाहीं—पण मीं केलें तें त्याला वांचविण्यासाठीं ! मालकाची कॅश होती जवळ—टाकली त्याच्या पदरांत—लिहून घेतलें नाहीं त्याच्याजवळून—! ३००० रुपये पदरांत पडतांच्च बुद्धि फिरली—मला ओळखेनासा झाला—उपकार विसरला—लिहून घेतलें नसल्यामुळें माझें पाप उभें राहिलें. उलटला—तोंड चुकवूं लागला——माझ्यावर पैशांची अफरातफर केल्याच्या आरो-पावरून फिर्याद गुदरणार होते; पण चार लोक मध्यस्थी घालून——माझें घर—बायकोचे दागिने विकून——पैशांची भरपाई केली. एक संसार तारण्याकरितां मी बुडालों—मला लोक पैसेखाऊ म्हणूं लागले—

पण मी खरेंच कां तसा आहे ? मीं चूक केली खरी--पण ती माणुसकी होती म्हणून-त्यानें मला तोंडघशीं पाडलें, तें तो राक्षस होता म्हणून ! वरवर पाहणाऱ्या लोकांच्या दृष्टीनें मी दुर्जन ठरलों--तो मात्र--

— २ —

सगळ्यांत क्रूर कोण असेल बरें ? सिंह-वाघ-चित्ता-कोल्हा-साप-नाग-कोणी 'हो' म्हणून चटकन सांगून टाकील ! वस्तुस्थिति मात्र अगदीं उलट आहे ! सज्जन दुनियेंत दुर्जन म्हणून वागणाऱ्या ह्या हतभागी माणसाला विचारलें असतें तर-माझ्याकडून उत्तर निराळें आलें असतें ! तीन वर्षांच्या खडतर अनुभवानें मला सांगितलें-,-कीं माणूस क्रूर आहे ! बोलणारा माणूस क्रूर असतो, मुकी जनावरें क्रूर नाहींत-कपटी नाहींत-मनांत ठेवून डाव दावा साधणारीं नाहींत-! माणूस-बुद्धि ज्याला आहे-अंतःकरण आहे, असें म्हणावयाचें मात्र-तो कठोर--दुष्ट-नीच आहे. मी माणूस आहे-मग मी सुद्धां त्याच पंक्तींत बसावयाला हवें ? पण नाहीं; मी जर हालांत दिवस काढले नसते-अन्नापाठीमागें लागून वणवण हिंडलों नसतों-खोटेपणानें न वागतां जीवन कंठलें असतें, तर मी माणसाच्या कोटींत बसलों असतों ! फाटलेले कपडे-ठिगळ दिलेलीं धोतरें-पांढरे झालेले केस-काळजीनें काळवंडलेला चेहरा पाहून तुम्हांला खास वाटेल कीं, मी माणूस आहे-सच्चा आहे ! वाईट मार्गानें वागून-मी सधन झालों असतों, पण तें माझें ब्रीद नव्हतें-मला खात्री होती-आत्मविश्वास होता-कीं नेहमींच माणसाला अंधाऱ्या रात्रीं दिसत नाहींत-केव्हां ना केव्हां तरी अरुणोदय होणार असतो ! माझा स्वाहाकार करणारी परिस्थिति मला कुमार्गाकडे लावण्याचे प्रयत्न करीत होती-! मनाला पुष्कळ आवरण्याचा प्रयत्न करी-पण चुकून एक वेळ मनांत येई-सत्त्वानें वागून कोठें



राजा हरिश्चंद्र—श्रियाळ म्हणून मिरवावयाचें आहे ! खसडी करावी, ह्याची टोपी त्याला घालावी, त्याला डुबवावें, आपण तरावें ! अखेर तरी मी हाच निर्धार ठरविला आहे. हें गांव सोडलें अन् कोठें दूर जाऊन व्यापारधंदा सुरू केला, तर तेथें कोण येऊन माझ्या स्थितीची जाणीव देणार आहे ? माझ्या वाईटावर असलेले लोक जरी तेथें येऊन माझ्या सुखांत विष कालवूं लागले, तरी एकदां नंगेपणानें वागण्याचें ठरविल्यावर मग कोणाची भीति वाळगावयाची ? सज्जनपणा तरी कोठपर्यंत टिकणार ? मरेपर्यंत ! आणि दुर्जन म्हणून काळवंडलेला चेहरा कोठपर्यंत काळा राहणार ! चितेवर देह ठेवीपर्यंत !

× × ×

नेहमींच्या संवयीप्रमाणें मी सकाळीं बाहेर निघालों होतों. इतक्यांत सहा वर्षांचे आमचे चिरंजीव येऊन मला विचारूं लागले.

" नाना ! कुठं चाललां हो तुम्ही ? "

" हूं बघ बाळ. असं बाहेर निघालं माणूस, म्हणजे कुठं निघालां म्हणून विचारूं नये !"

" पण मला ठाऊक आहे तुम्ही कुठ चाललां आहांत तें ?"

" खाऊ आणायला ना ?"

" अं—हं पैसे मिळवायला ! नाना, तुम्हाला पैसे मिळत नाहींत, म्हणून तुम्ही रडतां—मला विचारा कसे मिळवावयाचे तें !"

" बराच शहाणा शाळेंत जाऊन झालास म्हणायचा !"

" सांगूं नाना ? लोकांच्या घरीं जेवायला गेलं, कीं दक्षिणा म्हणून मिळतो पैसा—तुम्हांला कुणी जेवायला बोलवून पैसा देत नाहीं, म्हणून रडतां हो ? मला सगळे शाळेंतील सोबती—आपल्या आईला विचारून दररोज जेवायला घरीं बोलवून पैसा—देणार आहेत ! तुम्ही याल का माझ्याबरोबर ? तुम्हालासुद्धां पैसा मिळेल. "

जवळ घेऊन त्याचे मुके घेतले. पोट भरल्यासारखें वाटलें. बाप-ड्यानें फाटक्या सदऱ्यानें माझे डोळे पुसले ! देव दूर आहे म्हण-तात—मला माझा देव माझ्या लाडक्या मधूत दिसला !. समाधाना-साठीं अधीर झालेल्या मनाला चिमकुल्या हातानें डोळ्याचें पाणी टिपतांच–शांति वाटली— ! परिस्थितीचा क्षणभर विसर पडला.

× × ×

सहा महिन्यांनंतरचा तो दिवस. माझ्या चुलत्याकडून मला अचानक बोलावणें आलें होतें. ज्यानें माझी उभ्या ४ वर्षांत चौकशी केली नाहीं, त्याला आतांच कां प्रेमाचा उमाळा यावा ? स्वतःकडून धर्म पाळण्याचें कर्तव्य करावयाचें, म्हणून मी त्यांना भेटावयाला गेलों होतों.

" काका, गरिबाची आठवण झाली–थोर मनाचे आपण–देव आपलें कल्याण करो ! "

" किती रे खराब झालास तूं– "

" चार वर्षांनीं मला पाहिल्यामुळं तुम्हाला तसं वाटत असेल ! मायेच्या डोळ्याला नेहमीं आपलं माणूस वाळलेलं दिसतं– "

" अरे बाबा, परिस्थितीच्या रोगानं तुला घेरलं आहे; तेव्हां असा तूं दिसणार हें मला ठाऊक आहे ! "

" काका, माझ्या परिस्थितीची जाणीव मला करून देऊं नका ! तुमच्याकडे मी आलों, तो माझ्या भोंवतालच्या परिस्थितीचा कांहीं विसर पडावा म्हणून– ! क्षेमकुशलवर्तमान बोलून मनाला थोडं हलकं करावं म्हणून निरोपासरशीं आलों ! जातों मी आतां– माझ्या डोळ्यांपुढं रात्रंदिवस असणाऱ्या— "

" तुला दुखविण्याचा माझा हेतु नाहीं ! माझा तूं सख्खा पुतण्या, तुझ्याबद्दल चार लोक माझ्या कानांवर कांहीं कांहीं घालतात—तें ऐकून मनाला वाईट वाटतं; थोडाफार तुझ्या वर्तनाचा रागही

येतो ! माझी कल्पना नव्हती, कीं तूं इतका वाहवला असशील म्हणून; ४ वर्षांपूर्वीं ३००० रुपयांचा चुराडा केलास आणि आतां हा असा बेबंदासारखा—"

"काका, वरवर गोष्टींचा विचार करणाऱ्यांना मी भामटा आहे असं वाटणं साहजिक आहे ! माझ्या चैनीसाठीं मीं ३००० रुपयांची अफरातफर केली अशी तुमची समजूत असेल, तर बोलणंच खुंटलं ! माझ्यावरचा तुमचा विश्वास उडाला आहे. आतां मीं अंतःकरण जरी फाडून तुमच्यापुढं ठेवलं तरी खरं वाटणार नाहीं ? माणसाला असणारा स्वाभिमान तर परिस्थितीमुळें नाहींसा होतो; पण विश्वास—— !

"कसा विश्वास ठेवायचा तुझ्या बोलण्यावर ? तूं लोकांना अमेरिकन कॉटन फ्यूचर्सचे आंकडे काढून देतोस, स्वतः खेळतोस, रेसच्या टिप्स् देतोस, हलकट लोकांत मिसळतोस, चंगीभंगी लोकांचा तुझ्याभोंवतीं गराडा ! तुझ्या मित्रांपैकीं एखादा तरी सज्जन आहे कां——सारे लेकाचे व्यसनी ! अशांच्या संगतींत १२ न् १२ चोवीस तास जातात; तुझं पुढें कसं होणार ?"

"माझं कसं होणार ? काका, तुम्ही माझी काळजी करतां ? मी हा असा नटव्या——नादी लोकांच्या संगतींत असतों——ह्याचा खोल विचार कधीं आपण केला आहे कां ? माझ्या पोटानं मला असं वागायला शिकवलं; मी बिघडलेलों नाहीं; चांगले म्हणवणारे लोक मला पैसेखाऊ म्हणून जवळ करीनात, म्हणून मला दरोडेखोरांच्या मैत्रीचा आश्रय घ्यावा लागला ! काका, सज्जन—सज्जन म्हणून मिरवणारे लोक लबाड ढोंगी असतात ! सज्जन कोण म्हणतां तुम्ही ? लोकांच्या पैशावर चैन करणारे, अनाथ अबलांना फसवून साधु म्हणून मिरवणारे, देवाच्या दारीं कपाळाला पट्टे अन् भस्मे फांसून बसणारे, पाप दडविण्याकरितां पैशाच्या पिशव्यांचीं तोंडं मोकळीं सोडणारे ते सज्जन ! मित्रकरतां—माणुसकीकरतां स्वतःच्या

सर्वस्वावर तिलांजली देऊन कंगाल बनणाऱ्यांना तुम्ही दुर्जन म्हणतां ? काका, सज्जन–दुर्जन हा भेद कळायला अंतर्दृष्टि असावी लागते. ”

“ तुझं कर्म तुझ्यापाशीं ! रक्ताचं नातं पडलं–कींव आली तुझी; हालांत दिवस काढतो आहेस, वाईट वाटलं ! चांगलं वाग; माझ्या पाठीमागें हा वाढता संसार. तुला मदत करावयाची आम्ही; पण–परिस्थिति, जाऊं द्या ! बरं, घे हे तूर्त खर्चाला दहा रुपये. ”

“ काका, देव देईल मला ! आज चार वर्षें त्याच्याच कृपेनें ओलीकोरडी खातों आहें ! ललाटींची रेषा उमटली, तर खुळखुळ-तील पैसे माझ्या खिशांत; अजून वर्षभर दैवाची परीक्षा पाहणार आहें; सीधेपणानें वागून जर पोट भरलं नाहीं, तर मी अट्टल बद-माष होणार आहे. लोकांच्या गळ्याला फांस लावणार आहे ! जगाच्या दृष्टीनं मी सज्जन सधन होणार !

एक क्षणभरही न थांबतां मी घराकडे परतलों.

× × ×

वेळ यावी लागते. माणसांनीं धडपड करून ती कांहीं येत नसते. माझी वेळ आज आली होती. मुंबईच्या एका सुप्रसिद्ध फोटो-एन्ला-र्जिंग कंपनीचा एजंट म्हणून मला १५० रुपये मिळूं लागले होते. एजन्ट म्हणून हिंडतां हिंडतां मलबारहिलवरील एका बंगल्यांत कंपनीच्या कामाकरितां जावें लागलें. लक्षाधीशाचा तो बंगला होता. त्याच्याकडून एन्लार्जिंगकरितां फोटो आणावयाचा होता. सकाळीं ९ वाजतां बंगल्यांत गेलों. शेटजीनें हंसतमुखानें माझें स्वागत केलें; फोटोची प्रत माझ्या हातांत देऊन ते सांगूं लागले.

“ मिस्टर; फोटोंतील चित्र मोठं आकर्षक आहे म्हणून मी तुमच्याकडे तो देत आहें असं नव्हे ! माझ्या आयुष्यांत मला ह्या चित्रानं—”

" पण मला कांहीं त्यांत मोठं अलौकिक आहे असं वाटत नाहीं ! एका बाजूला हा मोठा टेकडीवर बंगला आहे आणि त्यासमोर पडक्या झोंपडींत एक गाय चरत असून तिचें वासरूं दूध पीत आहे. झोंपडीच्या पुढल्या बाजूस त्या घराचा मालक शांत चित्तानं बसला असून त्याची दृष्टि समोरच्या टेंकडीवरील बंगल्याकडे लागलेली आहे—झोपडी अन् बंगला—ह्यांत फरक—"

" फार मोठा आहे ! सज्जन-दुर्जनाइतका आहे. ह्या झोपडीचा मालक—कांहीं वर्षांपूर्वी रोल्सरॉईसमधून हिंडत होता. तोही या बंगल्यांत राहत असे ! मोठा व्यापारी होता तो. एका शेटजीला सट्ट्यांत १३ लाखांची रक्कम त्यांनीं उसनवार दिली होती—! शेटजीनं दिवाळं काढलं. तो दिवाळखोर आज २० लाखांचा मालक आहे; पण ज्यानं सावकारी केली, तो आज गाईच्या दुधाचे रतीब घालून गुजराण करीत असतो ! दोघेही मित्रच होते; मीही व्यापारीच आहें ! माझीही वासना फिरेल; पण ती न फिरावी म्हणून मी हें चित्र माझ्या दिवाणखान्यांत आदर्श म्हणून ठेवणार आहे ! माणसाची बुद्धि केव्हां फिरेल ह्याचा नेम नाहीं. शक्यतों लवकर माझं काम हातीं घ्या."

× × ×

फोटो बॅगमध्यें टाकला ! बंगल्याबाहेर पडलों. माझें वेडें मन सांगूं लागलें, माझें उदाहरण हें कार्ड साईजच्या फोटोएवढें आहे ! आणि ह्या शेटजींचें फुलसाइज फोटोएवढें आहे ! माझा अनुभव छोटा आहे, हा मोठा—एन्लार्ज करण्यालायक आहे !

—

सर्वस्वावर तिलांजली देऊन कंगाल बनणाऱ्यांना तुम्ही दुर्जन म्हणतां ? काका, सज्जन–दुर्जन हा भेद कळायला अंतर्दृष्टि असावी लागते. ”

“ तुझं कर्म तुझ्यापाशीं ! रक्ताचं नातं पडलं–कींव आली तुझी; हालांत दिवस काढतो आहेस, वाईट वाटलं ! चांगलं वाग; माझ्या पाठीमागें हा वाढता संसार. तुला मदत करावयाची आम्ही; पण–परिस्थिति, जाऊं द्या ! बरं, घे हे तूर्त खर्चाला दहा रुपये. ”

“ काका, देव देईल मला ! आज चार वर्षें त्याच्याच कृपेनें ओलीकोरडी खातों आहें ! ललाटींची रेषा उमटली, तर खुळखुळ-तील पैसे माझ्या खिशांत; अजून वर्षभर दैवाची परीक्षा पाहणार आहें; सीधेपणानें वागून जर पोट भरलं नाहीं, तर मी अट्टल बद-माष होणार आहे. लोकांच्या गळ्याला फांस लावणार आहे ! जगाच्या दृष्टीनं मी सज्जन सधन होणार !

एक क्षणभरही न थांबतां मी घराकडे परतलों.

× × ×

वेळ यावी लागते. माणसांनीं धडपड करून ती कांहीं येत नसते. माझी वेळ आज आली होती. मुंबईच्या एका सुप्रसिद्ध फोटो-एन्ला-र्जिंग कंपनीचा एजंट म्हणून मला १५० रुपये मिळूं लागले होते. एजन्ट म्हणून हिंडतां हिंडतां मलबारहिलवरील एका बंगल्यांत कंपनीच्या कामाकरितां जावें लागलें. लक्षाधीशाचा तो बंगला होता. त्याच्याकडून एन्लार्जिंगकरितां फोटो आणावयाचा होता. सकाळीं ९ वाजतां बंगल्यांत गेलों. शेटजीनें हंसतमुखानें माझें स्वागत केलें; फोटोची प्रत माझ्या हातांत देऊन ते सांगूं लागले.

“ मिस्टर; फोटोंतील चित्र मोठं आकर्षक आहे म्हणून मी तुमच्याकडे तो देत आहें असं नव्हे ! माझ्या आयुष्यांत मला ह्या चित्रानं—”

" पण मला कांहीं त्यांत मोठं अलौकिक आहे असं वाटत नाहीं ! एका बाजूला हा मोठा टेकडीवर बंगला आहे आणि त्यासमोर पडक्या झोंपडींत एक गाय चरत असून तिचें वासरूं दूध पीत आहे. झोंपडीच्या पुढल्या बाजूस त्या घराचा मालक शांत चित्तानं बसला असून त्याची दृष्टि समोरच्या टेंकडीवरील बंगल्याकडे लागलेली आहे—झोपडी अन् बंगला—ह्यांत फरक—"

" फार मोठा आहे ! सज्जन-दुर्जनाइतका आहे. ह्या झोपडीचा मालक—कांहीं वर्षांपूर्वी रोल्सरॉईसमधून हिंडत होता. तोही या बंगल्यांत राहत असे ! मोठा व्यापारी होता तो. एका शेटजीला सट्ट्यांत १३ लाखांची रक्कम त्यांनीं उसनवार दिली होती—! शेटजीनं दिवाळं काढलं. तो दिवाळखोर आज २० लाखांचा मालक आहे; पण ज्यानं सावकारी केली, तो आज गाईच्या दुधाचे रतीब घालून गुजराण करीत असतो ! दोघेही मित्रच होते; मीही व्यापारीच आहें ! माझीही वासना फिरेल; पण ती न फिरावी म्हणून मी हें चित्र माझ्या दिवाणखान्यांत आदर्श म्हणून ठेवणार आहे ! माणसाची बुद्धि केव्हां फिरेल ह्याचा नेम नाहीं. शक्यतों लवकर माझं काम हातीं घ्या."

× × ×

फोटो बॅगमध्यें टाकला ! बंगल्याबाहेर पडलों. माझें वेडें मन सांगूं लागलें, माझें उदाहरण हें कार्ड साईजच्या फोटोएवढें आहे ! आणि ह्या शेटजींचें फुलसाइज फोटोएवढें आहे ! माझा अनुभव छोटा आहे, हा मोठा-एन्लार्ज करण्यालायक आहे !

———

अहेर ! : : ४

अनेक लोकांचा संबंध येतो कळायला लागल्यापासून—पण खरें सांगायचें म्हटलें तर कितीकजणांच्या स्मृतीचा ठसा अंतःकरणावर उमटलेला असतो ? माझा तरी अगदीं चांगलें समजायला लागल्या-पासून अनेकांशीं परिचय झाला—परंतु निवांत वेळीं विचार करितांना अशा विरळ मूर्ति डोळ्यापुढें उभ्या राहतात कीं, ज्यांची भेट व्हावी —अगर ज्यांच्याबद्दल स्मृति होतांच सुखदुःखांच्या घटका चित्रपटा-सारख्या डोळ्यांपुढून जाव्यात—आतांपर्यंतच्या आयुष्यांतील अनेक प्रसंगांची ' मालिका ' जपतांना—मी वाटेल त्या गोष्टी विसरूं शकेन— परंतु तो प्रसंग आठवला कीं, अजून मला अगदीं बेचैन झाल्या-सारखें होतें !—

२० वर्षांचा असेन मीं त्या वेळेला—शिक्षणक्रम संपवून गांवाकडे परत जावयाला निघालों होतों. सारी मित्रमंडळी स्टेशनवर मला पोहोंचवायला आलीं होतीं. माझ्या बाकावर बसणारा माझा मित्र मात्र अगदीं दूर उभा राहिला होता—! गप्पागोष्टींच्या वेल्हाळांत त्या बिचाऱ्याचें मला स्मरणही राहिलें नाहीं. इत-क्यांत गार्डनें शिटी दिली, हिरवें निशाण फडकाविलें. गाडी सुटायला अर्ध्या मिनिटाचा अवकाश होता—सगळ्या मित्रांनीं माझी पाठ थोपटून हुळहुळी केली—आणि रुमाल फडकावीत ते परतले. डब्यांत मी चढायला लागलों, पहिल्या पायरीवर पाय ठेवला— माझ्या पाठीवर थाप मारून कुणीसें म्हणालें—

विसरलास इतक्यांत मला ?

खरं सांगायचं म्हणजे मी—

तसं नाहीं बरं कांहीं—पण गरीब मित्राची आठवण ठेव. एका खोलींत आपण राहिलों—ताटाला ताट लावून जेवलों—माझ्या गरिबी-

वर तूं पांघरूण घालून अनेक वेळां उपकृत केलेंस—जें जें माझ्या-साठीं तुला करितां येईल तें तें केलंस—याची फेड—

नको रे असें बोलूस—विठोबा !

तूं श्रीमंत—मी गरीब—तूं मला विसरणार नाहींस, पण तुझ्या-भोंवतालची परिस्थिति तुला—माझा विसर पाडील !

माझी आठवण म्हणून—

काय आहे ह्या पुडींत—

पहा उघडून तर—

हें रे काय— ? मीठ दिलेंस हो मला—

खिशांत एकच पैसा होता—तूं जाणार म्हणून तुला काय द्यावें हा विचार सारखा भंडावून सोडीत होता—तुझें मीठ मीं खाल्लें—माझ्या पाठीशीं तूं उभा होतास—माझी आठवण राहावी म्हणून हें मीठ तुला दिलें ! मिठाला तर नाहींना विसरणार?

पोर्टरनें गाडी सुटण्याची घंटा वाजविली, गार्डानें शीळ दिली—

अच्छा—

जेंड जिभेनें होकार दिला—दृष्टिआड होईपर्यंत मी त्याच्याकडे पहात होतों ! त्यानें रुमाल फडकाविला—मींहि रुमालानें प्रतिउत्तर दिलें ! पुन्हां एकदां मी लांबवर दृष्टी टाकली—दोन्ही हात त्यानें जोडले होते, डोळे पुशीत होता.

झालीं बरोबर १६ वर्षें त्या गोष्टीला ! दरम्यानच्या काळांत—उभयतां आम्ही एकमेकांना विसरलों होतों ! तो काय करीत असेल कुणास ठाऊक— ? अजूनहि मला त्याची ती कारुण्य-पूर्ण मूर्ति आठवली, कीं वाटतें एकवेळ जाऊन त्याला भेटून यावें—कारणाशिवाय कशाचें जाणें होणार—त्याच्याकडे—! पण त्यानें यावें माझ्याकडे—असें मात्र कारण आहे ! मुलांची मुंज आहेच अनायासें सात आठ दिवसांच्या अंतरावर—पाहूं एकादें पत्र लिहून— ! माझा

विठोबा मुंजीला आला तर—! वाटेल तिथून येईल धांवत–मी बोलाविल्यावर—! खात्री आहे माझी—तो मला विसरत नसेल–!

× × ×

विठोबा—

बरोबर सोळा वर्षें झालीं असतील–आपण एकमेकांना सोडून–! गांठ नाहीं–भेट नाहीं–किंवा एकही पत्र तूं लिहिलें नाहींस—काय समजायचें मीं ? कुठें आहेस–काय करितोस ? कसें चाललें आहे तुझें ? येवढ्या दीर्घकालानंतर–कारणपरत्वें तरी 'तूं मला भेटायला येशील म्हणून मी मोठ्या आशेनें तुझा पत्ता काढून इकडे येण्या-बद्दल लिहीत आहे. माझ्या थोरल्या मुलाची मुंज—बरोबर आठ दिवसांनीं होणार आहे–तूं यावेंस–आमच्या आनंदाचा वाटेकरी व्हावेंस–ऋणानुबंध दृढ करावा–फार काय निदान तुला एकदां डोळे भरून पहावें–जुन्या मित्राला कडकडून भेटावें–खूप–एकमेकांशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलाव्यांत–पोटभर गळ्यांत गळा घालून रडावें येशील कां विठोबा–! तूं आला नाहींस तर माझी निराशा होईल–विठोबा–येतांना एकटा येऊं नकोस वहिनीला घेऊन ये–पण विठोबा काय करित असतोस तूं ! किती दूरच्या अंतरावर राहतोस–नाहींतर चटकन हाताला धरून–तुला हक्कानें चार दिवस आणला असता–सोबत प्रवासखर्चाकरितां अडचण आहे असें समजून पांच रुपयांची नोट पाठवित आहे. रागवूं नकोस—कशाहि परिस्थितींत असलास तरी तूं ये–ह्या व्यतिरिक्त मला तुझी फारशी माहिती नाहीं—

तुझा

रामदास—

पत्राकडे पाहिलें—डोळे फाडून पाहिलें—अंतःकरणाजवळ नेऊन भिडाविलें—माझ्या रामदासाचें तें पत्र ! मला वाटलें–—ऐषारामांत दंग होऊन—माझा रामदास मला विसरला; माझ्या

गरीबाच्या मिठाला तो अंतरला—१६ वर्षांनीं—कां होईना माझी भेट व्हावी म्हणून अस्वस्थ झाला--रामदास तूं श्रीमंत आहेस-आयुष्यांत तुझा फरक पडला-संसारी बनलास-पण हा विठोबा-वयानें वाढला आणि द्वारिद्र्याचा दास बनला. माझ्या भेटीकरितां डोळे लावून वाट पाहणारें एक दयाळू अंतःकरण आहे शिल्लक-! नाहींतर माझी वाट कोण पहाणार ? मालक-भाडें केव्हां देणार म्हणून ! गवळी दुधाचे पैसे केव्हां हातीं पडणार म्हणून-आणि माझा शेट-कधीं माझी गुलामगिरी करायला दुसऱ्या दिवशीं येतो म्हणून !-रामदास-कसा मला दिसणार-त्याचें तें वैभव-मुलेंबाळें -तो भरलेला संसार-आणि मी दिसतांच-एकाद्या लहान मुलासारखा माझ्याकडे धांवत येऊन मला आलिंगन द्यायला-आनंद सगळीकडे आनंद ! पण मी रामदासला काय देणार ? माझ्या हातांत काय आहे देण्यासारखें-कसली भेट ?

× × ×

कां आला नाहीं अजून विठोबा—उद्यां मुंज आणि मी इतक्या आग्रहाचें पत्र लिहून प्रवास खर्चाकरितां पैसे पाठवूनही तो अजून आला नाहीं ? आजारी तर नसेल ? घरांत मुलाबाळांचा पोरवडा सोडून येणें त्याला जड वाटत असेल ? माझ्या वैभवाला साजेल असा अहेर त्याला करतां येणार नाहीं-आपलें दैन्य कुणाच्याही दृष्टीस पडूं नये म्हणून तो तर येणार नाहीं ? १६ वर्षांत कदाचित् तो श्रीमंत नसला झाला तरी सुखा-समाधानानें आपलें जीवन कंठीत नसेल कशावरून ? कां अजून विठोबाच्या आयुष्यांत सुखाची साखरप्रभात उगवली नाहीं ! सारें नातेवाईक जमतील-माझ्या भोंवतीं आनंदाचा बाजार भरेल. मोठ-मोठाले अहेर येतील-सगळे लोक खातील-पितील पण-अंतःकरणाच्या अगदीं कानाकोंपऱ्यांत मी दुःखी असेन ! माझें कौतुक करणारा-माझ्याविषयीं जिव्हाळा वाटणारा-माझ्या वैभवाकडे पाहून डोळे भरून येणारा

माझा विठोबा—केव्हां येणार ? एकच विचार सारखा मला त्रास देत होता.

× × ×

रात्रीचे दहा वाजले होते—कोठीच्या खोलींत आलेल्या अहेरांची नोंद करीत मी बसलों होतों—घरांत जिकडे तिकडे सामसूम झालें होतें—सकाळीं लवकर उठावं म्हणून—आपणही पडावें ह्या विचारानें डोळे मिटण्याचा प्रयत्न केला—डोळ्यापुढें विठोबा—सोळा वर्षांपूर्वीची ती करुणमूर्ति—! रस्त्यावरच्या खिडकींत उभें राहून इकडे तिकडे नजर टाकली—लांबवर पहातांच—कुणी तरी इसम—दुरून माझ्या घराकडे बोट दाखवित असल्याचें दिसलें—! पुन्हां—मीं निरखून पाहिलें—'अगदीं तेंच घर' अशी खात्री पटवून घेऊन—तो झरझर येऊं लागला—दहा बारा फुटांचे अंतरावर येतांच.

कोण विठोबा—?

रामदास—मींच वरं !

लहान मुलासारखा खालीं धांवत जाऊन त्याला खोलींत आणलें—त्याच्याकडे मीं पाहिलें—भडभडून आलें मला.

—विठोबा—अजून तुझ्या दारिद्र्यानें तुला सोडलें नाहीं.

—रामदास—दारिद्र्यानें मला सोडलें असतें तर ह्या विठोबाला तुला मुकावें लागलें असतें ! तुझें अंतःकरण तुटलें नसतें—! आणि सहानुभूतीच्या शब्दाला मीं—आंचवलों असतों—! रामदास—गेलीं सोळा वर्षें—मी जगलों—त्याचें सार्थक तुझें पत्र पाहातांच झालें ! डोळे मिटून दुःख सोसलें—पण तुझ्या पत्रानें मीं आतां उघडे डोळे करून—तें सोसायला खंबीर झालों.

—विठोबा—आलास फार—फार आनंद वाटला—! इतक्या-दिवसानंतर भेटायला आलास, तर वहिनीला मुलांना घेऊन यावयाचें—कां हंसलास—?

—लग्न—! आणि माझें ? वेड्या तें सुख माझ्या वाट्याला यावयाचें

नाहीं-! लग्न-वायको, संसार, मुलें सारे खेळ तुम्हां लोकांचे-! आम्ही गरिबांनीं ते नुसते डोळ्यांनीं पहायचे-आणि झुरायचें ?

—म्हणजे काय म्हणतोस अजून तुझें लग्न झालें नाहीं ? काय करतोस हल्लीं तूं ?

—एका शेटजीकडे १५ रुपयांस खर्डेघाशी करीत असतों ! अगदीं उघडा उघडा हिशोब आहे-भाडें-खाणें-कपडा लत्ता-खलास ! मग विनाकारण एकाद्या गरीब गाईच्या संसाराचें वाटोळें कशाला करूं-!

—खरें आहे-! सारें काहीं विसरून जा—आणि दोन दिवस इथें आनंदानें रहा—!

—हा पसारा इथें येवढा कसला पडला आहे-हीं चांदीचीं भांडीं-ह्या फुलदाण्या-त्या जरीच्या टोप्या-उपरणीं-कुणाचीं आहेत-? फार मोठमोठाली मंडळी तुझ्याकडे आलेली दिसतात-त्याच्या मानानें मी ? तुझा मित्र—

—मेहेरबान-चला अगोदर कपडे काढा-आणि मग बोलत बसूं !

× × ×

समारंभ मोठ्या आनंदानें पार पडला. तीनचार दिवसांत पाहुणेहि आपआपल्या घरीं निघून गेले.

—एकदिवस-मी आणि विठोबा सकाळचा फराळ करीत बसलों होतों. अर्धा अधिक फराळ झाल्यावर विठोबा म्हणाला—

—रामदास--आज सकाळच्या गाडीनें आम्ही जाणार. तुझ्या ह्या संसाराकडे पाहून समाधान वाटलें ! भाग्यवान् आहेस तूं—

—विठोबा—रहा-माझ्याजवळ रहा—! आतां कुठें-कुठें जाऊं नकोस—कुणाची गुलामगिरी पत्करूं नकोस-कुणासाठीं हे कष्ट उपसतोस तूं--कोण आहे तुला नात्या-गोत्याचे ? माझ्या घरीं तूं-रहा-खा पी.--

—रामदास—तुझेंच अन्न मी खातों आहें--! तुझ्या घरीं मी रहावें--राहायला हरकत नाहीं--पण हें प्रेम टिकायचें नाहीं—

दूर आहें मी म्हणून तूं मला चाहतोस. जवळ आलों तर तिरस्कार करूं लागशील !

—माझें बोलणें कठोर वाटत असेल—पण हें खरें आहे. अनुभवाचें आहे ! तुझ्या सुखाच्या संसारांत माझ्यासारख्या कमनशिबी माणसानें राहून—कदाचित् तो दृष्टावलाहि जाईल ! तूं दूर—मी—दूर असेच कधीं—काळीं गांठी—भेटी पडल्या तर—

विठोबा——

रामदास—

उभयतां आम्ही क्षणभर स्तब्ध होतों—विठोबानें आपल्या सामानाची आंवराआंवर केली—घरांतील मंडळींचा निरोप घेऊन तो माझ्याजवळ येऊन उभा राहिला—तो आपल्या खिशांतील रुमाल काढून एकसारखा डोळे टिपत होता—बऱ्याच वेळानंतर—तो म्हणाला—

येतों बरें रामदास——! तुला कांहीं तरी द्यावें अशी माझी फार इच्छा होती—पण तें समाधान माझ्या नशीबीं नाहीं ! कसला तुला अहेर करायचा ? काय आहे माझ्याजवळ—?

असें कां म्हणतोस—? मला तुला अहेर करायचा आहेना—मग मला तेवढा-तो भिजलेला रुमाल—तुझी आठवण म्हणून दे—त्याचें मोलं—बिनमोल—आपल्या मित्रप्रेमाचें तें प्रतिक आहे—!

आम्हीं एकमेकांनीं एकमेकांकडे—डोळे भरून पाहिलें. विठोबा—मला सोडून दूर जातांच—त्यानें दिलेल्या रुमालाकडे मीं पाहिलें—विठोबा मला रुमालांत दिसत होता !

दिवसामागून—दिवस गेले—नित्याच्या व्यवहारांत मन रमूं लागलें—पण दूर असलेल्या विठोबाची कधीं काळीं आठवण झाली तर मी त्या क्षणाला त्या रुमालाकडे पाहून मनाचें समाधान करीत असें !

———

ह्याला कारण ? : : ५

माझीं मतें कुणाला पटतील अगर पटावयाचींहि नाहींत, परंतु मी मात्र अगदीं निर्भींडपणें सांगणारा माणूस आहे, कीं जन्माला आल्यावर माणसानें–अशी एकहि गोष्ट सोडूं नये, कीं जिचा त्यानें उपभोग घेतला नाहीं ! आतां कां असें मला वाटतें ही गोष्ट अगदीं निराळी–पण वाटते तें हें असें ! माझ्या नांवानें कुणीं–ठणा–णा केला तरी सांगेन–एक वेळ जरूर अगदीं हायक्लास घ्या–वाटले तर ताजमहाल हॉटेलांत (मुंबईंत रहात असलां तर) जाऊन गम्मत करा–दररोज वापरतां येतील तितके सेन्ट्स वापरा–दिवसां-तून हवे तितके सूटस् वापरा–आणि जमल्यास–शक्य असल्यास हातांत–हात घालून एकाद्या ओळखीच्या सुंदर तरुणीबरोबर चौपा-टीवर भेळ खात बसा.–जें–जें–शक्य असेल–जें–जें उपभोगतां येणें जरूरीचें असेल–तें–तें जरूर–लाज–लज्जा सोडून उपभोगा––!– पण एक गोष्ट मात्र संभाळा–कीं तुमच्या ह्या असल्या वर्तणुकीमुळें कुणालाहि नाराज करूं नका–कुणाला दुखवूं नका–माणुसकीच्या मर्यादा ओलांडू नका ! आणि एवढें करून काय साधणार–असें जर तुम्हांला वाटत असेल–तर माणसें जोडण्याचें पुण्य–थकलेल्या जिवाला आसरा मिळावा–हुरहुरलेल्या मनाला विरंगुळा पडावा–उदास वाटणाऱ्या जिवाला–सृष्टीच्या मनोहर बगिच्यांत–लोळायला मिळावें–जीविताचा कंटाळा आल्यावर जगायाचें कुणासाठीं हा प्रश्न उभा राहतांच–ज्या मूर्तीकडे पहात–जीवित सुखकर होईल असा आत्मविश्वास निर्माण करितां येईल–मला वाटतें माणसानें वाटेल तें करावें ! मला तरीं असें वागणें–जरूरीचें वाटतें–मी एकटा जगाच्या संसारांत–मी पोरका–मला माणसें जोडण्यासाठीं–!

× × ×

मुंबईला येऊन अवघे दोन महिने झाले होते–एका लहानशा

चाळींत थोडी फार मोटीच खोली घेऊन मी राहिलों—! खानावळीचें जेवण—११ ते ५ नोकरी—पगार १०० रुपये—एकटा मी ! जीवित अगदीं कंटाळवाणें झालें होतें—घरीं आल्यावर कुणी बोलायला नाहीं—बाहेर निघाल्यावर कुणी बरोबर यावयाला नाहीं—ओळखीचीं माणसें काय तीं—हॉटेलवाला—खानावळीचा मालक—फर्ममधील समव्यवसायी—एक मोतीयाचा गजरा विकणारा तरुण पोरगा !

किती—दिवस—मी हा कौंडमारा सहन करणार ? किती दिवस मी वेळ जाण्यासाठीं—सिनेमा नाटकें—सफरी करणार ? आणि एकट्या जीवाला खर्च करून—करून किती पैसे उडविणार— ! मला तहान लागली होती—ती माणुसकीच्या सहवासाची—प्रेमळ माणसाच्या रम्य गुजगोष्टींची ! मला पाहतांच—कुणीं विचारावें—" आज लवकर आलां बाहेरून ? तब्येत ठीक दिसत नाहीं ?—आज स्वारी घाईत दिसते—चला कीं चहा घ्यायला !—असें कोण मला विचारणार ? मागच्या जन्मीं माणसें—जोडलीं—नाहींत—म्हणून कां हा वनवास माझ्या कपाळीं आला ? मी माणसामागें—आणि माणसें—पैशामागें ! " उलगडतां येईल कां कुणाला हें कोडें ?

× × ×

साडेपांच वाजतां नेहमींच्या संवयीप्रमाणें गजऱ्यांचा वास घेत घेत मीं खोलीकडे निघालों. खोलीवर आलों. दारें सताड उघडीं टाकलीं—नवीनच विकत घेतलेल्या सेन्टच्या दोन बाटल्या फोडल्या—एकदम दोन्ही बाटल्या सड्याप्रमाणें खोलींत शिंपडल्या—! खोलींत मधुर वास दरवळला. टेबलावरील स्टँड पुसला—आणि खिशांत हात घालून—पाकीट बाहेर काढलें—! आराम खुर्चीवर बसून मी नोटा मोजूं लागलों—१०० रुपये होते ते ! आणि पुन्हां वाटले—मी एकटा—! खोलीच्या दरवाज्यावर कुणीतरी थाप मारली—कुणी-

तरी माणूस आपल्याला भेटायला आला म्हणून उल्हसित मनानें उठून मीं दार उघडलें-! तीन खोल्या सोडून राहाणारा-एक माझ्यासारखा भाडेकरी होता तो !

—बसा कीं-असें उभे कां ? तुम्हीं बसा त्या खुर्चीवर मी बसतों ह्या टेबलावर-दररोज जर तुम्ही गप्पागोष्टी मारायला येत असाल तर उद्यांच्या उद्यां एक आणखीन खुर्ची आणतों—

—न यावयाला काय झालें ! येत जाईन कीं मी दररोज —

—खरं-अगदीं खरं-थांबा आपण चहा करूं-मी करितों-तुम्हीं बोला-माझ्याशीं-वा ! छान झालें बुवा-तुमची आमची ओळख झाली—

—वास कसला सुटला एव्हढा इथं ?

—सेन्ट शिंपडला.

—कपड्यावर शिंपडतात ना ?

—कपड्यावर शिंपडून शिंपडून कंटाळा आला. अलिकडे फिनाईलसारखाच मी सेन्टचा उपयोग करीत असतों.

—कुठले आपण राहणार ? नोकरी करण्यासाठीं म्हणून इथं आलां वाटतें ? आई-बापाला सोडून इतक्या दूर आलांत ? तुमच्या ओळखीचे मुंबईला कुणी नाहीं वाटतें ? अगदीं आल्यापासून एकटे पाहातों आहे तुम्हांला—

—कुणी नाहीं मला-मी अगदीं एकटा आहे !

—कुणी म्हणजे-कुणी नाहीं ?

—इतक्या दिवस नव्हतें कुणी. आतां अर्ध्यातासापूर्वी तुमची ओळख झाली-थोडाफार जिव्हाळाहि वाटूं लागला—!

हा गजरा कुणासाठीं आणला मग ?

तोहि माझ्यासाठींच ! बरं पण तुम्ही काय करितां ?

मी टाइपिस्ट आहे. ५० रुपये मिळतात मला—! मी—बायको—चार मुलें—मुंबईचा खर्च—एकंदरींत फार कठीण आहे माझी परिस्थिति ! नातेवाईक आहेत ते देशावर—मी तुमच्यासारखा इथं एकटा आहे—आणि म्हणून—मी—

—कां स्तब्ध कां ? बोला—अगदीं खुल्या दिल्यानें बोला—

—बोलायला जीभ धजावत नाहीं—! तुम्ही आल्यापासून पाहात असाल कीं मीं कुणाच्याहि आघ्यांत—मध्यांत नाहीं—कुणाकडे बैठक नाहीं—! तुमच्याकडे पाहून पुष्कळ वेळां वाटे—करावी दोस्ती.

दररोज वाटे आपणच येऊन ओळख करून घ्यावी—पण आज तो योगायोग होता—ती वेळ आज यावयाची होती ! आणि तीहि अशी—

—तुम्ही काय म्हणतां हें मला कळत नसलें तरी अंतःकरणाला भिडल्यासारखें वाटतें ! अजून माझे पाय ठेंचाळत नाहींत—परिस्थितीचे फटके बसले नाहींत—मला कांहींच ठाऊक नाहीं—मला ह्या गोष्टी अगदीं माणसाप्रमाणें परक्या वाटतात—खुल्या दिलानें बोला—

—गेले दोन महिने मी अडचणींत होतों—स्वाभिमानी स्वभावाचा म्हणून आजच सकाळीं दारांत मालकाचा भय्या दिसतांच दोन महिन्यांचे ४० रुपये दिले—डॉक्टरच्या बिलाचा दहा रुपयांचा शेवटचा हप्ता देऊन टाकला—! आज तुमच्या दाराशीं—मित्र म्हणून भीक मागायला आलों—फार नको आहेत मला—महिनाभर दोन वेळेला पुरेल इतकें धान्य—

—अगोदर हा तयार केलेला चहा तर घ्या—! कसा काय झाला आहे चहा—

—चांगला झाला आहे—!—

माझा चहा पिऊन झाला होता—टेबलावरच्या पांचच्या पांच नोटा मी त्यांच्या हातांत आणून दिल्या—

—अगदीं सावकाशीनें दिले तरी चालतील ! जेव्हां सवड होईल तेव्हां—द्या. कांहीं घाई नाहीं—

सत्तावीस वर्षांच्या आयुष्यांत—झालेला मला पहिला आनंद—! एक माणूस मीं जोडला—कायमचा जोडला—! कशानें मीं जोडला ? पैशानें ! पण पैशानें माणसें जोडतां येतात कां ?

× × ×

महिना झाला आतां. अगदीं हा ठराविक कार्यक्रम होऊन बसला ! ऑफिसांतून सुटलों कीं एक मोतियाचा गजरा विकत घ्यावयाचा—लहान मुलासाठीं खाऊ—आणि जिन्यावर बुटाचा आवाज होऊं लागला कीं—एका किटलींत चहा घेऊन—माझ्या मागोमाग तिनें यावयाचें ! टेबलावरचा गजरा तिनें घ्यावयाचा आणि कपांत गरम चहा ओतण्यास सुरवात करावयाची ! १५ वर्षांची अल्लड पोर—तिला पाहतांच मनाला आनंद वाटायचा. थकवा—'द्याना तो गजरा मला' असें म्हणतांच नाहींसा व्हावयाचा. माझा चहा पिऊन झाला कीं थोडा वेळ गप्पा मारून—तेथून ती परत—आपल्या खोलीवर जावयांची !

नित्य—नियमाच्या कार्यक्रमांत आज थोडा बदल झाला होता—कामामुळें घरीं यावयाला उशीर झाला होता—घरीं यावयाच्या ओढीमुळें गजराहि आणावयाला विसरलों. जिन्यावर पावलें वाजतांच—किटली हातांत घेऊन ती माझ्या मागोमाग आली—

—चहा, अगदीं—गार झाला ना ! लवकर तर यावयाचें नांव नको—पण उशीर मात्र दररोज करायचा—

—तुला काय कल्पना आम्हां पुरुषांची—बाहेर काम काय पडतें तें—अजून तूं अल्लड आहेस—लहान पोर आहेस—

—आणि तुम्ही अगदीं पिकलें पान वाटतें—! बरं पण गजरा-सुद्धां आणायचा विसरला ना ?

—Sorry हं—घराकडे पाउलें वळलीं आणि गजरा आण-ण्याचें त्या धांदलींत विसरलों—अं—! चहा झाला आहे माझा आतां, गजरा घेऊन येऊं कां ?

—मीं आपलें सहज थट्टेनं म्हटलं—कोण—तुम्हीं कुठले आम्ही —पण एकमेकांच्या गांठी पडल्या आणि ऋणानुबंध जडला ! अगदीं —कुणी—कुणी तुम्हाला नाहीं ?—

—तूं—तुझ्या वडिलासारखे पाठीराखे—अशीं मायेचीं माणसं माझ्याभोंवतीं असतांना—मला कुणी नाहीं असें मी कसें म्हणूं ?—वरं पण आज आम्ही तुम्हांला गजरा आणावयाला विसरलों असलों तरी—हें पाहिलें कां ?

—पाहूं ?—किती सुंदर आहे हा पीस—

—आवडला ना तुला ? तुझ्यासाठींच आणला आहे तो—

—किती दिवस माझ्या मनांतून असला कपडा वापरावयाचा होता—पण—

—मग मला का नाहीं सांगितलंस आणायला ? मीं नसता कां आणून दिला ?

—पण आईला—बाबांना वाईट वाटलें असतें—! आणि आमच्या-सारख्या गरिबानं हे येव्हढे भारी—भारी कपडे वापरणं—योग्य दिसत नाहीं ! तुमच्यासारख्या श्रीमंतानं—

—असें जर कांहीं भलतें सलतें बोलणार असशील तर उद्या-पासून माझी खोली वर्ज्य कर ! म्हणे तुम्ही श्रीमंत, आम्ही गरीब—!

—अर्धा तास झाला—जातें मी—

—तूं तर अगदीं टॅक्सी-ड्रायव्हरप्रमाणें मला वेळेची धमकी द्यायला लागलीस—आणि कुठें फार लांब जायचें आहे ? दोन खोल्या पलीकडे —! तुला जावयाचं असेल तर जा—

—हे तुम्हांला बाबांनीं पंचविसांपैकीं पांच दिले आहेत—सवडी-सवडीनें—

—तुमच्या पाठीमागें कुणीं भय्या लावला होता वाटतें ? हा विसरला कीं तुझा 'पीस' इथें ?

—नेईन मी उद्यां !

—आलें लक्षांत माझ्या ! आईला सांग—लवकर स्वयंपाक करायला—सगळे जण जाऊं—'सेंट्रलला'ला. फार सुंदर सिनेमा आला आहे—!

× × ×

असाच क्रम दोन महिने चालू होता. मला जाणवेल असा वागणुकींत फरक दिसून आला नाहीं—परंतु कांहीं अंशीं—अलिकडे वागणुकीचा वारकाईनें सुगावा काढतांच—असें आढळून आलें कीं, कर्तव्यासाठींच ती माझ्याकडे येत असे. जिव्हाळा नव्हता असें मला म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु होतां होईल तों जोडलेलें आपण-हून तोडावयाचें नाहीं अशी वृत्ति तिची—आणि घरांतील मंडळीची दिसून येत होती.

डिसेंबर महिन्याचे दिवस. यंदा दरवर्षांपेक्षां थंडी मुंबईला अधि-कच पडत होती. माझ्यासाठीं—वुलन रग, स्वेटर, कंफर्टर मीं नुक-तेच बाजारांतून आणून—कॉटवर स्वेटर अंगावर चढवीत बसलों होतों. बाहेर थंडी कडाक्याची पडली होती. माझ्या खोलींत—ती आली—! कांदेपोहे तिनें आणले होते. टेबलावर बशी ठेवावयास सांगितली मीं...

—मला तुला एक प्रश्न विचारावयाचा आहे.

—अगोदर—हे कांदेपोहे खा आणि मग काय विचारावयाचं असेल तें—

—ह्यापुढें तूं आणलेल्या कुठल्याच गोष्टीला मी हात लाव-णार नाहीं—

——कां—असें कां ?

ह्याचें उत्तर तुझी वागणूकं—! पूर्वीच्या मोकळेपणानें तुम्ही कुणी तरी माझ्याशीं वागतां कां ? माझा पाय वाजतांच चहाची किटली घेऊन येणारी तूं—अलिकडे मी खोलींत गेल्यावर किती वेळानें येऊं लागलीस—तुझ्याशीं चार गोष्टी मोकळेपणानें बोलायला बसावें असें मनांत आणतांच शेवटचा घोट चहाचा मी घेतांच—किटली घेऊन तूं निघून जावेंस—पूर्वीच्या हट्टीपणानें मीं आणलेला गजरा कधीं टेबलावरचा उचलून नेला आहेस कां ? मुलाकरितां खाऊं दिला—तर अजून घरांत आहे—कशाला पुन्हां आणतां—म्हणून उत्तर—! काय समजायचा मी अशा तुटकपणाचा अर्थ ?

——ह्याचा अर्थ तुमच्या डोळ्याला दिसायचा नाहीं—! मन मोकळं करून मला एक दिवस तुमच्याशीं बोलायचं आहे—! खूप—खूप बोलेन मी तुमच्याशीं——

——राहूं विसंबून मी तुझ्यावर ! हें पाहिलंस मी थंडीकरितां काय—काय आणलं आहे तें ! हा रग—हा अंगांत घातलेला स्वेटर—हा कंफर्टर—हे मोजे आणि खरंच आज इतकी थंडी बाहेर पडली असतांना— तूं—अगदीं साधा——

——मला नाहीं थंडी वाजत—एकावर एक मीं दोन ब्लाऊझ घातले आहेत——

——ते बघ तुझे ओठ कांपताहेत—खोटं बोलतेस. तूं—काय माणूस नाहीं वाटत—थंडी वाजायला—! थंडींत छातीला जपायला हवें—नाहींतर——

——न्युमोनिया होतो ! ठाऊक आहे मला सारे—न्युमोनिया झाला तरी थंडीला गरम कपडे आम्हांला मिळावयाचे नाहींत—! कुठून आणावयाचे आम्हीं—! थंडी पडली कीं गरम कपडे—उन्हाळा आला कीं तलम मलमल—पावसाळ्यांत रेन्‌कोट—कोण आणून देणार आम्हांला ?

—मला कां तूं परका समजतेस ? तूं जर कांहीं मागितलेंस तर मी आणून देणार नाहीं कां ?

—तुम्ही आमचे कां देणेदार आहांत ? आणि असें देऊन-देऊन कुठंवर पुरवणार ? तुम्हीं पुष्कळ दिले पण ते अंगावर घालायला—तुमची श्रीमंती तुमच्यापाशीं—आमची गरीबी आमच्यापाशीं—! माझ्या सत्तेचं फाटकं पातळ मला नेसायला अभिमान वाटेल—विटलेलीं पोलकीं मला मोलाचीं वाटतील—पण तुम्हीं दिलेली—

—किती—कठोर बोलते आहेस तूं—ह्याची कल्पना आहे तुला ? इतक्या निष्ठूरपणें वागायला मीं तुझा काय गुन्हा केला आहे ? जिवाभावाचीं माणसें जोडण्यासाठीं—एकल्या जिवाला सत्तेचा सहसहवास मिळावा म्हणून—मी तुमच्याशीं घरोब्यानें वागत असतां —तूं तुझीं सारीं माणसें मला दूर कां लोटताहेत ? मी प्रेमळपणानें—माणुसकीच्या मोलानें—तुमच्याशीं वागतों हा माझा अपराध आहे ?

—तुम्ही प्रेमळ आहांत—हा तुमचा आपराध आहे—तुम्हांला माणसें हवीत—जगाला तीं नको आहेत—! तुमच्या प्रेमांत—जगाला पाप दिसतें—

—मला जगाची काय पर्वा—माझ्या वागणुकीकडे करड्या नजरेनें पहाण्याचा लोकांना काय अधिकार ? मी हें सारें—माझ्यासाठीं करतों आहे—

—तुम्हाला त्याची कल्पना यावयाची नाहीं—! तुम्ही एकटेच आहांत—बाबा संसारी आहेत—गरीब आहेत— आणि अजून माझें—पुरे हा विषय इथं जातें मी—

—पुन्हां केव्हां येणार ? आणि थंडीकारितां तुला एक स्वेटर —मी आणीन उद्या—मला भरपूर कपडे आहेत—आज फार थंडी आहे—तुला थंडी वाजेल—हा स्वेटर—

—माझ्या आयुष्याची होळी करण्याचा का तुमचा विचार

आहे ! मी थंडीनें गारठून मेलें तरी चालेल पण—तुमचे उपकार मला नको—

रागानें फणफणत—तिनें स्वेटर माझ्या अंगावर फेंकला अन् ती निघून गेली !

× × ×

आठ दिवसानंतर डोक्यांत लख्ख प्रकाश पडला आणि मनाची खात्री झाली कीं—मी जर तिच्या जागीं असतों तर असाच स्वेटर फेंकून देऊन चालता झालों असतों. माझ्या सहानुभूतीचा लोक अर्थ भलताच समजूं लागले—तिच्या अभिलाषेमुळें—तिच्या तारुण्याच्या सौंदर्याच्या मोहामुळें मी—त्यांना जवळ केलें. तिच्या शीलाचा अब्रूचा—आणि त्यांतून एका उपवर तरुणीचा अशा रीतीनें लौकिक होणें—केव्हांहि योग्य नव्हतें—! ती चिडली—संतापली—ती ह्या कारणामुळें !

रविवारचा दिवस होता—गांवांतून सकाळीं हिंडून आलों होतों—टेबलावर माझें पाकीट पडलें होतें. तें तिच्या वडिलांचें होतें. पत्र वाचून मनाला धक्का बसला—आणि वाटलें—कीं जग स्वार्थी आहे—स्वतःच्या अब्रूसाठीं—स्वार्थासाठीं कुणीहि दुसऱ्याच्या आयुष्याची राखरांगोळी करावयाला मागेंपुढें पाहणार नाहीं—! जगाला ओरडून सांगावेसें वाटतें, " कीं स्वार्थी व्हा—सैतान बना—कुणावरहि उपकार करूं नका—कुणासाठीं कुणी नाहीं—जो तो आपल्यासाठीं——!"

साडेतीन वाजले—अंगावरचा रग दूर सारून खिडकीजवळ डोळे चोळीत मी उभा राहिलों होतों. कानावर किटलीचा आवाज पडतांच—मागें वळून पाहिलें आणि रागानें म्हणालों—

—get out. बाहेर हो खोलीच्या आधीं—फोडून टाकीन मी तुझी किटली—फेंकून देईन मी तुझा चहा—जरूर नाहीं मला कुणाची—

—कुणाची म्हणजे कुणाची नाहीं ?—माझी सुद्धां ?

—तूं कोण ? हें पहा आपल्या तीर्थरूपाचे पत्र. काय म्हणतो आहे तुझा बाप ठाऊक आहे कां ?— माझ्या मुलीचे लग्न व्हावयाचें आहे तेव्हां तुम्ही इथें राहणें अगदीं गैर आहे—! तुझें लग्न व्हावयाचें आहे आणि आम्ही काय संन्यास घेणार आहोंत— आम्हांला काय जीव द्यावयाचा आहे—आणि तुम्हांला काय अमर व्हावयाचें आहे ?

—माझी शपथ आहे तुम्हाला चहा न द्याल तर—!

—तुझा काय अधिकार मला शपथ घालण्याचा—तुझ्यासाठीं —मी विटंबना—मानहानी सोसूं ? लोकांचे भलते सलते आरोप ऐकूं —?

माणसें जोडायचीं आहेत ना तुम्हांला ? अशीं सहजासहजीं माणसें जोडलीं जात नाहींत—! तुम्हाला काय वाटतें—गजरे आणून दिले—स्वेटर—ब्लाऊझ पीस—मुलांना खाऊ—उसनवार पैसे दिले म्हणजे माणसें जोडलीं जातात हो ! माझा कधीं येथें चहा आणण्याचा चुकला आहे कां—येवढी ओरड कुणीं केली तरी—बसा इथें मुकाट्यानें—आणि प्या पाहूं चहा—!

—बरं घेतों पण—

—मीहि आणला आहे माझ्यासाठीं आज—आपण दोघे मिळून आज चहा पिऊं—तुम्ही ही चाळ सोडून जाणार आहां ना ?

—तुला कोणीं सांगितलं ?

—रागाच्या सपाट्यांत—भय्याला नव्हता कां सांगत कीं मी महिना अखेर जाणार आहे म्हणून—! तुमच्यासाठीं मीं लोकनिंदा सोसली—तुम्हांला मात्र ती सहन करण्याचें सामर्थ्य नाहीं ! बाबांनीं लिहिलें तेंच—मी तुम्हांला सांगणार आहे—

—तुझा सुद्धां मला हांकलून देण्याचा विचार दिसतोय ?—

—कुठें जाणार तुम्ही ?

—कुठेंहि—जगाच्या पाठीवर कुणाकडेहि ?

—मुंबई सोडून कुठें जाणार ? हवे तर चाळ सोडून दुसरीकडे जा—पण माझ्याकरितां—तुम्हाला माणसें जोडायचीं आहेत ना ? कांहीं विचार करतां आला तर पहा—तुमच्यासाठीं मीं मानहानी सोसली—लोकांच्या टीकेचा विषय होऊन बसलें—एकाच आशेवर ! कीं कुणीतरी माझ्याशीं गोड बोलणारं माणूस राखावं—जोडावें म्हणून—तुमच्या मनासारखें मला वागतां आलं नाहीं—तुमच्या प्रेमाचा अहेर मी लाथाडला—कारण मी एक अविवाहित तरुणी आहे—माझ्या गरिबीवर पांघरुण घालण्याचा तुम्ही प्रयत्न केला—मी, माझ्या वडिलानीं तें दूर सारलें कारण—समजा, तुम्हांला काय ह्यांत समजावयाचें असेल तें. बाबांनीं हे वीस रुपये दिले आहेत—परत—फेड करण्यास उशीर झाला—त्यांना फार वाईट वाटते—हे पैसे—

जड पावलानें ती खोलीबाहेर गेली. तिच्या बरोबर माझा रागहि मावळला—आणि एक वेळ वाटूं लागलें कीं—मी जर मुंबई सोडून गेलों तर—दारांत बुटाचा आवाज होतांच माझ्या मागोमाग येऊन कोण हातांतला गजरा हक्कानें हिसकून घेणार ?

आयुष्याची किंमत ८ आणे ! ! ! : : ६

" लागला निकाल परीक्षेचा ! काय, झालांत कां पास यंदा तरी ?—— "

" यंदाही नापास झालों ! "

" तुम्हांला काय बोलून उपयोग ! आमचं नशीब धड नाहीं त्याला तुम्ही काय करणार ! बरं झालं असतं यंदाचं वर्ष पदरांत पडलं असतं तर ! "

" म्हणजे पुढल्या वर्षीं ज्युनियरला गेलों असतों. "

" आतां पुढं काय करावयाचं ठरवलं आहे ?—कां अजून घालावयाच्या आहेत खेपा कॉलेजांत ? "

" मला तरी कांहीं एक सुचत नाहीं—काय करूं तें तुम्हींच सांगा. "

" अभ्यास नको करायला—उनाडकी करायला सांगा, आतां बोलणं आलं. सबंध गेल्या वर्षांत काळजीपूर्वक एक तास तरी पुस्तक वाचलं कां ? कसा होणार पास—सिनेमा पाहा—नाटकं पाहा—चर्चामंडळांत जाऊन गप्पा छाट्—ट्रिपस् काढ—सारा वर्षभर हा उद्योग—! परीक्षकानं तुमच्या पेपराकडे पाहून जीव द्यायचा कां भोकाड पसरायचं—! "

" खरं सांगायचं म्हणजे बाबा, मला ह्या आयुष्याचा कंटाळा आलेला आहे. नको वाटतं कांहीं हें ! "

" म्हातारा झालास—संसार लागला पाठीमागं—चार मुलं झालीं—न कंटाळून कसं चालेल ! मला तर अगदीं उल्हास दिवसेंदिवस येत चालला आहे ! अरे, नुसता धड अभ्यास होईना तुमच्या हातून ? परीक्षा पास व्हायच्चे. कां तुमच्या पाठीमागं इतर पोरासारखी पैशाची काळजी आहे—? सर्व कांहीं सुरळीत असतां—"

"असाच नियम आहे ! वारानें जेवणारीं पोरें विलायतेस जातात. आणि सांजसकाळ आयतें पुढें ताट वाढून घेणारीं मुलें मंडपाच्या वाऱ्या करीत बसतात !"

"कंटाळलों बुवा तुमच्या ह्या शिक्षणापायीं ! तुम्ही पिळवणार काय, दिसताहेच ! धाकटे तर अजून मॅट्रिकचा उंबरठा ओलांडित नाहींत, आणि लोक म्हणतात करून टाका दोघांचीं लग्नं ! माझा हा वाढता संसार; मुलींचीं लग्नं व्हायचीं आणि त्यांत तुमच्या लग्नाची भर–! झोप तरी घेतों आहें सुखानं आतां ती सुद्धां पुढं येईल कीं नाहीं, शंका आहे ! जा, तुम्ही व तुमचं नशीब ! कॉलेजांत जायचं असेल, आहे सावकार इथं बसलेला ! नसेल, तर तसं सांगा; नोकरी लावून देतों कुठं तरी–"

बाबा उठून फिरायला गेले–मी अभ्यासाच्या खोलींत जाऊन स्वस्थ बसलों. लहान मुलासारखा ढसढसा रडलों ! परीक्षा ? आयुष्याचा वळी द्यायला बसली आहे माझ्या–! उल्हास-आशा-महत्त्वाकांक्षा माझ्या पार जाळून टाकल्या ह्या बयेनें ! वर्षभर रक्त आटवावयाचें, स्वतःचे पैसे ओतायचे तिच्या डोंबल्यावर आणि शेवट काय. तर नापास ! आज माझा निकाल लागला–आयुष्याचे मनोरे ढासळून पडले, कल्पना नसेल कुणालां–मला काय वाटतें आहे त्याची ! बाबांना काय दोष द्यावयाचा ! किती दिवस पोसावयाचें त्यांनीं आम्हांला–धाकट्या बहिणी लग्नाला येऊन त्यांच्या गळ्याला फांस लागलेला आहेच–धांकटे बंधु तर काय बादशहासारखे बेगुमानपणें गांव पालथा घालून बापाच्या जिवावर चैन करताहेत. येऊन जाऊन जाणीव काय होत असेल ती मलाच. माझें लग्न व्हावयाचें आहे–आईचा आग्रह तर केव्हांपासून चालू आहे! एकवार वाटें, टाकूं या एकदांचें उरकून; मागून पाहतां येईल परीक्षेचें–आंतलें मन सांगे, 'वेड्या, चार दिडक्या मिळवायला शिक आणि मग हें धाडस कर'–

एकपरीनें काय चुकीचें आहे ! जेथें पैसा धूमकेतूसारखा दुर्मिळ झालेला आहे, जीविताच्या चिरस्थायित्वाबद्दल शाश्वती देतां येत नाहीं-तेथें लग्न करणें हें एक प्रकारचें धाडस नाहीं तर काय ? आतां मी जगतों आहें तें आयुष्य कां ? वडिलांनीं पैसे द्यायचें, आपण शिकावयाचें-दर वर्षीं अकलेची आमावास्या त्यांना दर्शा वावयाची ! कुठवर हें चालणार ? केव्हां या परीक्षेच्या तडाख्यांतून सुटून दोन पैसे मिळवून बाबांना ऋणमुक्त करणार ? यातना मनाला खरोखर सहन होत नाहीं माझ्या ! मेल्यासारखं होतें कधीं कधीं बाबा बोलूं लागले म्हणजे ! २५ वर्षं झालीं वयाला, अजून बापाला खड्ड्यांत घालावयाचें-! यापुढें मी केव्हां आयुष्यांत पराक्रम गाजव-णार, मनगटाच्या जोरावर जगांत चमकणार आणि आईवडिलांना सुखासमाधानाचे दिवस दाखवणार ? कसलें आलें आहे-हें असेंच चालावयाचें-जगाची जेथें सर्वकडून परिस्थिति बिघडली, तेथें आमच्या आयुष्याची काय किंमत ! व्यवहारी जगाची अजून कल्पना नाहीं मला-कोण त्रास पडतात पैसे मिळवायला ते ! उगाच नाहीं बाबा तळतळत नापास झालों म्हणजे ? असलें हें फुटकें नशीब ! वडील जिवंत आहेत तोंपर्यंत दोन वेळ निर्धास्तपणें ताट तरी पुढें आहे-ते गेल्यावर उघडच आहे-पुढें मी, मागें आई-धाकटे भाऊ आणि धाकट्या बहिणी गावांतून हिंडून मागावयाची भीक आणि भरावयाचें पोट ! असलींच भविष्यकाळचीं स्वप्नें पडावयाचीं ! कोठें आहेत मार्ग दाखवावयाला माणसें ? आशा करावयाला कोठें आहे जागा-कोठें राहिला तेवढा धीर आणि तेवढें आयुष्य ! ठार केलें मला ह्या इंटरनें ! उमेद गेली, कंबर कचली, घरांत ही असली परिस्थिति; मिळवणार बाबा, खाणार आम्ही काळ-आणि हुंड्यापायीं बाबांना सावकाराच्या त्रासांत गुंतविणाऱ्या बहिणी ? नको वाटतें जगणें तें...

" दादा ! "

" कसला करतो आहेस एवढा रे विचार आणि रडतो आहेस काय लहान मुलासारखा ढसढसा—दादा काय झालं तुला ? "

" मेला तुझा दादा ! जा चालती हो इथून ! "

" तुझी आई सारखी वाट पाहते आहे. "

" कोण आई ? कां वाट पाहते आहे ? "

" जेवणासाठीं. अजून ती जेवली नाहीं ! चल ना रे—

" जा. आईला म्हणावं आलों म्हणून !"

भावपूर्ण मनानें मीं आईला नमस्कार केला. आई आहे माझी ती ! उपाशी राहिली माझ्याकरितां ! आहे एवढें आहे कां ग माझें भाग्य ? जसा मला आयुष्याचा कंटाळा आला, तसा तुला माझा नाहीं कां आला ?"

डोळ्यांचें पाणी पुसलें आणि आईकरितां म्हणून जेवावयाला गेलों !

× × ×

१५ दिवस झाले निकाल लागून. अजून चित्त कांहीं स्थिर होईना. भलभलते विचार मनांत येऊन मनाला सतावून सोडीत. निराशा डोळ्यांपुढें थैमान घालूं लागली. आशा ही माझी वैरीण बनली. यश हें एखाद्या नायकिणीप्रमाणें नुसतें झुकावूं लागलें. पण त्याच्या पाठीमागें लागून अखेर नाश होईल हीच कल्पना हजार वेळां मनांत येई. माझा—माझ्या अस्तित्वाबद्दलचा विश्वास उडाला ! दोन वेळेला घरांत जेवण्यापुरतें बसावयाचें; बाकीचा वेळ विचार—विचार नुसता करावयाचा ! आयुष्याकडे पाहण्याचीसुद्धां मला भीति वाटूं लागली. जगलों तर आपल्याला हाल सोसावे लागतील, काळजीखालीं मरावें लागेल. सुखाच्या नुसत्या आशेवरच सारा जन्म रखडावें लागेल ! मग जगावयाचें तरी कशाला ? मरतां येत नाहीं म्हणून ! छट्, तसें नाहींच मुळीं आणि जगलों कां जगांत ह्या

असल्या कठीण दिवसांत !–तर मागच्या जन्मीचें पातक भोगावयाचें म्हणून ! मग आयुष्याला कांहीं किंमतच नाहीं कां ? देवानें–नको त्या अधमाचें नांव उच्चारायला ! राक्षस आहे तो–तोंड लपवून बसतो–छाती आहे कोठें तें दाखवायला ! दिसावयाचा अवकाश–कीं हजारों अपंग गांजलेले त्याची पाठ पुरवतील. त्याला नकोनकोसें करतील–आणि कान पिरगळून विचारतील, ' कां जन्माला घातले आम्हांला–आमची सोय लाव !' मला सुद्धां भेट घ्यावयाची आहे त्याची आणि सांगायचें आहे–तूं दिलेल्या आयुष्याची किंमत किती, आठ आण्यांची ! एक तोळा अफू घेतली कीं खेळ खलास–पुन्हां जन्म नाहीं–मरण नाहीं–हाल नाहींत ! आणि सुख तरी आहे कां ? तो पुढचा प्रश्न आहे ! येथून तर होऊं द्या सुटका–

साधारण दिवे लावणीचीच वेळ होती–आई देवाहून परत आली –ती आल्यावर मीं तिला विचारलें,

" आई, कुठं गेली होतीस इतका वेळ–देवाला का ? कशाला जातेस त्या दळभद्र्याकडे–काय देणार आहे तो तुला ?"

" वेडा आहेस तूं ! असं कांहीं भलतं सलतं बोलूं नकोस–मोठा झालास म्हणून काय झालं ? मारीन तुला—"

" ठार मारशील का मला–! आई, येऊं दे तुझ्या हातानं मला मरण—"

" अलीकडे असलं काय रे वेडंवाकडं बोलतोस ? तुझ्या मनांत तरी काय आहे ? माझ्या गळ्याची शपथ आहे—"

" आई, डोकं फिरण्याची वेळ आली आहे माझी ! हें आयुष्य आहे का–सरणावर ठेवलं नाहीं म्हणून जिवंत म्हणायचं–आलं डोळ्यांत पाणी–बरं, नाहीं असं पुन्हा बोलायचा,–झालं अगदीं तुझ्या गळ्याशपथ ! जा, मला छानपैकीं झुणका कर–"

आईचें समाधान करण्यासाठीं कांहीं तरी बोललों. माझें मन कांहीं तरी निराळेच बेत ठरवीत होतें. विश्वासघात ह्यांचा मी तर करीत नाहीं ना ? फसवणूक तर नाहीं ना होणार ही ? विचार कसला करावयाचा—आतां एकच अविचार ! सारी रात्र मीं विचारांत घालविली. मनानें ठाम निश्चय ठरविला कीं, जग हें आपल्यासाठीं नाहीं. आपण जगासाठीं नाहीं—

× × ×

दुसऱ्या दिवशींची गोष्ट ! रात्रीचे ९॥ वाजले होते. अखेरचें पत्र लिहून ठेवलें होतें. कपांत तेल भरलेलें होतें. अफूचा गोळा डोळ्यांसमोर दिसत होता. राक्षस तर बनलों नाहीं ना मी—— ! मी माझ्या हातानें काय करणार ? आत्महत्त्या ! आईला काय वाटेल ? बाबांना काय वाटेल ? माझ्या निर्जीव देहाभोंवतीं माझीं चिमुरडीं भावंडें ' दादा—दादा ' म्हणून आक्रोश करून टाहो फोडतील ! किती जीवांना मी दुःख देणार ? स्वतःच्या आयुष्याचा कंटाळा आला म्हणून प्रेमळ अंतःकरणाचा असा छळवाद मांडणार ? आई, आयुष्यांत येऊन तुला काय सुख दिलें, तर पुत्रवियोगाचें ! बाबा तुम्हाला काय दाखविलें, तर हें असलें दृश्य !

विचारच माझा घात करणार असें दिसतें. माझ्या आयुष्याचा नाश करणारें हलाल तयार केलें—ओठाला प्याला लावणार तोंच——

' दादा '—म्हणून माझ्या दारावर कोणी थाप मारल्याचा भास झाला. दार उघडून पाहिलें, तर माझा धाकटा भाऊ होता. त्यानें हा सारा प्रकार केव्हांच ताडला. उसनें आवसन आणून त्याला मीं विचारलें,

" काय हवं आहे तुला—— "

" दादा—मला—मला तूं हवा आहेस—— "

माझ्या गळ्याला त्यानें मिठी मारली.

" वेड्या, काय करणार होतास तूं—? "

माझ्याच्यानें बोलवेना. मला अधिकच रडूं कोसळलें.

" लहान आहे तुझ्याहून मी ! मरण हें केव्हां ना केव्हां तरी यायचंच आहे मग इतकी घाई कां ? केवढी चूक करणार होतास तूं— "

त्याच्याशीं बोलावयाला वाचा उरली नव्हती—त्याच्याकडे पाहावयाला डोळे कुठें धजावत होते—वेड्यासारखें त्याच्या पायावर मीं लोळणें घेतलें.

लग्नाची बेडी : : ७

जगावयाचें का म्हणून कोणीं विचारलें, तर उत्तर देईन कीं, आत्महत्त्या करणें हा गुन्हा आहे म्हणून. इतका मला ह्या आयुष्याचा कंटाळा आलेला आहे. तें संपाविण्याचा प्रयत्न करीत आहें, पण तें केव्हां संपणार ह्याचा अंदाज लागत नाहीं. यातना, हाल-अपमान भोगण्यासाठीं कां जन्म घ्यावयाचा ? गेलीं आठ वर्षें आशा धरून कसाबसा जगूं शकलों; पण आतां तीही सुटलेली आहे. माझ्या विरुद्ध सारें जग बंडखोरी करूं पाहत आहे.

अशाच आयुष्यांतील एक सकाळचा दिवस. तोंड धुवून फाटक्या सतरंजीवर अस्थिर चित्तानें बसलों होतों. घरांतील प्रत्येक वस्तूकडे पाहण्याचें धैर्य, ती सावकाराची मालमत्ता आहे म्हणून होत नसे. कांहीं तरी बोलायचें म्हणून घरांत चहा मागितला.

"चहा ! गेल्या आठ दिवसांत आणून दिली आहे कां एखादी शिवराई—"

—उत्तर निराळ्या रीतीनें देतां आलें असतें. माझ्या अंगांत सामर्थ्य असतें, तर असले शब्द कानीं पडले नसते ! जाऊं द्या, हेही दिवस जातील—

डोक्यावर टोपी टेवून घराबाहेर पडण्याचा विचार करूं लागलों.

"कुठं निघालांत ? घरीं केव्हां येणार ?"

"बाहेरचीं कामें आटोपल्यावर !"

"कसलीं कामं ? रिकामटेकडे हिंडण्याचीं ? माझ्या आयुष्याचा नव्हे, साऱ्या संसाराचा शिमगा केलात, आणि आतां परिस्थितीकडे बोट दाखवून उरल्यासुरल्या आशेवर अग्नि ठेवतां ? तुमच्या संसारांत मला काडीभर तरी सुख आहे कां ? तुमच्याकरतां यातना सोसायच्या, कां ? तर तुम्ही माझे नवरे आहांत म्हणून. स्पष्ट

बोलतें, तुमच्यामध्यें असा कोणचा गुण आहे, कीं मी तुमच्याकरतां उपासमार सोसावी--लोकांचीं बोलणीं सहन करावीं, आणि ह्या घरांत नांदावं? इतक्या दिवस पोटांत पेटलेला ज्वालामुखी उसळूं न देण्याकरतां धडपडलें; पण आज राहावेना, म्हणून त्याचा स्फोट केला."

" तुला मला सोडून जायचं तर खुशाल जा; माझ्यावर तुझी सत्ता नाहीं. तूं श्रीमंताची मुलगी आहेस."

" श्रीमंताची मुलगी असेन, परंतु तुमच्यासारख्या धनाढ्य पुरुषाची पत्नी होतें आणि अजूनही आहें! सत्ता नाहीं कशी म्हणतां--? घर सोडून जाऊं? कुठं जाऊं? आणि तुम्ही जिवंत असतां?"

" मग मेल्यावर जा--!"

" कींव येते मला तुमच्या बोलण्याची! इतक्या दिवस मला तुमची दया येत होती; पण ज्या दिवसापासून तुम्ही व्यसनी बनलांत--घाणेरड्या छंदाफंदांत पडून पोटाकडे दुर्लक्ष करूं लागलांत, तेव्हांपासून माझ्या अंगानं पेट घेतला! उघडणार केव्हां तुमचे डोळे--? माझ्याशीं लपंडाव करून काय साधणार आहांत आपण? वडिलार्जित पैसा उधळला--कंगाल बनलांत आणि अजूनही त्याच मार्गानं जातां?"

" खोटं आहे सारं--! मी दारू पितों--बायकांच्या नादीं आहे--कर्जबाजारी आहें--सांगितलं कुणीं तुला हें?"

" सांगायला कशाला हवं--डोळे कांहीं माझे मिटलेले नाहींत; इतके दिवस फसले ती वेडी म्हणून--"

" शिकावू बुद्धि दिसते आहे. मलाही निष्ठुर होतां येतं; वाटलं तर माझ्या संसारांत राहा, नाहीं तर खुशाल माहेरचा रस्ता धर--"

× × ×

डोकें फुटण्याची वेळ आलेली होती. कधीं न येणाऱ्या प्रसंगानें मनाला जास्तच वाईट वाटलें ! तिनें तरी किती दिवस माझ्या-करितां असले हाल सोसावयाचे ? माझ्या दुर्दैवाचे परिणाम तिनें कां म्हणून भोगावेत—मीं चैन केली—पैसे उधळले—निष्कांचन झालों—तसा वागलों; मला हें सहन करावयाला पाहिजे; आणि तें मी कर-तोंही आहे. तिच्याकडे काय दोष आहे ? नवऱ्यानें बेजबाबदारपणानें वागावयाचें आणि त्यांच्याकरितां बायका पोरांनीं त्याला चांगले दिवस येईपर्यंत रडत बसावयाचें, कुठला न्याय ? पण जगांत न्याया-कडेच दृष्टि ठेवून का व्यवहार चालले आहेत ? तसें जर म्हणाव-याला गेलें तर माझ्या सुखाच्या दिवसांत त्यांनीं ऐषआराम नाहीं का भोगला ? मग दुःखाचाही वांटा नको कां पदरीं घ्यायला ? खरें आहे माझें म्हणणें. एवढ्यावरच कां संसारांत भागतें आहे ? एकमेकांच्या गांठी तोडूनही तोडतां येणार नाहींत इतक्या त्या वळकट बांधल्या गेलेल्या आहेत. परिस्थितीलाच काय, पण मृत्यु-लाही त्या तोडतां येणार नाहीं ! परमेश्वरानें दोन जीवांना लग्नाची बेडी घालून बंदिवान केलें काय आणि उभयतांच्या सुखःदुखांचे परिणाम एकमेकांना भोगावयाला लावलेत काय ! नवरा—बायकोचें नातें तें काय ? मनांत आणलें तर क्षणांत वेगळें होतां येईल—नव्हे लाथा-डून दूरही जातां येईल ? मग तसें करण्याचें मनोधैर्य कां बरें अंगांत असूं नये ? बायको कोठली तर म्हणे जिच्या नांवा—गांवाचा लग्न-करीपर्यंत पत्ता नव्हता असल्या कुळांतील. नवरा कुठला तर असाच ! पण अक्षता पडल्यावर—झालें, कायमचे बांधले गेलों ! विचार करा-वयाला गेलें तर वराच करितां येईल; पण डोळ्यांपुढची परिस्थिति विचारांची मात्रा कशी चालून देईल ? मी व्यसनापायीं पैसा घाल-विला—बायकांच्या नादीं लागून आयुष्याचें नुकसान केलें आणि अजून खिशांत पैसा नसतांनाहि त्याच मार्गानें जातों आहे. काय म्हणावें मला ? डोळे तरी कधीं उघडणार ! संसारांत तरी केव्हां लक्ष लागणार

आणि जन्माच्या सोबतिणीच्या ऋणांतून मुक्त कसा होणार ! कां ह्या गरीब गाईची अखेरपर्यंत कुचंबणा होणार ! ज्या नादानें नागविलें—ज्यानें मला जगांतून—लोकांतून उठवून लावलें—त्याच नादाकडे माझा ओढा आणि त्यावर प्रेम—! कळूनही अजून सुधारणा होत नाहीं—परमेश्वरा, कुठलें रे हें पाप माझ्या वाटेंत पडलें आहे तें तरी सांग ! मागच्या जन्मीं कोणत्या अपराधाचा मालक झालों होतों तें माझ्या कानांवर तरी पडूं दे; केव्हां ह्या नरकांतून माझी सोडवणूक करणार आहेस ? जन्माच्या संवयी मृत्यूनें बोलावल्याशिवाय जात नाहींत असें म्हणतात. पण देवा, एक मला तरी मार, नाहीं तर माझ्या पायीं आयुष्याची होळी करणाऱ्या बायकोच्या हांकेला तरी ओ दे ! जगांत मला जगावयाला आतां अब्रू नाहीं, पत नाहीं, पैसा नाहीं आणि आपलीं म्हणणारीं माणसें माझा त्याग—तिरस्कार करूं लागलीं, तेव्हां राहूं तरी कशाला ? मरणें इतकें सोपें नाहीं आणि जगणें तर त्याहूनही कठीण होऊं लागलेलें आहे ! प्रयत्न करून दमलों, दैवाची परीक्षा पाहून थकलों; आतां स्वस्थ बसून काय होईल तें पाहणार आहें !

× × ×

सिगारेटचा धूर सोडीत तिच्या हालचालींकडे लक्ष देत होतों. ती बॅगमध्यें सामान भरीत होती. तिच्या ह्या तयारीवरून ती घर सोडून जाणार असल्याचें स्पष्ट दिसत होतें. निराश अंतःकरणानें तिला विचारलें,

" कांय चालवलं आहेस तूं हें ? "

" पसारा आवरतें आहें माझा ! तुम्हाला मी नकोशी झालेली आहें ना—? "

" मला ! मला नाहीं; परिस्थितीला, दारिद्र्याला; तुला संभाळण्याचं माझं सामर्थ्य नाहीं—आणि आतां तें येईल अशी आशाही वाटत नाहीं. "

म्हणून मी हें उमजून संसार आवरतें आहें. मी गेल्यावर खुशाल आपले रंगढंग चालूं द्या.”

“ तूं असतांना काय मीं ते कमी केले, तर तूं गेल्यावर त्यांना भरती येणार–मी फार भाग्यवान् समजतों, कीं तुझ्यापासून मला मूलबाळ झालं नाहीं. नाहीं तर फार कठीण गेलं असतं मला–कुठं निघाली आहेस तूं, तें तरी सांग. माहेरीं का ? ”

“ त्यानं काय माझा संभाळण्याचा पत्कर घेतलेला आहे ? आईबापांचं नातं काय लग्न होईपर्यंत.”

“ आणि आतां जर तूं त्यांच्या घरीं जाऊन राहिलीस, तर जसें कांहीं ते तुला पोसणारच नाहींत—”

“ हो, पोसतील कीं ! मेलेलं अन्न माझ्या ताटांत टाकतील, फाटलेलीं लुगडीं नेसायला देऊन अंग झांकतील–आणि मरत नाहीं म्हणून सारखी खंत काढतील—”

“ मग माहेरीं जाणार नाहींस तर–मला तरी काय करायचं विचारून—बाहेर जाऊन येतों मी. आतांशी सहा वाजले आहेत–रात्रीं बारापर्यंत येईन.”

“ ही शेवटचीच भेट आपली म्हणायची ! दहाच्या गाडीनं मी जाणार आहे–नमस्कार करतें आपल्याला. बागवून घेतलीत इतक्या दिवस, जन्माचे ऋणी केलंत–दुर्गुणांची–व्यसनांची परिसीमा झाली –म्हणून सोडून जातें आहे ! तुमचंही संसारांत मन रमत नाहीं—लक्ष उडून जाऊन तुम्हीही बेफिकीर बनलां आहांत––एकदां वाटलं तर दहा वाजतां या, नाहीं तर शेवटची भेट—”

पुन्हां ती सामान बांधूं लागली. तिच्या बोलण्याकडे लक्ष न देतां तसा बाहेर निघालों.

× × ×

खिशांत चार आणे होते—वणवण हिंडणाऱ्या मनाला विरंगुळा पडावा म्हणून ताडीच्या गुत्त्यांत शिरलों. तोंडाला ग्लास लावून

पहिला घोट घेणार तोंच इतक्यांत माझा शोध करीत कोणी तेथें आलेला दिसला. वाड्याच्या मालकाचा मुलगा होता तो.

" काय रे, तूंही प्यायला सुरुवात करणार कीं काय ! "

" माणूस आहेस कीं दगड आहेस—कांहीं घरची काळजी ! "

गुत्त्याच्या घड्याळांत दहांचे ठोके पडले—कांहीं तरी करावयाचें म्हणून ते मोजले.

" काय, झालं काय ? "

" काय व्हायचं आहे ! तुझी बायको गेली कीं ? "

" बरं झालं ! सांपडेल तिला दहाची गाडी ! सुटली एकदांची ह्या संसारपाशांतून ! काय रे, तिकिटाला पैसे उसने मागितले का तुझ्याजवळ—नाहींतर तेंही ऋण माझ्या डोक्यावर ! "

" चांगला २०-२५ रुपयांचा खड्डा घातला आहे तिनं तुला ! "

" काय म्हणतोस—? पण माझ्याजवळ आहेत कुठं पैसे ! मेली तरी जाळावयाला देखील सावकार बघावा लागेल—"

" तीच वेळ आलेली आहे. "

" म्हणजे—"

" कॉलऱ्यानं तिला ढाळ, वांत्या होऊन मृत्यु आला. "

अजून उणेपुरे चार तासही झाले नाहींत मी घरांतून बाहेर पडून—मध्यंतरींचा हा सारा खेळ ! खरंच का मेली ती ? "

" मग काय थट्टा करितों आहें वाटतं ? घरीं चल ना ! "

" कशाला—जाळा तुम्ही तिला—पैसे नाहींत माझ्याजवळ. सुटली एकदाची—मालक, एक नवटाक बेवडा—आणि ह्यांनाही एक ग्लास आणा हो—"

असें कां ? : : ८

" मला बॅरिस्टर व्हावयाचें आहे. "
" मी ना, मोठा डॉक्टर होणार. "
" बस्स ! एकच इच्छा आपली, कीं अगदीं विलायतला जाऊन यावयाचें. "
" कुठेंही मास्तरकी करावयाला मिळाली म्हणजे अगदीं खूष. "
" बडा लेखक होईन. "
" हजारों लोकांचा पुढारी होऊन लोकमान्य होईन ! "
" प्रोफेसर होईन पण गव्हर्मेंट कॉलेजचा. "
" व्यापार करीन, तर मुंबईला. "
" उत्तम गायक होऊन लौकिक मिळविन. "
" स्टेशनमास्तर होईन. "
" सावकारी करून शेतकरी माझा सखा बनवीन. "

अशा एक कां अनेक मनोरथांच्या वावड्या भविष्यकाळाच्या धूसर आकाशांत कळावयाला लागल्यापासून मनुष्य उडवीत असतो.

पण प्रश्न एकच डोळ्यांपुढें उभा राहतो, कीं ज्याला जें हवें असतें, तें मिळालें असतें काय ? फार थोड्यांच्या आशा सफळ झाल्या असतात. बोटावर मोजण्याइतके ध्येयाकडे धांवत असतात, आणि सांगावयाला शरम वाटते, कीं शेंकडा ७५ लोक केवळ पोटाकरितां जो हातीं येईल तो मार्ग चोखाळीत असतात !

पण हें असें कां ?

मनुष्य जर स्वतःच्या आयुष्याचा सर्वस्वीं नेता आहे, तर अनेक प्रसंगीं प्रयत्नांची कांस धरूनही ज्या मार्गानें त्याला प्रवास करण्याची इच्छा असते त्या मार्गानें कां जातां येऊं नये, कोणी देईल का या प्रश्नाचें उत्तर ?

बिनबक्षिसाचें कोडें कोणी सोडविण्याचे घेईल का प्रयास ?

कधीं कोणीं मेंदूला शीण तरी दिला आहे का विचार करून ! फार थोड्यांनीं ! परिस्थितीकडे बोट दाखवितात.

विद्वान् लोक प्रवचनांचें पालिस्तर तोंडावर मारतात, देवभोळे लोक 'हरीची इच्छा' म्हणून समाधान करून घेतात. प्रयत्नवादी प्रयत्नांत कसूर झाली म्हणून 'हं व्हा, पुढें' असा फुसका उत्साह-वर्धक हुंकार देतात, आणि तुम्ही विचाराल, तुम्ही काय म्हणूं शकाल ?

तुम्हाला देतां येईल का कांहीं समर्पक उत्तर यावर ?

मी कुठल्याही लेखकाचा उतारा तुमच्यापुढें आडवा ठेवणार नाहीं. मीं जें उत्तर देणार आहें तें अगदीं तुम्हाला पटेल असेंच आहे. इतकेंच तूर्त मी तुम्हाला आश्वासन देतों ! पण आतां एक तर गोष्ट तुम्ही कबूल कराल कीं नाहीं ? जें हवें तें मिळतें, ह्याच्याहीपेक्षां थोडें अधिक पुढें जाऊन मी म्हणूं शकेन—

'फार थोड्या लोकांना जें हवें तें मिळतें.'

आतां अगदीं अखेरचें पण त्याच्याहीपुढें जाऊन म्हणतों, कांहीं कांहीं लोकांना जें नको असतें अगर जें कधींही कल्पिलें नसतें, तें सहज मिळतें ! कोणी तरी तुमच्या आमच्या आयुष्याचा मार्ग आंखून ठेवलेला आहे आणि इच्छा नसतांनाही त्या मार्गानें नाक धरून जावें लागतें ! फार कशाला–खोटें बोलूं नका, तुम्हाला असें कधीं कधीं कां नेहमींच वाटतें ना—?

मी जर एखाद्या सुसंपन्न घराण्यांत जन्माला आलों असतों तर–माझें आयुष्य अधिक सुखकर झालें असतें—खरें ना, हें ?

कोणाच्याही हातांत, कुठल्या घराण्यांत जन्म घ्यावयाचा हें जसें नसतें, तसेंच नाईलाजानें कां होईना, प्राप्तमार्गाचा प्रवासी व्हावेंच लागतें !

× × ×

गांवाबाहेरच्या टेकडीवर संध्याकाळचे दररोज आम्हीं पांच सात-जण फिरावयास जात असूं. तरुण लोक तिकडे फार येत असत;

कारण तरुणींचा तांडाही पाय मोकळा करावयाला येत असे. कॉलेजांतील आम्ही मुलें, मोकळें वातावरण, डोळ्यांसमोर सुंदर सुंदर तरुणी, आणि त्यांतून सगळे 'उमेदवार' अशा ठिकाणीं विषय 'हिंदुस्थानचें राजकारण,' 'तरुण पिढी आणि धर्म,' 'गीतेंतील कर्मयोग' असे निघणार, का शेपटा कां वेणी, सकच्छ कौ विकच्छ हे निघणार ? आमचें टोळकें असेंच एक दिवस गप्पा मारीत बसलें होतें—समोरून चारपांच जणींचा गट येत होता, ती संधि साधून मी म्हणालों,

" कोण म्हणतो लेकाचा स्त्री ही पुरुषांच्या मार्गांतील धोंड आहे–?"

" निदान स्त्री-पुरुष असे समोरासमोर आले, कीं जिभेला असें अवसान चढतें !"

" ए shut up विनयभंग होईल आपली चर्चा ऐकून त्यांचा !"

" काय लेकाचा अरसिक आहे ! निदान 'विनयभंग झाला हें सांगण्याकरितां, निदान तंबी देण्याकरितां इकडे आल्या म्हणजे तरी बरें होईल."

" त्या दुरूनच जातात त्याच बऱ्या; ती पाहिलीस कां ?"

" कोण रे ती ?"

" ती कडेची, बस्स लग्न करावं तर अशा पोरीशींच ! नाहींतर जन्मभर तालमीच्या हौदांत लाल मातींत लोळत 'जय हनुमान,' 'जय हनुमान' म्हणत किंकाळ्या फोडत लोळावें ! अहाहा."

" कविराज."

" काय म्हणतोस बाबा ? माझ्या दोस्त मंडळींनो, अशी जर मला 'मंडळी' लाभली, तर वर्षभर तुम्हांला तिच्या हातचा चहा पाजीन आणि माझें आयुष्य म्हणजे अगदीं ताजमहाल हॉटेल होईल !"

" समज, आमच्या प्रयत्नांनीं अशी बायको मिळाली, तर काय करशील ? "

" बस्स ! तुझें नशीब बेंडासारखें फुटलें, तर सकाळपासून तें अगदीं ' शेड स्विच ऑफ ' होईपर्यंत कसा वागशील तें सांग ! "

" समज, तूं डायरीचें पानच लिहावयाला बसला आहेस ! "

" साखरझोंपेंतून मी गजराच्या खणखणाटानें ५॥ ला जागा झालों आहे. तिच्या विस्कटलेल्या बटा दूर सारींत आणि पदर आंगावर घालून—हलक्या हातानें हालवून ' उठायचं ना ! ' म्हणतांच ह्या कुशीवरून त्या कुशीवर होतांना होणारा बांगड्यांचा तो मंजुळ नाद ! पुन्हां एकदां ' उठायचं ना ? ' असें म्हणतांच ती डोळे चोळ-चोळत उठून माझ्यापुढें लिस्टरिन पेस्ट आणि ब्रश आणून ठेवील —आम्ही दोघे मग, नव्हे मींच एकटा बाहेर टेबलावर जुनीं वृत्तपत्रें चाळीत बसून चहाच्या ट्रेकडे नजर रोखून बसेन ! डाव्या हातानें किटलींतून ती चहा ओतीत म्हणेल, ' घ्यायचें ना गडे ! ' सायकलीवरून बाहेर पडतांना गॅलरींत उभी राहून ती नजरेआड होईपर्यंत —माझ्याकडे ' जुल्मी डोळ्यांनीं ' बघून मुरका मारीत पुन्हां जाईल—! मी दिसतांच—पायांतला बूट, कोटाचीं बटणें, टोपी ठेवून ' जेवायाची तयारी आहे ' म्हणून बोलावील ! हातावर पाणी पडतांच माझ्या पाठोपाठ येऊन चांदीच्या चमच्यानें मसालेदार सुपारी आपल्या रेशमी हातानें देईल. संध्याकाळीं भर बुधवारांतून हातांत हात घालून फिरायला जात जाईन, व येतांना मोतियाचा गजरा मी विकत घेऊन तिच्या काळ्या भोर चक्कांत खोवीन. असाच कांहीं वेळ मी बेभान स्थितींत तिच्या वक्षस्थळावर दृष्टि रोखून मग दोन्ही हातांनीं—"

" कविराज, तो पाहिलास कां सूर्य अस्ताला चालला ! "

" म्हणजे माझ्या आकांक्षा अशाच अस्ताला जातील असें तुला म्हणावयाचें आहे का ? "

" लेका, खेड्यांतून शहरांत कुठें चार वर्षें राहिला नाहींस तों एवढ्या शहरी संसाराचा कैफ चढला—"

" बरं जाऊं दे—लग्न पुढें मागें झालें तर बोलाव बरें कां ! नाहीं-तर—दे टाळी ! "

" तुम्ही या मात्र लेकांनो ? नाहीं तर काढाल ऐन वेळीं कांहीं तरी सबबी. "

" अरे, सात वाजले का ? मला गांवांत जायचें आहे. अच्छा—"

× × ×

कृ. सा. न. वि. वि.

आमचे येथें श्रीकृपेंकरून आमचे जेष्ठ चिरंजीव चि. रघुनाथ-यांचा विवाह रा. वि. र. काळे (राहणार माठा जि. सोलापूर इनामदार) यांची कन्या चि. सौ. कां. अंबूताई—"

लग्नचिट्ठीकडे कुतूहलानें वारंवार पाहून चार निःश्वास सोडले. काय मित्राची कल्पना झाली असेल आमच्या मंडळीबद्दल ! एक वेळ वाटते तीर्थरूपांच्या नरडीला नख लावून देहान्त शासन करावें ! हुंडा आणि गरिबी ! सुटली हांव पैशाची—आणि घातला आमच्या गळ्यांत ' मद्रासी वाण ! '

सकाळचा सात वाजण्याचा प्रहर

आमचा सोलापुरी बांड शेणसडा करून हातांत केरसुणी घेऊन घरांत येत होता ! मला पाहतांच ती लज्जेनें हंसली आणि कायसें पांढरें दिसलें. जरा वेळानें न्याहाळून पाहिलें तेव्हां कळलें हे दांत म्हणून ! जवळ येतांच मी म्हणालों,

" चहा आणतां कां ? "

" अजून चुलीवर आधण ठेवायचं आहे; अन् इश्श—"

" कळलें, आधीं घरांत जा पाहूं ! "

अर्ध्या तासानंतर कप पुढें आला.

" काय आहे हें ? अग, मला आमसुलांचें सार नको आहे. "

" हें सार नाहीं, चहा आहे ! भारीच नाहीं तरी थट्टा करायची ! " तिनें मुरका मारला (!) आणि आपले बटबटीत डोळे रोखून ती पुढें सटकली ! "

कॉलेजच्या रम्य वातावरणाचें स्मरण होतांच मनाला वाटलें,

' हें असें कां ? '

× × ×

नवऱ्याच्या म्हारकीला कंटाळून जी थेट घरांतून निघालें ती मुंबईला आलें. मागचा जाच सुटला; नवऱ्याचा त्रास सुटला; पण डोळ्यांपुढें पोटाचा प्रश्न उभा राहिला. पोटाचा प्रश्न मुंबई सोडून दुसरीकडे कुठेंही जाऊन कांहीं सुटणार नव्हता. जिथें जाल तिथें हा प्रश्न उभा आहे. आईबापांच्या घरीं सुखावलेल्या हाडांना मोलमजुरी करणें मानवणार नाहीं हें डोळ्यांपुढें दिसत होतें. मनाचा पक्का निश्चय, कीं मोलमजुरी म्हणून करावयाची नाहीं ! येऊन जाऊन काय पोटाचं. भांडवल म्हणून ज्याच्यावर धंदा उभारतां येईल, तो म्हणजे गोड गळा !

कधीं चौपाटीवर, तर कधीं मलबार हिलवर माणसांचा घोळका पाहून गाणीं म्हणावीं आणि पोटासाठीं पदर पसरावा. रोजीं आठ बारा आणे मिळूं लागले आणि आश्चर्याची गोष्ट कीं, कांहीं गुलहौशी लोक माझी वाट पाहू लागले.

संध्याकाळचे ७॥ वाजले होते ! चौपाटीवर बसलेल्या भेळवाल्यांकडून भेळ घेऊन मी समुद्रानजीक ती खात बसलें होतें. भेळ खातांना मी आपल्या मनाशीं अस्पष्ट गाणें गुणगुणत होतें. माझ्या शेजारीं ३०—३५ वयाचा एक तरुण येऊन गाणें चोरून ऐकत असल्याचें मला दिसतांच मीं एकदम म्हणालें,

"कां ? असें चोरून कां ऐकतां गाणें ! कांहीं जीव जायचा नाहीं पैसा देऊन गाणें ऐकलें तर–! फुकटे ! "

"पुष्कळ लोक तुझें गाणें पैसे देऊन ऐकतात; त्यांत एखाद्यानें फुकट ऐकलें, तर काय बिघडतें तुझें ? "

"माझें तें जीवन आहे ! मी गाणें म्हणून पोट भरतें ! माझ्या पोटावर पाय आज एकानें दिला, उद्यां दुसरा देऊं पाहील; आणि मग मला उपाशीं पोटानें वागावें लागेल ! उद्यां जर मी अन्ना-वाचून तडफडत मेलें, तर द्याल का दोन घास माझ्या घरीं पाठवून ? "

"कुठं राहत असतेस तूं ? "

"परळला––! मजुरांच्या चाळींत ! "

"आणि तुझा नवरा काय करतो ? "

गांवाकडे शेतांत चिखल तुडवीत असतो ! नवरा कसला तो ! –तुमच्यासारखाच राक्षस. टाकून दिलें मीं त्याला; पळून आलें मीं ! पोटाकरितां हीं अशीं गाणीं म्हणत असतें; आणि तुम्ही एक दिडकी न देतां खुशाल ऐकतां ? द्या, माझ्या पोटाला पैसा द्या– चांगलें गबर दिसतां आहांत; श्रीमंत आहांत; सुटूं द्या एखादा कडुसरीचा पांढरा पैसा ! "

"अशीं लोकांपुढें गाणीं म्हणून किती दिवस दाखविणार ? एकदां तुझा आवाज खलास झाला कीं कुत्रें सुद्धां तुझे हाल खाणार नाहीं ! "

"आजचा दिवस पार पडला, पुन्हां उद्यां काय होईल अशी आमची स्थिति ! आम्हांला लिहितां वाचतां येत नाहीं कां साहेबा-सारखे यॅस् फॅस् करतां येत नाहीं. देता एखादा रोजगार मला ? ही पहा चौपटी आणि मलबार हिल देतें सोडून उद्यांपासून, आणि गाणें देखील. "

"गाणें सोडून देऊन कसें चालेल ? "

"म्हणजे रोजगार मिळणार तिथें गाणें काय करावयाचें ? असला रोजगार कोणता आहे ?"

"असाच आहे रोजगार माझ्याजवळ ! कपाळींचा लेख जर उमटला नीट, तर ह्याच मलबार हिलवर बंगला बांधशील आणि ती पाहिलीस कां माझी मोटार गाडी—तशाच मोटारींतून मुंबई पालथी घालशील, ठाऊक आहे ? ये अशी चौपटीवर उद्यां, म्हणजे सांगेन कुठला रोजगार आहे तो."

असें म्हणून तो निघून गेला.

असा रोजगार तरी कोणता कीं तिथें नुसतें गायचें ?—नुसतें गाऊन पैसे कितीसे मिळणार, तर ह्या टेकडीवर बंगला बांधण्याइतके मिळावयाचे ! मोटारीपाठीमागें धांवत धांवत जाऊन विचारावेसें वाटतें असा आहे तरी कोणता रोजगार—कीं नुसतें गाऊन मोटार उडावितां येतें !

× × ×

"अरे ए ती बघ !"

"ती बघ काय ? पुढच्या शेंगा संपव; असेल एखादी खुपसुरत, तिला काय पाहावयाचें आहे ? मुंबईला सुंदर स्त्रिया आणि भव्य इमारती या कांहीं पाहाण्यासारख्या गोष्टी नाहींत !"

"म्हणून तर लेका चौपाटीवर आल्यावर नजरेंतून एखाद्या घाटाणीपासून ते थेट शेटाणीपर्यंत—"

"हें काय बोलणें झालें का ! डोळ्याचा उपयोग अभ्यासाचीं पुस्तकें वाचण्यासाठींच नुसता करावयाचा असें तुझें म्हणणें आहे होय ?"

"तसें नाहीं रे ! ती पाहिलीस बाई ? ती कुलंगी कुत्र्याशीं खेळत आहे, सिल्कचें पातळ—हातांत मोत्यांच्या बांगड्या, पेंट केलेले ओंठ—"

" साऱ्या मुंबईला ठाऊक आहे, कोण आहे ती !"

" हेमलता ना—"

" किती तरी रेकॉर्ड्स् तिच्या निघाल्या आहेत ! "

" हेमलताचें Picture म्हटलें कीं थिएटर गच्च—! गेल्या तीन वर्षांत वेड लावलें आहे तिनें लोकांना आणि त्याबरोबर मेंडिकल स्टूंडसला ! तुम्हांला आठवतें का, आपण फर्स्ट इअरला होतों तेव्हां चौपाटीवर रोज गाणें म्हणायला कोण येत होतें तें ?"

" म्हणजे काय म्हणतोस—ती ही काशी ? ती भेळ दिली कीं गाणें म्हणणारी काशी ? "

" बनवीत नाहींस ना ! अरे, अशा भिकारणी जर मोटारी उडवूं लागल्या, तर कॉलेजिस् ओस पडतील ! एकदा जवळ जाऊन घेऊं खात्री पटवून. "

कुत्र्याशीं मी खेळत होतें, तरी माझें लक्ष संवादाकडे होतें. ते इकडे येत असल्याचें दिसतांच

" ड्रायव्हर " म्हणून हांक मारली !

" अरे, तीच रे तीच ! "

" काय लेका आपण मूर्ख ! "

" आणि आतां हिचें गाणें ऐकायला आठ आणे फिरवावे लागतात.

" तें सुद्धां उभें राहून ऐकावें लागतें. "

" तिला स्वप्नांत सुद्धां वाटलें नसेल कीं आपण ह्याच चौपाटीवर मोटरींतून येऊं. "

मोटर सुटतांना हाच विचार माझ्या मनाला धक्का देऊन गेला !

× × ×

चार जणांकडून होणाऱ्या शाब्दिक कौतुकानें आणि कोणीही भेटल्यावर, ' काय चालू आहे नवीन लिखाण?' ह्या उत्साहवर्धक प्रश्नानें एव्हढी खात्री वाटूं लागली कीं लेखक म्हणून वाङ्मयक्षेत्रांत वावरावें !, पोटापुरतेंच कां होईना, लिहून चार पैसे मिळाले, लेखनावर तरी पुरे ! प्रश्न होता समाधानाचा, जीवनाचा नव्हता !

दुपारची भाकरी-समाधानानें लेखनव्यवसाय करून खातां आली तर तर—माझ्या सौख्याची सीमा कुणालाच ओलांडतां यावयाची नाहीं ! खूणगांठ बांधली कीं जगायचें लेखक म्हणून आणि मरायचेंही लेखक म्हणून, धडपड करायची माणसानें कशाकरितां ? जगण्यासाठीं ! नुसत्या जगण्यासाठीं ! छे मुळींच नाहीं ? जें हवें तें मिळवून जगण्यासाठीं !

" या हो, अरे बाबू, एक सिंगल सांग शेजारच्या हॉटेलांत. बसा असे; तरुण दिसतां."

" हो, आहे खरा तरुण ! तुम्हांला भेटण्यासाठीं आलों आहे. तुमच्या संस्थेंत लेखक म्हणून काम करावें अशी इच्छा आहे."

" तुमच्यासारख्या तरुणांनीं लेखक म्हणून आलेंच पाहिजे पुढें. शिकलांत कुठपर्यंत ?"

" विश्वविद्यालयाच्या उंबरठ्यावर टाळकें आपटून रक्तबंबाळ झालों आहे. दारांतच हनुमानसारखा उभा आहें. अजून आमची आणि पदवीची गांठ पडली नाहीं. !"

" बोलण्यांत सुद्धां चमक दिसते आहे तुमच्या ! काय काय लिहितां तुम्ही !"

" काव्य सोडून म्हणाल तें !"

" आमच्याकडे तुम्हाला साजेल असें काम नाहीं हो ! तुम्हाला का भाषांतर करायला देऊं टाइम्सचें ? का प्रुफ तपासायला ठेऊं !"

"तुमच्या कचेरींत मला उमेदवार म्हणून वाटेल तें काम करायला सांगितलें तरी करायला तयार आहे !"

"हा तुमचा विनय आहे ! भावी पिढीचे उदयोन्मुख लेखक तुम्ही. तुम्हाला असलीं कामें सांगणें हा आमचा—!"

"बरें, आपण प्रकाशक आहांत ? देत जाऊं कादंबऱ्या लिहून ?"

"कुठें आहे हो खप त्या तुमच्या कादंबऱ्या आणि नाटकाला ?" "कोरीं करकरीत पुस्तकें प्रेसमधून निघालेलीं धूळ खात पडलेलीं आहेत; ठेवायला जागा नाहीं;— जागेचें भाडें पदरचें भरावें लागतें. कवि–व्यवहार हा असा आहे ! धंदा उरला नाहीं—गरजा संपत नाहींत;–कसातरी चालवला आहे संसार हा !"

"तुमच्या इतक्या ओळखी आहेत, नाटकवाल्यांच्या–सिनेमावाल्यांच्या–तिथें कुठें प्रवेश—"

"नाटकानें डोळे पांढरे केले–सिनेमाची घरघर सुरू झाली—"

"बरें, पण तुमच्या साप्ताहिकांत कांहीं मजकूर दिला तर काय घ्याल मला—"

"कविता असेल, तर छापण्याचा जाहिरातीसारखा खर्च, वातमीपत्र असेल तर मिळतील कॉलमचे चार आणे, लघुकथा असतील, तर मोफत अंक मिळेल; इथें राहत असाल तर कचेरींत येऊन घेऊन जावा लागेल, बाहेरगांवीं पाठवावयाचा असेल, करूं पोस्टेज खर्च, कादंबरी लिहून देणार असाल, तर देऊं पानाला २ आणे प्रमाणें आणि तेंही पुस्तकें खपविण्याचें काम करीत असाल तर ! व्यवहार हा असा चोख, नाटकवाल्याकडे जा, नाहीं तर सिनेमावाल्याकडे जा !"

"मी पोरसवदा पाहून मला आपलें कांहीं तरी सांगतां हो ! अहो, मी तर ऐकलें आहे हजार हजार रुपये नाटककाराला मिळतात, सिनेमाचे संवाद लिहून दिले तर चार हजार रुपये वाजवून घ्यावेत."

"मिळणारे मिळवत असतील, नाहीं असें नाहीं; पण तुम्ही आपलें हें 'वेड' सोडून कुठें तरी दुसरीकडे जा रे! अहो, तुमचें वय काय आहे?"

"फार नाहीं, अगदीं सव्वीस!"

"लग्न झालें आहे का व्हावयाचें आहे?"

"ओळखीची एखादी गळ्यांत मारण्याचा विचार आहे वाटतें?"

'छे! सहज विचारलें आपलें! नाहीं तुमचा-आमचा योगायोग-!"

"ही सिगारेट तर घ्या—"

"मी कधींच ओढीत नाहीं."

"म्हणजे? लेखक आणि सिगारेट ओढत नाहींत! आश्चर्य आहे बुवा!"

"पान-सुपारी-कांहीं नाहीं!

"हीं काय लेखक म्हणून जगण्याला qualification लागतात वाटतें?"

"ह्या जन्मांत तुम्ही लेखक म्हणून पुढें येणार नाहीं; अरे बाब्यां कुठें मेला होतास. सांगितला का चहा शेजारीं? नाहीं शंखोबा?—अरे ११ वाजले-आतां जेवायच्या वेळेला का कुठं कवीला चहा पाजूं—बेअक्कल माणूस कुठला-येतां,-या!"

× × ×

सुंदर स्त्री असावी, पण मूल नसावें तिला; मूल बाळसेदार असावें पण तें खेळकर आणि हंसरें नसावें, समोर सारंगी असावी, पण गज फिरवला कीं सूर बेसूर निघावेत, शृंगारलेला देव असावा पण त्याला वाचा नसावी, अफाट सागराकडे पाहून हातांत ओंजळभर पाणी घेऊन तोंडाला लावावें पण तें खारट असावें, आणि आयुष्य असावें, पण समाधान नसावें असाच प्रकार माझ्या वाङ्मयीन संसारांत चालू होता. मला भाकर फार नको होती; चतकोर,

पण ती लेखक म्हणून मिळवावयाची होती ! माझी धडपड वैभवासाठीं नव्हती, समाधानासाठीं !

अखेर तीन –चार वर्षांच्या खडतर अनुभवानें शहाणा झालों. एका इंग्रजी कपनीचा फिरता एजंट म्हणून काम करूं लागलों. साऱ्या महत्त्वाकांक्षा लाथाडून दिल्या; मजूर बनलों; हमालासारखा राबूं लागलों आणि चार पैसे मिळवूंही लागलों !

× × ×

माझा गिऱ्हाइकाशीं सौदा पटवून झाला होता. दुकानदार दुपारीं आर्डर करून ठेवणार होता, बॅगमध्यें सॅम्पलस् ठेवून मीं ती बंद केली आणि डोक्यावर हॅट ठेवून लॉजमध्यें निघणार, तोंच एक गिऱ्हाइक दुकानांत शिरलें व माझ्याकडे फार बारकाईनें पाहूं लागला; तो होऊनच मला म्हणाला—

"पुण्याला असतां आपण ?"

"हो ! कां ?"

"नाहीं, मला आपलें पाहिल्यासारखें वाटतें, इतकेंच; तुम्हाला एक विचारूं का प्रश्न ? आतां तुमच्या वेशावरून तुम्हांला प्रश्न विचारावयाचा संकोच वाटतो."

"नाहीं, विचारा कीं !"

"तुम्हीं कधीं कधीं लिहितां ना ? पुष्कळ वेळ मीं तुमचे लेख वाचले. मला वाटलें तुम्हीं लेखनव्यवसायांत—"

"हें असेंच !"

"चटकन दुकानांतून उठलों आणि पायऱ्या उतरतांना हुंदका आवरण्याचा प्रयत्न केला तरी"

× × ×

डोळ्यापुढें पुन्हां प्रश्न उभा राहतो 'असें कां ?' आणि उत्तर देणाऱ्यालाही उत्तर देतांना म्हणावें लागेल 'असें कां ?'

चंदनाचें खोड : : ९

ज्याला आपण छंद अगर 'हॉबीज्' म्हणतों, त्या प्रत्येकाच्या निरनिराळ्या असतात! कांहीं लोकांना विशिष्ट मोटरचे नंबरस् लक्षांत ठेवण्याचा छंद असतो, कांहीं लोक एखाद्या विशिष्ट रस्त्यावरून सायकली किती जातात ह्याची नोंद करीत असतात, प्रेम-वीर तरुण कुठल्या तरुणी कुठल्या बाजूस फिरावयास जातात, याकडे अवधान ठेवतात आणि माझ्यासारखें कांहीं उल्लू तरुण कुठल्या चित्रपटांत 'चुंबनाचें रेकॉर्ड' मोडलें आहे हें 'नोट' करून ठेवतात! जिगर दोस्तांना माझा सहवास अगदीं हवासा वाटतो; पण नवीन होऊं पाहणाऱ्या कच्च्या दिलाच्या मंडळींना मी अगदीं 'गणिताचा मास्तर' वाटतो! कारण पहाल तर एकच-वय-शिक्षण-जात गोत लक्षांत न घेतां मी सरळ थोड्याशा सलगीनंतर बेधडकपणें विचारितो कीं, किती मुलींवर आतांपर्यंत प्रेम केलेस? सिगारेट केव्हांपासून ओढूं लागलास? मिशा केव्हांपासून साफ करूं लागलास? दारू-पीत असशील, तर ती केव्हांपासून पिऊं लागलास! एक का हजार प्रश्नांचा भडिमार मी करी! हेतु एकच असे; आयुष्यांतील लहानसहान घडामोडींचा 'श्रीगणेशा' केव्हांपासून गिरविला हें कळावें! मी कांहीं मोठा मानवी आयुष्याचा अभ्यास करणारा जाडा विद्वान् नाहीं; परंतु ती एक माझी 'हॉबी'-छंद होऊन बसला होता!

सुट्टीचा दिवस गांठून माझे सात-आठ मित्र माझ्या दाराशीं 'मजुराच्या' आवेशानें येऊन माझ्या नांवानें बेंबीपासून कंठशोष करूं लागले. भांडवलवाल्याच्या आवेशानें मीं झोंपेंतून उठून दार उघडलें आणि सर्वांना 'साष्टांग नमस्कार' केला! खोडसाळपणा-सूड उगविण्याच्या बुद्धीनें सारे माझ्याकडे बेरकी नजरेनें पाहत होते.

अरे ए—

काय म्हणतो रे—

आम्ही सर्व तुला एक प्रश्न विचारणार आहों. ईश्वराशपथ खरं सांग !

चुकलास तूं; मला ईश्वरी शपथेचा लाल दिवा दाखवण्याऐवजीं जर माझ्या आवडत्या 'कुलंगी कुत्रीचा'—

पाहिलंत–ही तरुण पिढी—

आणि तुमची कुणी शिंकाळीं हातांत घेऊन तयार आहे वाटतं ! बरं, पाजीपणा पुरे करा; सरळ विचार काय विचारावयाचें असेल तें.

पाहा बरं–मागून गांधींसारखा बदलशील !

Excuse me–तुम्हांला वाटत असेल–गांधींचं नांव घेऊन मला 'सायकल' वर चढवलं. परंतु पुन्हां जर त्या गृहस्थाचं नांव घेतलं, तर मला Shower bath घ्यावा लागेल.

आमचा असा विचार आहे कीं तूं तुझ्या वैवाहिक आयुष्याच्या सुरवातीपासून ते परवांचा वैवाहिक 'Once more' घेईपर्यंत सारी हकीकत सांगावीस—

एकदम मला गहिंवरल्यासारखें झालें. माझ्या खिलाडू वृत्तींत एकदम गांभीर्य आलें—! वरवर हंसणाऱ्या माझ्या मुखचंद्रम्यानें 'सुखी जीव' म्हणून मला समजणारी माझी दोस्त मंडळी–माझ्या वैवाहिक आयुष्याच्या शाळेंतील—सुरुवातीचा पहिला धडा मीं कसा गिरविला हें विचारतील अशी कल्पनाही नव्हती—! कांहींसा भानावर येऊन मीं म्हणालों. ठीक ! पुरे आतां विषय—Now let us have tea ! चहा घेऊं आणि मग जाऊं गांवांत पोळा-सारखे हिंडायला–!

× × ×

माझ्या स्वतःच्या आयुष्याचें जर सिंहावलोकन केलें, तर मला इतके धक्के बसतील कीं कदाचित् त्यामुळें मला एकदम 'गृह्य-संस्कारां'त प्रगट व्हावें लागेल ! आणि ज्या स्थितींतून मीं घोड्या-

वर, पगडी घालून गालाला काजळ लावून, तोंडांत विडा चघळीत चढलों, तेथपर्यंतचाही इतिहास 'न्हाव्याचा नटसम्राट कसा झालों' ह्या आत्मवृत्ताइतका मनोरंजक ठरेल ! इसापनीतीसारखे थोडक्यांत— आज तागायताच्या आयुष्याचें सार काढून उपदेशामृत पाजतांना निःशंकपणें मी सांगूं शकेन " आमच्या आयुष्यांत अकलेपेक्षां नशिबाचा भाग अधिक आहे. शिक्षण, विचारूं नका—सद्गुण बोलूं नका, वडिलार्जित इस्टेट, एकुलता एक हा दिवटा औरस पुत्र. अशा ह्या सर्वगुणसंपन्न चिरंजीवाच्या विवाहप्रसंगीं जर आई—बाप असावेत अशी हुरहुर वाटून चारदोन अश्रु टाकले तर काय बावगें होईल का ? Bombay office मध्यें नोकरी, आई—बापाला एकुलती एक असलेली आमची 'मंडळी' रहायला पुण्यासारखें शहर, मग काय विचारतां ? आयुष्य म्हणजे मलबार हिल !

नेहमींच्या वेळेपेक्षां थोडासा अगोदरच तासभर मीं ऑफिसांतून आलों होतों. 'मंडळी' पलंगावर अजून 'लोडा' सारखी पसरलेलीच होती. कपडे खुंटीवर काढून ठेवून मीहि आपला मोर्चा पलंगाकडे वळून 'लोडा' ला टेकून फॅन सुरू केला.

'अय्या ! केव्हां येणं केलं तें !

'येणं आतांच झालं; बरं अय्या — '

'आज नेहमीपेक्षां लवकर येणं केलं ? '

'आमच्या तो हेडक्लार्क आहे ना. त्याचं दुसरं लग्न नुक्तंच झालं आहे. तो अलीकडे अगदीं चारच्या सुमारास घरीं पळतो ! हेडक्लार्कचं लग्न दुसरं असलं तरी आमचं पहिलं आहे ह्याची जाणीव—'

'काय तरी बाई एक—एक माणसाचा स्वभाव असतो ! जशी कांहीं बायको घरांत आली कीं लोकांना वाटतं—मेल्यांना म्हणावं एकदां बायको होऊन पहा नवऱ्याची म्हणजे कळेल काय सुख आहे तें !—

आपल्याला तर कांहीं नवऱ्याची बायको होतां येत नाहीं ! आतां बायकोचा नवरा होऊन पाहतो काय वाटतं तें बरं ए—'

'समजलं ! ही पहा आलेंच—'

'अग इकडे ये, दुसरे आणखीन तुझ्या कानांत सांगाय्चं आहे; अशी इकडे ये !'

'इश्श-कुणी पाहील ना-हें काय तें—! हेंच कां कानांत सांगायचं होतं तें !'

'स्त्रियांशीं कानगोष्टी करितांना अशा 'गोष्टी' ही कराव्या लागतात—! रागावलीस वाटतं ?'

'इतका राग आला आहे मला कीं असं वाटतं—

'—कीं पुन्हां मीं कानगोष्टी कराव्यात ! बरं बाईसाहेब, चहा आणा लवकर !'

पलंगावरून उठून टेबलाजवळ आलों. 'मंडळीं'ची रवानगी करण्याबद्दल सासऱ्याचें आलेलें कार्ड दिसलें. झटकन वाचून सकाळीं आलेल्या दैनिकाकडे नजर टाकली.

'हं घ्या'

'आणा—'

'आणला आहे कीं—आतां करा सुरुवात प्यायला.'

'कशाला ?'

'इश्य, कसली ही कोटी !'

'आमची ही कोटी--तुमच्या इश्य ह्या शब्दाइतकी कांहीं घाण नाहीं ! दुसरा कप नाहीं भरला; और एक ग्लास थंडा पानी लाव--'

'हिंदी ही राष्ट्रभाषा व्हावी अशी तुमची इच्छा असली, तरी घरांत--'आव--लाव पाव' कांहीं चालणार नाहीं ! फारच जर सुरसुरी आली हिंदी बोलयची तर द्या एखादं व्याख्यान !'

'बरं एक ग्लास पाणी आण !'

'हें काय हॉटेल आहे वाटतं ?'

'तुझं आणि एका मोठ्या इंग्रजी लेखकाचं मतैक्य दिसतं ! आयुष्य हें एक हॉटेल आहे असं त्याचं मत आहे.'

'तो लेखक कोण ? कप-बशा विसळणारा वाटतं ? चहा करायला सुरवात, नाहीं तर गार होईल.'

'अरे बाप रे !'

'काय झालं इतकं दचकायला ?'

'अग, आज व्याख्यान आहे.'

'कुणाचें ?'

'एका बाईचं.'

'मग त्यांत काय मोठंसं नवल आहे ! पुष्कळ स्त्रिया अलीकडे बोलूं लागल्या आहेत !'

'विषय पाहिलास का काय आहे तो ? अजून नाहीं 'अय्या' चा धांवा केलास !'

'त्या बाईला नाहीं कवडीची अक्कल !'

'तुला इतक्यांत नाहीं कळायचं त्या विषयाचं महत्त्व. संसाराला विटल्यावर सन्यास, तसाच हा प्रकार आहे ! चार दोन घरांत रांगूं लागल्याशिवाय नाहीं कळणार तुम्हां बायकांना महत्त्व; जा, ठेवा नेऊन घरांत कपबशा !'

× × ×

लग्न होऊन वर्ष झालें आणि वर्षानंतर काय होणार ? प्रत्येकाला ठाऊक असतें कीं, इतक्या दिवस दुसऱ्यांच्या मुलांना कडेवर घेऊन हिंडणारा तरुण आपल्या अपत्याला 'रेनकोट' प्रमाणें खांद्यावर टाकून पाय मोकळे करून यावें म्हणून हिंडतो !

रात्रींचे ९॥ वाजले होते. मीं नवीनच आणलेल्या सेन्टचे चार थेंब हातरुमालावर शिंपडून त्याचा वास घेत—फाउंटन् पेन्मध्यें शाई भरत होतों. दूरच्याच अंतरावर सौभाग्यवती किर्लोस्करी पाळ-

ण्यांत घालून त्याला निजविण्यासाठीं भावगीत म्हणत होती. चिरंजीवांनीं न निजावें असेंच मला वाटे; कारण तिच्या मधुर कंठांतून येणाऱ्या गोड गीताच्या आलापांना मला पारखें व्हावें लागलें असतें! पाळण्याचीं आंदोलनें स्थिरावत चाललीं—गाणेंही हळू हळू ती बंद करूं लागली—मीं एकदम त्या शांत वातावरणाचा भंग करून म्हणालों—

'अजून तो निजला नाहीं'

'जरा इकडे येऊन पहावें कीं आपला बाळ किती सुंदर दिसतो म्हणून सांगूं! आतां ह्या दिवाळीला तो वर्षाचा होईल; तेव्हां त्याला उष्टावण करायचं आहे.'

'आलें माझ्या ध्यानांत! इतका वेळ बाळाला निजविण्यासाठीं गाणं म्हटलं आतां—'

'कांहीं तरीच आपले—! मी किती दिवस आपल्याला सांगतें आहें घरीं एक बाबागाडी आणायची म्हणून! मला नाहीं गडे त्याला घेऊन चालवत—! वरं, आपण घेऊन चालायचं होईल नाहीं असें नाहीं पण मला अगदीं विरमल्यासारखं होतंय! मग होईल ना आणायची लवकर? कां आपलं नुसतं 'हो' 'पाहूं.'

'अग पण त्या बाबागाडींत एकटाच त्याला कसा बसवायचा—! बाबा गाडी आणण्याइतकी आपली प्रगति करून दाखवा. अन् मग सांगा आम्हांला ती आणायला—'

तिच्या चेहऱ्यावर कांहींसा असंतोष प्रगट झाला. माझ्या उत्तराला प्रत्युत्तर द्यावयाचेंही तिच्या मनांतून होतें; परंतु तिनें सरळ आपला मोर्चा पलंगाकडे वळवून अंग लवंडलें. दमल्यामुळें तिला झोंपही लागली. मीं तिच्या चेहऱ्याकडे अत्यंत बारकाईनें पाहूं लागलों.

तिच्या चतुर्थीच्या चंद्रासारख्या कमानदार भुवया, अंतःकरणाचा सरळ भाव दर्शविणारी सरळ नासिका, उमलणाऱ्या गुलाबाच्या

पाकळ्यांप्रमाणें दिसणारे तिचे ओठ, सतेज कांति पाहून मनाला धन्य वाटलें. पुन्हां एकदा जवळ जाऊन—निरखून पाहिलें आणि परमेश्वरानें निर्माण केलेल्या कलाकृतीला नम्र भावानें नमस्कार केला.

× × ×

कांहीं वेळेला मला अगदीं पटूं लागतें कीं, जगांत आनंद, सुख प्रेम ह्या गोष्टींचा ध्यास माणसाला जेव्हां अनिवार होतो तेव्हांच तो त्यांचें सौख्य भोगूं शकतो. पुत्राकरितां नवस करून पुत्रवान होणारा संसारी आणि दरवर्षीं Maternity Home मध्यें चक्करा घालणारा कारकून, चार दिवस थारे पालट व्हावा म्हणून मुंबईला येणारा युवक—आणि दररोज यांत्रिक आयुष्याचा एक घटक बनून कंटाळणारा चाळींतील मजूर अगर मलबार हिलवरील शेट—पंढरपूरच्या विठोबाच्या गाभाऱ्यांत चोविस तास बसणारा बडवा आणि वर्षांतून काशी रामेश्वराहून येणारा यात्रेकरू—लग्नाची आतुरतेनें वाट पाहणारा ब्रह्मचारी—आणि लग्नाच्या बेडींत अडकून पोरांचें लेंढार लागलेला सांसारिक—सकाळ संध्याकाळ मन मानेल तेव्हां मोटारींतून सहल करणारा ऐषारामी भांडवलवाला आणि पुणें—मुंबई सर्व्हिसचा मोटर ड्रायव्हर—येईल कां कधीं उभयतांच्या आनंदाची तुलना करायला ? आणि म्हणून मला वाटतें आनंद—प्रेम—सुख हें अनेक सायासानें प्राप्त झालेल्या संधीचा फायदा घेण्यांत असतें ! संसारांतसुद्धां अगदीं तसेंच आहे. माझ्या संसाराच्या सुरवातीचीं तीन—चार वर्षें फार मोठ्या आनंदाचीं गेलीं—आणि आतां नेहमीं तिच्या-भोंवतीं—मुलें ! लग्नानंतरच्या सुरवातीच्या कालाकडे आणि मीं अनुभवतों या कालाकडे नजर टाकूं लागलों, तर उद्‌गारचिन्हच मला पुढें दिसतें !

आज दुपारीं एक नवीन चित्रपट लागणार होता. माझ्या मनांतून तिनें माझ्याबरोबर यावें असें वाटत होतें. दुपारचे दोनचे ठोके पडतांच—मुलांच्या गराड्यांत पडलेल्या तिला उठवून मी म्हणालों,

'दोन वाजले. चहा कर !'

'आतांच कुठं आवरून–मुलांना झोंपवून पडलें होतें, तर लगेच चहा कर म्हणून आली स्वारी हुकूम सोडायला ! मला आला आहे कंटाळा ! तो स्टोव्ह आहे—ती स्पिरिटची वाटली—सारं आहे सामान तिथंच ! करा तुम्ही ! आणि माझाही टाका एक कप चहा, मर्जी असेल तर !'

'कांहीं वाटते का शरम असं बोलायला ? गांवांत पुष्कळ आहेत हॉटेल्स् ! जरूर नाहीं मला तुझ्या त्या चहाची–! बरं, काढून ठेवलेस का परटीचे कपडे बाहेर ? लावल्यास का सदऱ्याला गुंड्या –टोपीला ब्रश केव्हां करणार ? चल, ऊठ मला दाढी करायची, दे ती 'केस' इकडे आणून !'

'कंटाळा आला मला ह्या संसाराचा ! ह्या मुलांकडे लक्ष देऊं, का तुमची मर्जी संभाळू ? आज दोन दिवस झाले, बेबी खोकते आहे–थोरला तापानें फणफणून पडला आहे ! गेलां होतां का डॉक्टरकडे ? कमी जास्ती कांहीं झालं तर !'

'काय व्हायचं असेल तें होईल त्याचें ! तूं आणि पोरं घाला गोंधळ !'

'आणि तुम्ही ? कुणी नाहीं वाटतं त्यांचे ?'

'काडीचाही माझा त्यांचा संबंध नाहीं असं तुला वाटत असेल तर वाटो–! हें बघ वाजले अडीच–! चहा कर–कपडे कर–आणि चल माझ्याबरोबर सिनेमाला–संध्याकाळीं सिनेमाहून आल्यावर जाऊं डॉक्टरकडे घेऊन मुलांना–!'

'निर्दय आहांत–! घ्या तुम्ही सिनेमा पाहून–मला कांहीं यायचं नाहीं ! आणि सांगतें, मला पांच रुपये हवे आहेत– '

'कशाला ?'

'हवे आहेत. चार आठ दिवसांनीं मला जायचं आहे आईकडे, तेव्हां पुण्याहून जातांना कांहीं तरी तिला नेणार आहें ! सदा–सदा

मीही आजारी, पोरांनाही बरं वाटत नाहीं ! येतें जाऊन दोन महिने हवापालट करून—! निदान आतां २ रुपये तरी द्या डॉक्टर-कडे संध्याकाळीं जायचं आहे तेव्हां–! '

कांहींशा चिडखोरपणानेंच मी दोन रुपये ड्रावरमधून काढून तिच्यापुढें फेकून दिले !

× × ×

महिना दोन महिने डॉक्टरनें तिचा ताप हटविण्याचे प्रयत्न करून पाहिले. आणि शेवट Blood examination करून घेण्याचा सल्ला दिला ! चार आठ दिवसांच्या अंतरानें एक दिवस डॉक्टरनें मला खाजगी रीतीनें बोलावून सांगितलें–– मिस्टर, तुमच्या बायकोला क्षयाची भावना झाली असा माझा समज झाला होता. परंतु आज रिपोर्ट आला असून त्यांत T. B. चे germs सांपडले आहेत ! नुसता क्षयच असतां, तर कांहीं बरी होण्याची आशा होती. परंतु त्यांतून त्यांना कांहीं दिवस गेले आहेत !–– प्रत्येक बाळंतपणानं त्यांना आलेला अशक्तपणा–आणि दरम्यानचा असणारा अल्प अवधी ह्यामुळें–She has utterly lost her health अगदीं हतबुद्ध झालों आणि जड अंत:करणानें मीं घरीं परतलों.

दिवेलागणी झाली होती. तिच्या भोंवतीं मुलें होतीं; एक रडत होता, तर दुसरा अंगाशीं दंगामस्ती करीत होता. तिसऱ्यानं अंग भाजून घेतलं होत आणि काय ! एकूण–चूल आणि मूल ! मला पाहतांच तिनें उठण्याचा प्रयत्न केला–! माझा चेहरा उतरलेला. पाहतांच तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले––

' काय म्हणाले डॉक्टर ?'

' कांहीं नाहीं, ठीक आहे वाटेल बरं औषध घेऊनच !'

' अगदीं खरं ना सांगायचं हें ? मला कांहीं कळत का नाहीं ?"

एक प्रकारची मला घमेंड वाटत होती, कीं मी सुखी आहे;.

माझा संसार सुखाचा होणार; पण दुर्दैव तो कुठें सुखानें साजरा करूं देणार—! 'नीज तूं मी करतों स्वयंपाक; पोरांनाही संभाळतो; तूं अगदीं स्वस्थ नीज; डॉक्टरनीं विश्रांति घ्यायला सांगितली आहे. ऐक एवढें माझं !'

'मी येतें ना तुम्हाला मदत करायला !

असं कुठं झालं आहे का ?'

× × ×

एकच मला काळजी लागूनं राहिली होती, माझें कसें होणार ? मुलें उघडीं पडणार—गृहिणीला मी मुकणार, किती स्वार्थी ! मी कां रडतों, तर माझ्या सुखासाठीं ! मी कां हळहळतों, तर माझ्या अर्ध्या अधिक उभारलेल्या संसारमंदिराचा महाल कोसळणार म्हणून ! डोक्यांत किडे पडेपर्यंत विचार कां करतों, तर माझें लग्न पुन्हां झालें तरी अशी बायको मिळणार नाहीं म्हणून ! भवितव्य भेडसावीत असतां मीं निष्ठुरासारखा हा सारा प्रकार एखाद्या राक्षसाप्रमाणें पाहतों तो कां म्हणून ? मी गुन्हेगार आहे म्हणून ! लग्न कशाला करायचें, तर बायकांना बाळंतपणांच्या रोगराईनें मारण्याकरतां, त्यांनीं चंदनाच्या खोडासारखें झिजून उगाळलेल्या सुवासिक गंधाचे टिकले कपाळीं लावून आमचे वारसदार म्हणून मिरविण्यासाठीं ! अनेक आशाआकांक्षा मनांत धरून माहेरचा मायेचा उंबरठा ओलांडून जन्मदात्या आईबापांचे पाश तोडून नवऱ्याच्या घरीं नांदयला यावयाचें तें कशासाठीं ? आमच्या वैषयिक वासनांना बळी पडण्यासाठीं त्यांच्या तारुण्याचा उन्मादक आनंद भोगून त्यांना निःसत्त्व करून भरल्या मळवटानें सरणावर शय्या करण्यासाठीं ! अंतःकरण फुटून जातें, मन दुभंगून जातें आणि मति गुंग होते ! सृष्टि निर्माण करणाऱ्या परमेश्वरानें ह्या असहाय्य बनविलेल्या स्त्रीजातीकडे पाहून ढसढसा रडावेसें वाटतें ! कोणी विचार करील का ह्याचा ? देवाचें देणें म्हणून देवाकडे दोषानें बोट दर्शविणाऱ्यांना

विचार करण्यासारख्या हा प्रश्न आहे ! अगदीं आवश्यक आहे. ज्या आनंदाचा खजिना तुमच्या हातीं लुटावयास दिला आहे, तो लुटतांना परिणामाकडे नजर ठेवून लुटायला हवा ! वैभवाचा सांठा, सौख्याचा सांठा हातीं आल्यावर तो टिकविला पाहिजे ! देवानें तो दिला, पण आम्ही तो टिकविला पाहिजे ! दोषी कोण ? देव ? छे, मुळींच नाहीं ! आम्ही बेअकलीं जनावरें, कामांध पशु, अविचारी पागल ! आतां रडून काय उपयोग—?

' ऐकलंस कां ? ९॥ वाजले; औषध घ्यायची वेळ झाली. असा कंटाळा करून कसं चालेल ? थांब, मींच देतों तुला औषध ग्लासांत ओतून ? '

' इतका काय तो त्रास घ्यायचा माझ्यासाठीं ! अलीकडे सारं घरचं पाहाणं होतं. पुन्हां ऑफिसांतील काम. मुलांचे हट्ट, आणि शिवाय माझी सारी वारकाईनें पाहणी ! '

' नको का मला करायला ? ज्याचं मन त्याला खात असतं ! अजून मीं माणुसकी सोडली नाहीं; मला अंतःकरण आहे देवानं दिलेल्या मेंदूचा उपयोगही कसा करावा हें कळतं म्हणून मला हें निमूटपणं करावं लागतं ! नवरा-बायकोचं नातं दूर करून मी तुला अगदीं धुतलेल्या जिव्हेनं सांगतों ह्या तुझ्या स्थितीला कारण हा तुझा मंगळसूत्राचा मालक आहे ! '

' छे छे ! असं भलतं सलतं कांहीं नाहीं बरं मनांत आणायचं ! अगदीं माझ्या गळ्याची शपथ आहे बरं ! असं मनाला लावून घेतलं, तर आपला काय अपराध आहे ? असं वेड्यासारखं कांहीं नाहीं बोलून घ्यायचं ! त्यानं जोडलं, त्याला वाटलं तर तोच तोडणार ! '

' बरं, तसं का होईना तुझ्या समजुतीप्रमाणं. मग तर हरकत नाहीं ! चल, घे हा भाग ! झोंप घे, अगदीं स्वस्थ पड. '

नीज म्हणतांच निजली ! तिच्या त्या केविलवाण्या स्थितीकडे पाहून जीव गुदमरला, अंतःकरण द्रवलें ! तिच्याकडे सारखें टक लावून पाहवेना, म्हणून सहज मान मागें वळविली तोंच मुलें दिसलीं; काळीज फाटलें !

चटकन उठलों, बटन ऑफ केलें—अंधार ! सारीकडे अंधार पडला. एक दिवस असाच माझ्या संसारांत अंधार पडणार आहे !

× × ×

महिन्यानंतरची गोष्ट.

सकाळचा आठचा सुमार. इझीचेअरवर मी चहा पीत बसलों होतों. थोरले चिरंजीव, मधली मुलगी, आणि सगळ्यांत धाकटे चिरंजीव तिला सतावून सोडीत होते. त्यांच्या अंगावर खेकसून मी म्हणालों,

'प्राणघेऊ कारटीं !—आणि तूं ग बेबे, लहान आहेस का तिला त्रास द्यायला ? तिच्यापुढं काय बसली आहेस वेणी घालायला ?'

'मींच होऊन तिला बोलवलं. आज किनई, मीं स्वयंपाक करणार; मुलांना आंघोळी मी घालणार तुम्हाला सर्वांना मी वाढणार.'

'आगेवरून इकडून तिकडे हालायची शक्ति तरी आहे कां ?'

'आज किनई, तुम्हीं माझं ऐकलं पाहिजे ! बरं का बेबी, आणि तूं रे गुलामा—'

'आई ग, मी भात करीन—!'

'मी पोळ्या करीन !'

'आणि तूं रे टोणोबा ?'

'आम्ही आपली गोल गोल तुमची पापी घेऊं—'

'काय वाटेल तें करा, तुम्हीं नाहीं ऐकायच्या ?'

'कुठं निघालांत तुम्ही ?'

'बाजारांत !'

'मग मला चांगला एक बनारसी खण, हिरवं टोप पदराचं लुगडं, कुंकवाची पेटी, फणी, आरसा, आणि मुलांकारितां खाऊ ! आज मी आपल्या हातानं वाढणार आहें.'

'काय विचार आहे तुझा ? तुला बरं वाटल्यावर एकच काय, पण दहा लुगडीं आणून देईन.'

'मग काय हो उपयोग त्याचा ? आज मला हवं आहे हें सारें. पैसे नाहींत काय आपल्याजवळ ? ह्या घ्या पाटल्या. केव्हां तरी काढायच्याच आहेत.'

'कल्पना आहे तुला किती त्रास होतो आहे तुझ्या बोलण्यानं ? माझ्या मनाला अगदीं एक शब्द बोलूं नको.'

'इतके दिवस जसे बोललांत, तसे आजच्या दिवस तरी—मग होईल ना माझं ऐकायचं एवढं——निघालां बाहेर म्हणून सांगतें. होईल ना आणायचं ?'

कुंठल्या जिभेनें मीं 'होकार' दिला हेंच माझं मला कळेना ?

× × ×

दुपारचे तीन वाजले होते. तिला झालेल्या श्रमामुळें कल्पनातीत अशक्तपणा आला होता. तरी माउली मुलांशीं गोष्टी करीत होती.

'बेबी' इकडे त्रास द्यायचा नाहीं बरं का ! आणि तूं रे लबाडा, दांडगाई नाहीं कशी करायची नेहमीं नेहमीं; दररोज सकाळीं उठून त्यांच्यापाशीं बसून अभ्यास करायचा.'

'आई, मी कलीन तुझ्यापाशीं अभ्यास; दादा किनई आमची पाती फोडतो.'

'नाहीं ग आई; हिनं माझं पुस्तक फाडलं म्हणून मीं तिची पाटी फोडली.'

'कां असं दूर दूर बसायचं होतं माझ्यापासून ? पाळण्यांतून मुलीला द्या मजजवळ. मला घेऊंद्या तिला मांडीवर. आणायची ना तिला इकडे ?

'हट्टी ! हं ह्या !'

'ऊठ बाई—उठायचं ना ? किती वेळ झोंपायचं ? हंसा बावा हंसा आमच्याकडे पाहून ! कां, केली रडायला सुरवात ? बरं नाहीं; एक गोल पापा तरी—'

'आणि आमचा ग'

'दादाचा तेवढा घेतला !'

'तुला सांगितलं ना तूं स्वस्थ पड म्हणून !"

'अगदीं आतां स्वस्थ पडतें हं ? माझं किनई डोकं मांडीवर घेऊन दाबायचं म्हटलं; नाहीं का ऐकायचं ?"

मीं तिचं डोकं मांडीवर घेतलें. डोळ्यांतून घळघळ पाणी वाहूं लागलें. तिच्या निस्तेज डोळ्यांतून अश्रुप्रवाह वाहत होता. एकमेकांशीं पुष्कळ बोलावेसें वाटत होतें; पण तें सारें दृष्टीनें !

'काय हवें तुला ?"

'कांहीं नको, मुलांना जपा; स्वतःला...मला सोडून जायचं नाहीं अं, कुठं आतां !"

किती तरी वेळ ती माझ्याकडे पहात होती. सातासमुद्रांचें अंतर तोडून जातां येईल, मोठमोठाले घाटदऱ्या—पर्वत ओलांडून जातां येईल. परंतु हा घराचा उंबरठा ? कायमचा ओलांडून जाणें कठीण आहे—! पोलादी शृंखला तोडतां येतील; पण मायेच्या, रक्ताच्या, सहवासाच्या शृंखला ?—

मुलांच्या मायेला—पोटच्या लेकरांना—माझ्या उभारलेल्या संसाराला सोडून ती कायमची बंधमुक्त झाली !

———

जनरल स्टोअर्स : : १०

एकाद्या शाळेचा बक्षिससमारंभ असो, गणपतिउत्सवांत जाहीर व्याख्यान होवो, सत्कारसमारंभ साजरा केला जाणारा असो, एखाद्या कॉलेजचें गॅदरिंग असो, किंवा कुठल्याही संस्थेचा उद्घाटन समारंभ असो, गळ्यांत पडलेला मोठा थोरला हार काढून हातांतील गुच्छाचा सुवास घेत श्रोतृसमुदायाकडे गंभीर नजरेनें पाहत जेव्हां हीं जुनीं खोडें आम्हां तरुणांवर तोंडसुख घेऊं लागतात, तेव्हां मला मात्र अगदीं मनस्वी राग येतो. ऊठसुट जो–तो म्हणतो, 'तरुणांनीं धर्म बुडवला, तरुणांनीं देश बुडवला, तरुण स्त्रीलंपट झाले, कादंबऱ्या आणि ललित वाङ्मयांत गुरफटून ध्येयहीन बनले !" एवढ्यावरच कुठें टीका करून थांबताहेत ! हे लोक वर उपदेश करितात कीं, 'तरुणांनो, व्यापार करा, व्यापारी बना, व्यापारी पेठ काबीज करा,' हें ऐकून माझ्या मस्तकांत तिडीक उठते. आमच्यापेक्षां अगोदर ४० वर्षें जन्माला आलांत एवढेंच काय तें ! बाकी कांहीं नाहीं ! तुमच्याच मुलांबाळांची पाहा फटफजिती उडते आहे ती ! आमच्या पिढीला दोष देतांना थोडा विचार केला असतां, तर माझें बोलणेंच खुंटलें ! पण आंधळेपणानें तोंडसुख घेऊन 'व्यापार' करा म्हणून हरहमेश उपदेश करणारीं धेंडें–आजमितीला हातांत तागडी घेऊन बसतील, तर कुठल्या पारड्यांत वजनें–आणि कुठल्या पारड्यांत माल ठेवून झोंक द्यावयाचा हें सुद्धां धडपणें सांगतां यावयाचें नाहीं ! मग व्यापार करण्याची गोष्ट दूरच ! एक वेळ असें वाटतें, करावें धाडस आणि करावा व्यापार ! आला तोटा तर बळ आहे तोंपर्यंत सोसूं, नाहीं तर शेवट कुलूप दुकानाला ठोकून

हिंडूं गांवांत वसुलीला ! माझा एक मित्र नेहमीं म्हणत असतो कीं, 'आयुष्य ही प्रयोगशाळा आहे.' मग हा प्रयोग आयुष्यांत करून पाहावयाला काय हरकत आहे ?

× × ×

सगळें कांहीं ठीक आहे; पण व्यापार करावयाला भांडवल जमवावयाचें कसें हा प्रश्न डोळ्यांपुढें 'तगादा' करणाऱ्या भय्या-प्रमाणें उभा राहिला ! चार ओळखीच्या लोकांकडे दांत विचकून पाहावें. कांहीं जमलें तर भांडवलाचें, नाहीं तर गांवचीं शेतें विकून करावा शुभमुहूर्त 'जनरल स्टोअर्स'चा !

"कां आज स्वारी विशेष गडबडींत ? एवढी धडपड कशा-साठीं चालवली आहे ?"

"धाडस करून पाहतों !"

"धाडस ? कसलं रे बाबा ? "

"व्यापार करायचा विचार आहे. भर पेठेंत एक जनरल स्टोअर्स उघडायचा विचार आहे."

"अरे गुलामा ! पाहिजे, कांहीं तरी धडपड पाहिजे; त्याशिवाय तरुणांना तरुणोपाय नाहीं ! नोकरी अगोदर मिळत नाहीं;—पुन्हां ताबेदारी—! लाखाचे दहा लाख झाले तरी आपलेच, तोटा झाला तरी तो आपल्यालाच ! नशिबाची खरी परीक्षा होते ह्या व्यापारांत. तुमच्यासारख्या ताज्या रक्ताच्या माणसानं आतां लक्ष इकडेच वळवलं पाहिजे बाबा."

"एकंदरींत माझं धाडस तुम्हाला पसंत दिसतं आहे ?"

"अरे पसंत—एकदम पसंत ! आमच्या हक्काचं दुकान झालं एक पेठेंत आणि बरं का, ते रावसाहेब—त्यांची जागा ती नाक्या-वरची सांगतों तुला झायला, आपलेच आहेत ते; पुष्कळ दिवस

सांगत होते—' लक्षांत असूं द्या जागेचं '—अनायासं तुला हवी आहे; सांगतों मी जागेबद्दल—"

" तें ठीक आहे हो सारं, पण दुकानाला भांडवल—! थोडी-फार मदत म्हणून तुम्हीं– "

" मदत—! रात्रीं बारा वाजतां येऊन मला उठवं–वाटेल ती करीन–! आतां भांडवल, आमचा सल्ला पटायचा नाहीं तुम्हां तरुण लोकांना; पण खरं सांगायचं, म्हणजे कर्ज काढून धंदा करणं खोटं; त्यांतून ओळखीच्या माणसांतील व्यवहार प्रेमांत बिघाड आणतो–! स्वतःचें भांडवल–चार पैसेच कां होईना, तें सत्तेचें ! तुला मदत–आम्हींच देऊं चार लोकांच्या ओळखी करून–स्वतः आम्ही दुकानांत बसत जाऊं, आमच्या बिऱ्हाडकऱ्यांना सांगूं तुमच्याकडून माल घ्यायला. ये असा चार–आठ दिवसांनीं; दुपारीं बोलूं ह्या विषयावर. "

पांढऱ्या केसाचा गळ्याला पडलेला पहिला विळखा !

× × ×

" स्पष्ट सांगावयाचें म्हणजे हल्लींची परिस्थिति व्यापारांत उडी घेण्याची नाहीं ! व्यापार करावा गुजराथ्यांनीं; व्यापार करावा मारवाड्यांनीं; तुम्हांला ही कला जमायची नाहीं;–स्वतः तुम्ही भांडवल घालून किती घालाल स्वतःचं ! "

" म्हणून तर मी आपल्यापुढं हात पसरतों आहें. "

" हात पसरला कीं हातांत घ्यायला पैसा म्हणजे सुपारीची पूड आहे, का सत्यनारायणाचा प्रसाद आहे ?–तुंमचा आमचा जुना संबध, पुष्कळ जुना पण पैसा ! बच्चा आहेस तूं अजून ! तुला भांडवलच जर उभारायचं असेल, तर देईन हजार–पांचशें– "

" तेवढे पुरे आहेत; मग केव्हां देतां–? "

"केव्हांही ! तारणावर वाटेल तितका पैसा देतों; सोनं आण, देतों तुला पैसा !"

"तारण ? सोनं ? माझी जबान हेंच माझं तारण; सोन्याहून मोलाचा माझा जीव हें तुमचं तारण समजा."

"मूर्ख ! असल्या भाषेच्या फुलोऱ्याला भुलून जाणारा मी– 'मस्कापाव' 'इराणी रेस्टॉरंटमध्यें' चहा पिणारा पेद्रू तरुण नाहीं–! व्यवहार म्हणजे व्यवहार ! उद्यां लेकांनो तुम्ही–मिशा वोडून–लेंगा घालून पळून गेलांत, तर घ्या कांय तुमचं ! छे–छे–छे, भाडभीड नाहीं आपल्याजवळ–! असेल तारण तर देतों पैसे, नाहीं तर आहे जिन्याचं दार उघडं !"

लटपटणाऱ्या पायानें मारलेली दुसरी लाथ !

× × ×

"बरं झालं, कुठें तरी पाहतच होतों चिरंजीवाला नोकरी;– अनायसं ओळखीचं दुकान निघतं आहे, ठीक–! पगार, हवे तर देऊं नका तूर्त महिना दोन महिने."

"माझ्या बोलण्याकडे कानाडोळा करूं नका; मला 'हवी आहे मदत तुमची."

"आमची मदत ! म्हणजे चिरंजीवांना दुकानांत उमेदवार म्हणून ठेवायचं; हवं तितकं काम करून घ्यायचं ! तुम्हाला जोडीदार मिळेल; त्याला अनुभव येईल."

दांत पडलेल्या तोंडांतून अंतःकरणावर सुटलेले बाण !

× × ×

प्रयोगाला लागणारीं उपकरणीं सुद्धां जमवितां येत नाहीं, मग प्रयोग करावयाचा कसा ? एखाद्याला 'हनुमानबाजी' करावयाला सांगण्याचा उपदेश करावा, पण त्याला भीक मागून सुद्धां पोटाला

पुरेसें अन्न मिळूं नये; संसार थाटण्यासाठी डिंक खर्च, पण लग्नाच्या बाजारांत कवडी किंमतीच्या मोलानें मोजले जाऊन 'भिकारदास मारुति बनावं–' अशी स्थिति माझी झाली आहे ! म्हातारपणाचा फायदा घेऊन–उपदेशाचा मारा करणाऱ्या असल्या लब्धप्रतिष्ठेच्या तोंडांत देवासमान समजणाऱ्या 'गाईचें ताजें' तरी घालून तें बंद करावें असें वाटतें ! मी थोडाच माघार घेणार आहे; एकदां निश्चय झाला तो झाला ! धंदा भांडवलावांचून थाटतां येत नाहीं, असें म्हणून स्वस्थ बसण्यापेक्षां शेतें विकून तो थाटावा असें मला वाटूं लागलें !

× × ×

'येथें थुंकू नये,' 'फ्री पासेस बंद,' 'हा रस्ता रहदारीचा नाहीं,' 'फक्त ३५ लोकांकरितां,' 'येथें लघवी करूं नये'–ह्याच मालिकेंत बसणारी 'उधारी बंद आहे' ह्या पाटीपासून ते थेट 'जनरल स्टोअर्स'चा दणकेबाज बोर्ड झळकविण्यापर्यंत तयारी करून अखेर दुकान थाटलें ! १००० रुपयांच्या भांडवलावर नित्य उपयोगी लागणाऱ्या सामानापासून समारंभानिमित्त लागणाऱ्या गोष्टींची मांडणी दुकानांत आकर्षक पद्धतीनें केली. हितचिंतक, मित्र ह्यांना बोलावून उद्घाटन समारंभ वृत्तपत्रांपर्यंत गाजवून अखेर 'व्यापारी' असा जाहीर झालों.

पहिल्या आठ–पंधरा दिवसांत हितचिंतकांची दुकानाला भेट, चहापाणी–ह्याच दंगलींत व्यापार मंदाईत गेला ! नंतरच्या आठवठ्यानंतर थोडाफार जोर लागेल असा अंदाज केला; परंतु दुसऱ्या आठवड्यांत वृत्तपत्राचे वातमीदार 'जाहिराती'करितां खेटे घालूं लागले. निरनिराळ्या कंपन्यांचे एजंट येऊं लागले आणि हळूहळू कांहीं जवळच्या मित्रांनीं भरपेठेंत 'अड्डा' –'चार चकाट्या पिटावयाचें स्थान ठीक झालें म्हणून त्यांचीही

ये–जा सुरू झाली ! शेवट 'आजचा दिवस कसा जाईल ?' 'हा आठवडा कसा जाईल–' 'महिना काय म्हणतो ?'––ह्या भविष्याकडे लक्ष जाईपर्यंत व्यापाऱ्याला रंग येऊं लागला ! पाहिला महिना, मालकाचें भाडें देण्याइतका जरी किफायतशीर झाला असता, तरी ठीक; परंतु तेंही नाहीं–! आतां मात्र हा नियम होऊन बसला कीं, '८ ते १२ दुकान–३ ते ९ दुकान—! असल्यास गिऱ्हाईकी-नसल्यास––'गप्पा मंडळांतील' गप्पा !

× × ×

सकाळींच दुकान उघडून–वृत्तपत्रें आठवड्याचीं लावीत होतों. मंडळाचे सभासद येण्यास सुरवात झाली. हं, काय म्हणता आहे सकाळ पाहूं ?

"त्रिकाळ, ज्ञानप्रकाश आज आला नाहीं वाटतं ? आणि आठवड्याचीं साप्ताहिकं––

थोड्या वेळांत दुकानाला मोफत वाचनालयाचें स्वरूप आलें ! माझ्या चांगुलपणाचा फायदा घेणाऱ्या मित्रांना बरेच दिवस खडसविणार होतों. पण जीभ रेटेना–अखेर धिटाईनें म्हणालों,

"हें पाहा जोशीबुवा, तुम्हांला वाटलं तर तुम्ही दुकानीं येत जाऊं नका. राग आला तर तुम्हांला चालेल; माझं दुकान म्हणजे काय मोफत वाचनालंय आहे ? हो, तुम्ही जर फुकट वाचूं लागलां, तर––"

"ए, व्यापाऱ्याच्या लेका, आम्ही वाचतों फुकट, वाचल्यानें काय तुझीं वृत्तपत्रं झिजतात वाटतं ?"

"इतर लोक वाचत असतील फुकट; पण मी तर घेतों ना तुझ्याकडून Illustrated Weekly ?"

"खरं; नुसता नेतां, पण दिले आहेत का कधीं पैसे ?"

"पैसे––पैसे काय–देऊन टाकीन मी––"

"असंच म्हणतां तुम्ही—आणि देत नाहीं ! ही चित्रा—तुम्हीं गोडबोले—नेली परत आणून दिलीत आणि दुर्गाबाई खोट्यांचा फोटो कुणी कापून घेतला ह्यांतला ?"

"वा वा मालक ! जसा नेला तसा आणून दिला मीं !"

"Illustrated Weekly" मधील कोड्यांचीं कूपन्स फाडून घेऊन केलात तुम्हींच हा अंक परत—"

"मालक रागावलेत आज ? गोडबोले, चहा मागव रे आज तूं; जा, ये सांगून ! बरं, नवीन साबण कुठले कुठले आले आहेत ?"

"पैसे रोख हवेत—तर देतों तुला !"

"गेल्या महिन्यांत—चार वेळेला साबण नेले, एका साबणाचे दिले आहेत पैसे ? भुडं, दिवाबत्ती, पदरचं का भरायचं ? गल्ला रोजचा दोन रुपयांचा सुद्धां येत नाहीं; दुकान काढून महिना झाला. पण विक्रीपेक्षां उधारी अधिक."

"उधारीशिवाय धन्दा नाहीं !"

"धंदा नाहीं तर स्वस्थ बसलेलं परवडलं."

"तें पहा गिऱ्हाईक आलं—!"

१७-१८ वर्षांची एक सुंदर तरुणी दुकानांत शिरल्यामुळें वादळ शांत झालें आणि माझें लक्ष गिऱ्हाईकाकडे वळलें—!

"काय हवं आहे आपल्याला ?"

"लोंकर—निळी हवी आहे !"

"किती हवी—?"

"फार नको, दोन तोळे—"

"बरं, आणखीन् काय हवं ?—स्नो—साबण—फीत्स् टॉवेल्स्—"

"टॉवेल्सं—बरी झाली आठवण, एक पाव डझन घ्या पाहूं."

"रेशमी का सुती—कुठल्या डिझाइनचे ?"

"इश्य, ते तसले नको आहेत—सॅनिटरी हवे असतील त्यांना. आहेत का आपल्या दुकानांत ?"

" दिली आहे ऑर्डर, येतील उद्यांला,"

" दोन स्नोच्या वाटल्या घ्या अफगाण; एक घ्या पावडरचा डबा, पेस्ट घ्या मॅक्लीन–"

" आणखी कांहीं हवं ?"

" कांहीं नको. करा बिल–"

" २ रु. ५॥ आणे."

" अय्या किती झांले ! असं करा, तो समोरचा दिसतो आहे ना वाडा, तिथं मी राहतें; मी किनई गडे, बॅग आणायला विसरलें ! नसेल विश्वास तर राहूं द्या. पैसे देईन आणि उद्यां मालही घेऊन जाईन ! "

" नाहीं हरकत ! केव्हांही आणून द्या पैसे."

" नाहीं तर तुम्हीच या उभ्या–उभ्या दुपारीं घरीं आणि घेऊन जा; येतें हं."

" आहे बुवा मालक !:मारलंत खरं इम्प्रेशन. मजा आहे बुवा !"

" अरे खऱ्या, असल्या गिऱ्हाईकांची उधारीच बरी. निदान उधारीमुळें घरीं तरी जायला मिळतं आणि आमची कुठं आठ आणे बाकी राहिली कीं हा लेकाचा ' उधारी बंद ' आहे ' ह्या पाटीकडे बोट दाखवतो. बनला व्यापारी ! केव्हां येणार रे तुझा चहा ? "

" तो बघ आला किटली घेऊन ! किती झाले रे ?"

" ५॥ आणे. "

" तूं काय बिलाची काळजी करतोस ! मालक आहेत आज खुशींत ! चहा आज त्यांचा. ए, पैसे शेटजीजवळून घ्यायचे, बरं का ? आणि जा, एक पिवळा हत्ती पाकिट दे पाठवून ! "

" आहे माझ्याजवळ. "

" काड्यांची पेटी– ? नुसती सिगरेट काय करायची ? "

एक वेळ वाटलें ह्याच काडीनें दुकान पेटवून द्यावें ! १२ चे ठोके पडले. दुकान बंद करून लॉजकडे निघालों.

× × ×

संध्याकाळच्या सुमाराला जमाखर्चाची वही घेऊन चाळीत असतां असें दिसून आलें कीं, गप्पामंडळाच्या पांच-सहा सभासदांकडेच जवळ जवळ पन्नास-साठ रुपये बाकी ! शिवाय-'मालक-मालक.' म्हणून चहापाणी व इतरही झीज कांहीं कमी लागत नव्हती ! दुकानांत माल भरण्यासाठीं भांडवल नाहीं. विकलेल्या मालाची वसुली नाहीं ! वरवर येणारी विक्री स्वतःकरितां खर्च होऊन बसे-आणि दुकानभाडें व इतर देणींही तशींच तुंबून राहत. पाचसहा महिन्यांच्या अनुभवानें जीव इतका हैराण होऊन गेला कीं, 'जनरल स्टोअर्सचा अवतार-मला झेपेपर्यंतच टिकवावा असें वाटे ! आज मात्र मीं निश्चय केला होता कीं मंडळी जमतांच बाकी मागावयाची. ५॥ च्या आंत हे तरुण टोळभैरव गप्पा मारावयाला जमतात, रस्त्यांतून येणाऱ्या-जाणाऱ्या तरुणांवर टीका, डोळ्याचा शोक -आणि मनाचा-करमणूक-हाच मंडळांतील सदस्यांचा उद्देश—!

"गोडबोले, केव्हां देणार तुम्ही लेमन्क्रीमचे पैसे ? थोड्या नाहींत बाटल्या नेल्या मजजवळून तुम्ही; चांगल्या सहा नेल्यांत—एकाचे तरी पैसे द्यायचे !"

"राहिले बुवा देऊं देऊं म्हणतां ! देऊन टाकूं झालं एकदम दिवाळीला."

"तुम्ही जोशीबुवा ? कागदाचीं रीम्स् किती नेलींत, पत्ता आहे का ?"

"तुमचा-आमचा करार काय ठरला होता ? तुम्हीं दिलेल्या कागदावर लिहिलेलं वाङ्मय प्रसिद्ध होऊन पैसे मिळाले तर द्यायचे; तरी मी म्हणत होतों, नको मला; पण आग्रह तुमचाच."

" बरं तें राहूं द्या, ब्लेडचे ?—का त्याही मी गळ्यांत मारल्या ?"

" ब्लेडचं बिल माझ्या नांवावर ! अहो, मी तर रेझर वापरतों. "

" तुमच्या ओळखीनं कुणीं नेल्या होत्या ना. त्या तुमच्याच नांवावर मांडल्या मीं ! "

" शाबास ! "

" तुम्हां सगळ्यांना अगदीं हात जोडून—साष्टांग दंडवत घालून विनंति आहे, ' जनरल स्टोअर्स 'ला जगवा; उधारी वसूल होऊ द्या; दोस्त हो ! हा ब्राह्मण व्यापारी रडकुंडीला आला आहे—त्याला तरी वांचवा ! "

" बरं,—देऊन टाकूं आम्ही तुझी बाकी ! आज शुक्रवार—बालाजीचा वार; करा पूजा; हं,—करा पूजा ! "

मीं बालाजीची पूजा केली. सर्वांना काबली वाटली. काबली चघळतांना रस्त्यांतून येणाऱ्या माणसांवर टीका सुरू झाली !

" अरे, ही ठाऊक आहे का पोरगी, ती प्रिंटेड पातळ नेसलेली आहे ती, दोन्ही बाजूंला दोन शेपटे सोडले आहेत,—तिला म्हणे ! "

" काय म्हणे, सांग कीं ! "

" अरे, झोंप येत नाहीं अजिबात ! "

" कुणीं सांगितलं तुला हें ? "

" मारली असेल थाप—! आणि हें पाहिलं कां चित्र खरं वाटायचं नाहीं कुणाला सांगितलं तर; अरे, हिचं प्रेम एका शिंप्यावर आहे. "

" ओहो ! फारा दिवसांनीं दिसली स्वारी. मालक अगदीं जाम खूष आहेत. "

" ही स्वारी निघाली ' शो 'ला. "

" बरोबर कोण, तर ' ती ' त्याची मावसबहीण. "

" अरे हलकें म्हणावं ! पाहा दिला धक्का त्यानं ! "

"कां देऊं नये–? रस्त्यावरून हिंडतांना शरम वाटत नाहीं?"
"अहो सतातनी, पुरे!"
"हा पाहा आला फुलांचा पुडा."
"चला; झाली आपली वेळ, उठा."
"३०३—५०५ गेल्या नाहींत अजून इकडून."
"अरे, हें काय? आज पायीं 'मंडळी' ही."
"मोटर झाली वाटतं पंक्चर?"
"नाहीं तर संपलं असेल पेट्रोल."
"उठा मेहरबान, वाजले आठ?"
"अरे, बरी आठवण झाली. एक सहरा ब्लेड दे पाहूं; वाढली आहे—उद्यां केलीच पाहिजे."
"का, कुठं, मालकाप्रमाणं नाजुक तगादे करायला जायचं आहे वाटतं?"

अशा कांहीं उत्तर–प्रतिउत्तरानं हास्याचे फवारे उडल्यावर– 'गप्पा मंडळाची' सभा खलास झाली.

× × ×

सुमारें दोनशें रुपयांपर्यंत मला मालकाला भाडें पोहोंचतें करावयाचें होतें. विक्री दुकानांत माल नसल्यामुळें येत होती नव्हती तेवढीही येईनाशी झाली. उरलीसुरली आशा वसुलीवर; ती वसूल करून कांहीं फेड करतां आली तर पहायचें; नाहीं तर—"

'पैसे कुठं जातात–देऊं सावकाश' अशीं आश्वासनें सधन लोक देत. 'जेव्हां मिळतील तेव्हां देऊं' अशी घोषणा गरीब लोक करूं लागले. कांहीं कांहीं गिऱ्हाइकें—'उद्यां या–परवां या–संध्याकाळीं या–दुपारीं या' फार चकरा झाल्यावर ८ तारखेला देतों, १५ ला देतों–आतां नक्की महिना अखेर–' शेवटीं 'दुकानीं येऊन पावते करतों' अशी बतावणी करूं लागले

कांहीं कांहीं खमंग गिऱ्हाइकें 'घरांत असून भेट घेईनात–' तर कांहीं 'खुशाल कोर्टांत जा आणि करा फिर्याद–' असा वकिली सल्ला देऊं लागले. बेरड गिऱ्हाइकें तर सरळ म्हणत 'बुडला म्हणून समजा आाण स्वस्थ बसा !' गप्पा मंडळाच्या सभासदांनीं हाच 'शेवटचा संदेश सांगून' कायमचा निरोप घेतला. गप्पा नाहीं–व्यापार नाहीं–वसुला नाहीं. महिनापंधरा दिवसांच्या अंतरानें 'जनरल स्टोअर्स'ला अगदीं गांवाबाहेर असलेल्या मारुतीच्या देवळाची अवकळा आली. दुकानांत मीं, बालाजींची तसबीर. रिकाम्या बरण्या –कांहींचें अर्धें अधिक आयुष्य संपुष्टांत आलें आहे अशा ! लेमनच्या वड्या, पेपरामिंटच्या वड्या चघळत वेळ घालवावा.—वेळ पडल्यास झाडून घ्यावें. इकडचें सामान तिकडे ठेवावें. शेवटचा आणि रामबाण उपाय म्हणजे अर्ध्या फळ्या लावून दुकानाची 'लांबी रूंदी' मोजित जावी.

हातपाय आपटत रागानें लाल होऊन मालक दुकानांत आले. संध्याकाळची वेळ असल्यामुळें मी दिवे लावीत होतों.

"लावलेत तेवढे दिवे पुष्कळ झाले ! आमची वीज अाणखी कशाला जाळून बुडवतां आम्हाला ? व्यापारी आहांत का–?"

"व्यापारी नाहीं–मी, माझा हा प्रयोग आहे."

"आणि तो नेमका आमच्यावरच केला ! भले महाराज ! आज देऊं, उद्यां देऊं, संध्याकाळीं या, चेक देतों–थापा मारतां ? चांगलें सुशिक्षित दिसतां कीं ?"

"सुशिक्षित आहे म्हणूनच वायदे–मला जशीं माझीं गिऱ्हाईकं करतात, तसेंच.मीही तुम्हाला करतों. पैसा माझ्या हातीं आला नाहीं तर देऊं कुठला ! ५०० रुपये उधारी आहे–एक पै वसूल नाहीं. मी कांहीं सधन नाहीं घरचा. पोटाकरतां मीं हा मार्ग पत्करला. नाहीं आलं यश हा काय माझा दोष आहे ? तुमचं देणं मला कबूल आहे. हवी असल्यास देतों प्रॉमिसरी लिहून !"

"तुमच्या का माझ्या कपाळावर घेऊं चिकटून ? व्यापारी म्हणवतां आणि काय भाषा करतां ? मला पैसे हवेत-भाडं आतां हवं, नाहीं तर दुकानाला कुलूप ठोकीन."

"ठोका, जागा तुमची आहे ! आपल्याजवळ नाहींत बुवा पैसे. हा दुकानांत जेवढा कांहीं माल असेल, तेवढा विका आणि करा वसूल—"

"तुमचा माल विकण्याकरितां व्यापारी होऊं ? वा, वा ! कुठं खपणार हो हा माल ? ह्या रिकाम्या वरण्या काय करावयाच्या आहेत ?-लोणचीं का घालून ठेवायला घेऊं ?"

"साबण आहेत, रेझर्स् आहेत, स्नो आहे, पावडर आहे-"

"तुमच्या ह्या भांडवलावर 'सलून' थाटूं ?"

"वरं, हा चहा-साखऱ्या !"

"भले महाराज ! आतां का मला चहाचं हॉटेल उघडायला सांगतां हा तुमचा बालाजी-'उधारी बंद आहे' ही पाटी, जनरल स्टोअर्सचा बोर्ड-अहो, एकावेळचं पाणी सुद्धां तापायचं नाहीं ! माझे केव्हां पैसे देतां, बोला ? वायदा करा तो उद्यांचा करा नाहीं तर सकाळीं कुलूप ! सकाळीं पैसे घेऊन घरीं या, आणि मग देईन कुलुपाची किल्ली उघडायला ! समजलं-! द्याल ना उद्यां ? फार नको, निदान निम्मे. तुम्ही ब्राह्मण, मी ब्राह्मण म्हणून सवलत. एखादा गुजराथी असता, तर त्याला कोर्टांतच खेंचला असता !"

८॥ वाजले. दुकान बंद करण्याची वेळ झाली,-नव्हे, आतां कायमची येणार असें वाटूं लागलें होतें. व्यापारांत सचोटीनें वागलों, तो व्यापार गळ्याशीं आला; प्राणाशीं बेतल्यावर लबाडी केल्याशिवाय जमायचें नाहीं हें ठरवूनच. गल्ला मोजला, वसुली व किरकोळ विक्री मिळून दहा रुपये होते ! नेहमीं लागणारें सामान, खाण्यासारखें असलेलें थोडेंबहुत हुडकून ट्रंकेंत घातलें. खिशांत

खडूची कांडी टाकली. दुकान बंद करून घेतलें. टांगेवाला दिसतांच हांक मारली ! ”

“ घरीं जायचं आहे. तिथून स्टेशनवर; काय घेणार ? ”

“ आठ आणे. ”

“ हरकत नाहीं. उचल बॅग ! थांब, मी आलों हं. ”

दुकानाच्या लावलेल्या फळ्यांवर खिशांतील खडूनें लिहिलें.

“ मालक परगांवीं गेले असल्यामुळें दुकान कांहीं दिवस बंद राहील. ”

“ हं, चला. ”

टांगा चालू होताच ‘ जनरल स्टोअर्स ’च्या पाटीला रामराम ठोकून ‘ जय बालाजी ’ म्हणून ‘ शुक्रवार ’ची घोषणा केली !

“ कुठं निघाला हो ? खरेदीला वाटतं ? ”

“ खरेदीलाच; ११–५० ची गाडी सांपडली पाहिजे ! बरं. ”

“ पुन्हां केव्हां येणार ? ”

“ कां बाबा ? माझ्या येण्यावर कां तुझा डोळा ? ”

“ नाहीं म्हटलं तुमच्याकरतां स्टेशनवर येईन ! ”

“ तुला अगोदर पत्रानं कळवीन, त्या गाडीला यें स्टेशनवर. चल हाण ! ”

∴ घसा साफ करून—

लंगोटबंदी : : १

—पडसें आलें होतें मला. कारण थंडीचे दिवस होते ते. सपाटून थंडीमुळें घसा अगदीं—कंपनींतून कुचकामीं ठरणाऱ्या बालनटासारखा झाला होता. आमच्या घशाची सफाई होण्याकरितां—गरम दूध—त्यांत थोडें साजूक तूप—आणि एक चिमूटभर हळद—कोण आणून देणार—? लांच दिलेल्या कारकुनाचा आवाज जसा बंद व्हावा—कॉंग्रेसला खाऊं कीं गिळू अशा आवेशानें टीका करणाऱ्या संपादकाला खादीच्या खजिन्यांतून—खणखण असा आवाज (आंतल्या आवाजासकट) ऐकूं येऊन 'तेरी बी चूप नि मेरी बी चूप' असें व्हावें—तशीच स्थिति माझ्या आवाजाची झाली होती.

आवाज साफ करण्याकरितां—थोडा खांकरलों मात्र--माझ्या पाठीवर थाप मारून--एक मित्र म्हणाला, गाणार कीं काय लेका ? --शपथपूर्वक सांगतों आपल्याच्यानें तें धाडस होणार नाहीं--खाकरलें कीं गातो कां ? डोक्यावर गांधी टोपी असली कीं कां दे. भ. ? नसल्यास कां भाई ? जरा कुठें एकादी तरुणी (संध्याकाळच्या वेळीं फिरण्यास म्हणून नव्हे तर घरापर्यंत सोबत बरं कां !) घेऊन थोडीशी छाती काढून चालले कीं खोकल्याचे आवाज कानावर ऐकूं यावेत ? हॉटेलमध्यें शिरून विसाव्यासाठीं बसतांच ' साहेब --काय गरम हवें ? ' असें ठराविक कोट्यासारखे प्रश्न विचारले जावेत ? परंतु आज मी माझ्या वाचकापुढें घसा साफ करून—फार मोकळ्या मनानें—खुल्या दिलानें--चार शब्द बोलणार आहे. ऐका तर.

× × ×

ठाऊक नसेल तुम्हांला—मी एक लंगोटबंद--तरुण आहे–! लवकर ओळख पटायची नाहीं माझी–माझ्या तुळतुळीत दाढीकडे पाहून लोक म्हणतात—न्हाव्याचा भाचा असेल–परीटघडीचे कपडे पाहून लोक म्हणतात–एकादी लाँड्री असेल मालकींची—पायांतील निरनिराळ्या नखऱ्याचीं पायतणें पाहून लोक म्हणतात–असेल ' शू मार्टचा ' संचालक (क्षमस्व–शब्द अत्यंत भारदस्त असा वापरला–पाणी पिऊन बोलतो) असेल—नेहमीं सुवासानें दरवळणाऱ्या शरीराकडे पाहून म्हणतात—असेल एकादा सुगंधी सामानाचा व्यापारी—सायकलवर चकरा मारतांना पाहिलें कीं लोक म्हणतात--असेल एजंट (तो सुद्धां बृहन् महाराष्ट्र—इ.)—--तुम्हीच आतां खरं–सांगा–येव्हढा हा सारा खटाटोप मी करितों—ह्याकडे जर अशा विपरीत नजरेनें पाहूं लागलें तर—आमचें गाऱ्हाणें कोण ऐकणार ? आम्ही देवाची प्रार्थना करून आळविलें तर देऊन देऊन देव काय देणार ?—नारळाची करवंटी–

शेंदूर—नि रुईच्या पानांच्या माळा—आणि फारच प्रेम आलें तर कमरेचा सोडून लंगोट ! खरं आहे किनई—? आमच्या देवाजवळ जें नाहीं तें तो देईल कां ? उद्यां तुम्ही एकाद्या तरुण कुमारिकेजवळ पिंवळी अस्सल कडक तपकीर मागितली—तर ती देऊं शकेल कां ? तें मिळण्याचें एकच ठिकाण—म्हणजे चंदेरी शिरावर लाल भडक आलवणाचा पदर घेतलेल्या आजीबाई—थोडी कल्पनाशक्ति ताणूं कां ? चंदेरी शिरावर—लाल भडक आलवणाचा पदर कसा दिसेल—सांगू—पैशांत दोन—पैशांत दोन म्हणून विक्ण्यांत येणाऱ्या बर्फाच्या काड्यावर—शिंपडण्यांत येणाऱ्या गुलाबी रंगाप्रमाणें—काय सांगत होतों मी मघाशीं तुम्हांला वरं—जें मागायचें तें तिथेंच मागितलें पाहिजे—असेंच नव्हे कां ? खरोखर ह्या लंगोटबंदीचा मला अगदीं कंटाळा आलेला आहे—! खरोखर—अहाहा—आठवलं मला—माझ्या मित्राचें लग्न—फार दूरचा मित्र होता तो—आठ दिवस सारखा रावत होतों—पंगतींत मट्ठा वाढला—चटण्या—कोशिंबिरी वाढल्या—नवऱ्यामुलीला बोलावून आणण्याकरतां धांवपळ केली—कोठीच्या घरांत—जिन्नस असून—' सांपडत नाहीं—सांपडत नाहीं—म्हणून ' किती वेळ घोंटाळलों—अर्ध्या वाटेंतून परत फिरून ' अरे हें विसरलों ' म्हणून किती खेपा केल्या—विड्या तोडतांना घोळक्यांत बसलों—वरातींत नवऱ्या मुलाच्या मोटारीच्या फलाटावर चढून नारळ फोडले—रडणाऱ्या मुलांच्या आयाजवळून—त्यांचीं मुलें—त्यांच्या बहिणीजवळ पोहोंचाविलीं—परंतु—आयुष्यांतील ' तांबडें ' अजून फुटावयाचें आहे हें नक्की, असें वाटूं लागलें ! कंटाळलों बुवा—वरं चाळींत राहावें म्हटलं तर चटकन जमतेसें दिसलें कीं, ' पाठ मऊ व्हायची '—वरं कुटुंबवत्सल घरांत भाडेकरी म्हणून प्रयत्न केला—तर विचारतात—विवाहित कीं अविवाहित ?—बायको माहेरीं कां सासरीं ? सनातनी कां सहभोजनी ? लग्न होत नाहीं म्हणून तळ-

मळतों—आणि पुन्हां मला म्हणतात, 'आम्हीं—कुटुंबवत्सला-शिवाय जागा देत्त नाहीं'—सरळ सांगितलें एका मालकाला 'एकादें कुटुंब द्या कीं गांठून आम्हाला—म्हणजे कुटुंबवत्सल होतों कीं नाहीं तें पाहा. दहापांच वर्षांत घरींच बालवर्ग तुकडी 'अ' निघण्याची पाळी येते किनाई ती'—ब्रह्मचर्य—मी म्हणतों लंगोटबंदी ज्याला—हें ऐच्छिक नाहीं अपरिहार्य आहे ! मॅट्रिकची परीक्षा पास व्हावें असें कुणाला वाटत नाहीं ! पदवीधर होणें आणि बोहोल्यावर उभें राहून 'शुभ मंगल' ही संसार—पदवी मिळविणें नाशिबीं लागतें ! आम्हीं लंगोवाले—धोतरवाले (संसारी) होऊं कां इच्छित नाहीं ?—परंतु आमची नाडी इतकी घट्ट आहे कीं—बिशाद कांहीं बरंवाईट होईल ?

× × ×

'लग्न करणें हा प्रत्येक तरुणाचा जन्मसिद्ध हक्क आहे,' 'ब्रह्मचर्य हें म्हाताऱ्याचें आयुष्याचें शेंवटलें टोंक होय—आणि लग्न ठोकून—संसार करून सौ. सहित बुधवारांतून नव्या पुलावर फिरायला जाणें—हें तरुणाचें ध्येय होय. लग्न ही तरुणाच्या आयुष्यांतील महाबळेश्वराची सफर होय—तर ब्रह्मचर्य ही विधुराश्रमांतील म्हाताऱ्यांची काशीयात्रा होय—लग्न हें तरुणाच्या आयुष्यातलें गोकुळ होय—तर ब्रह्मचर्य, हा सरत्या घडीचा आणि म्हातारपणीचा मशिदींतील नमाज होय. लग्न करणें—आमचा मारुतीराया ब्रह्मचारी राहिला ?—प्रश्न विचारतों तुम्हांला कुठल्या तरुणीला ही मूर्ति आवडली असती. सांगा पाहूं ? असल्या 'चले जाव सोटा छाप' मारुतीरायाशीं संसार करण्याची कुणाची माय व्यायली होती ? मारुतीरायांची लंगोटबंदी—ही अशी मुस्काटदाबीच आहे—! तुम्हांला काय सांगूं ? मारुतीरायाला जर कुणीं बोलते केलें—आणि जर कुणीं एकाद्या आगाळ—प्रसिद्धी भिक्षुक मुलाखत्या लेखकांनीं मुलाखत घेतली तर—अरे बापरे—सारे देव-

भक्त—त्यांतल्या त्यांत—नकोच पण आतां, पुरे—मारुतीरायाला आपणच प्रश्न विचारूं—वा मारुतिराया—सुंदर तरुणीकडे पाहून तुला कामदेवाचें रम्य मंदिर दिसतें कां मसूरचा ब्रह्मचारी आश्रम दिसतो ? किंचित् मिस्किल नजरेनें पाहाणाऱ्या तरुणीकडे पाहून तूं नऊ मुलें झालेल्या आणि P. W. D. खात्यांत काम करणाऱ्या कारकुनासारखी कां मान खालीं घालतोस ?—चांफेकळी नाक—मोगऱ्यासारखे दांत—काळेकुळकुळीत केस पाहून—तुला 'मोडून दंडा फेकून देइन भिकार भगवीं वस्त्रें' असें वाटतें, कां 'यमुनाजळीं खेळू खेळ कन्हैया—' ह्या पदाचें सूर जीभेवर नाचतात ? सिनेमाशो ला—'कौटुंबिक चक्रांत' (Family circle) बसणाऱ्या युगुलाकडे पाहून तुला 'हा नको नको संसार' असा मुडदेफरास संदेश सांगावासा वाटतो ? प्रेमरसानें अथांग ओथंबलेल्या वाक्यांतील—'आलिंगनें—चुंबनें—' त्यांचे मादक निनाद ऐकून तुला अजून—धुळें, अमळनेर—ह्यांची माहिती सांगणारा भूगोल आवडतो ? मारुतीराया बोल—एकदां—बोल—आणि तुझ्या ब्रह्मचर्याची ! लंगोटबंदीची—मीमांसा कर—तुझें व्याख्यान ऐकायला—पुण्याचा शिवाजी आखाडा (गुंडांसहित) सज्ज आहे—! श्रोतेहो—तो शनिवारचा दिवस केव्हां येणार ? तेल आहे—पण वात कुठें आहे ? आखाडा आहे—पण मारुतीराय कुठें आहेत ?—आतां अगदीं शेवटचा आणि निर्वाणीचा आणि सरता संदेश सांगून मी तुमची रजा घेणार आहे. लोकहो—आजपासून—लंगोटासकट—नाडीला—नाडीसकट लंगोटाला—माझा शेवटचा प्रणाम—

पाळणेबाज : : २

—एका म्हाताऱ्या माणसानें काटकसर करायच्या इराद्यानें घरीं हातानें—ती सुद्धां सेफ्टी रेझरनें दाढी—करण्याचें धाडस केलें—तेव्हांपासून—तो ज्याला त्याला सांगत असे—'दाढी म्हणे करून पाहावी'—चार दिवस (कोपऱ्यांत रुसुंबाई रुसुंबाई म्हणून नव्हे) बाजूला बसणाऱ्या सौ० वतीच्या नवऱ्यानें सांगावें—'स्वयंपाक म्हणे करून पाहावा'—'चट्' म्हणून एकाद्या तासाला जाऊन मुलांनीं 'गुलाबी रेवडी' उडाविलेल्या मास्तरांनीं सांगावें—'मास्तरकी म्हणे करून पाहावी'—फारसा पैसा हातीं नसलेल्या—आणि गांवांत उधारी करण्याइतकी थापेबाजी जवळ नसणाऱ्या माणसानें म्हणावें 'घर म्हणे बांधून पाहावें'—ज्याच्या शरीराचा शनवार वाडा—आणि मनाचा फुटका बुरुज झालेला आहे त्यांनीं कोंकलावें 'लग्न म्हणे करून पाहावें—'ध्यानांत आलें असेल तुमच्या मला काय म्हणावयाचें आहे तें—सगळे हे लेकाचें महात्मा गांधींचें मेषपात्र शिष्य आहेत—दम नाहीं त्यांच्या अंगांत—'शाळेंतुनी घुराला येता धरील पोटीं' ह्या काव्यचरणाच्या आधारानें असें म्हणतों—'लंगोटबंदी मुक्त दिनांतून—संसाराच्या आखाड्यांत उतरणाऱ्या—उत्साही तरुणाच्या तोंडून असे उद्गार निघतील काय? असे उद्गार निघणाऱ्या तरुणांनीं कुठल्याहि टॉनिकची जाहिरात वाचून—अंतःकरणांतील उत्साह खेंचून धरावा. 'मत डरना—ये लंगोटबाबू मत डरना' ह्या शक्तिवर्धक नि उमेदउत्तेजक काव्यचरणाचा जयघोष करावा.

× × ×

तो दिवस—अहाहा—देवा—फिरून वाटते—लग्न करावें तो दिवस—सारं मराठी प्रेमकाव्य त्या दिवसापुढें 'गायत्री' मंत्रा-

इतकें तुच्छ आहे—त्या दिवसापुढें रिकाम्या पडलेल्या दारूच्या बाटलीइतकें जग तुच्छ आहे—त्या दिवसापुढें परीक्षेनंतर लाथेनें तुडंविल्या जाणाऱ्या 'नोटा' इतकें जग तिरस्करणीय आहे—परंतु तो दिवस—आयुष्याची चांदरात—तो दिवस म्हणजे ताज-हॉटेलांतील एक रात्र—तो दिवस म्हणजे यार्डले ब्रिलियन्टाईन—तो दिवस म्हणजे काण्यांची पुणेरी मिसळ—महाराष्ट्र भुवनाचे सामोसे—तो दिवस म्हणजे—अत्र्यांचें तुफानी भाषण-वाचकहो,———त्या दिवसाची ' कल्पना थोडी आवरून धरा—तो दिवस तुम्ही समजता तो नव्हे—तो दिवस म्हणजे वधूपरीक्षेचा—मीं दिवाणखाण्यांत पाय टाकला—जिकडे तिकडे शांतता—सारे म्हातारे—कंबरेला उपरणी बांधून—आणि रुमालांची आलेलीं टोकें शेंडीसकट आंत घालून—उभें राहून 'यावें'—असें सुस्वागतमच्या स्वरांत म्हणाले—थोड्या वेळानें नारिंगी रंगाचें तलम परंतु गोल——असें पातळ नेसलेली मुलगी——मेजावर येऊन बसली——तिनें केसरी वाचला (त्या दिवसापासून लग्न होईपर्यंत मी केसरी वाचत असें)——'मुली वर पहा' माझ्याकडे तिनें पाहिलें——आपला तारुण्य-गुलकंद 'खलास झाला'——'डोळे हे जुलमी गडे'——ही रेकार्ड डाळ्यापुढें उभी राहिली——सिनेमांतल्या साऱ्या सुनेत्रा अभिनय तारका——लख्खन् उभ्या राहिल्या——आणि 'निवडून आलों' ——ह्या विजयानंदांत 'सासुरवाडीचें' 'व्होटी स्टेशन' सोडलें——

डेक्कन क्वीनच्या वेगानें लग्नसमारंभ उरकला——आणि आयुष्याच्या 'व्हिक्टोरिया टर्मिनस'वर येऊन धडकलों—V. T चा अर्थ मी अनुभवानें असा करणार आहे–Where victory terminates—आयुष्याच्या विजयाचा तो पूर्णविराम होय.

× × ×

लग्नानंतरचें पहिलें वर्ष म्हणजे मॅट्रिकच्या तडाख्यांतून सुटून कॉलेजमध्यें प्रवेश करणाऱ्या उंडारलेल्या तरुणांचें आयुष्य—लग्नानंतरचें पहिलें वर्ष म्हणजे खेडेगांवांतून व्ह. फा. पास होऊन इंग्रजी शिक्षणाकरितां येणाऱ्या उत्साही आणि अवखळ खेडवळाचा चळवळेपणा—लग्नानंतरचें पहिलें वर्ष म्हणजे नवीन सायकल शिकलेल्या उत्साही तरुणांच्या गांवांत वेळीं अवेळीं होणाऱ्या चकरा—लग्नानंतरचें पहिलें वर्ष म्हणजे नुकतेंच काव्य करूं लागणाऱ्या 'कच्च्या कवीचा' वाटेल त्या विषयावर होणारा बलात्कार—वेळ पाहिली नाहीं काळ पाहिला नाहीं आणि दिसेल तो सिनेमा—आणि असेल तें थिएटर—अशा उकळत्या उत्साहांत—संत नामदेव-चित्रपट पाहिला ——प्रभातचा माणूसहि पाहिला—आणि रणजितचा तुळशीदास तो सुद्धां पाहिला——सकाळीं पर्वतीकडे——संध्याकाळीं प्रभातकडे—— कधीं मंडई तर——कधीं कापडाचें दुकान——कधीं 'बुवाचें आइस्क्रीम' तर कधीं तुळशीबागेंतील राममंदीर बाजारांतील खरेदी—— त्या वर्षांत काय केलें तें एक आमच्याकडे टेहाळणीच्या नजरेनें पाहाणाऱ्या——चांडाळचौकडीना ठाऊक——! संपलं——वर्ष झालें ——तिला कसेसेंच होऊं लागलें——ती खराब दिसूं लागली——तिला जिना चढवेना——तिनें वाचायला कधी. केसरी मागावा तर कधीं रेल्वे गाईड मला विकत आणा म्हणून सांगावं—कधीं भेळ आणा म्हणून मागें लागावें तर——चिवडा आणा म्हणून सांगावा——कधीं पातळाचा नाद धरावा—तर कधीं पुणेरी जोडा आणा म्हणून सांगावें— कधीं मच्छरदाणी हवी म्हणून हट्टून बसावें——तर कधीं कधीं पलंग हवा म्हणून घोंगडीवर झोंपावें—कधीं ज्योत्स्ना भोळेची भावगीत तर कधीं रायटिंग पॅडचा डफ करून——'टुई—टुई—' म्हणून केसाचें तुणतुणें (प्रभात 'डायरेक्टर कीं जय') करून 'लक्ष्मुबाई ——झांशीची राणी' असा पोवाडा म्हणावा——तिच्या ह्या 'स्वैर संचारी' वागणुकीचा शेवट काय होणार असें मनांत कुठें येतें ना

येतें—तोंच माझ्या टेबलावर 'आमच्याच दवाखान्यांत उत्तम सोय, दहा दिवसांचा अल्प आकार' अशा जाहिराती येऊन थडकूं लागल्या—तेव्हां कळलं कीं आपण—'हिंदुस्तानचे' संतान-निर्मितींत फूलना फुलाची पाकळी अशी भर टाकणार— !

× × ×

—'पेढे–पेढे' म्हणून माझी माझ्या मित्रांनीं पाठपुरवणी केली. रस्त्यांत दिसला ओळखीचा 'आहे बुवा पेढे'—घरीं परीट आला–'पेढे' मोलकरीण धुणें वाळत घालतांना 'मालक पेढे हवेत हं' (मुरक्यासहित)—ज्या मुलीवर मी प्रेम करीत होतों अशी माझी समजूत होती–त्या आळींतील मुली (कदाचित् सुटला हा त्रास ह्या जाणिवीमुळेंच कीं काय) पेढे म्हणून मागणी करीत होत्या—सायकलीवरून वाममार्गानें (Wrong side) जात असतांना —पोलिसानें दम भरून सांगितलें उद्यां पावशेर पेढ्यासहित फरसखान्यांत हजर (कालांतरानें कळालें हा माझा शाळूसोबती नि सौ. च्या गांवचा भातुकली मित्र होता) राहा—पेढे संपले—खरंच देवा—अरे काय रे तूं अगदीं अरसिक—पुरुषाच्या आयुष्यांत एकादां जरी बाळंत होण्याचा प्रसंग आला असतां तरी—तो आनंदानें पुरुषानें सहन केला असतां—देवा, ती अंधारी खोली त्यांत तो धूप–ती उबेकरितां जळणारी शेगडी–सकाळ–संध्याकाळ अंगमर्दन—डिंकाचे, आळीवाचे लाडू—दहाव्या ठोक्याला लोण-कढ्या तुपाच्या वाटीसहित जेवण—मसालेदार विडा—अधून मधून—'सुपारी हवी—विडा हवा—' म्हणून होणाऱ्या पति-राजांच्या खेपा—बाळंतीणीची अंधारी खोली ठेवण्यांत फार मोठें काव्य सनातन्यांनीं राखलें आहे असें मला वाटतें—देवा—हा आपण भेदभाव कां केलांत ह्याचं कारण मला आतां कळालें—लबाड आहांत आपण—वृक्ष पारिजातकांचा सत्यभामेच्या दारीं—

आणि फुलें मात्र रुक्मिणीच्या आवारांत--जिथें पिकतें तिथें विकत नाहीं--देवा असेंच ना ! आतां ही चूक ह्या जन्मीं सुधारतां येणें शक्य नाहीं. देवा--आम्हीं पुरुष लोक असें करणार आहोंत--दिवाळी--दसरा--ह्या संणाप्रमाणें--'बाळंतदिन दहा दिवस' अंधाऱ्या खोलींत डिंक--आळीव--धूप--ह्या थाटांत पाळणार--पण छे--बाज पाहिली परंतु अजून त्यांच्या खालीं जळणारा विस्तव पाहिला नाहीं--डिंक पाहिला परंतु--अजून रक्ताचें पाणी करून 'क्यॉ--क्यॉ' रडणाऱ्या कारट्याचें किंचाळणें ऐकलें नाहीं--ती दुपट्टी--तीं बाळंतीं--अरे बापरे--'दर वर्षीं खेशांच्या किंवा हनुमान डायऱ्या' प्रमाणें रोजनिशी इतकीच निरस आणि वर्ष सरताच कोंपऱ्यांत धूळ खात पडणारीं लेंकरें पाहिलीं कीं--अतःकरणाचा अगदीं 'आइस फ्रूट' होतो--लंगोटबंदी तरुणाचा संसार म्हणजे शून्य गुणिलें वाटेल ती संख्या--आणि लंगेबाज तरुणाचा संसार म्हणजे 'चे' चा प्रकार ! संसाराच्या अंकगणिताची सुरवात गुणाकारापासून होते आणि शेवट--! मारवाड्याचे पैसे उसनवार काढणारा कर्जबाजारी व्याजाखालीं मरायाचा--मुद्दलाची फेड कधीं व्हायची नाहीं--त्याप्रमाणें--दरसाल दरशेंकडा (बाळंतपणाचा खर्च) एक मुलगा अगर मुलगी ह्या व्याजाच्या दरानें फेड करावी लागते--

× × ×

बग्याचा खोकला संपला--मनीला आव सुरूं झाली--मनीची आव बंद झाली--ठकीला दांत येऊं लागले--ठकीचे दांत संपले --पुन्हां बग्याला गवर आला and so on. तेवढ्यावरच थांबलें तर बरें, नाहींतर पुन्हां सौ०वतीच्या वांत्या सुरूं झाल्या कीं आटोपलाच बाजार--! पूर्वीचे लाकडी--आणि वीणीचे पाळणे बदलून किर्लोस्करी पाळणे खरेदी करण्यापर्यंत पाळी आली. डोकें-दुखीवर

मेंथॉल--तापावर क्किनाईन--अशीं ठराविक औषधें फळकटावर दिसावयाचीं--त्याचप्रमाणें आढ्याला टांगलेला पाळणा--आणि माळ्यावर पडलेली बाज--ही सुद्धां बाळंतपणाकरितां खास 'राखीव' ठेवलेलीच असावयाची--! पुरुष--पाळणेबाज--संसारी पुरुषांना मी पाळणेबाज म्हणतो--संसारी माणसाच्या घरांत पाळण्याची 'दोरी' कुणाच्या तरी हातांत असावयाची आणि 'नीज बाळा रे' ह्या अंगाई--गीताचे स्वर कानांवर पडायचे--कांहीं माझे प्रेक्षक म्हणत असतील--पाळणा नको का ? हवा आहे--आम्हीहि त्याच पाळण्यांत झोके घेतले होते--त्याच पाळण्यामुळें जगाच्या मनोहर पसाऱ्यांत येऊन पडलों--आहोंत. इतकेंच सांगावयाचें--झोके फार होतात--घेरी येईपर्यंत झोके घेण्यांत मौज आहे कां ?--तरुणांनो, तुम्हांला हें दृश्य आवडतें कां ? सांगू कोणतें तें ?--तुमची पत्नी कृश झालेली आहे--तिच्या अंगावर ज्या मुलाचें वजन किंमान पक्षी पांच्च पौंड भरणार नाहीं इतकें आहे--मागें--अडीच तीन वर्षांचें पोर रडून कहर करीत आहे--दुसरा मुलगा अंगावर दूध सांडून घेत आहे--चिडक्या स्वरानें-नि त्रासिक आवाजांत आई म्हणते--'मरा मेल्यांनो'--चुलींत गेलांत तर बरं होईल ? ऐकवतील कां हे तुमच्यानें शब्द ?--बब्याच्या सदऱ्याचें टिळक पंचांग झालें आहे--छबीच्या झग्याचा हवेली तालुका झालेला आहे--हणम्याच्या सावरकरी टोपीचें रूपांतर 'गांधी टोपींत' झालेलें आहे--धोतराला गिलावा दिलेल्या भिंतीप्रमाणें ठिगळें दिलेलीं आहेत--बायकोचीं पातळें, केव्हां विरून जातील त्याचा नेम नाहीं--पानावर बसलें कीं--भातावर वास येणाऱ्या तुपाचा अर्धा न भरलेला चमचा--संध्याकाळीं लाल चहा घेतांना दाराशीं 'साब पैसे लाव' असा दम देणारा मालकाचा भैय्या--विचार पटतात कां माझे ? पटत असतील मनांतून परंतु बोलून

दाखविण्याचें धाडस होत नसेल—मग पाळणेबाज पुरुषांनो—'बालबंदी' (संतति नियमन) करा—आणि संध्याकाळीं थंड अशा हवेंत कडेवर एक—बाबागाडींत एक—मागें बालू, त्याच्या हातांत मंडईची झोळी—अशा थाटांत—हंसत—हंसत आनंदानें फिरायला जा—ही आयुष्यांतील संध्याकाळ केव्हां बरं उजाडणार !

कशाला उद्यांची बात : : ३

भरलेला गरम चहाचा कप ओंठाला तासा भरानें लावला तर —?— आईसक्रीमची प्लेट जरावेळानें खाऊं म्हणून तशीच दूर ठेवली तर ? — तव्यावरून उतरलेली पोळी मग खाऊं म्हणून म्हटलें तर ? वाटलींतून फसफसणारा सोडा जरा वेळानें प्यालों तर —? परटीकडून आणलेले कपडे तसेंच ठेवले तर ? हंसऱ्या नि खेळकर मुलानें चुंबनासाठीं तोंड पुढें केल्यावर—मग घेऊं म्हटलें तर--फारा दिवसानें माहेराहून परत आलेल्या बायकोशीं 'वेळ नाहीं' म्हणून बोलण्याचें टाळलें तर ? गाईच्या सडापासून दूर केलेल्या चरवींतील दूध 'तापविल्यावर' पिऊं म्हटलें तर ?--नाहीं चालणार—आज जें करायला हवें—जें केलें नाहींतर त्याची चव जाईल--त्यांतील खुमारी जाईल—अशा ह्या गोष्टी आहेत— असें नाहीं' कां तुम्हांला वाटत--आयुष्यासंबंधीं सुद्धां माझी हीच कल्पना आहे—आयुष्याचा ताजेपणा टिकत नाहीं—जोंपर्यंत तो आहे तोंपर्यंत अगदीं भरपूर हंसलें पाहिजे—नाचलें पाहिजे —भांडलें पाहिजे—रडलें पाहिजे—प्रेम केलें पाहिजे—निराश झालें पाहिजे—परंतु वाटेल तें करून—कांहीं तरी केलें पाहिजे— शस्त्र वापरलें पाहिजे—नाहीं तर तें गंजतें--आयुष्य वापरलें पाहिजे--नाहींतर गंजेल-फार मोठी माझी तक्रार आहे-तें वापरता येत नाहीं—त्याचा ताजेपणा टिकवितां येत नाहीं—आयुष्य माणूस —वापरीत नाहीं--तो कुजवित आहे--त्याच्या हातांत ताजें फूल दिलें तर--तो देवाकरितां ठेवील—त्याला सुंदर सुंदर पदार्थ दिले --अपचन होईल म्हणून—हात राखून खाईल'--मलबार हिलच्या माथ्यावर बसायला सांगितलें तर तो 'घड्याळांत किती वाजले' हें पाहून तो घरीं जाईल--एकाद्या सुंदर तरुणीनें हातांत हात दिला तर--बांगड्या फुटतील म्हणून--कुचराई करील--

नाचणाऱ्या हंसणाऱ्या तरुणींच्या तांडयांत नेऊन सोडले—' खालीं पाहून तो नीति टिकवील—क्रिकेट मॅच पाहाण्यासाठीं कौंचावर बसला तरी—दुर्बीणींतून मॅचशिवाय इतरत्र दृष्टि वळवून बघणार नाहीं—अशा वृत्तीच्या लोकांच्या संबंधीं माझी तक्रार आहे—अशा लोकांना ताजेपणा टिकविण्याकरितां तयार करायाचें म्हणजे—म्यु. पालिटींतील मुकादमाला ' शुभ बोल नाऱ्या ' म्हणून सांगण्यासारखें आहे—अशा लोकांना ताजेपणा टिकविण्याकरितां तयार करावयाचें म्हणजे पोलिसाला, ' नम्र कसें वागावें ' हें शिकविण्यासारखें आहे—मोटार एजंटाला ' एक भाव ' सांगण्याची विनंति करण्यासारखें आहे—किंवा ' बूट पॉलिश ' करणाऱ्या मुलांना—' बूट पॉलिश ' म्हणून विचारूं नका असं बजावून सांगण्यासारखें आहे—अशा लोकांची ही वृत्ति होण्याचीं कारणें शोधण्यांत फार मौज आहे—परंतु माझ्या मतें कारणें शोधण्यापेक्षां—जर त्यांच्या जीवनांतील ठळक प्रसंगांकडेच—भेदक नजरेनें पाहिलें—तर असल्या आळणी वृत्तीचें कारण—चावणारा ढेंकूण—जसा चटकन हातीं सांपडावा—तसें खात्रीपूर्वक सांपडेल.

× × ×

फार गंमतीदार दृश्य आहे तें. संध्याकाळीं मी एका गृहस्थाला भेटावयाला गेलों होतों. तो गृहस्थ घरांत नव्हता—परंतु घरांत मुलांचा गोंगाट आणि बाहेरून दाराला लावलेलें कुलूप पाहून—भुतचेष्टा आहे कीं काय असें मला वाटलें—राम-नामाचा जप करीत दोन चार हांका मारल्या—' बाहेर गेले आहेत '—' कोण सुमन—तूं आणि बाहेर कुलूप—! "—' आई नि बाबा फिरायला गेले आहेत—मुलें माझ्या अंगावर टाकून गेले आहेत.'

मुलांना कोंडून ठेवून—फिरायला जाणाऱ्या आईबापांना—' गाढव ' म्हणावें कां ' मूर्ख म्हणावें ' येवढाच प्रश्न आहे—खरो-

खर ज्या मुलींनीं आपल्या बरोबरीच्या मुलीबरोबर—हंसत खिद-ळत फिरायला जायचें–गप्पागोष्टी करून वेळ गमतीनें दवडायचा–अशा मुलीला मुलें संभाळून तिला पुढें ' बाळंतगृहांत ' नर्स म्हणून कां काम करावयाला जायचें आहे ? कांहीं लोक म्हणतील—तिला भावी मातृत्वाची जाणीव व्हावी–आई ग थांवतो थोडे–आई आपांच्या दरवर्षाआड प्रसिद्ध होणाऱ्या प्रकाशनाची–आवृत्ति अंगा-खांद्यावर खेळवायची हो ह्या मुलींनीं ?–जसें कांहीं तिचें लग्न व्हायचें नाहीं—जन्मभर ती कुंवारच राहणार आहे—अशी गोष्ट आहे होय—! मुलें संभाळण्याचें काम करायला ती कोकणांतील बालू आहे कां स्वयंपाकीण बाई आहे—! कधीं तुम्ही तरुण मुलीला मुलांशीं बोलून देतां ? कधीं त्याच्याबरोबर फिरायला धाडतां ? कधीं त्यांच्या मनासारखीं पातळें नि रंजन करणारीं पुस्तकें आणून वाचायला देतां ? संध्याकाळ झाली, एकटी—खिडकींत राहू नको उभी—फुगे काढू नकोस—नाटकांत काम करूं नकोस—शाळेस जाऊन धिटा-ईनें भाग घेऊं नकोस—एकटी गांवाला तर दूरच राहो—फिरायला जाऊं नकोस—पुरुषांत मिसळू नको–? हसूं नकोस फार मोठ्यानें–कां तर संस्कृति बिघडेल—ही सारी तयारी कशाकरितां—माता होणार आहेत म्हणून—वेडे आहेत हे सारे लोक—तुम्हीच म्हणतां ना सनातनी विचाराच्या रसगुल्यांनो–कीं जीवित क्षणभंगुर आहे–जीवित जर क्षणभंगुर आहे—तर मग जें तारुण्य आहे तें अमर आहे कां ? ' मग कशाला उद्याची बात ' असें म्हटलें तर चुकीचें होईल कां ?

× × ×

लहानपणापासूनच मुलाच्या पाठीमागें लकडा ' पैसे मिळवा–' ' पोट मोठें वाईट आहे ' ' संसार हा असार आहे ' ' खोटं कधीं बोलूं नकोस ' ' इकडे तिकडे पाहूं नकोस–' खरोखर—त्याला हें

सांगण्यापेक्षां त्याला हें कळालें तर फार बरं होईल—अनुभवानें होऊ द्याना शहाणा त्याला—उद्यांकरितां तयारी करून—त्याच्या आयुष्याचें मुंबई ऑफिस कां करतां ? त्याला उद्यां काय घडणार आहे हें सांगून—त्याच्या आयुष्याचें 'शाळेंतील' अभ्यासाचें वेळापत्रक कां करतां ? पुढें पैसे मिळवावे लागतील ह्या भीतीनें त्याला लागणारें पैसे—(अर्थात आज) कां देत नाहीं ? त्यानें कधीं प्रवासाला पैसं मागितले—'मी बेकार आहे'—कधीं हौसेचा कपडा हवा म्हणून मागितला 'महागाई फार आहे'—अमकें परवडत नाहीं—तमकें शोभत नाहीं—लहान वयांत कादंबऱ्या वाचू नकोस—मग काय त्यांनीं ज्ञानेश्वरी वाचायची—फिरायला बेलबागेंत जायचें ? सिनेमा नाटकें सोडून कीर्तनें ऐकायचीं—क्रिकेट मॅच पाहायची सोडून घरीं त्यांनीं वडिलासाठीं 'केसरीच्या फाईला' कां लावत बसायचें ? ओळखीच्या मुलीशीं बोलायचें सोडून स्वयंपाकास येणाऱ्या आजीबाईशीं कां गप्पा मारायच्या ? बरोबरच्या मित्राबरोबर फिरायला न जातांना त्यानें वडिलामागें आठ हात अंतरावर मंडईची झोळी घेऊन डुलत डुलत त्यांच्या पाठीमागें कां जायचें ? नापास झाल्यावर—त्याला रडवायचें कां हंसवायचं ? प्रेमभंग झाला कीं त्याला मारायचें कां त्याचें शांतवन करायचें ? त्याच्यासाठीं मुली आपण पाहायाच्या कीं—त्यांनीं—लग्नाच्या मुली म्हणजे काय विश्वविद्यालयांनीं नेमलेलीं क्रमिक पुस्तकें आहेत कीं काय—? बापाच्या संमतीनें ठरलेली मुलगी मुलानें केली पाहिजे—?—दररोज दाढी करायला लागला—कीं आज सोमवार एकादशी—मोकळ्या मनानें बोलायला लागला—'अमर्यादा होते आमची'—'पुरे आतां थिल्लरपणा—'संसारी व्हायचें तुला ?—संसार इतका कां मोठा कठिण आहे ? काय दहशत घालून ठेवली आहे आम्हां तरुणांना ह्या लोकांनीं—अमकें केलें—पाप लागेल—तमकें केलें—पुढच्या जन्मीं नरकांत पडशील—अमकें करूं

नकोस, कारण तुझ्या मुलाबाळांना हें नडेल—आणि पुन्हां अधून मधून देवाची 'दहशत'—! तरुणांनो अजीबात ह्या गोष्टीकडे लक्ष देऊ नका—तरुणांना मी तरुण आहे—मला जगायचें आहे—आज—उद्यांची तयारी म्हणून नव्हे—उद्याकरितां जगणारा माणून बेअकली आहे—वीस वर्षांनें हातीं येणाऱ्या पैशाकरितां 'आयुष्याचा विमा उतरणारे लोक वेडे आहेत'—आज बाळकें राहून उद्यां लट्ट होऊं ह्या आशेनें जगणारे लोक—दुधावरची साय न खाणारे आहेत—केव्हां नजर चुकून मांजरी खाऊन जाईल ह्याचा नेम नाहीं—आज उधार देऊन उद्या रोखीचें गिऱ्हाईक जोडणारा व्यापारी यशस्वी होतो का ? आज भूक लागली असतां उद्यां पैसे मिळणार म्हणून उपाशी कोणी राहूं शकते ? उद्यां मरणार म्हणून आज मृत्युपास आणि मयतीचें सामान घरांत कोणीं आणून ठेवलें आहे कां ? आज जो चांगल्या रीतीनें जगणार नाहीं त्यांनीं उद्याची काळजी कशाला करावी—आज हसून घ्या—उद्याचे उद्या—परंतु ज्यांना आजचाच पत्ता नाहीं—त्यांनीं 'उद्याची बात कशाला करावी ?' ज्याच्यापुढें आज गरम चहा तयार नाहीं त्यांनीं—तो तसांच ठेवावा कीं घ्यावा ह्याची उठाठेव कां करावी—आज आइस्क्रीमची प्लेट ज्याच्यापुढें नाहीं—त्यांनीं ती तशीच ठेवावी कीं नाहीं—ह्यासंबंधीं विचार कां करावा—आज जें आहे तें आज—उद्याची गोष्ट उद्याला—असें निक्षून मला सांगावयाचें आहे—माझें जीवनाचें तत्त्वज्ञान वरवर पाहणाऱ्याला उथळ वाटेल—परंतु त्यांनीं थोडा विचार करावा—आणि मग मला विरोध करावा—जळणाऱ्या सिगारेटनें मी जगणार म्हणून डौल मारावा—! आकाशांतून पडणाऱ्या पावसानें मी जागा सोडणार नाहीं म्हणून चालेल ? पाण्यांत पडलेल्या माणसानें मी कोरडा राहीन म्हणून म्हणावें—तरुणानें मी तरुण नाहीं म्हणून कां म्हणावें आणि तसें वागावें—

त्याला तसें वागण्याचा अधिकार आहे—बाल्य--तारुण्य--आणि वार्धक्य—हे आयुष्याच्या इमारतीचे मजले आहेत--असें तुम्हांला वाटत असेल—तसें वाटत असेल तर तें खोटें आहे--कसें म्हणाल सांगतों--लहान मुलें म्हातारपणापर्यंत जगूं शकतात कां ? लहान मुलें तारुण्याच्या उमेदींत खलास होत नाहींत कां ? कांहीं इमारतींला ७ मजले असतात--कांहीं-कांहीं ४ मजली असतात, कांहीं—एक-मजली असतात-कांहीं कांहीं पाया खणतांनाच अपुऱ्या भांडवलाच्या अभावीं--तशाच राहतात ! खरें आहे ना हें ?—आयुष्याचें हें अगदीं असेंच आहे. म्हणून माझें म्हणणें आहे--पुन्हां पुन्हां सांगतों—निक्षून—अंतःकरणापासून सांगतों—'कशाला उद्याची बात' ! आज बोला—उद्यां बोलतां येईल कीं नाहीं सांगतां यावयाचें नाहीं--आज डोळ्यांनीं गिरिसप्पा पहा--काश्मिर पहा--उद्यां डोळ्यांनीं दिसेल असें सांगतां यावयाचें नाहीं—आज हंसा--उद्यां हंसण्यासारखें घडेल हें सांगतां यावयाचें नाहीं—आज पोटभर जेवा—उद्यां मिळेल कीं नाहीं तें सांगतां येणार नाहीं--आज ताजेपणानें जगा--कारण उद्यां मरण केव्हां झडप घालील ह्याचा भरंवसा नाहीं—परंतु उद्यां मरणार म्हणून—आज स्मशानाच्या मार्गाकडे पावलें वळवूं नका—

लुंगी नि कांसोटा : : : ४४

—अगदीं परवांची गोष्ट. गणपती–उत्सवांत एका संस्थेचे चिटणीस माझ्याकडे आले नि मला म्हणाले, 'वाडेकर—आपलं व्याख्यान व्हावं अशी आमची इच्छा—कंटाळवाणें झालें न पाहिजे—हंसवा.' वर्तमानपत्राच्या स्तुतीला ज्या प्रमाणांत किंमत देतो—आम्हीं तुमचें अत्यंत आभारी आहोंत (पै पाव आणे देणें लागत नाहीं ह्याची लेखी पावती—माझा अर्थ)—आपण आल्यानें मंडपास विशेष शोभा येईल——घोरपड्याच्या काळ्या शाईपासून ते स्वॉनइंकची स्तुती ज्या आत्मीयतेनें दुकानदार करतो—त्या नजरेनें मीं माझ्याबद्दल काढलेल्या उद्‌गाराकडे पाहिलें—शिवाय नकलाकार—पोवाडेवाले—रेडिओ–तारका—पैशाशिवाय पाऊल टाकत नाहींत—व्याख्यात्याला कपभर चहा—संध्याकाळीं कार्यक्रमाकरतां उपयोगांत आणलेला हार, रात्रीच्या व्याख्यानाला—पुन्हां बंदोबस्ताची जरूर नाहीं. विषयाकरतां निकड लावली—शेवट विषय जाहीर केला 'लुंगी नि कांसोटा'——मीं जाहीर केलेल्या विषयानें एक प्रकारचें कुतूहल निर्माण केलें——येथें पीयूष मिळेल—म्हणून आंत घुसावें नि फुळकवणी पदरीं पडावी—'कुमारिका म्हणून प्रेमयाचनेकरतां तयारी करावी——नि म्यु. शाळेंतील मास्तरीण ठरावी'—'गांधी म्हणून पाया पडायला जावें तों शेळी पुढें 'दत्त' म्हणून उभी राहावी—' असाच प्रकार विषयामुळें होईल कीं काय, अशी मला भीति वाटूं लागली—

× × ×

—'विषयाच्या संगतीं गदीं होई बहुत ती' असा मी नवा अभंग म्हणून बोलायला सुरुवात करतो—अशा रात्रीच्या वेळीं—आपली थोडीफार अडचण करून—थोडीफार कळ सोसून—

बराच वेळ ताटकळत उभं राहून—जें—आपण माझें भाषण ऐकायला तयार झालांत—ह्याबद्दल मी वर्तमानपत्राच्या संपादकासहित तुमचे आभार मानतों—आजच्या सभेला—लंगोटी नेसणाऱ्या बाळूपासून लेहेंगा नेसणाऱ्या बाळासाहेबांपर्यंत तरुण हजर आहेत—मिशाशीं दंगामस्ती करणाऱ्या—आणि केसांची कांपणी करणाऱ्या घरगोती—आणि धंदेवाईक कारागिरापर्यंत माणूस 'ठेंचून' भरलं आहे—मुरका मारणाऱ्या तरुणीपासून—वार्धक्यामुळें डुगडुगणाऱ्या मानेला सावरणाऱ्या स्त्रिया हजर आहेत—परकरी पोरीपासून—पैठणो नेसणाऱ्या नारी हजर आहेत—जाणत्या, वयांत आलेल्या (कायद्याच्या दृष्टीनें हं) तरुणीपासून—' हा नको नको संसार—पुरा वीट आला ' अशा वृत्तीच्या तरुणी हजर आहेत—त्या सर्वांना खूष करणें एकट्याच्यानें झेंपणार नाहीं—विषयासंबंधीं फार घोंटाळा माजला आहे—' कुणी म्हणतो शंकरराव देवाच्या लुंगीला हात घालूं नका—— ' ' कुणी म्हणतो तुमचा हात × × × कां घालतां ? '—विनयभंग होईल ! कुणी अर्थ असा केला ' लुंगी नेसतां कां सोटा घालूं पाठींत '—अक्कलहुशारीनें असें सांगतों—मी कुणाला लुंगीचा कासोंटा घालायला सांगणार नाहीं—आणि कांसोट्याची लुंगी करा म्हणून सांगणार नाहीं——मी सांगणार आहे——हो अजून सांगणार आहे—नुकतेच अकरा वाजले आहेत——इतक्यांत घाई——जरा दमानें——जें सांगणार तें आजकालच्या गोल पातळ नेसणाऱ्या स्त्रिया आणि पूर्वीच्या कांसोटा घालणाऱ्या स्त्रिया——पूर्वीचे खोपे—नि आतांचे झेंपटे—पूर्वीच्या एका दमांत ३५ भाकरी करणाऱ्या स्त्रिया—आणि——दोन फुलक्या करतांच ' अय्या ' म्हणून ' निश्वास ' टाकणाऱ्या स्त्रिया—पूर्वीच्या ' इश्य—भारीच बाई नाहीं तरी ' म्हणणाऱ्या म्हाळसाकाकू नि अलिकडच्या ' अय्या ' म्हणणाऱ्या मालिनीबाई—ह्यासंबंधीं !

× × ×

आजच्या अफाट जनसमर्दीत—कांहीं कांसोटेवाल्या आणि कांहीं लुंगीवाल्या स्त्रिया असतील——प्रथम मी कांसोटेवाल्या स्त्रियांचा समाचार घेणार आहे. कांसोटेवाल्या स्त्रियांसंबंधीं मी अगदीं छातीला (अर्थात् माझ्या) हात लावून सांगतों—त्या 'घट्ट पण मट्ठ' स्त्रिया आहेत—शरीरप्रकृतीनें घट्ट म्हणजे अगदीं चक्का सव्वा रुपया शेर——दहावीस रव्या घेऊन घुसळल्याशिवाय ताक होणार नाहीं अशा——किंवा घट्ट म्हणजे दोन दोन वर्ष पुणेरी जोड्याप्रमाणें टिकणाऱ्या. पूर्वीच्या कांसोटेवाल्या स्त्रिया—म्हणजे मावळी घोंगड्या—दिसायला ओबडधोबड—वीण भक्कम, ऊब—घाम कडाक्याच्या थंडींत फुटेल इतकी——शरीरप्रकृतीनें इतक्या सणसणीत कीं ह्या श्रावणीला जानवें घालावें—तें त्या श्रावणीला 'यज्ञोपवीत धारण' करण्याचें वेळीं तोंड म्हटल्यानें तुटायचें नाहीं, इतक्या—! मट्ठ अशा अर्थानें म्हणतों—कीं जें कपाळीच्या कुंकवाचा मालक ताटांत वाढून ठेवील—त्या अन्नावर खूष—'इकडे आवडत नाहीं म्हणून'—जणू मनाचें ओंकारेश्वर करून घेतलें. कांसोटेवाल्या स्त्रिया—एका अर्थी राणीच्या बागेंतील दिखाऊ——टिकाऊ——परंतु परतंत्र अशा वाघिणी——दिवेलागणीच्या आंत घरांत——! फिरणें 'मारुतीला अगर गणपतीला'—वाचन 'हरिविजय, रामविजय'—करमणूक पोथी—कीर्तन——चर्चा—रमाकाकूंच्या सुनबाईला 'मुका' मुलगा झाला—ठमाकाकूंच्या सुनबाईला वांत्या सुरू झाल्या——ह्याला मुलगा झाला——त्याला मुलगी झाली——सणाला पक्वान्न काय केलें होतें——आज भाजी कोणती——ह्याशिवाय दुसरी बात ठाऊक नाहीं—व्यायाम—घरचें दळण—कांडण——धुणें—पाणी—! थंडी येवो—पाऊस येवो——हिंवाळा येवो—उन्हाळा येवो——दोन चोळ्या—दोन लुगडीं——ह्याशिवाय कपडा ठाऊक नाहीं—बाळंतपणाशिवाय विश्रांति ठाऊक नाहीं—बाळंतपणानें झिजायच्या नाहींत—मुलाच्या

किरकिरिमुळें कधीं कंटाळायच्या नाहींत–दीड वर्षाआड पाळणा असला—तरी भाकरी नि तूप––ह्याशिवाय अन्न ठाऊक नाहीं—लग्नसमारंभांत—पोटांत पोर––कडेला पोर—नाकांत नथ अडकवून––पांच पंक्ती वाढून पुन्हां पुढल्या पंक्तीकरितां कंबर कसून तयार––कधीं हुश्य––ठाऊक नाहीं––कधीं भोंवळ नाहीं––भोंड नाहीं––असल्या खणखणीत––असल्या घट्ट कांसोट्याच्या परंतु मठ्ठ बुद्धीच्या स्त्रिया––इ. सन्नापूर्वी होत्या––अजूनहि तुरळतुरळ —स्वयंपाकघराच्या आसपास दिसतात—' गेले ते दिवस '—ह्याच न्यायानें ' गेल्या त्या स्त्रिया ' असें म्हटलें तर चालणार नाहीं कां ?

× × ×

आमच्या नाशिकीं—तरुणांच्या नाशिकीं—लुंगीवाल्या स्त्रिया आल्या आहेत—तरुणांनो—लुंगीवाल्या असल्या तरी—' आलीया भोगासी असावें सादर.!—तयार ऐस ! लुंगीवाल्या स्त्रियांनो—तुम्ही आपलें वजन एकदां स्टेशनच्या कांटयावर जाऊन करा—तुमच्या सांठवणीच्या लुगड्याचें––तुमच्या सौंदर्याच्या टिकाऊपणासाठीं 'बासनांत' असणाऱ्या सामानाचें—वजन तुमच्यापेक्षां नक्की दहा पौंडानें अधिक भरेल—मराठींत एक अश्लील म्हण आहे—करूं कां उच्चार–पण नको—आलें असेल लक्षांत तुमच्या ! तुमचा चेहरा मुंढवा पेपर मिलच्या कागदासारखा 'पिवळा'—तुमचे गाल धान्याचे अपुरे भरलेल्या मापासारखे खोल गेलेले—तुमचे डोळे—एस्. एम्. आर. लाईनवरील कोणत्याहि स्टेशनयार्डमधील दिव्याइतके निस्तेज—तुमची मान 'सिग्नल—' सारखी पडलेली––तुमची हनुवटी मोदकाच्या वरील भागासारखी चिंचोळी––तुमची छाती––गंजीफ्राक घालून––जर खालीं लंगा नेसलात तर––स्त्री म्हणून ओळखण्याची पैज लावावी––परंत

नखरा--अरे बापरे--वर्णन करण्यापेक्षां संध्याकाळीं अर्धातास नव्या पुलावर जाऊन बसा म्हणजे कळेल—!

× × ×

आईस्क्रीमची अर्धी प्लेट खाल्ली कीं झांली थंडी—दोन सिंगल चहा घेतला कीं झाली गरमाई-- आतां तुम्हीच सांगा--ह्या स्त्रिया संसाराला कशा टिकणार--! नवऱ्यानें प्रपंचाकरतां बाहेर पाहावें--कीं बायकोच्या प्रकृतीकरतां घरीं राहावें ? पुन्हां 'तिची' मिजास संभाळावी कां संसारखर्च भागवावा ? पातळाचा हट्ट पुरवावा कां घरांत धान्य भरावें ? सिनेमा-नाटकांची भरती करावी कां दूधवाला संभाळावा ?,,माहेरपणाचा प्रवासखर्च सोसावा कां खानावळीच्या डब्यांचीं बिलें भरावींत ? इतकें करायलाहि मागें पुढें माणुस पाहाणार नाहीं--परंतु एकादं दुसरं बाळंतपण होतांच—ज्या तक्रारी सुरूं होतात--त्या म्युनिसिपालिटीच्या विरुद्ध जाणाऱ्या तक्रारी-अर्जांच्या संख्येच्या वर—आज कंबर गेली—खोकला सुरूं झाला—पाठ दुखते--पायाला गोळे येतात—बारीक ताप येतो--तोंड कडू पडतें—पुन्हां डॉक्टर म्हणतो कोरड्या हवेवर पाठवा--मुसंबीं घ्या—लिव्हर extract घ्या—दोन दिवस कुठें तक्रारी बंद झाल्या म्हणून समाधान मानावें--तोंच भडाभड ओकाऱ्या सुरूं ! दाढीची वाढ आणि तक्रारी ! स्त्रियांच्या तक्रारी कितीहि दूर करण्याचा प्रयत्न केला तरी व्यर्थ आहे--बोलून चालून जपानी माल—टिकणार किती दिवस ?—

× × ×

गृहकृत्याकडे पाहावें--अंधार—आवडता पदार्थ कधीं करतील --नांव नको--हीं विश्रांतिगृहें ओस पाडण्याकरतां प्रथम लुंगीवाल्या स्त्रियांनीं 'ताजे पदार्थ परंतु लज्जतदार पदार्थ' करण्याकडे

लक्ष दिलें पाहिजे--मुलें संभाळायला नको—सिनेमाला जातांना तीं सुद्धां नवऱ्याच्या बोकांडीं—कपड्यांचा शोक नि वाचनाचा शोक—इतका कीं आधुनिक 'स्त्री' म्हणजे 'चालतें बोलतें कापडाचें दुकान नि फिरतें वाचनालय' असें म्हटलें तरी चालेल. जिभेच्या तुफानी—जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन तयार—तें तुमचें शरीर--तुमचें सौंदर्य--तुमचा दिमाख--राखण्याकरतां--तुम्ही वाटेल तें करून पैसा मिळवा—पुरुषापुढें हात पसरूं नका--आम्ही तुमच्या वाटेला जाणार नाहीं--तुम्ही आमच्या वाटेला जाऊं नका-- 'लग्न करणार नाहीं' असें मोठमोठ्यानें ओरडून 'गुपचुप' रजिष्टर लग्नें करूं नका--आम्ही कांहीं एक बोलणार नाहीं--पुरुषाचा द्वेष करणाऱ्या स्त्रियांनीं—खुशाल लग्न करूं नये—परंतु हें होणें शक्य आहे का ? सूर्याला म्हटलें उगवूं नको ? चंद्राला म्हटलें थंड राहूं नको ? भेळेला सांगितलें 'तोंड खवळूं नको.' संपादकाला सांगितलें 'टिंगल करूं नकोस'—गवयास सांगितलें 'गाऊं नकोस'—असें होणें शक्य नाहीं—आम्हां लंगोटबंद तरुणांना पाळणेवाज व्हायचें आहे—स्त्रियांना लग्न नको असेल--पुरुषांना तीं हवीं आहेत. आम्हांला आतां 'लुंगीवाल्या पाहिजेत कां कांसोट्यावाल्या हव्या आहेत' हाच प्रश्न आहे--ह्या प्रश्नाचें उत्तर ज्याचें त्यानें सोडवून घ्यावें-- !

चष्म्याचे व्यापारी

मुंबईला मी जेव्हां जेव्हां जातों, तेव्हां तेव्हां माझा एक व्यापारी मित्र नेहमीं प्रश्न विचारतो, 'आतां एकदां घ्या नंबर आणि करा खरेदी चष्म्याची.' त्याच्या प्रश्नाला मी अगदीं ठराविक उत्तर देत असें. 'अगदीं नक्की पुढच्या वेळेला.' असें होतां होता वर्षा-दीड वर्षाचा काळ लोटला, आणि अखेर एका खेपेस त्यांनीं माझ्या कॉलरचें टोक धरून थोडेफार प्रेमानें विचारलें, 'आचरटपणा पुरे करा, डोळे तपासून घ्या, सवड नसली तर केव्हांही पैसे द्या; पैसे देण्याची इच्छा नसेल तर देऊं नका—परंतु आतां मात्र दिरंगाई करूं नका.'

मित्राचा आग्रह नि आपुलकी पाहातां मी धंदेवाईक गिऱ्हाइकाप्रमाणें सतावून सोडलें आणि शेवटीं सांगितलें, 'मला जो चष्मा हवा आहे, तो तुझ्याजवळच काय, परंतु उभ्या मुंबईतही सांपडेल कीं नाहीं, ह्याबद्दल मला दाट शंका आहे.'

त्यांनीं मला मारुतीसारखा हात जोडून नमस्कार सुनवला आणि मी आतां बाहेर जावें, फार वेळ बसूं नये म्हणून एक पीयूष आणि एक 'कॅमल'ची ऑर्डर दिली. अजूनही मला तो हट्टनों विचारतो, 'असा चष्मा आहे तरी कुठें?' मी हसतों आणि उत्तर देतों, 'ह्या जन्मीं तरी तुझ्या दुकानांत विकला जाणार नाहीं.'

× × ×

व्यापारासंबंधीं माझें अज्ञान जरी भरपूर असलें, तरी एका गोष्टीबद्दल मला अलीकडे तीव्र जाणीव होऊं लागलेली आहे कीं, ज्या वस्तूची वाण तिचा पुरवठा केला पाहिजे—निदान तिचा पत्ता आणि भाव कळविला तरी व्यापारधर्माचा पहिला धडा समजला म्हणून समाधानाचा श्वास टाकीन! मला व्यापार करावयाचा आहे तो असा

करावयाचा आहे कीं एकदां मी जी जिन्नस–वस्तु गिऱ्हाइकाच्या ताब्यांत दिली ती त्याला जन्मभर पुरावी आणि त्याच्या हसऱ्या व आनंदी चेहऱ्याकडे पाहिलें, कीं समाधानाचा चेक मनाच्या मनोहर पेढीवर वटावा !

माझ्या ह्या व्यापारी वृत्तीकडे पाहून घेलाशेट हसले, माझ्या ह्या मनोरचनेचा धिक्कार शेअरबझारमधील गुजराथी शेठिया करील, परंतु ज्याला जगावयाचें—ज्याला नुसतें जगावयाचें असें नव्हे, तर अंत:करण आणि माणुसकी जिवंत ठेवून जगावयाचें आहे, त्या माणसाला ह्या माझ्या वृत्तीचे सूर कानीं पडतांच त्याच्या निस्तेज गालाला खळी पडेल आणि किंचित् हंसऱ्या चेहऱ्यानें आणि ओलावलेल्या डोळ्याला हात लावून म्हणेल, 'जगांत माणसाला जगावयाची सोय आहे खरी;' परंतु ती करून घेतली पाहिजे असें म्हणावयाचें आहे मला. जिथें सोय आहे, तिथें तिचा भरपूर उपभोग घ्यावयाचा, आणि जिथें नसेल, तिथें ती करून घ्यावयाची असेंच म्हटलें तर नाहीं का चालायचें ? सकाळच्या प्रहरीं गरम चहाबरोबर खुसखुशीत खारी असलीं, तर बहारीचीच गोष्ट आहे. परंतु नसली तर नाक फेंदारून आणि वस्सादिशी सौ.वर रागावून न बसतां संसारांतील खाऱ्या व गोड्या अनुभवाचीं बिस्किटें दांतांखालीं घालून चहाचा गरम घोंट घेण्यांत कमी कां मजा आहे ? प्रवासाकरितां सवड व पैसा नाहीं म्हणून तक्रार करणाऱ्या माणसानें आमच्या पाठीमागचें घर मेल्याशिवाय सुटणार नाहीं असे उदास उद्‌गार काढण्यापेक्षां इंग्रजी चित्रपटासोबत दाखविण्यांत येणारे विविध व मनोहर शहरांचे देखावे कां बरें पाहण्याचें सुख उपभोगूं नये ? आपल्या कुरूप पत्नीच्या चेहऱ्याकडे पाहून-संसाराचा 'गोलपिठा' करण्याऐवजीं-संध्याकाळीं ज्या ठिकाणीं सुंदर सुंदर मुली फिरावयास येतात, तिथें जाऊन निदान दृष्टिसुख तरी कां उपभोगूं नये ! सुंदर स्त्रीकडे पाहण्यानें नीति बिघडते असें थोडेंच आहे !

नीति बिघडली, तरुण आचरट झाले, नवमतवाद नंगा नाच घालूं लागला, असे उद्गार काढणारे 'कृष्णराव'—रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या तरुणींकडे पाहाण्याऐवजीं देवळांचे कळस आणि उघडे-बोडके जाणारे भटजी—आणि रहदारीचा बंदोबस्त करणाऱ्या शिपायांकडे कां पाहतात! आपल्या उनाड व व्रात्य मुलावर तोंडसुख घेणाऱ्या आईबापांनासुद्धां माझें सांगणें आहे, जें आपल्या मुलांत चांगलें आहे त्याची वाहवा करा, आणि भोंवतालीं असणाऱ्या गुणी मुलांच्याही पाठीवर कौतुकानें हात फिरवा—'एखादे वेळेस'—होतां होतां—असें होईल कीं कालांतरानें तुमचींच मुलें—त्या पंक्तींत बसून तुम्हांला धन्य करतील! सांगण्याचा हेतु आहे तो हा कीं, रडूं नका—हें माझ्याजवळ नाहीं; आतां काय करूं! लहान मुलासारखे आपले का हट्ट पुरविणार आहे कोणी! माझें उलट असेंच म्हणणें आहे. आपणच रडायला शिकलें पाहिजे आणि स्वतःचें समाधानही आपल्यालाच करतां आलें पाहिजे. जोंपर्यंत आपल्याला असें वागतां येत नाहीं, तोंपर्यंत अजून जीवनाची जाई-जुई फुलली नाहीं असें समजलें पाहिजे. 'हें नाहीं, तें नाहीं' अशी जीवनाला जाळणारी वृत्ति नाहींशी करून टाकण्याचा प्रयत्न करायला हवा! जें मागितलें, जें हवे तें मिळालें, तर जीवन कसलें! ठाऊक असेल तुम्हाला, इच्छा तृप्त करितात त्या मृताच्या, जिवंत माणसाच्या नव्हे. जिवंत माणसानें झगडलें पाहिजे. जें नाहीं, त्याच्यासाठीं आणि जें हातीं आहे तें आनंदानें राबविण्यासाठीं!

× × ×

समजलें असेल तुम्हांला मला काय म्हणावयाचें आहे तें? नाहीं, छे, असें मुळीं व्हावयाचेंच. मी काय म्हणत होतों तें असेंच ना, कीं रडूं नका; पदरीं जें आहे तें भरपूरही समजूं नका, परंतु सुखानें नांदा! परंतु असें जगण्यासाठीं माणसाला

दृष्टि यावयाला पाहिजे, असें वारंवार मी म्हणतों. अशा दृष्टीचा चष्मा स्वतः तयार करून घ्यावा लागतो; तो विकत मिळत नाहीं; माझ्या दुकानदार मित्राला मीं दिलेल्या उत्तराचा अर्थ तुमच्या लक्षांत एव्हांना यावयाला हवा– ! माझ्या ओळखीचीं कांहीं कांहीं माणसें आहेत, त्यांची जर मी तुम्हांला हकीकत सांगितली, तर तुम्हांला कौतुक व दुःखंही वाटेल ! दुःख कशाकरितां, आणि कौतुक कशासाठीं, हें तुम्हांला मी हकीकत सांगितल्याशिवाय कसें कळणार ?

× × ×

माझ्या ओळखीचें एक जोडपें आहे; सुंदर आहे त्याची बायको. हेवा वाटतो कधीं कधीं मला त्याच्या आयुष्याचा; मी मनांत एक प्रकारें त्याच्या ह्या भाग्याचा हेवा करीत असें. परंतु एक दिवस अचानक तो माझ्या घरीं आला व म्हणाला, ' स्वयंपाक, तो सुद्धां हिला करतां येत नाहीं ! फसलों लग्न करून !' एक दिवस त्याच्या प्रश्नाचें उत्तर देण्याची तयारी करावी म्हणून त्याला मलबार हिलकडे नेलें. डोक्यावर बर्फाची पिशवी ठेवून त्याला सांगितलें–– ' माझी बायको स्वयंपाक सुंदर करते. पत्करतोस ? ' नसेल येत स्वयंपाक, तर मुंबईत खानावळी काय कमी पडल्या आहेत ? कुठें चुकत होता तो ठाऊक आहे तुम्हांला ? त्याला वाटलें संसारसुख म्हणजे उत्तम स्वंयपाकसिद्धता—मला वाटतें, त्याला कोणी तरी सांगितलें पाहिजे, अशा तुझ्या व्याख्येचा फायदा अनेक ' मावशीबाई ' घेऊं लागल्या तर—? '

× × ×

तो लेखक होता. त्याला वाटे माझ्या लिखाणाचा बोलबाला व्हावा. माझे फोटो वृत्तपत्रांत छापून यावेत; परंतु खरोखरच त्याला

तें कांहीं एक जमत नसे; खरें सांगावयाचें म्हणजे तो एक जिवंत लेखक होता. जगणारा आणि जळणारा तो एक जीव होता. लिखाणाबद्दल त्याला मोबदला मिळत नसे. त्याला संपादकाच्या 'आभाराच्या' आशीर्वादावरच जगावें लागत असे. त्याचें हें शल्य तो वेळीं-अवेळीं माझ्याजवळ बोलून दाखवीत असे. असें वाटणें सहाजिकच आहे. सुंदर स्त्री म्हणून गवगवा व्हावा आणि लग्नही होऊं नये आणि जमण्याचा रंग दिसूं नये अशांतला प्रकार होऊन बसला. एक दिवस तो घरीं नाहीं असें पाहून मी घरीं गेलों. त्याच दिवशींच्या अंकांत त्याची गोष्ट प्रसिद्ध झाली होती. त्याच्या बायकोला मीं सांगितलें, 'वहिनी, गोष्ट वाचली; तुम्ही वाचा आणि त्याचा मोबदलाही भरपूर लेखकाला पावता करा'! आठ पंधरा दिवसांच्या अंतरानें मला तो भेटला आणि म्हणाला 'मरेपर्यंत लिहिणार.'

'कां रे? मोबदला देण्याचें कुणीं कबूल केलें वाटतें?'

'छट्! परवांच्या गोष्टीचा मोबदला मला इतका भरपूर मिळाला म्हणून सांगू!'

"'काय' म्हणतोस काय?

'तिनें गोष्ट वांचली—तिनें आपले रेशमी हात माझ्या हातांत दिले, पाणीदार डोळ्यांनीं पाहिलें आणि ह्यापेक्षां कुठला फडतूस संपादक अधिक मोबदला देऊं शकणार आहे सांग? माझें तरी हेंच सांगणें आहे अशांना. अशा रीतीनें समाधानाचीं कारंजें आयुष्याच्या बागेंत निर्माण होऊ 'द्यात' एवढंच!'

× × ×

जगांत हीच हाकाटी आहे. मुलें आहेत ज्यांना, त्यांना वाटतें कशाला हीं कार्टीं जन्माला आलीं आहेत, आणि ज्यांना नाहींत, ते म्हणतात घर कसें ओसाड दिसतें! सुंदर मुलींचे बाप म्हणतात नटून

थटून ह्या पोरी बाहेर कां पडतात? तरुण म्हणतात—अलीकडे मुली फिरायला ह्या बाजूला नटूनथटून कां येत नाहींत ? सिनेमागृहांतील गर्दी पाहून ती हटवावी म्हणून पोलिस येतात, आणि अशा गर्दीत घुसून गोड धक्के मिळण्याची संधि दवडली जाणार म्हणून तरुण निराशेचे निःश्वास टाकतात ! मुलाला खूप शिकवावा आणि हुंडा उकळावा असें बापाला वाटतें. मुलीच्या बापाला थोडक्यांत जमलें तर बरें होईल— असें त्याला वाटतें ? शिकून काय, शेवटीं भाकरीच भाजणार ना—असें आई म्हणते—आणि मुलांची आई म्हणते मला सून हवी ती अगदीं सुशिक्षित. शिक्षकाला वाटतें मुलांनीं गप्प बसावें. मुलांना वाटतें दांडगाई करावी ! गिऱ्हाइकाला वाटतें दोन पैसे मिळवावेत. दुकानदाराला वाटतें, दोन पैसे कमवावेत—— ! कबूल आहे मला प्रत्येकाचें म्हणणें; परंतु माझेंही म्हणणें फार कांहीं नाहीं; सोय जाणावी व जगावें ! गिऱ्हाइकालाही वाटलें पाहिजे, मी जगलों आणि दुकानदारालाही समजलें पाहिजे माझें भागलें; शिक्षकाला वाटलें पाहिजे शिस्त 'राखली,' मुलानांही वाटलें पाहिजे आम्ही दांडगाई केली. हें जमणार कसें ? जमवून घतलें पाहिजे ! दृष्टि तयार करायला हवी. मागें एकदां मीं सांगितल्याचें मला आठवतें कीं स्वतःचा चष्मा स्वतः तयार करून घ्यावयाला हवा. तेंच मला सांगावयाचें कीं, स्वतःच व्यापारी बना आणि गिऱ्हाइकही स्वतःशींच पटवून——हंसत हंसत डोळे झांका.

गांवठी रेझर आणि सेफ्टी रेझर : : ६

—सार्वजानिक सभेच्या दिवाणखान्यावरून जो दत्तमंदिराला रस्ता जातोना--त्या रस्त्यानें–मी दत्ताला दर गुरुवारीं जात असें--एक दिवस त्या बाजूला राहणाऱ्या दोन वेश्यांमध्यें भांडणें सुरूं झालीं. दोघींनींहि--एकमेकांवर तोंडसुख घेतलें—आणि शेवट दोघींनींहि एकमेकींला बजावून सांगितलें—'लाज सोडून बाजारांत बसली--ठाऊक आहे तुझी लायकी--मीं नाहीं अजून तुझ्यासारखी लाज सोडली'--प्रमाणांत फरक पडेल–परंतु लाज सोडल्याशिवाय का ह्या वेश्या झाल्या ? उद्यां एकाद्या नाटक कंपनीच्या मालकानें सांगितलें कीं मी--उधारी ठेवत नाहीं--नटानें सांगितलें मी थापा मारीत नाहीं–आपल्या 'मंडळीकरतां' मालकाला न कळत पास मागून घेत नाहीं--रस्त्यांतून हिंडणाऱ्या नि दुकानांत बसणाऱ्या टग्यांनीं सांगावें आम्हीं चेहेरे न्याहाळीत नाहीं–पटेल कां हें तुम्हाला ? माणसामाणसांमध्यें फरक आहे--परंतु माणूस कांहीं जनावर होऊं शकणार नाहींना ? अगदीं अलिकडला बी. ए. बी. टी —एस्. टी. सी घेतला–नि पूर्वीचा तात्यापंतोजी मास्तर (हरेराम) घेतला--तरी दोघेहि मास्तरच (मेलों) फरक इतकाच—एक गांवठी रेझर--नि दुसरा सेफ्टी रेझर—एक ५०१ न्हानेकां शाबुन--दुसरा–पीयर्स–एक चंपीवाला--दुसरा मसाज करणार—एक कुलपी मलाई—दुसरा लर्कींतलें आईस्क्रीम--परंतु दोघेहि मास्तरच ! दोघी नायकर्णींनीं लाज सोडली—परंतु प्रमाण निराळें —दोघेहि शिक्षक—दोघेहि 'सर'—दोघेहि 'इश्य सर,' 'अय्या सर,' 'सर सर.'

× × ×

आयुष्यांत माणूस कांहीं कांहीं गोष्टी विसरण्याचा प्रयत्न करील–

परंतु--लहानपणीं पडलेल्या खोका--आणि वेळींअवेळीं वस्सकन् कुत्र्यासारखा ओरडणारा मास्तर कोणी कधीं विसरेल कां ! गणित चुकलें 'चल हात पुढें कर'--घरचा अभ्यास विसरला ' चल गाल पुढें कर'--उशीरा आला--'बाकावर उभा राहा' --' दंगामस्ती केली--' उठाबशा काढ '--वह्या विसरल्या--' भिका मागा-- ' हजामती करा ' असले शेलके शब्द ! मुलांना शिकवितांना आणि शिक्षा करतांना ' मर कारट्या '--' दगड आहेस तूं ' ' हमाल आहेस '--' बाप खायला घालतो ना फुकटचं '--' टांगेवाला होशील ' ' महार आहेस '--' चांभार आहेस '--' न्हावी आहेस ' --असल्या एकाद्या मवाली नि अशिक्षित माणसाच्या तोंडीं सुद्धां जे शब्द येऊ नयेत त्या शब्दांनीं--मुलांच्या कोंवळ्या मनावर आघात करणारे मास्तर, कधीं तो जन्मांत तरी विसरेल कां ? मुलांच्या कपाळीं आडवें गंध पाहिलें--' कां मास्तरला घरीं हात ओला करायला बोलावलें असतें तर भिक लागली असती ?--' एकाद्या शेटजीच्या मुलाला उद्देशून ' सांगा--घरीं मास्तर म्हणतात-- गणित कच्चें आहे--' ' शुक्रवार आला सांग पैसा पैसा आणायला ' --मुलांच्या पुस्तकांत खा कमीशन--ओळखीच्या मास्तरांकडे जाऊन चढव मार्क-हेडमास्तराच्या घरची आण भाजी-मुलांना संभाळ--वरिष्ठाच्या लग्नामुंजींत--वाढण्याचें कर काम--भटजींना दक्षिणा वाटण्याकरितां कर लुडबुड--पास झाल्यावर माग बक्षिसी --असल्या वृत्तीच्या मास्तरांना कोण विसरणार--वरं बाबाचा पोषाक --अहाहा म्यु. पालिटीचा मुकादम बरा--देवळांत पूजा करणारा पुजारी बरा--चक्कीवर काम करणारा हमाल बरा--मारवाड्याकडचा कारकून बरा--परंतु आमचा शामा--आमचा शिक्षक--आमचा सरस्वतीचा हा पंड्या--बाळयाचा चेहरा--ज्याचें डोकें म्हणजे मुसल-मानाच्या घरचीं कल्हईचीं भांडीं--आणि त्यांत पुन्हां ' खवड्या-मुळें खरबुजा-' सारखा होणारा भास--पेंटरच्या ब्रशाइतकी राठ-

कधीं तेलाचा हात न फिरणारी, विसकटलेली—चोरीसारखी शेंडी—मूळव्याधीची व्यथा—रक्ती आव—गजकर्ण नायटें—इ.पी.डेमुळें—चेहऱ्यावर आलेली कसबा पेठेंतील तळमजल्यावरील कोणत्याहि खोलीची कळा—अंगांत सदरा, प्रेताला वापरण्यांत येणाऱ्या शार्टिंगचा—मंडईच्या हातगाड्यावर २१ तास भांडून पैशासाठीं ५ पौंड वजन कमी करून—चोळखण आळींतील कोणत्याहि शिंप्याडूकन शिवलेला—कोट, गुडघ्यापर्यंत लांब—रंग—टांगेवाल्याच्या कपड्यासारखा—दुधावर येणाऱ्या सायीप्रमाणें कॉलरवर जमणारी मळाची 'डांबरी मलाई'—दहा गुंड्यांतील एक गुंडी—तीहि ढिली झालेली—धोतर, रात्रीं हातरुणावर चादर नि दिवसा धोतर—रुमाल—कानपिळ्याचा, मानाचा मिळालेला—किंवा कुणीहि दुखवट्याच्या दिवशीं बांधलेला. पायतण—कुडमुडी देऊन विकत घेतलेले—बिचाऱ्याच्या खिशांत रुमाल—नांव काढू नका. वर्गांत शेंबूड आला किंवा शिंक आली कीं धोतर वरती घेऊन (शंभो शिवहर—शारदेंतील एक पद)—मग 'हरेराम' करीत तोंड स्वच्छ करायचें—दोन महिन्यांतून एकदां दाढी—एकदां सावण—तुम्हींचें सांगा—असा हा प्राणी कसा विसरेल! चुकून जर कधीं हर्षवायु झाला तर हंसणार—बिचाऱ्याची पैशाची आणि हंसण्याची गांठ—मुरदाड मनोवृत्तीमुळें कधींहि पडत नाहीं! आम्हाला एक मास्तर होते—नांव सांगत नाहीं त्यांचें मी. अलिकडे—गंधाचे रवे—जानवी जोड—आणि फावल्या वेळांत भिक्षुकी आणि वाढण्याचें काम करतात—गंमत सांगणार आहे त्यांची. मी—शिकवणीला जात होतों—त्यांनीं बरोबर सात वाजतां आम्हांला बोलावयाचें—आम्हींच दारावर थाप मारून मास्तरला रोज घरांतून उठवायचें—'अग ए ऊठ—' मास्तरानें म्हणायचें '—तुम्हींच उठा—' सौ. वतीचें उत्तर—'अग शिकवणीला मुलें आलीं आहेत.'

'स्वयंपाकघरांत घेऊन बसा'--सौ. नें उत्तर द्यावें--'आलों हं--' आम्हांला सांगावें--मास्तर धोतराच्या निऱ्या करीत--आळोखे देत--दार उघडीत--'हें पाहा मुलांनो--स्पेलिंग पाठ करा--आणि हीं उदाहरणें सोडवा'--कानांत जानवें आणि हातांत माती घेऊन येतांना सांगावयाचें--'नीट करा उदाहरणें--पुढलीं आणखी दोन उदाहरणें करा--' हातांत मंडईची झोळी घेऊन बाहेर पडतांना--'शुद्धलेखन लिहा. आलोंच' --मंडईतून आल्यावर 'शंख आहांत--शिकायला नको--अभ्यास करायला नको--मास्तर काय रडणार--' इंतक्यांत आठचे ठोके--'वरं आतां उद्यां लौकर या' संपली शिकवणी--कसा वाटणार आदर असल्या शिक्षकाबद्दल--शाळा सुटल्यावर शिकवण्या--घरीं झोपेंपर्यंत शिकवण्या--त्याहि असल्याच प्रकारच्या--मारवाडी आणि मास्तर--स्वयंपाकीण आणि भिक्षुक--ह्या जातींत सुधारणा व्हायला--पुन्हां सृष्टि नवीन व्हायला पाहिजे--पोटासाठीं सारींच माणसें धडपड करतात--मुलांना मास्तर म्हटलं कीं--'चार हात दूर.' असें वाटतें--पूर्वीहि वाटत होतें नि अजूनहि वाटत आहे--सूट बूट घालणारे--शिक्षणतज्ञ म्हणून मिरवणारे मास्तर अजूनहि मनानें मास्तर आहेत--फार थोडे--बोटावर मोजण्याइतकें--खऱ्या सौंदर्याप्रमाणें तुरळक दिसणारे--असे अध्यापक फार थोडे आहेत--ज्यांच्या जीवनाच्या आशा पार खुरटलेल्या आहेत, अशांचा भरणा फार--'कांहीं जमलं नाहीं--होतों मास्तर' 'सुट्या भरपूर--बरं दिसतंय् होतों मास्तर'--फार मोठी घोडचूक--हिमालयायेवढी चुक होती आहे!--आंबलेल्या दुधानें कधीं शरीर पोसलें जाईल कां? रोगट आईच्या दुधावर पोसलेलें मूल कधीं सशक्त होईल कां? कोयता घेऊन झाडाच्या फांद्या नुसत्याच तोडणारा, बाग कशी फुलविणार?--कागदी फुलांचा गुलकंद तयार कसा होणार? वेलदोड्यानें मी थंड आहे म्हणून हिमालयाचा

अधिकार तो माझा अधिकार, असें म्हणण्यांत काय शहाणपणा आहे ! श्रीखंडासारखा रंग आहे म्हणून पिठल्यानें घमेंड मारावी ! हातांत काठी आहे म्हणून गुराख्यानें मी शिक्षक म्हणून म्हणावें ! टाम्याटोनें मी लाल म्हणून उगवत्या सूर्यबिंबाची बरोबरी करावी !—शिक्षकानें मी सूटबूट घालतों—बी. टी. आहे—म्हणून—" up-to-date " शिक्षक म्हणून म्हणावें—पूर्वीच्या शिक्षकांत नि अलिकडच्या शिक्षकांत फरक—रेझरइतका—एक गांवठी नि दुसरा सेफ्टी—! माझी अशी तक्रार आहे—प्रथम शिक्षकानें आपलं मन फार मोठें केलें पाहिजे—तें मन तयार करीत नाहींत—भिक्षुकवृत्तीनें वागतात—म्हणून ' मास्तर म्हटलं कीं वांती होते—दारिद्र्य मला कबूल आहे——अर्धपोटी राहणारा माणूस हंसणार कसा ? हाहि सवाल मला कळतो——अर्धचंद्र—— चंद्राची चिमुकली कोर—शांत प्रकाश देतेच ना ? डबक्यांत सांच-लेल्या पाण्यावर हास्याचे तरंग उमटतातच ना ! पैसा नाहीं म्हणून मजूर हंसत नाहीं कां ? उपाशीं पोटानें चहापावाशीं गांठ असणारा अभागी, फुटपाथवर घोरत शांत चित्तानें झोंपतोच ना ! माझी खात्री आहे—मनाची श्रीमंती ही पैशाप्रमाणें न मिळणारी चीज नव्हे—परंतु ती अंगीं बाणून घेण्याचा प्रयत्न कोण करतोय्—— थोडे फार चिडून आणि खात्रीनें म्हणतो—भरपूर पगार मिळाला तरी हंसणारा आणि कुरकुर न करणारा शिक्षक मिळणार नाहीं—— तिजोरींत पैसा भरपूर असतो——म्हणून कुलूप कां कधीं हंसतें ! हंसलें कीं——तिजोरी मोकळी होऊन——जागा रिकामी पडेल ही भीति——! ——भाडोत्री तरी हास्य चेहऱ्यावर झळकू द्या ?——आणि तुमच्या पुढें बसणारी——सोनचांफ्याचीं फुलें—फुलूं द्यात !——

राम बोलो भाई राम : : ७

—एका सज्जन गृहस्थानें मला प्रश्न विचारला 'कां हो वाडेकर —तुम्ही लेखक आहांत—तेव्हां सांगा पाहूं—हे कवि लोक तरुणी, —त्यांतून सुंदर अशा तरुणींकडे पाहून काव्य कां करतात—?' प्रश्न खरोखरच मला मार्मिक वाटला—परंतु उत्तर मात्र मीं दिलें नाहीं —कल्पना खरी आहे—सारेच तरुणींच्या गुलाबी गालावर कां गर्दी करतात ? 'प्रेम' म्हणून जी काय चीजवस्तु आहे—त्यावर कां हल्ला करतात ? दोन जमले—लग्न झालें—सुखानें संसार करूं लागले —समाजाला जमल्यास शिव्या—वेळप्रसंगीं उपदेश—अशा ठराविक चाकोरींतून—जाणाऱ्या लेखकांचा मला मनस्वी राग येतो —आतां खरं सांगा "कचऱ्यास पाहून कुणी कविता केली आहे कां ?—'उकीरडा' पाहून कवीला कांहींच वाटलें नसेल कां ! काळ्या कभिन्न मुलीकडे कवीनें कधींच पाहिलें नसेल कां ?— संवय लागली आहे गादीवर बसावयाची—घोंगडीवर कसें बसवेल—? संवय लागली सायकलची—पायीं कसें हिंडवेल—? फुकट वाचनाची संवय लागलेला माणूस पैसा टाकून वर्तमानपत्र कसें विकत घेईल ? उधारीनें माल आणणाऱ्या संसारी माणसाला रोखीचा व्यापार कसा मानवेल"! उमेदवार दाराशीं गर्दी करत असतांना पगारी नोकर कोण ठेवील ? पण खरोखर गंमत आहे ती त्यांतच. ज्या रस्त्यानें आपण जात नाहीं—त्या रस्त्यानें जाण्यांत—नवीन जग दिसेल—अनुभव येईल—आणि काय ?—मी सुद्धां थोडासा अशाच मार्गानें जाणार आहे—माझें मनोराज्य तरुणींच्या पोटऱ्याभोंवतीं नाहीं—त्यांच्या गालाभोंवतीं नाहीं—माझें मनोराज्य

कदाचित् तुम्हाला धक्का बसेल--पण सांगतोंच आतां--जेव्हां जेव्हां 'राम बोलो भाई राम' हे शब्द माझ्या कानांवर येतात तेव्हां तेव्हां माझ्या डोळ्यांपुढें माझ्या मरणाचें मनोहर चित्र उभें राहतें--'खरंच'--मी जर मेलों तर'--काय होईल ?

× × ×

सांगू--फार दिवस आजारी असलों तर 'सुटला एकदांचा बिचारा' असे उद्गार काढतील--'एकाएकी खत्म झालों'--हरीची इच्छा म्हणून कपाळाला हात लावतील--तें कांहीं झालें तरी--प्राण गेल्याबरोबर एकदम रडारड सुरूं होईल--पांच मिनिटें फार तर अर्धा तास--रडून रडून कंटाळल्यावर एक-एक रडण्याचें थांबतील--बायका-माणसें--अधूनमधून उमाळे देऊन रडतील 'पुरे--आतां काय उपयोग--आतां अगदीं आवर घाला दुःखाला' असा ठराविक उपदेश करतील--पुढें म्युनिसिपालिटीचा पास--—सामानाची बांधाबांध-तयारी झाल्यावर-पुन्हां 'नेण्या-करतां' आल्यावर रडा-रड--बायको असल्यास 'गळ्यांतील मंगळसूत्राची तोड'-आई असल्यास 'अरे कुठें चाललास ?'-बाप असल्यास 'अरे तुझ्या खांद्यावर आम्ही जायचें--' मोठा थोरला हंबरडा--भाऊ असल्यास 'दादा--अरे दादा--' खेळ खलास--! मुलगा असल्यास त्याच्या हातांत शिंकाळी--नसल्यास तोंडावर फडकें-स्मशान-लांकडें नि गोवऱ्या (सांगितल्यापेक्षां कमी आलेल्या) अशा सरपणांत जळण-कवटी फुटल्यावर--घरोघरीं परत.

× × ×

मी मेल्यावर-नारळ फुटल्यानंतर जसें पाणी तसें-स्तुतीचे पाठ घरोघरीं वृत्तपत्रांतून वाहूं लागतील--मी जर मोठा साहित्यिक

राम बोलो भाई राम : : ७

—एका सज्जन गृहस्थानें मला प्रश्न विचारला 'कां हो वाडेकर —तुम्ही लेखक आहांत—तेव्हां सांगा पाहूं—हे कवि लोक तरुणी, —त्यांतून सुंदर अशा तरुणींकिडे पाहून काव्य कां करतात—?' प्रश्न खरोखरच मला मार्मिक वाटला—परंतु उत्तर मात्र मीं दिलें नाहीं —कल्पना खरी आहे—सारेच तरुणींच्या गुलाबी गालावर कां गर्दी करतात ? 'प्रेम' म्हणून जी काय चीजवस्तु आहे—त्यावर कां हल्ला करतात ?—दोन जमले—लग्न झालें—सुखानें संसार करूं लागले —समाजाला जमल्यास शिव्या—वेळप्रसंगीं उपदेश—अशा ठराविक चाकोरींतून—जाणाऱ्या लेखकांचा मला मनस्वी राग येतो —आतां खरं सांगा "कच-यास पाहून कुणी कविता केली आहे कां ?—'उकीरडा' पाहून कवीला कांहींच वाटलें नसेल कां ! काळ्या कभिन्न मुलीकडे कवीनें कधींच पाहिलें नसेल कां ?— संवय लागली आहे गादीवर बसावयाची—घोंगडीवर कसें बसवेल—? संवय लागली सायकलची—पायीं कसें हिंडवेल—? फुकट वाचनाची संवय लागलेला माणूस पैसा टाकून वर्तमानपत्र कसें विकत घेईल ? उधारीनें माल आणणाऱ्या संसारी माणसाला रोखीचा व्यापार कसा मानवेल"! उमेदवार दाराशीं गर्दी करत असतांना पगारी नोकर कोण ठेवील ? पण खरोखर गंमत आहे ती त्यांतच. ज्या रस्त्यानें आपण जात नाहीं—त्या रस्त्यानें जाण्यांत—नवीन जग दिसेल—अनुभव येईल—आणि काय ?—मी सुद्धां थोडासा अशाच मार्गानें जाणार आहे—माझें मनोराज्य तरुणींच्या पोटऱ्या-भोंवतीं नाहीं—त्यांच्या गालाभोंवतीं नाहीं—माझें मनोराज्य

कदाचित् तुम्हाला धक्का बसेल--पण सांगतोंच आतां--जेव्हां जेव्हां 'राम बोलो भाई राम' हे शब्द माझ्या कानांवर येतात तेव्हां तेव्हां माझ्या डोळ्यांपुढें माझ्या मरणाचें मनोहर चित्र उभें राहतें--'खरंच'--मी जर मेलों तर'--काय होईल ?

× × ×

सांगू--फार दिवस आजारी असलों तर 'सुटला एकदांचा बिचारा' असे उद्गार काढतील--'एकाएकी खत्म झालों'--हरीची इच्छा म्हणून कपाळाला हात लावतील--तें कांहीं झालें तरी--प्राण गेल्याबरोबर एकदम रडारड सुरूं होईल--पांच मिनिटें फार तर अर्धा तास--रडून रडून कंटाळल्यावर एक-एक रडण्याचें थांबतील--बायकांमाणसें--अधूनमधून उमाळे देऊन रडतील 'पुरे--आतां काय उपयोग--आतां अगदीं आवर घाला दुःखाला' असा ठराविक उपदेश करतील--पुढें म्युनिसिपालिटीचा पास--—सामानाची बांधाबांध-तयारी झाल्यावर-पुन्हां 'नेण्याकरतां' आल्यावर रडा-रड--बायको असल्यास 'गळ्यांतील मंगळसूत्राची तोड'-आई असल्यास 'अरे कुठें चाललास ?'-बाप असल्यास 'अरे तुझ्या खांद्यावर आम्ही जायचें--' मोठा थोरला हंबरडा-भाऊ असल्यास 'दादा--अरे दादा--' खेळ खलास--! मुलगा असल्यास त्याच्या हातांत शिंकाळी--नसल्यास तोंडावर फडकें-स्मशान-लांकडें नि गोवऱ्या (सांगितल्यापेक्षां कमी आलेल्या) अशा सरपणांत जळण-कवटी फुटल्यावर--घरोघरीं परत.

× × ×

मी मेल्यावर-नारळ फुटल्यानंतर जसें पाणी तसें-स्तुतीचे पाठ घरोघरीं वृत्तपत्रांतून वाहूं लागतील--मी जर मोठा साहित्यिक

असलों तर खास अंक काढतील--कधीं न लिहिणारे लब्ध प्रतिष्ठितसुद्धां लेखक होऊं लागतील—

'असा लेखक पुढेंहि होणार' नाहीं असें, ज्या वृत्तपत्रांत मी लिहून कधींहि मोबदलाच काय पण ज्या अंकांत मजकूर प्रसिद्ध झाला आहे, तो अंक सुद्धां पाठविण्याची स्मृति राहिली नसेल--असे संपादक शब्दांचीं सुमनें वाहून माझें शव सजवतील--माझा ब्लॉक छापा म्हणून वारंवार विनंति करूनहि ज्यांनीं कधीं दाद दिली नसेल--तोच संपादक--१६ वर्षांचे असतांना--लेखन तंद्रीत, कुटुंबासमवेत--मित्रांच्या सहवासांत--शेवटचें दर्शन-हस्ताक्षर-आम्हांला आलेलें शेवटचें पत्र--अशा क्षुल्लक परंतु कृत्रिम पान्हा फोडणारे फोटोचे ब्लॉक करतील. कांहीं-कांहीं भंपक-ज्या गादीवर निजत होतों--ज्या सायकलीवर बसत होतों—ज्या कपानें चहा घेत होतों--ज्या रस्त्यानें जात होतों--ज्या दुकानांत गप्पा मारत होतों--त्याचीं सुद्धां छायाचित्रें छापतील--आणि आठवणी ना--विचारूं नका-रस्त्यांत ठेंच लागून घरीं पोहोंचविण्यासाठीं उपयोगी पडणाऱ्या वाटसरूपासून—तें न्हाव्यापर्यंत--न्हावी म्हणेल--दाढी करतांना कधीं मान हालविली नाहीं--गवळी म्हणेल कधीं दुधांत पाणी घातलें--असें म्हटलें नाहीं—हॉटेलवाला म्हणेल—सिंगल चहानि बनपाव शिवाय उधारी केली नाहीं—कापडवाला म्हणेल--साधे कपडे परंतु मागेन तो भाव देत असे--शिंपी म्हणेल किती थापा मारल्या तरी चकरा मारीत असत--ज्या मित्रांनीं उसनवार पैसे नेऊन कधींहि मला तोंड दाखविलें नाहीं तेच वर्णन करतील, आम्हांला अतिशय सढळ हातांनीं मदत केली—ज्या प्रकाशकांनीं मी जिवंत असेंपर्यंत पुस्तकाला खप नाहीं म्हणून ओरड केली—तोंच प्रकाशक-'पुस्तक तडाखेबंद खपत' असें असे कबूल करायला सोडणार नाहीं—ज्या खंदूस टीकाकारांनीं खाजगी—सभेंत-आणि मासिकांतून कधींहि माझ्या लेखनाचा गौरव लोक

नसेल त्या टीकाकारांच्या, गौरव गजकर्णाची कंड थांबणार नाहीं—नभोवाणीवर जाऊन माझ्या नांवानें टाहो फोडतील—माझ्या नाटकावर हजारो रुपये मिळवून—ज्या थापेबाज मालकांनीं 'फ्री पास, आणि सत्कार समारंभ—ह्या शिवाय मला कपर्दीकहि दिली नसेल—तोंच मालक 'आमचा अन्न दाता गेला' असा टाहो—स्वताच्या फोटोसहित फोडील—बुधवारचें नाटक बंद ठेवील—ज्या मित्रांनीं तपकिरीच्या चिमटीचा देखील माझ्यावर उपकार केला नसेल—तेच मित्र 'आम्ही—त्यांच्या कडू काळांत त्यांना मदत केली—परंतु मानी स्वभावामुळें त्यांनीं त्याचा स्वीकार केला नाहीं' असें दडपून जाहीर करतील. स्मारक फंड उभारतील——त्यांत स्वतःची चैनी—चहा पाणी उरकून——तो जमविण्यास——त्याकरितां पत्रकें काढण्यास—वाटेल ती खटपट करतील——साऱ्या वृत्तपत्रांतून मी मेल्याचें प्रसिद्ध झालें तरी——स्वतःला अत्यंत भारदस्त (भुक्कड)——गंभीर (सुताळ) —सडेतोड (बापजाद्यांनीं कमवलेल्या फंडाच्या आधारावर) म्हणाविणारे——संपादक माझ्या मृत्यूचा उल्लेख 'हें पत्र पुणें येथें प्रसिद्ध होऊन' ह्या मजकुराला जी जागा लागते—जी सहानुभूति शून्य कळकळ लागते——त्याच कळकळीनें—'ईश्वरी कोप' ह्या सदराखालीं छापून मोकळे होतील—साहित्यमंदिरांतील पुजारी जागे होतील——'अरे तो मेला ना—' भरवा सभा—हॉटेलांत जमतील—नव्या साहित्यिकाला तुझा लेख छापतो ह्या मिषानें गंडवून चहा उकळतांना—हॉटेलांत सभा साजरी करतील——दुःखवट्याचा ठराव——घरीं पाठवून——तयार केलेल्या भाषणासहित रिपोर्ट संपादकाकडे हेलपाटे घाल—घालून' छापण्याची व्यवस्था न चुकतां करतील—शाळेंतल्या चालकांच्या पाठीमागें लागून——'गुलजार मुलीकडून'——'भावगीतें' स्मृतिदिन प्रसंगीं म्हणून घेतील—स्वतःला लोकांनीं पाहावें नि आपली 'स्मृति अखंड राहावी म्हणून तिच्या मागें—मागें—कान गुंजन करून—प्रत्येक कवितेचा भावार्थ सांगून—

काव्यें म्हणून घेतील--जळीं-स्थळीं माझी 'वीरची बाटली' म्हणून निंदा करायला कमी केलें नाहीं तेच--नादान, नारायण स्वरूप धारण करून असें सांगू लागतील--औषधाला द्राक्षासव (आयुर्वेदिक फॉर्मसीचें) सुद्धां घेतलें नाहीं--शक्तिकरितां, गाईचें दूध आणि सुवर्ण मालिनी वसंत (तें सुद्धां धूत पापेश्वरचें)--माझ्या शीलाची ज्यांनीं 'भोकरवाडी' केली--तेच शिष्ट माझ्या शिलाला गंगेच्या पाण्याची उपमा देतील--विधवा स्त्री लेखिकेशीं विवाहबद्ध होणार म्हणून ज्यांनीं चौकांचौकांतून चकाट्यांचा चौघडा बडविला--तेच मुर्दाड भ्याड--पुनर्विवाहाचा ओझरता विचार सुद्धां त्यांचे मनांत आला नाहीं असें बेदरकारपणानें आठवणींतून कबूल करतील--जीवंतपणीं ज्यानीं स्वतःच्या बायकोला कधीं गजरा--दिला नसेल--जीवंतपणीं कधीं घरच्या देवाला फुलांचा रतीब लावला नसेल--तेच चाहाते (!) माझ्या प्रेताला 'बंडगार्डन' चें स्वरूप आणतील--ज्या कर्मचांडाळानें स्वतःच्या भावाच्या शवाला अग्नि देतांना डोळ्यांतून 'टिपूस' गाळलें नसेल--असें 'गाळीव,' बातमीदाराच्या कानावर हुंदके जाऊन आदळतील इतक्या तत्परतेनें रडतील--ज्यांनीं टेनीसच्या रॅकेटच्या लाकडाशिवाय आणि सायकलच्या कंदिलांत रॉकेल भरण्याकरितांच हात घाण केले--असें प्रसिद्धी आगाळून माझ्या शवावर--(हजर होते ह्या सदरांत नांव यावें ह्याच एकमेव हेतूनें) लांकडें रचून--रॉकेलचा अभिषेक करतील--बुडत्याला काडीचा आधार--ह्यांचीच 'री' ओढून प्रसिद्धीला काव्याचा आधार समजून अश्रूंची चूळ (क्षमस्व--अंजली) टाकतील--

× × ×

ज्या शिक्षण संस्थेंत किल्येक वर्षें 'कायम होईन' ह्या 'घसरत्या' आशेवर काढले--त्याच शाळेचे चालक 'कायम

नाहीं--म्हणून ' पहिले चार तास घेऊन सुट्टी देतील--- कायम झालों असतों तर संबंध दिवस बंद कदाचित् केली असती--- बदली किंवा तात्पुरता काम करणारा शिक्षक असतो तर ३० मिनि- टाचे सहा तास घेऊन---दुखवट्याची--सभा भरवून--त्यांचा रिपोर्ट झटकन येईल अशी व्यवस्था झाल्यावरच सुट्टी देतील--मुलें --सुट्टी मिळाली ' बरं झालें '---आतां पुन्हां केव्हां एकादा असा ' खत्म होतो ' म्हणून वाट पाहात बसतील--ज्यांना छड्या मारल्या असतील ते विद्यार्थी ' बरें झालें उखडला ' म्हणून फिदी- फिदी दांत विचकतील--शाळेचे मुख्य अध्यापक आपल्याभोवतीं पिंगा घालणाऱ्या मंडळींची ' सोय ' झाली म्हणून हर्षभरित होतील--ज्या शिक्षकांना कधींच लोकप्रिय होता आलें नाहीं--ते शिक्षक ' समाधानाचे श्वास टाकतील '---गडी वर्षाचें ' पोस्त ' बुडालें म्हणून तोंडें आंवट करतील--मास्तरवर खूष असणाऱ्या मुली मुळुमुळू रडतील--आणि ज्या ' फडतुस मुलीकडे ' कधींहि तिरव्या नजरेनें पाहिलें नसेल--त्या मुली--काय करतील तें ' तुज ठावें ईश्वरा. ' शाळेच्या त्रैमासिकांत फोटो छापतील--- ' नामवंत 'नी उत्साही ' ह्या विशेषणांनीं गौरवून-- ' संपली कामागिरी ' म्हणून हात झटकून मोकळे होतील.


× × ×

घरांत पाऊल टाकतांच टिप्याच्या आवेशानें अंगावर येणारी सौभाग्यवती--नवे-नवे-हट्ट कोण पुरविणार? प्रभातचे नवीन नवीन चित्रपट पहिल्या दिवशीं कोण दाखविणार? आईचीं गाऱ्हाणीं आतां कुणाच्या कानांवर घालणार? माहेरचीं माणसें घरीं कुणाच्या जोरावर येऊन नांदणार? एक तारखेला ' खिश्यांतून पांच दहा रुपये हातचलाखीनें ' काढून कसे घेतां घेणार? आणि शेवट मुलांची चैन आणि पुढचें वैधव्य कसें टिकवितां येणार? याविचा-

रानें कपाळाप्रमाणेंच अंतःकरण उदास करून—धाय मोकलून टाहो फोडणार ? ' बायल्या—–'—–' भांडकुदळ ' म्हणून टोचून बोलणारी आई—–'तुझ्या बापाचे आम्ही नोकर—–चाळंतपण करा—मुलांना संभाळा—–' म्हणून घालून पाडून बोलणारी आई—–' तुझें माझें पटायचें नाहीं—–तुझें तरी तोंड काळें कर—–नाहीं तर माझें तरी मी काळें करतें ' म्हणून वर्मी बोलणारी आई—आज माझा आधार—–माझ्या पोटचा गोळा गेला हो म्हणून हंबरडा फोडणार ! ' पुरे झालीं हीं थेर—–पुरे झाला हा नवमतवाद '—– पुरे झाली ही ऐट—तीस रुपयांवर येव्हढीं ऐट कशी करतोय तें पाहातोय—–हांकलून देतों—–हातांत हात घालून सिनेमाला काय जातो—सिगारेट काय ओढतो—वेळीं अवेळीं हिंडायला काय जातो—–फिदी फिदी हांसतो काय ?—–बाप जिवंत असतांना प्रेताला खांदे काय देतो—मिशा काय छाटतोस ' एकना हजारों शब्दांनीं अंतःकरण घायाळ करणारे बाबा 'पेन्शन् जप्त' झालें इतक्या उमाळ्यानें ढसाढसा रडतील !

× × × ० ०

वाचकहो—तुम्हांला नाहीं कां असे विचार सुचत ? ' राम बोलो भाई राम ' हे कर्णकटू शब्द कानांवर पडतांच मला माझ्या डोळ्यांपुढें सत्य आणि जिवंतपणीं कधीं न दिसणारें चित्र दिसलें ! वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्यावाईट अभिप्रायासारखे जर जगांत जिवंत असतांना असे अभिप्राय कळाले तर—–आयुष्याच्या बाजारांत किंमत चढेल तरी—–नाहींतर कायमची उतरेल तरी !—जीं तुम्ही अनेक मनोराज्यें करतां, त्यांत एक मरणाचें मनोराज्य करून कोणत्या कोणत्या विचारांचे आणि अनुभवांचे विंचू डंसतात तें तरी एकदां पाहा !



REFBK-0005969